म. ग्रं. सं. ठाणें.
विषय चरित्र
सं. क्र. ६५२

REFBK-0006726

म. ग्रं. सं. ठाणे.
ग्रं. नं. ९३३२
चरित्र (विभाग)
अं. ६५२



बा

# आमच्या बा

[ त्यांची जीवन-कस्तूरी ]


लेखिका

**वनमाला परीख**

**सुशीला नय्यर**

अनुवादक

**ना. ग. जोशी**



दा. क्र. ६०२६

REFBK-0006726



**नवजीवन प्रकाशन मंदिर**

**अमदाबाद**

मुद्रक आणि प्रकाशक
जीवणजी डाह्याभाई देसाई
नवजीवन मुद्रणालय, काळुपुर, अमदाबाद

प्रती २,२००

दोन रुपये

जुलै, १९४६

पूज्य महादेवकाकांच्या
चरणीं

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| दोन शब्द | गांधीजी | ३ |
| **भाग पहिला:** प्रसंगकथा | वनमाला परीख | ३–११० |
| १. जन्म आणि लग्न | | ३ |
| २. बांचा बाल-गृहस्थाश्रम | | ५ |
| ३. आदर्श सहधर्मचारिणी | | ९ |
| ४. संकटांतील सोबती | | १७ |
| ५. सत्याग्रहाच्या गुरु | | २१ |
| ६. अपरिग्रहाची दीक्षा | | २४ |
| ७. जोहानिसबर्गमधील बांचें घर | | २९ |
| ८. बांची दृढता | | ३२ |
| ९. बापूंना वांचविलें | | ३७ |
| १०. पहिल्या स्त्री-सत्याग्रही | | ३९ |
| ११. बांची शुश्रूषा | | ४३ |
| १२. बांचें इंग्रजी | | ४६ |
| १३. खादी-परिधान | | ४९ |
| १४. आश्रमाच्या बा | | ५२ |
| १५. हरिजनांच्या बा | | ५७ |
| १६. बांची दिनचर्या | | ५९ |
| १७. कर्मयोगी बा | | ६८ |
| १८. हरिलालभाई | | ७३ |
| १९. सार्वजनिक क्षेत्रांत | | ८३ |
| २०. निरोप | | ९७ |
| परिशिष्ट | | १०२ |
| **भाग दुसरा:** वात्सल्यमूर्ति बा | सुशीला नय्यर | ११३–२०० |
| **पुरवणी:** | | |
| १. अंत्येष्टि | देवीदास गांधी | २०१ |
| २. बा | गोशीबहेन कॅप्टन | २०८ |

# दोन शब्द

श्री नरहरि परीख हे सत्याग्रह आश्रमाची स्थापना कोचरब येथें झाली तेव्हांपासून त्यांत दाखल झालेल्या लोकांपैकीं *आहेत. तेव्हां चि. वनमालेला जें कांहीं शिक्षण, संस्कार मिळाले आहेत ते आश्रमांतच मिळालेले आहेत. तिला सरकारी शाळा आणि तेथें मिळणारें शिक्षण यांचा स्पर्शहि झालेला नाहीं. म्हणजे तिला मजुरी करतां येते असें मानावयाचें. पण तिनें तर कस्तूरबाच्या जीवनवृत्तांताची सामग्री एकत्र करण्याचें धाडस केलें आहे. त्यांत तिनें इतर मदत मिळविली आहे. ते इतर लेख, हें लिहीत असतांना मी पाहिलेले नाहींत. चि. वनमालेचें स्वतःचें लिखाण मी पाहून जावें, असा तिचा आग्रह होता. ती बिचारी लिहायला गेली कस्तूरबाविषयीं, पण माझ्याबरोबर बाळपणीं धांवलेली, खेळलेली ती मला कशी विसरेल? हकीकत कोनाकोपऱ्यांतून मिळवून ठीक जुळविलेली दिसते. तिची भाषा घरगुती आणि साधी आहे. त्यांत कुठेंहि मला कृत्रिमता नाहीं दिसली. एकंदरींत चि. वनमालेचा हा पहिला प्रयत्न सफळ झाला आहे कीं निष्फळ तें तर वाचकानें नक्की करावयाचें आहे.

चि. प्यारेलालची बहीण चि. सुशीलेनें बाचे जेलमधील अनुभव लिहिले होते. त्यांतून स्वतःच्या लेखांसाठीं कांहीं सामग्री घेण्याचा चि. वनमालेचा विचार होता; पण ते वाचल्यावर तिला वाटलें कीं बहेन सुशीलेच्या लिखाणांत स्वाभाविक कला आहे. तिचा भंग करण्याची तिला हिंमत झाली नाहीं. सुशीलेचें लिखाण मूळ हिंदींत आहे. त्याचें समग्र गुजराती या संग्रहामध्यें देण्यांत आलें आहे. बहेन सुशीला शेवटची डिग्री मिळविलेली डॉक्टर आहे.

त्याबरोबरच तिला गाण्याबजावण्याचा, चित्रें काढण्याचा आणि साहित्याचा षोक आहे. सार्वजनिक जीवनाची गोडी आहे. तिचे हे गुण स्व. महादेवानें पाहिले, आणि ते वाढविण्यांत त्याला आनंद वाटला. पण तो तर सगळ्यांना टाकून निघून गेला. हें जीवन त्यानें पूर्ण केलें. या दृष्टीनें वाचणाऱ्यानें चि. सुशीलेचा लेख पाहावा.

हें झालें लेखिकांच्याविषयीं.

पण दोघी म्हणतात कीं मी 'बा' विषयीं कांहीं सांगणार नाहीं तोपर्यंत हें पुस्तक अर्धवटच गणलें जाणार. ज्या अर्थी मीच या संग्रहाचा परिचय लिहीत आहे त्या अर्थी बाविषयीं कांहीं लिहून देणें कदाचित् योग्यच होईल. वेळ मिळाला तर सविस्तरपणें लिहिण्याचा माझा विचार आहे. येथें मात्र ज्यामुळें बानें जनतेमध्यें एवढें मोठें आकर्षण उत्पन्न केलें आहे, त्याचें कारण शोधतां आलें तर मी शोधावें म्हणतों. बाचा सर्वांत मोठा गुण म्हणजे केवळ स्वेच्छेनें माझ्यांत सामावून जाणें हा होता. हें कांहीं माझ्या ओढीनें झालें नव्हतें, पण स्वतः बामध्येंच हा गुण यथाकाल विकास पावला. हा गुण बामध्यें लपलेला आहे, हें मला माहीतहि नव्हतें. माझ्या सुरुवातीच्या अनुभवाप्रमाणें बा फारच हट्टी होती. मी दडपण घालावयाचें म्हटलें तरी ती आपल्या मनाप्रमाणेंच वागत असे. त्यामुळें आमच्यामध्यें क्षणिक किंवा दीर्घकालपर्यंत कडवटपणाहि राहत असे. पण माझें सार्वजनिक जीवन जसजसें उज्ज्वल होत गेलें, तसतशी 'बा' खुलत गेली, आणि पोक्त विचारानें माझ्यांत, म्हणजेच माझ्या कार्यांत, सामावून गेली. कांहीं काळानें असें झालें कीं माझ्यांत आणि माझ्या कार्यांत—सेवेंत—भेद राहिला नाहीं. तेव्हां बा देखील त्याच्यांत तदाकार होऊं लागली. हा गुण हिंदुस्तानच्या भूमीला कदाचित् अधिकांत अधिक

मानवत असावा. कांहींहि असो, बाच्या वरील भावनेचें मला तर हेंच मुख्य कारण वाटतें.

बामध्यें हा गुण पराकाष्ठेला पोंचला त्याचें कारण आमचें ब्रह्मचर्य हें होय. माझ्यापेक्षां बाच्या बाबतींत तें अधिक स्वाभाविक ठरलें. आरंभीं बाला त्याची धड जाणीव देखील नव्हती. मीं त्याचा विचार केला आणि बानें तें उचलून धरून आत्मसात् केलें. परिणामीं आमचा संबंध सच्च्या मित्रांसारखा झाला. माझ्या जवळ राहण्यामध्यें बाला सन १९०६ पासून, खरें पहातां १९०१ पासूनच, माझ्या कामांत मिळून जाण्याशिवाय किंवा त्याहून निराळें असें कांहींच करावयाचें राहिलें नाहीं. तिला वेगळें राहतां आलें असतें. वेगळें राहण्यांत तिला कुठलीहि हरकत आली नसती. पण तिनें मित्र होऊनहि स्त्री म्हणून आणि पत्नी म्हणून माझ्या कार्यांत सामावून जाण्यांतच आपला धर्म मानला. त्यांत तिनें मांझ्या व्यक्तिगत सेवेला अनिवार्य स्थान दिलें. म्हणून मरेपर्यंत माझ्या सुखसोयींवरील देखरेखीचें काम तिनें सोडलेंच नाहीं.

सेवाग्राम,
१८–२–'४५

**मोहनदास करमचंद गांधी**

# भाग पहिला

## प्रसंगकथा

ठाणे ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६५२६

# जन्म आणि लग्न

काठेवाडांत पोरबंदरास सन १८६९ च्या एप्रिल महिन्यांत 'बां' चा जन्म झाला. बापूजींपेक्षां जवळजवळ सहा महिन्यांनीं बा मोठ्या. वडिलांचें नांव गोकुळदास मकनजी असें होतें आणि आईचें नांव व्रजकुंवर. तीन भाऊ आणि दोन बहिणी मिळून पांच भावंडें होतीं. पैकीं एक बहीण आणि एक भाऊ लहानपणींच वारलीं. मोठा भाऊ तरुण वयांत गेला. नंतर बा आणि एक लहान भाऊ माधवदास हीं दोघेंच राहिलीं. माधवदासमामा सर्वांत लहान आणि बा तिसऱ्या होत्या.

त्या काळांत, व त्यांतहि काठेवाडांत, मुलींना कोणी शिकवीत नसे. त्यामुळें बा लहानपणीं अगदीं निरक्षर होत्या. पण त्यांना घरकामाचें चांगलें शिक्षण मिळालें होतें. शिवाय वडिलांच्या सुसंस्कृत वैष्णव कुटुंबाचे कित्येक चांगले गुण त्यांना वारसा म्हणून मिळाले होते. धार्मिक वातावरणांत जें कांहीं संकल्पबळ आणि संयम अंगीं बाणतात ते बांमध्यें लहानपणापासूनच दिसून येत असत.

बांचे वडील पोरबंदरला व्यापारी होते. आर्थिक स्थिति साधारणच म्हटली पाहिजे. पोरबंदरच्या प्रधानपदावर असलेल्या गांधी-कुटुंबाशीं त्यांचा चांगला संबंध होता. तेव्हां त्यांनीं सात वर्षें वयाच्या बांचा साडेसहा वर्षांच्या बापूंबरोबर वाङ्निश्चय केला, आणि १३ व्या वर्षी त्यांचें लग्न झालें.

आज आपणाला अशा बालविवाहाची गोष्ट विचित्र आणि गमतीची वाटते. बापूजींनीं सुद्धां आपल्या आत्मकथेंत त्याचें मजेदार चित्र काढलें आहे. ते लिहितात कीं, "'सगाई' (वाङ्निश्चय) झाली तेव्हां मला कांहीं कळविल्याचें मला आठवत नाहीं. तसेंच लग्नाच्या वेळींहि कांहीं विचारलें गेलें नाहीं. केवळ तयारी चाललेली पाहूनच समजलें कीं, लग्न व्हायचें आहे. त्या वेळीं माझ्या मनांत चांगले चांगले कपडे वापरायला मिळतील

वाजंत्रीं वाजतील, सुग्रास भोजनें मिळतील, एका नव्या मुली बरोबर खेळ खेळायला मिळतील वगैरे हौसेपलीकडे दुसरें कांहीं असल्याचें स्मरत नाहीं." लग्नप्रसंगाचें वर्णन करतांना बापूजी लिहितात: "बोहल्यावर बसलों, सप्तपदी केली, शिरा खाल्ला—घास दिले आणि पतिपत्नी तेव्हांपासून एकत्र राहूं लागलों. दोन निर्दोष बालकांनीं ज्ञान नसतां संसारांत प्रवेश केला. . . . आम्ही दोघेंहि एकमेकांना भीत होतों अशी अंधुक आठवण आहे. एकमेकांची लाज तर वाटत होतीच. काय बोलावें, कसें बोलावें हें मला काय कळे? हळूहळू एकमेकांना ओळखूं लागलों, बोलूं चालूं लागलों."*

त्या वेळच्या स्वतःच्या भावनांचें आणि बांच्या स्वभावाचें बापू वर्णन करतात: "माझ्या मनांतून माझ्या पत्नीला आदर्श स्त्री बनवावयाचें होतें. तिनें शुद्ध व्हावें, निर्मळ राहावें, मी शिकतों तें शिकावें, मी अभ्यास करतों तो तिनें करावा, आणि आमची उभयतांची एकतानता व्हावी अशीच माझी भावना होती. कस्तूरबाईच्या मनांत ही भावना असल्याचें माहीत नाहीं. ती निरक्षर होती. स्वभावानें सरळ, स्वतंत्र, मेहनती आणि माझ्याशीं तरी मितभाषण करणारी होती. तिला स्वतःच्या अज्ञानाबद्दल असंतोष नव्हता. मी शिकतों त्याअर्थीं आपणहि शिकलेलें चांगलें अशी तिची इच्छा मी माझ्या बालपणांत कधींहि अनुभवलेली नाहीं. . . . तिला शिकविण्याची मला फार हौस होती. पण त्यांत दोन अडचणी होत्या. एक तर बाची स्वतःची शिकण्याची भूक जागृत झाली नव्हती. शिवाय बा अनुकूळ झाली असती तरीहि त्या काळांत एकत्र कुटुंबाच्या भरलेल्या घरांत ती इच्छा पुरी करणें सोपें नव्हतें."+

बापूजी स्वतः त्या काळचें वर्णन करितात: "एक तर मला सक्तीनें शिकवावें लागणार. तेंहि रात्रीं एकांतांतच जुळणार. वडिलांदेखत पत्नीकडे नुसतें पाहतां सुद्धां कामा नये. बोलायचें तर नांवच नको. काठेवाडांत त्यावेळीं बुरख्याचा (पदर तोंडावर ओढण्याचा) निरुपयोगी व अडाणी रिवाज अमलांत होता. आजहि बऱ्याच अंशीं चालू आहे. त्यामुळें शिकविण्याची संधीहि मला प्रतिकूल. त्यामुळें शिकविण्याचे जेवढे प्रयत्न मी तारुण्यांत केले तेवढे व्यर्थ गेले, हें मला कबूल केलें पाहिजे. जेव्हां मी विषयाच्या निद्रेंतून

* 'आत्मकथा', प्रथम खंड, पृ. ७–९.    + कित्ता, पृ. १२.

जागा झालों, तेव्हां तर मी सार्वजनिक जीवनामध्यें गुरफटलेला होतों. त्यामुळें विशेष वेळ देतां येण्यासारखी माझी स्थिति राहिली नव्हती. शिक्षकांमार्फत शिकविण्याचे माझे प्रयत्नहि निष्फळ झाले. परिणामीं आज कस्तूरबाईची स्थिति जेमतेम पत्र लिहूं शकेल आणि सामान्य गुजराती समजूं शकेल इतपत आहे. जर माझें प्रेम विषयदूषित नसतें, तर आज ती एक विदुषी असती अशी माझी समजूत आहे. तिचा शिकण्याचा कंटाळा मी जिंकूं शकलों असतों."*

## २

# बांचा बाल-गृहस्थाश्रम

अशा रीतीनें बाल्यावस्थेंतच बांच्या व बापूजींच्या गृहस्थाश्रमाचा आरंभ झाला. त्या लहान वयाच्या पतीपत्नींच्या संसाराचें आणि नादान भांडणांचें वर्णन बापूजींनीं फारच मार्मिक शब्दांत केलें आहे. त्यावरून आपणाला कळून येतें कीं, बा जरी निरक्षर होत्या तरी आपली स्वतंत्रता समजणाऱ्या नव्हत्या असें नाहीं. त्या लांबलचक चर्चा किंवा युक्तिवाद करणाऱ्या नव्हत्या. पण आपल्या मनांत आलेली गोष्ट करीत असतां कुणाच्या दडपणानें दबल्या जाणाऱ्याहि नव्हत्या. बापूजी लिहितात :-

"लग्न झालें त्या दिवसांमध्यें निबंधांची लहान लहान चोपडीं-पैशा पैशाचीं कीं पै पैचीं आठवत नाहींत-निघत असत. त्यांमध्यें दांपत्यप्रेम, काटकसर, बालविवाह वगैरे विषयांची चर्चा केलेली असे. यांपैकीं एखादा निबंध माझ्या हातीं पडे, व मी तो वाचीत असें. ही संवय तर होतीच कीं, वाचलेलें पसंत पडलं नाहीं तर विसरून जावें आणि पसंत पडलें तर त्याचा अंमल करावा. एकपत्नीव्रत पाळणें हा पतीचा धर्म आहे, असें वाचलें तें हृदयांत घोळत राहिलें.

"परंतु या सुविचारांचा एक विपरीत परिणाम घडला. 'मी जर एकपत्नीव्रत पाळायचें तर पत्नीनें एकपतिव्रत पाळलें पाहिजे,' या विचारानें मी संशयी पति बनलों. 'पाळलें पाहिजे' वरून 'पाळविलें पाहिजे' या

* 'आत्मकथा', प्रथम खंड, पृ. १३.

विचारावर आलों; आणि जर पाळवावयाचें तर मला नजर ठेवली पाहिजे. मला कांहीं पत्नीच्या पवित्रतेबद्दल शंका घेण्याचें कारण नव्हतें. परंतु असूया ही थोडीच कारण शोधीत बसणार ? माझी पत्नी कोठें जाते, हें मला नेहमीं माहीत झालेंच पाहिजे; म्हणून माझ्या परवानगीवांचून तिनें कोठेंहि जातां कामा नये. या गोष्टीमुळें आमच्यामध्यें दुःखदायक बेबनाव होऊं लागले. परवानगीशिवाय कोठेंहि जायचें नाहीं ही एक प्रकारची कैदच झाली. परंतु कस्तूरबाई ही अशा प्रकारची कैद सहन करणारी स्त्री नव्हती. मनाला येईल तेव्हां खुशाल मला विचारल्या शिवाय जाई. मी जसजसा दाब घालीं तसतशी ती अधिकच मोकळीक घेई, आणि तसतसा मी अधिकच चिडत असें."*

बापू मत्सरी आणि शंकेखोर पति होते; तरी त्यांना न जुमानतां बा मोकळीक घेतच राहिल्या आणि त्या बरोबरच बापूंचा संशयजन्य मत्सर सहन केला. तसें केलें नसतें तर गृहसंसार तेथूनच मोडून गेला असता. हिंदु गृहस्थाश्रमांत बालदंपतींमध्यें पुष्कळ वेळां असे कलह होतातच. पण त्यांत एकंदरीनें स्त्रियाच अधिक समजुतदारपणा, धैर्य आणि सहनशीलता दाखवितात. त्यामुळेंच संसाराची नाव भलतीकडे झुकण्याचें टळतें. नंतर दोघांनाहि समजूं लागतें आणि संसार सरळ चालतो. अशा रीतीनें त्याला सरळ आणि सफळ करण्यांत स्त्रियांचा अधिक वांटा असतो. अशा वेळीं स्त्री पड खाते आणि सर्व सहन करून टाकते. पुरुषाला तर त्या वेळीं आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा, नवरेपणा सिद्ध करण्याचा आवेश चढलेला असतो, पण स्त्रीच्या शहाणपणामुळें संसार टिकून राहतो.

बापूजी आत्मकथेंत पुढें लिहितात : " कस्तूरबाईनें जी मोकळीक घेतली, ती मी निर्दोष समजतों. जिच्या मनाला पापाचा स्पर्शहि नाहीं अशी बालिका देवदर्शनाला जायचें किंवा कोणाला भेटायला जायचें, असल्या गोष्टींवर नियंत्रण कां म्हणून सहन करील ? मी जर तिच्यावर दडपण घालणार तर तिनें माझ्यावर कां घालूं नये ? — पण हें आतां सुचतें."+

* 'आत्मकथा', प्रथम खंड, पृ. ११.

\+ कित्ता, पृ. ११–१२.

पण बा प्रत्येक वेळीं मूग गिळून बसतच असें नाहीं. बापू गर्विष्ठ यजमान होते तरी त्यांना जेव्हां जरूर वाटेल तेव्हां सावधगिरीची सूचना देण्यास बांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. बापूजींनीं लिहिलें आहे कीं, एका वाईट मित्राच्या संगतीबद्दल माझ्या मातुःश्री, वडील बंधु, तशीच पत्नी यांनीं मला सावध केलें होतें. बापूजींना त्या मित्राच्या संगतींतील भय दिसलें नव्हतें तें बांनीं आपल्या सहजबुद्धीनें पाहिलें; आणि विशेष हें कीं, पाहून त्या स्वस्थ बसल्या नाहींत. अशिक्षित आणि लहान वयाच्या बांमध्यें त्यावेळींहि विवेकशक्ति आणि स्वतंत्र विचारशक्ति होती. स्वतःच्या बाबतींत काय चांगलें व काय वाईट, तें तर त्यांना समजत होतेंच. त्या शिवाय आपल्या पतीच्या बाबतींतहि काय चांगलें व काय भयावह आहे त्याची कल्पना त्यांना होती. त्यामुळेंच "पत्नीची सूचना मी गर्विष्ठ पति कसली मानतों ?" हें वाक्य लिहून बापूजींनीं आपलें दुःख व्यक्त करून, त्या बरोबरच बांच्या शहाणपणाचीहि कबुली दिली आहे.

* * *

या काळच्या बांच्या जीवनांतील इतर प्रसंगांची माहिती मला मिळूं शकली नाहीं. सन १८८८ मध्यें बापूजी विलायतेस गेले त्यापूर्वीं बांना एक मूल झालें होतें तें दोन किंवा चार दिवसांतच वारलें आणि त्यानंतर हरिलालभाईचा जन्म झाला. तेव्हां बांचें वय एकोणीसएक वर्षांचें होतें. बापूजी विलायतेस गेले त्यावेळीं 'सर्वांचा निरोप घेतला' वगैरे त्यांनीं लिहिलें आहे, पण बांचा निरोप घेतल्याबद्दल किंवा त्यांच्या भावनांविषयीं कांहींच लिहिलें नाहीं. अर्थात्, बांना तें आवडलें नसावेंच. फार तर 'केव्हां परत येणार' असें बांनीं विचारलें असेल आणि बापूंनीं प्रेमपूर्वक कांहीं तरी आश्वासन दिलें असेल.

बापू विलायतेंत असतांना त्यांच्या मातुःश्री म्हणजे बांच्या सासूबाई मरण पावल्या. बांच्या थोरल्या जाऊबाई तास न् तास देवपूजेला बसत. त्यावेळीं त्यांच्या मुलांना न्हाऊं-धुऊं घालण्याचें किंवा त्यांच्याकडे लक्ष देण्याचें सर्वच काम बा मुकाट्यानें करीत असत. स्वैंपाकघर तर समळें बांच्याच ताब्यांत होतें. बांनीं सासूबाईएवढीच जाऊबाईचीहि सेवा केलेली आहे.

बापूजी विलायतेहून परत आल्यावरहि आपला द्वेषी स्वभाव सोडूं शकले नव्हते. ते लिहितात: “हरएक बाबतींत माझी धुसफूस आणि संशयी वृत्ति चालूं असायची. त्यामुळें माझ्या मनाच्या इच्छा मला पार पाडतां आल्या नाहींत. पत्नीला अक्षरज्ञान असलेंच पाहिजे आणि मीच तें देईन असा विचार केला होता. परंतु माझ्या विषयासक्तीपुढें तें काम बाजूलाच पडलें, आणि माझ्या कमकुवतपणाचा राग मी पत्नीवर काढला. एक प्रसंग तर असा आला कीं, मी तिला माहेरींच लावून दिली आणि खूपशी पीडा दिल्यानंतर पुनः एकत्र राहूं देण्याचें कबूल केलें. यांत माझीच केवळ नादानगिरी होती हें मागून माझ्या लक्षांत आलें.”*

या प्रसंगाविषयीं अधिक तपशीलवार माहिती बापूजींपासून मिळूं शकली असती; पण त्यांचें आजारीपण आणि दुसरीं महत्त्वाचीं कामें यांत त्यांचा वेळ अडला गेल्यामुळें मला ती माहिती मिळवतां आली नाहीं.

बापूजींची बॅरिस्टरी हिंदुस्तानांत नीट चालली नाहीं आणि त्यांना एका खटल्या साठीं आफ्रिकेस जावें लागलें. त्यावेळच्या बापूजींच्या व बांच्या भावनांची थोडीशी अस्पष्ट कल्पना त्यांनीं दिली आहे. ते लिहितात: “विलायतेला जातांना झालें होतें तसें दक्षिण आफ्रिकेला जातांना वियोग-दु:ख झालें नाहीं. मातुःश्री निवर्तल्या होत्या. त्यामुळें यावेळीं मला वियोग विशेष जाणवला तो फक्त पत्नीचा. विलायतेहून आल्यानंतर आणखी एक मुलगा झाला होता. आमच्या उभयतांतील प्रेम अजूनहि विषयदूषित होतेंच. तरी पण त्यामध्यें निर्मळता येऊं लागली होती. मी विलायतेहून आल्यानंतर आम्ही एकत्र असे थोडेच राहिलों होतों. आणि वाईट बरा पण मी स्वतः तिचा शिक्षक बनलों होतों त्यामुळें, तसेंच पत्नीकडून कित्येक सुधारणा करविल्या होत्या त्या टिकविण्यासाठींहि एकत्र राहणें जरूरीचें आहे असें आम्हां उभयतांना वाटत होतें. पण आफ्रिकेचें आकर्षण होतें ना? त्यानें वियोग सह्य करून टाकला. ‘वर्षाच्या अखेरीस तर आपण एकमेकांस भेटूंच ना!’ असें म्हणून सांत्वन करून मी राजकोट सोडलें आणि मुंबईस आलों.”+ पण बापूजी दक्षिण आफ्रिकेंत एकाच्या

* ‘आत्मकथा’, प्रथम खंड, पृ. ११०. + कित्ता, पृ. १२४.

बदलीं तीन वर्षे राहिले. तीं वर्षे यांनीं राजकोटमध्येंच काढलीं. बापूजी सन १८९६ सालीं सहा महिन्यापुरते, आपल्या कुटुंबाला घेऊन जाण्यासाठीं म्हणून, स्वदेशीं आले. पण सहा महिने पुरे होण्यापूर्वींच ताबडतोब परत या, म्हणून आफ्रिकेहून तार आली; आणि बा, दोन मुलें व आपल्या स्वर्गवासी मेहुण्याचा एक मुलगा यांना बरोबर घेऊन बापूजी आफ्रिकेला जाण्यास निघाले.

## ३

# आदर्श सहधर्मचारिणी

बापूजींनीं एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं, "माझ्या पत्नीबद्दलचें माझें प्रेम व माझी भावना यांचें वर्णन जर मला करतां आलें, तर हिंदुधर्मा-विषयींचें माझें प्रेम आणि माझ्या भावना यांचें वर्णन मला करतां येईल. दुनियेंतल्या कुठल्याहि अन्य स्त्रीपेक्षां माझी पत्नी माझ्यावर अधिक परिणाम करते."

बापूंना आपल्या जीवनांत जी कांहीं अत्युच्च वस्तु लाधली आहे, जी कांहीं प्रेरणा मिळाली आहे, जें मार्गदर्शन झालें आहे, तें जसें हिंदुधर्मांतून मिळालें आहे तसेंच बांजवळूनहि मिळालें आहे, असें म्हणतां येईल. या दोन्हीं जीवनदायी व प्रेरणादायी बलांच्या बाबतींत रहस्यपूर्ण घटना अशी आहे कीं, दोहोंतील एकहि वस्तु बापू स्वतः पसंत करायला गेले नव्हते. हिंदू-धर्म जन्माबरोबरच मिळाला. विलायतेस जातांना आईच्या इच्छेवरून एका जैन साधूसमक्ष केलेल्या प्रतिज्ञा तिकडे तंतोतंत पाळल्या, त्या कांहीं त्या प्रतिज्ञांचें महत्त्व समजल्यामुळें नव्हे, तर केलेल्या प्रतिज्ञांचें पालन वाटेल तेवढ्या बिकट परिस्थितींतहि केलेंच पाहिजे, अशा तऱ्हेच्या हिंदुधर्मांतील समजूतींचें बाळकडूच पाजलें गेलें होतें म्हणून. त्याचप्रमाणें पत्नीची पसंती-हि त्यांनीं केलेली नाहीं. धर्म जसा आईबापांपासून मिळाला तशीच

* 'आत्मकथा', प्रथम खंड, पृ. १३४.

पत्नीहि आईबापांनींच मिळवून दिली. आत्मकथेंत ते सांगतात : “ कोणा मुलीबरोबर लग्न व्हावयाचें व ती मला पसंत आहे कीं नाहीं, वगैरे कांहींहि मला विचारण्यांत आलें नाहीं. पण माझ्या मातापित्यांनींच सर्व ठरवून टाकलें होतें. ”

दुसरी रहस्यपूर्ण गोष्ट अशी आहे कीं, आपल्या आयुष्याच्या सुरुवातीला या दोहोंबद्दल, म्हणजे हिंदुधर्म व पत्नी यांविषयीं, बापू साशंक होते. हिंदुधर्माविषयीं दक्षिण आफ्रिकेंत त्यांनीं एका मित्राला सांगितलें आहे कीं, “ जरी मी जन्मानें हिंदु असलों तरी हिंदुधर्माविषयीं मला फारशी माहिती नाहीं. इतर धर्मांविषयीं तर यापेक्षांहि कमी माहिती आहे. धर्माबाबत माझी काय समजूत आहे, कुठल्या धर्मावर माझी श्रद्धा आहे व कुठल्या धर्मावर ती ठेवली पाहिजे, तें कांहीं मला माहीत नाहीं. ” हिंदुधर्माचें पुरेपूर महत्त्व व खरेंखुरें रहस्य ओळखल्यावांचूनच बापूंनीं जशी धार्मिक जीवनाला सुरुवात केली, तशीच पत्नीचें महत्व व तिचे खरे गुण यांचें कांहींहि ज्ञान नसतांनाच त्यांनीं गृहस्थजीवनाला सुरुवात केली. बापूजी स्वतः च सांगतात : “ मी मत्सरी व संशयी पति होतों. पत्नी कोठें जाते व काय करते यावर ताबा चालवूं पाहत होतों. ”

असें असलें तरी शेवटीं बापूजींनीं या दोघांनाहि समजावून घेण्यासाठीं खूप प्रयत्न केले. दोहोंनाहि त्यांनीं आपल्याशा केल्या व दोन्हींच्या योगें आपलें जीवन धन्य केलें. हिंदुधर्माचें अगदीं खोल रहस्य स्वतः शोधून काढलें आणि त्याच्या प्रभावानें जगांतील एक धार्मिक विभूति बनले, सन्त व महात्मा म्हणून प्रसिद्ध झाले. तसेंच बांचे खरे गुण जसजसे कळूं लागले तसतसें आपलें गृहस्थजीवन धन्य करूं लागले आणि बापू खरे बापू बनले.

बापूजींना तपश्चर्येची आवड आहे. तप व संयमन यांचे मोठमोठे प्रयोग ते करीतच असतात. त्यांनीं जीवनाला तपोमय करून टाकलें आहे. तरीहि तपस्व्यांत जें शुष्क वैराग्य व कर्कशता येत असतात, तीं त्यांच्या जीवनांत आलीं नाहींत. प्रेम व करुणा त्यांच्या स्वभावांत मूळचींच आहेत. या प्रेम व करुणेच्या झऱ्याला त्यांच्या तपःपरायणतेनें आटवून टाकलें असतें; पण तो झरा आटला नाहीं एवढेंच नव्हे, तर तप वाढत असतां तोहि वाढतच गेला. हा बांचाच प्रभाव म्हटला पाहिजे.

बापूजींसारख्या उग्र तपस्व्याच्या जीवनावर अशा तऱ्हेचा परिणाम घडवून आणणाऱ्यामध्यें दिसून येणारी योग्यता अशी तशी नव्हे. बापूंच्या तपस्येच्या घरीं जवळ थोडा वेळहि राहणें किती कठिण आहे याची कल्पना ज्याला अनुभव आहे त्यालाच करतां येईल. मिसेस पोलाक लग्न झाल्या-बरोबरच बापूजींच्या कुटुंबांत एक कुटुंबीय म्हणून राहिल्या होत्या. त्यांत त्यांना किती अडचणी सहन कराव्या लागल्या असतील त्याविषयीं आपण सहानुभूतीच धरावी म्हणून सांगतांना मि. ॲन्ड्रूझ् लिहितात कीं, "नेहमीं कांहींना कांही शारीरिक गैरसोयच सहन करण्याचा आग्रह धरणाऱ्या, हट्टी व छांदिष्ट असूनहि ज्याच्याविषयीं प्रेम वाटावें अशा, एका सन्ताबरोबर त्याचा एक कुटुम्बीय म्हणून दैनंदिन निकटचें जीवन कंठणें हें मिसेस पोलाक यांना किती कठिण गेलें असेल ?"

मिसेस पोलाकना थोडेसे महिनेच किंवा एक-दोन वर्षेंच बापूजींच्या घरीं रहावें लागलें असेल, आणि तें त्यांना कठिण वाटलें. मग ज्यांच्या आयुष्याची अशा 'सन्ता'च्या जीवनाशीं कायमची गाठ पडली त्या बांची काय दशा झाली असेल याचा विचार तर करा. अलबत्, बांना अनेक अडचणी आल्या असतील; परंतु त्या सर्व अडचणींतून मोठ्या गौरवानें त्या पार पडल्या, एवढेंच नव्हे, तर बापूजींनाहि तपश्चर्येच्या जोरामध्यें प्रमाणाबाहेर कडक किंवा शुष्क होऊं दिलें नाहीं, हें बांच्या जीवनाचें खरें रहस्य आहे. बापूजी स्वतः म्हणतात कीं, "आमच्यांत भांडणतंटे पुष्कळच झाले. पण शेवट नेहमीं कल्याणकारकच होत आला आहे. बानें आपल्या अद्भुत सहनशक्तीनें जय मिळविला आहे."

दक्षिण आफ्रिकेंत असतांना बापूजींच्या जीवनांत पालट होऊं लागला आणि सन १९०४ मध्यें तर त्यांनीं जीवनांत क्रान्तिकारक परिवर्तन केलें. जीवनांतील परिवर्तनाबद्दलचा त्यांचा आग्रह इतका तीव्र व उत्कट होता कीं, त्यांच्याबरोबर टिकाव धरणें त्यावेळीं कठिण होतें. गोखले यांनीं एकवेळ विनोदानें पण खरें तेंच सांगितलें कीं, "तूं अतिशय जुलमी आहेस. एका बाजूनें तुझें प्रेम आणि दुसऱ्या बाजूनें तुझा आग्रह हीं इतक्या जोरानें दुसऱ्यावर पगडा बसवितात कीं, तो बिचारा तुझ्या इच्छेप्रमाणें वागण्यासाठीं

आणि तुला खुष करण्यासाठीं आपल्या जीवाची ओढाताण करतो." श्रीमती सरोजिनी नायडु सुद्धां बापूजींना अनेक वेळां ' 'टायरन्ट' म्हणत आणि पत्रांतून 'माय् डियर टायरन्ट' (माझे प्रिय जालिम) म्हणून संबोधीत. बापूंच्या असल्या 'जुलमी' प्रेमांत आणि जीवनपरिवर्तनाच्या उत्कट तीव्रतेंत बांचा कसा काय टिकाव लागला असेल? बापूजींच्या जीवनाचा प्रवाह त्याग, वैराग्य, संन्यास यांकडे जोरानें वाहूं लागला होता. त्याला अनुकूल आणि इष्ट मार्गानें बांनीं वाहूं दिला आहे, त्यांत कांहीं आडकाठी घातली नाहीं; आणि असें असूनहि जेव्हां जेव्हां जरूर वाटेल तेव्हां तेव्हां नम्र सूचनारूपी बांध घालून, सविनय प्रतिकाररूपी इष्ट प्रतिबंध उभे करून, प्रवाह प्रतिकूल किंवा अनिष्ट दिशेला वाहत असतां थांबविला आणि नेहमीं योग्य दिशेला वाहत ठेवला. 'काव्यप्रकाश'कार मम्मटानें कवितेंतील बोध किंवा उपदेशाची कान्तेच्या उपदेशाबरोबर तुलना केली आहे. बांनीं त्या उपमेला अगदीं सार्थ ठरविली आहे. कधीं नम्रपणें समजूत घालून, कधीं सौम्य आग्रहानें आणि कशानें भागलें नाहीं म्हणजे आंसवें, यांच्यायोगें बांनीं बापूजींना कठोर होण्यापासून, कर्कश होण्यापासून आणि जालिम होण्यापासून वाचवलें आहे; ते प्रेमळ आणि रसाळ राहतील असें केलें आहे.

कोणी याचा अर्थ असा समजूं नये कीं, बांनीं बापू जीवनांत पुढें जात असतां त्यांची अडवणूक केली आहे. बापूजी लिहितातः "बामध्यें एक गुण फारच मोठ्या प्रमाणांत आहे, जो इतर पुष्कळ हिंदु स्त्रियांत कमी-अधिक प्रमाणांत वसत असतोच. मनांत असतांना किंवा नसतांना, जाणतां कीं नेणतां, माझ्या मागून येण्यांत तिनें आपल्या जीवनाची सार्थकता मानली आहे, आणि विशुद्ध जीवन जगण्याच्या माझ्या प्रयत्नांत मला कधीं अडवून धरलें नाहीं. यामुळें जरी आमच्या बुद्धि-शक्तींत खूप अंतर असलें तरी आमचें जीवन संतोषी, सुखी आणि ऊर्ध्वगामी राहिलें असें मला वाटलें आहे." बापूजींच्या धार्मिक महाव्रतांत आणि देशसेवेच्या महाव्रतांत बांनीं नेहमीं पाठिंबाच दिला आहे; बापूजींना पुढें जाऊं दिलें आहेंच आहे. कसें? तर बापूजी स्वतः सांगतात कीं, "ब्रह्मचर्यव्रत पाळण्यांत बाकडून केव्हांहि विरोध आला नाहीं, किंवा तिनें कधीं मला मोहविलें

नाहीं. माझी अशक्ति किंवा आसक्तीच मला अडवून ठेवीत होती." साधेपणासुद्धां बांमध्यें सहज होता, स्वभावसिद्ध होता. कपडे वगैरेंचा थाट-माट सोडतांना कांहीं प्रयास पडले असतील तर ते कपडयांच्या टापटिपीचे शोकीन आणि झोकनोक आवडणाऱ्या अशा बापूजींनाच पडले असतील. अपरिग्रहाच्या बाबतींत बांना अवघड वाटलें असेल खरें, पण त्यांतहि बांनीं आपल्या पुरतें आपलें मन फारच लवकर वळवलें होतें. परिग्रहाबाबत जो कांहीं मोह अथवा इच्छा बांमध्यें होत्या त्या लेकी आणि सुनांपुरत्याच होत्या. बानीं मन जिंकल्याबद्दलचा एक प्रसंग मुरब्बी रावजीभाई मणिभाई पटेल — ज्यांना बा-बापूंच्या संसारांत राहण्याचं सद्भाग्य आफ्रिकेंत लाभलें होतें — यांनीं मला लिहून कळविला आहे तो येथें देत आहे :—

" फिनिक्स आश्रमांतील गोष्ट आहे. सन १९१२ मध्यें एके दिवशीं सकाळीं जेवण झाल्यावर ११ वाजण्याच्या सुमारास जेवणाच्या टेबलापाशीं मी बसलों होतों. बापूजी सगळ्यांना जेवूं घातल्यावर नेहमीं जेवत. ते जेवत होते आणि जवळ बापूंच्या कुटुंबांतील एक मुरब्बी कालिदास गांधी बसले होते. ते टोंगार नांवाच्या गांवीं राहत. तेथून कांहीं दिवसांसाठीं आले होते. बा उभ्या उभ्या स्वैंपाकघराची कांहींतरी साफसूफी करीत होत्या. श्री. कालिदासभाई थोडेसे जुन्या विचारांचे होते.

" दक्षिण आफ्रिकेंत एकाद्या सामान्य व्यापाऱ्याच्या येथेंहि स्वैंपाकघरांतील किंवा इतर साफसुफीचें काम करण्यासाठीं नोकर असे. बांना तेथें सर्व कामें स्वहस्तें करतांना पाहून श्री. कालिदासभाई बापूजींना संबोधून म्हणाले: 'भाई, तुम्ही तर जीवनांत फार फेरफार केलेत. अगदीं साधेपणा आणून सोडला आहे. या कस्तूरबाईनें देखील कांहीं वैभवाचा उपभोग घेतला नाहीं.'

" 'मीं काय तिला वैभवाचा उपभोग घ्यायला नाहीं म्हटलें आहे ?' बापूंनीं जेवतां जेवतां उत्तर दिलें.

" 'तर मग तुमच्या घरीं ऐश्वर्य तरी असें काय भोगलें आहे ?' बांनीं हंसत हंसत टोमणा मारला.

" बापूजींनीं त्याच पद्धतीनें हंसत हंसत म्हटलें : 'मी तुला दागदागिने किंवा सरस रेशमी साडया वापरूं नकोस असें केव्हां म्हटलें

आहे ? आणि तुला हव्याशा वाटल्या तेव्हां सोन्याच्या बांगड्या सुद्धां करवून आणल्या होत्या ना ?'

" 'तुम्हीं तर सगळें आणून दिलें. पण मीं तें केव्हां वापरलें आहे ? मीं पाहिलें कीं, तुमचा मार्ग निराळा आहे. तुम्हाला साधु संन्यासी व्हायचें आहे. मग मला तरीं मौजमजा करून काय मिळवायचें होतें ? तुमचें मन ओळखल्यावर मग मी आपलें मन आवरून धरलें,' बांनीं कांहींशा गंभीर भावानें म्हटलें."

'मी आपलें मन आवरून धरलें' यांत बांच्या सर्व जीवनसाफल्याची गुरुकिल्ली सांपडते. पण अशा रीतीनें मन आवरलें असतांहि बांनीं बापूंना कठोर आणि शुष्कहि होऊं दिलें नाहीं. बांच्या जीवनाचें रहस्य हें आहे कीं, त्यांनीं बापूंना 'महात्मा' होऊं दिलें किंवा 'महात्मा' होण्यास मदत केली, तरीहि बापूंना आपल्या मोठ्या कुटुंबाचे प्रिय बापू या नात्यानें दुरावण्यापासून रोकून धरलें आहे किंवा अखिल जनतेचे खरे व मोठे बापू बनविलें आहे, आणि अशा रीतीनें बापूंच्या महत्तेंत भर टाकली आहे. अर्थात्, बांना 'बा' करण्यामध्यें बापूंचा वांटा कांहीं लहानसहान नाहीं. या विभूतिपूर्ण दंपतीच्या जीवनाचें खरें रहस्यच हें आहे कीं, दोघांनीं एकमेकाला वर चढवलें आणि महान् केलें.

गुरुदेव टाकुर एके ठिकाणीं लिहितात कीं, "त्या वेळीं भारतांतील तपस्वीजन गृहस्थ होते, कारण गृह हें तेव्हां मुक्तीच्या मार्गांत अडचणी सारखें नव्हतें." बांच्या जीवनांतून निघणारा बोधहि हाच आहे. बा बापूजींच्या साधनेंत व त्यांच्या महाव्रतांच्या पालनांत आड तर आल्या नाहींतच, पण उलट हळूहळू त्या बापुजींचीं व्रतें, आदर्श व सिद्धान्त आपलेसे करीत गेल्या आणि तसतसा बांचा स्वतःचा विकास होत गेला. या दृष्टीनें बांना महापतिव्रता म्हटलें पाहिजे. पतिव्रता शब्दाच्या प्रचलित अर्थानें तर खरोखर त्या पतिव्रता होत्याच, पण त्याहून फार विशाल अर्थानेंहि—पतीचीं सर्व व्रतें आपलीशीं करून बांनीं आचरणांत आणलीं, या अर्थानेंहि होत्या. यांत बांचें वैशिष्ट्य हें कीं, हीं सगळीं व्रतें, सिद्धान्त, आदर्श हीं कांहीं बांची स्वतःचीं नव्हतीं. बांची महत्त्वाकांक्षा कांहीं बापूंच्या प्रमाणें आपलें जीवन पूर्ण बनविण्याची, मोक्षाची साधना करण्याची नव्हती. ज्याला स्वतःला अशी महत्त्वाकांक्षा

असेल तो आपल्या आंतरिक प्रेरणेमुळें ढकलला गेल्यानें असलें जीवन कंठील. बांची अशी महत्त्वाकांक्षा होती असें सुद्धां म्हणतां येणार नाहीं. बापूंना अनुकूल बनून जाणें, ही एक त्यांची सहजवृत्ति होती. अर्थात् आपल्या समजुतींच्या कक्षेंतील जी गोष्ट असेल तिच्या विषयीं बांचे स्वत:चेच स्वतंत्र विचार असत व ते भक्कमहि असत; तरीहि सार्वजनिक कार्यें, आश्रमांतील आदर्श वगैरे बाबतींत त्या निष्ठापूर्वक बापूंना अनुसरीत. असें अनुसरण करतां करतां त्यांनीं आपला विकास साधला, अथवा अधिक खरें सांगायचें तर त्यांचा विकास झाला. कारण अशा विकासाचीहि त्यांनीं महत्त्वाकांक्षा ठेविली नव्हती. त्यांचें जीवन सहजवृत्तीनें चाललें. त्यांतील ध्रुवतारा एकच, कीं जी बाबत समजण्यासारखी नसेल तींत पतीचें अनुसरण करावयाचें.

बापूंच्या सारख्या परम सत्याग्रह्याला व ध्येयवाद्याला अनुसरण्यांत बांनीं कांहीं कमी त्याग केला नाहीं. बापूंसारख्या तपस्वी पुरुषाबरोबर चालण्यांत मधून मधून भूकंपाच्या सारखे भयंकर धक्के सहन करावे लागतात, ज्वालामुखीच्या धगधगत्या लाव्हामध्येंहि पावलें टाकावीं लागतात. तरीहि शेवटपर्यंत बा मागें सरल्या नाहींत. आपल्या इच्छा-अनिच्छांचा त्याग करून, अनेक अडचणी व परिवर्तनें सहन करून, पतीच्या मार्गानें चालावयाचें, हें कांहीं सोपें नाहीं. त्यासाठीं खूप आत्मबल व अपूर्व समर्पणवृत्ति पाहिजे. बांमध्यें हीं दोन्हीं होतीं, किंवा बांनीं तीं दोन्हीं अंगीं बाणविलीं होतीं, आणि त्यामुळें गृहस्थजीवनाचा दुर्गम समुद्रहि एखाद्या कसलेल्या पोहोणाऱ्याप्रमाणें त्या सफाईनें पार ओलांडून गेल्या.

बापू पुष्कळ शिकलेले व मोठे पुढारी, आणि बा अशिक्षित; शिवाय बापू आपल्या जीवनांत उत्तरोत्तर कठिण परिवर्तनें करीत आले आहेत आणि आपल्या विचारांचें पालन करण्याचा फार आग्रह ठेवित आले आहेत; त्यामुळें त्यांत बा खरोखरच तावून भाजून निघत असत. त्यावरून कित्येकांना असेंहि वाटत असे कीं, बांना त्याचें फार दुःख वाटत असावें. परंतु बा त्या अग्निपरीक्षेंतून किती आनंदानें व उत्साहानें पार पडत असत याचा पुरावा त्यांनीं लिहिलेल्या एका पत्रांतून मिळतो. बांची इच्छा तें पत्र एका टीका करणाऱ्या बाईंना पाठवावें व तसेंच वर्तमानपत्रांतून प्रसिद्धीसाठींहि द्यावें

अशी होती. पण बापूंनीं तें पत्र त्या बाईंना पाठविलेंच नाहीं. मग वर्तमानपत्रांत तें कोठून यायला ? सेवाग्रामांत महादेवकाकांच्या कित्येक पत्रांच्या नकला मी करीत होतें त्यांतून तें पत्र माझ्या हातीं आलें, व तें बापूंच्या परवानगीनें येथें देत आहे.

शुक्रवार

अ. सौ. लीलावती,

तुमचें पत्र मला फार बोंचत आहे. तुमचा व माझा बोलण्याचालण्याहि प्रसंग फारसा कधीं आला नाहीं. तर मग तुम्हाला कसें कळलें कीं, मला गांधीजी फार दुःख देतात? माझा चेहरा उतरलेला असतो, ते मला खाण्यापिण्याचा बाबतींतहि त्रास देतात, हें तुम्ही पहायला आल्या होतांत ? माझ्या पतीसारखे पति तर कुणाला दुनियेंतहि नसतील. सत्यामुळें सर्व जगांत पूजिले जात आहेत. हजारों त्यांचा सल्ला विचारायला येतात. हजारांना ते सल्ला देतात. केव्हांहि माझ्या चुकींवांचून माझा दोष नाहीं काढला. माझ्यांत दूरवरचा विचार नसेल, तोकडी दृष्टि असेल, तर सांगतात. तें तर साऱ्या जगांत चालत आलें आहे. गांधीजी वर्तमानपत्रांत छापतात, इतर घरांतल्या घरांत धुसपुस करतास. माझ्या पतींमुळें तर मी सर्व जगांत पूजिली जात आहे. माझ्या नातलगांचें खूप प्रेम आहे. मित्रांत मला पुष्कळ मान आहे. तुम्ही माझ्यावर खोटा आळ घ्याल तर कुणींहि खरें मानणार नाहीं. हो, मी तुमच्यासारखी आजकालच्या युगांतली नाहीं. खूप मोकळीक घ्यावी, पति आपल्या ताब्यांत राहिला तर बरें, नाहींतर (म्हणावें), तुमचा व माझा मार्ग वेगळा आहे. पण सनातनी हिंदूला तें शोभणार नाहीं.

पार्वतीचा तर असा पण होता कीं, जन्मोजन्मीं शंकर मला पति मिळावेत.

आ.

कस्तूर गांधी

# ४

## संकटांतील सोबती

बापूजी १८९६ च्या अखेरीस दुसऱ्यांदा आफ्रिकेस गेले तेव्हां बा बरोबर होत्या, असें मागील प्रकरणांत सांगितलें आहे. बापू हिंदुस्थानांत थोडा काळ राहिले. त्या दरम्यान त्यांनीं दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या स्थितीविषयीं जीं भाषणें केलीं त्यांचे विकृत अर्थाचे व अतिशयोक्तिपूर्ण अहवाल वाचून डरबन मधील गोरे लोक त्यांच्यावर चिडले होते. आणखी तेथें अशी एक भुमका उठविण्यांत आली होती कीं, गांधी दोन बोटी भरून हिंदी माणसें घेऊन आला आहे आणि नाताळ हिंदी लोकांनीं भरून टाकूं पाहत आहे. त्यामुळें ते खूप भडकले होते; व जेव्हां बापू बोटींतून खालीं उतरतील तेव्हां त्यांच्यावर हल्ला करण्याचा विचारहि करीत होते.

अशा स्थितींत तेथील प्रधानमंडळांतील एक सभासद व डरबनचे अग्रेसर कार्यकर्ते यांजकडून बोटीच्या कप्तानाला असा संदेश आला कीं, लोक फार भडकले आहेत आणि गांधींचा जीव धोक्यांत आहे; तेव्हां त्यांना व त्यांच्या कुटुंबाला सायंकाळीं अंधार पडल्यावर उतरवा. पण बापूंच्या व हिंदी लोकांच्या एका गोऱ्या वकील मित्राला ही सूचना आवडली नाहीं. त्यांनीं बोटीवर येऊन बापूंना म्हटलें, " जर तुम्हांला जिवाची भीति वाटत नसेल तर मला वाटतें कीं, मिसेस गांधी व मुलें यांनीं गाडींतून शेट रुस्तुमजींच्या घरीं जावें आणि तुम्ही व मी हमरस्त्यानें चालत जाऊं. तुम्हीं काळोख झाल्यावर गुपचुप शहरांत यावें हें मला मुळींच रुचत नाहीं. मला तर वाटतें कीं, तुमच्या केसालाहि धक्का लागावयाचा नाहीं. आतां सर्व शांत आहे, गोरे लोक सगळे निघून गेले आहेत; आणि कांहीं झालें तरी तुम्हीं लपून छपून प्रवेश करतां कामा नये असें माझें मत आहे. "

बापूंना हें म्हणणें पसंत पडलें. बा व मुलें घोडागाडींतून शेठ रुस्तुमजींच्या घरीं सुखरूप पोंचलीं. बापू त्या गोऱ्या मित्रासह चालत निघाले. लोकांना बातमी कळतांच ते सगळे एकत्र झाले आणि त्या दंगेखोर जमावानें त्या मित्राला बापूंपासून दूर केलें, व नंतर बापूजींवर हल्ला केला. दगड,

अंर्डी, लाथा यांचा बापूजींवर नुसता पाऊस पाडला. तेवढ्यांत मुख्य पोलिस अधिकाऱ्याची पत्नी त्या बाजूनें जात होती. तिनें बापूजींना ओळखलें आणि त्यांच्या बचावासाठीं ती जमावाच्या आडवी उभी राहिली. इतक्यांत पोलिसांची मदतहि आली व बापू शेठ रुस्तुमजींच्या घरीं पोंचले. बापूंना मुका मार बसला होता; त्यावर तेथें हजर असलेल्या बोटीवरच्या डॉक्टरानें उपचार सुरू केले. गोऱ्या लोकांच्या जमावानें तर घरालाहि वेढा घातला व गांधीला स्वाधीन न केल्यास ती इमारत जाळून टाकण्याची धमकीहि दिली. पोलीस सुपरिन्टेन्डेन्टच्या चतुराईमुळें बापूजींना त्या घरांतून बाहेर पळवून नेतां आलें. जेव्हां लोकांना कळलें कीं, आपली शिकार हातची निसटली तेव्हां ते देखील पांगले.

बापूजींची ही एक जबर कसोटी होती. पण त्याबरोबरच बांचीहि किती भयंकर कसोटी होती! बांना स्वतःला मार बसला नव्हता, तरीहि स्वतःला सहन करावें लागण्यापेक्षांहि आपल्या पतीच्या जीवाला धोका पोंचण्याचा प्रसंग नव्या अपरिचित देशांत पाऊल ठेवतांच आला असतां त्या किती घाबरल्या असतील, त्यांना किती चिन्ता वाटली असेल याची कल्पना करून पाहावी. बापूंच्या संकटांत त्यांच्याबरोबर असण्याचा हा प्रसंग अकस्मात् घडला, पण तेव्हांपासून नेहमीं बा बापूजींच्या संकटांत त्यांच्या सांगाती राहिल्या आहेत. बा आपल्या हृदयामधें झोपेंत किंवा जागेपणीं, बापूजींविषयींची चिन्ता सतत बाळगीत आल्याच आहेत. बापूजी संकटांत असतां आपणाला दुसऱ्या कोठेंहि राहतां येणार नाहीं, अशा तऱ्हेची भावना त्यांनीं नेहमीं आपल्या हृदयांत बाळगली होती. याचीं कांही उदाहरणें 'स्त्री-जीवना'च्या खास अंकांतील श्री० कुसुमबहेन देसाई — या बापूंच्या बरोबर आश्रमांत थोडीं वर्षें राहिलेल्या आहेत — यांच्या लेखांतून येथें दिलीं आहेत.

"साबरमती आश्रमांत एका रात्रीं उशीरा बापू झोपीं गेले होते. समोरच्या ओटीवर बा व मी निजलों होतों. दोन अडीचच्या सुमारास बापूजी एकाएकीं उठून चालूं लागले. बा जाग्या झाल्या आणि मला विचारलें, 'बापूजी कुठें जात असावेत? आपण मागून जायचें कां? बुद्धासारखें तर नाहींना झालें?' आम्ही दोघी जणी मागून गेलों आणि कांही अंतरावरून बापूजींना पाहिलें. बापूजी म्हणाले, 'तुम्हाला असें का वाटलें

कीं मी पळून जात आहे ?' रस्त्यावर कोणी मनुष्य विंचू चावल्यामुळें ओरडत होता तें ऐकून बापूजी तिथें गेले होते.

दुसरा प्रसंग बापूजी १९२९ मध्यें कांहीं काल हिमालयांत कौसानीला राहिले होते त्या वेळचा आहे :

" हिमालयांत थंडी व धुकें अपरंपार असे. तरीहि बापूजी नियमाप्रमाणें तेथेंहि उघड्यावरच निजत. एका रात्रीं वाघाचें पिलूं बापूजींच्या बिछान्या-जवळ येऊन फिरून गेलें. नैनीतालहून आलेले कार्यकर्ते बापूजींच्या आदरातिथ्यासाठीं तेथें राहिले होते; त्यांपैकीं एकानें तें पिलूं पाहिलें होतें. दुसरे दिवशीं बापूजींना हा प्रकार सांगितला. उघड्यांत निजण्यापेक्षां आंतच निजण्याचा सर्वांनीं खूप आग्रह केला. बापूजी मात्र खूप हंसले आणि नेहमींप्रमाणें उघड्यावरच आपलें आंथरूण घालायला सांगितलें. हें पाहून बा ज्या रोज आंत निजत त्यांनींहि आपला बिछाना बाहेर आणविला व बापूजींच्या संकटांत स्वतः सहभागी झाल्या.

" याच वर्षी बापूजी बनारसला गेले होते. तेव्हां तेथील सनातन्यांचा त्यांना अतिशय तीव्र विरोध होता. जाहीर सभेंत बापूजींबरोबर बा गेल्या नव्हत्या. सभेंत खूप दंगल माजल्याची बातमी कळतांच त्यांनीं सभेंत जाण्याची तयारी केली. बा, देवदासभाई, जवाहरलालजी वगैरे सभास्थानीं जायला निघाले. रस्त्यांत समोरून एका दंगेखोरांच्या टोळीनें येऊन मोटारीला सभास्थानीं न जाऊं देतां अडवून ठेवण्याचा प्रयत्न केला. देवदासभाई व जवाहरलालजी मोटरमधून खालीं उतरले. जवाहरलालजींनीं दोघां-चौघांना पकडून दूर केलें तेव्हां दंगेखोरांची टोळी पांगून गेली. पण गर्दी अतोनात होती. म्हणून आम्ही सर्वच मोटारींतून उतरलों. देवदासभाई व जवाहरलालजी यांपासून वेगळे पडले. इतक्यांत सभास्थानीं दगड पडताहेत असें ऐकतांच बा उद्‌गारल्या: 'सभेंत धोंडे पडत असतां, बापूजी सभेंत असतां, माझ्यानें असें बाहेर कसें राहवेल ?' अन् बा सभास्थानाकडे चालूं लागल्या. आम्ही मोठ्या कष्टानें जमावांत घुसून वाट केली आणि सभास्थानीं पोंचलों."

बापूजींच्या अनेक उपवासांतहि बा बहुधा बापूजींच्या जवळ राहिल्या आहेत आणि अतिशय काळजीपूर्वक त्यांनीं त्यांची सेवाशुश्रूषा केली आहे.

जीवन आणि मरण यांमध्यें प्रति हेलकावे खात असतां विह्वळ न होतां, छाती मजबूत ठेवून, सेवाशुश्रूषेंत कांहीहि न्यूनता पडूं न देण्याएवढा मनावरील ताबा कायम ठेवण्यासहि अद्भुत वीरता पाहिजे असते. ही वीरता बांमध्यें होती. सन १९३२ त हरिजनप्रश्नासंबंधांत येरवडा जेलमध्यें बापूजींनीं आमरण उपवास केला तेव्हां बा साबरमती जेलमध्यें होत्या. आपण बापूंच्या जवळ नाहीं म्हणून त्या किती व्याकुळ झाल्या त्याचें त्यांच्याबरोबर साबरमती जेलमध्यें असलेल्या सौ. लाभुबहेननीं वर्णन केलें आहे : "आपण हें भागवत वाचीत आहों; रामायण, महाभारत वाचीत आहों; त्यांत कोठेंहि असल्या उपवासाच्या गोष्टी नाहींत. पण बापूंचें सगळेंच वेगळें. ते असेंच कांहीं तरी करीत असतात. आतां काय होईल ?" बरोबरच्या बाया आश्वासन देत कीं, सरकार निकाल लावून टाकील, त्यांच्याजवळ सेवाशुश्रूषा करणारी पुष्कळ आहेत, वगैरे. पण बांना मात्र घटकेघटकेला वाटे कीं, काय झालें असेल ? काय होणार आहे ?

बायका सांगत कीं, "सरकार बापूंच्या सर्व सुखसोयींची व्यवस्था करील, तुम्ही कशाला काळजी करतां ?" तेव्हां बा उत्तर देत : "पण बापू कांही सोयी स्वीकारतील तर ना ? त्यांचा तर सर्व बाबतींत असहकार. त्यांच्यासारखा माणूस मी कुठें पाहिला नाहीं, आणि कुठेंहि ऐकला नाहीं. पुष्कळ पुराणांतल्या कथा ऐकल्या, पण असलें तप कुठेंहि पाहिलें नाहीं." मग थोडा वेळ गेल्यावर स्वतःच म्हणत : "तशी कांही हरकत नाहीं. तसा महादेव आहे, वल्लभभाई आहेत, सरोजिनीदेवी आहेत; पण आपण असलों तर फरक पडणारच ना ?"

"आपण असलों तर फरक पडणारच ना ?" एवढ्या वाक्यांत बांची सर्व चिंता व्यक्त होते. त्यांना असें सारखें वाटे कीं, आपल्यासारखी शुश्रूषा इतर करूं शकणार नाहींत. आणि हें स्वाभाविकहि होतें. कारण बापूजींना बा जितक्या ओळखीत, त्यांच्या संवयी त्यांना जितक्या माहीत, तितक्या दुसऱ्यांना कशा माहीत असणार आणि त्यांचा आगाऊच विचार ते कसा करून ठेवणार ? शेवटीं सरकारनें बांना साबरमती जेलमधून बापूं-जवळ येरवड्यास नेलें. बापूंच्या जवळ गेल्यावर, 'आणखी फिरून हें काय ?' असें रागें भरणाऱ्या नजरेनें बा बोलल्या. बापू निरुत्तर राहिले. बांच्या प्रेमपूर्ण

चिंतातुर नजरेंतून आणि बापूंच्या भक्तिभावपूर्ण मौनामधून अनेक गोष्टी बोलल्या गेल्या, आणि पुढें कांही बोलल्याचालल्यावांचून बांनीं बापूंच्या सेवाशुश्रूषेचा चार्ज आपणांकडे घेतला.

अगदीं शेवटच्या घटकेपर्यंत या बापूंच्या संकटांत सोबती म्हणून राहिल्या, हें त्यांचें थोर भाग्यच म्हटलें पाहिजे. आगाखान महालांतील बापूंच्या उपवासाच्या वेळची कसोटी तर सगळ्यांत कठिण म्हटली पाहिजे. त्या वेळच्या बांच्या स्थितीचें वर्णन सुशीलाबहेन यांनीं आपल्या लेखांत (या पुस्तकांतील दुसऱ्या भागांत) सुंदर केलें आहे.

## ५

## सत्याग्रहाच्या गुरु

बापूजींनीं आपल्या आत्मकथेंत हा प्रसंग 'एक पुण्यस्मरण व प्रायश्चित्त' या मथळ्याखालीं दिला आहे. सन १८९८ च्या सुमाराचा हा प्रसंग आहे.

"डरबनमध्यें मी वकिली करीत होतों, त्यावेळीं माझे कारकून पुष्कळदां माझ्या बरोबरच राहत असत. त्यांत हिंदूहि असत व ख्रिस्तीहि असत; आणि प्रांतवार बोलायचें तर गुजराती आणि मद्रासी असत. त्यांच्या बद्दल माझ्या मनांत कधीं भेदभाव उत्पन्न झाल्याचें मला स्मरत नाहीं. त्यांना मी कुटुंबांतले मानीत असें; आणि पत्नीकडून त्या बाबतींत कांही विघ्न आल्यास तिच्याबरोबर झगडतहि असें. एक कारकून ख्रिस्ती होता. त्याचे आईबाप पंचम जातीचे होते. आमच्या घराची बांधणी पाश्चात्य पद्धतीची होती. त्यांत खोल्यांमध्यें मोरी असत नाहीं — असणें योग्यहि नाहीं असें मला वाटतें — त्यामुळें दरेक खोलींत मोरी ऐवजीं लघ्वीसाठीं एक भांडें असतें. तें उचलण्याचें काम नोकराचें नव्हतें, आमचेंच यजमान-यजमानणीचें होतें. जे कारकून स्वतःला घरच्या प्रमाणें समजूं लागत, ते स्वतः आपआपलें भांडें उचलीतहि. हे पंचम कुळांत जन्मलेले कारकून नवे होते. त्यांचें भांडें आम्हींच उचललें पाहिजे. इतर भांडीं कस्तूरबाई उचलीत

असे, परंतु हा तिच्या मतें कडेलोट झाला. आमच्या मध्यें धुसफुस झाली. मी उचलावें तर तेंहि तिला कबूल नाहीं, आणि स्वतः उचलणेंहि जड वाटलें. डोळ्यांतून अश्रूबिंदूंचीं मोत्यें ढाळणाऱ्या, हातांत भांडें धरलेल्या, स्वतःच्या तांबडया लाल डोळ्यांनीं मला ठपका देत असलेल्या, जिन्यावरून उतरणाऱ्या कस्तूरबाईचें चित्र मी या घटकेलाहि रेखाटूं शकतों.

"मी जसा प्रेमळ तसाच घातकी पति होतों. मी स्वतःला तिचा शिक्षकहि समजत असें; आणि त्यावरून आपल्या आंधळ्या प्रेमाला वश होऊन तिला नकोसेंहि करीन असें.

"अशा तऱ्हेनें तिनें फक्त भांडें उचलून नेल्यानें माझें समाधान झालें नाहीं. ती हंसतमुखानें नेईल तेव्हां माझें समाधान होणार. म्हणून मी दोन शब्द खड्या सुरांतच सुनावले. 'असली धुसफुस माझ्या घरांत नाहीं चालणार,' मी बडबडलों.

"शब्द तिला तीराप्रमाणें झोंबले. पत्नीचा क्रोधाग्नि पेटला, 'तर मग तुमचें घर आपल्यापाशींच ठेवा! ही मी चालले.'

"ईश्वराचें स्मरण मला राहिलें नव्हतें. दयेचा लवलेशही राहिला नव्हता. मी तिचा हात धरला. जिन्याच्या समोरच बाहेर जाण्याचा दरवाजा होता. मी त्या असहाय अबलेला धरून दरवाज्यापर्यंत ओढीत नेलें. दरवाजा अर्धा उघडला.

"डोळ्यांतून गंगायमुना वाहत आहेत अशी कस्तूरबाई बोलली, 'तुम्हाला एक लाज नाहीं, मला आहे. कांही तरी लाज धरा. मी बाहेर पडून जाणार कुठें? इथें माझे आईबाप थोडींच आहेत कीं मी त्यांच्याकडे तरी जाऊं. मी बायको पडले, तेव्हां तुम्ही द्याल त्या लाथा मला खाल्ल्याच पाहिजेत. आतां लाज धरा आणि दार बंद करा. कोणी पाहिलें तर दोघांपैकीं एकाचीहि शोभा राहणार नाहीं.'

"मी तोंड तर लालच्या लाल ठेवलें, पण शरमलों मात्र खरा. दरवाजा बंद केला. पत्नी जर मला सोडून जाऊं शकत नव्हती तर मी तरी तिला टाकून कुठे जाणार होतों? आमच्या मध्यें पुष्कळ भांडणें झालीं आहेत, पण परिणाम नेहमीं कल्याणप्रदच झालेला आहे. पत्नीनें स्वतःच्या अद्भुत सहनशक्तीच्या जोरावर जय मिळविला आहे.

" हें वर्णन आज मी तटस्थवृत्तीनें करूं शकतों, कारण हा प्रसंग आमच्या जुन्या युगींचा आहे. आज मी मोहांध पति नाहीं, शिक्षकहि नाहीं. मनांत आणल्यास कस्तूरबाईच आज मला धमकी देऊं शकेल. आज आम्ही कसलेले मित्र आहोंत. एकमेकांविषयीं निर्विकार होऊन वागत आहोंत. कोणत्याहि तऱ्हेच्या उपकारफेडीची अपेक्षा न करतां माझ्या दुखण्यामध्यें माझी शुश्रूषा करणारी ती सेविका आहे. "*

या लहान प्रसंगाच्या द्वारें आपणाला बा आणि बापूजींच्या त्यावेळच्या गृहजीवनांत डोकावून पाहतां येतें.

बांच्या मृत्यूनंतर बापूंना सांत्वनपर अनेक पत्रें व तारा आल्या. व्हाईसरॉय वेवेल यांच्या पत्राला पाठविलेल्या उत्तरांत बापूंनीं लिहिलें आहे कीं:

" . . . प्रथम माझ्या पत्नीच्या मृत्यूबद्दल तुम्हीं जें मायाळुपणानें सान्त्वनपर शोकप्रदर्शन केलें आहे त्याबद्दल मी तुमचे व लेडी वेवेल यांचे आभार मानतों. जरी त्यांच्या मृत्यूमुळें त्या सतत होणाऱ्या वेदनांतून मुक्त झाल्या म्हणून मी त्यांच्या मृत्यूचा सत्कार केला, तरी मला वाटलें होतें त्यापेक्षां या हानीमुळें मला जास्तच दुःख होत आहे. आम्ही एक असाधारण दंपती होतों. १९०६ त एकमेकांच्या संमतीनें आणि नकळत झालेल्या प्रयोगांनंतर आम्हीं आत्मसंयमाचा जीवनाचा नियम म्हणून निश्चितपणें स्वीकार केला. परिणामीं आमच्यामधील स्नेहगांठ पूर्वीं कधीं नव्हती इतकी दृढ बनली, त्यामुळें मला फार आनंद झाला. आम्ही दोन भिन्न व्यक्ति राहिलों नाहीं. माझी इच्छा नसतांहि त्यांनीं माझ्यांतच विलीन होण्याचें पसंत केलें. परिणामीं खरोखरच त्या माझें शुभतर अर्धांग बनल्या. त्या सदा अतिशय दृढ इच्छा-शक्ति असलेल्या स्त्री होत्या. नवपरिणीत दशेंत मी त्यांना चुकीनें हट्टी समजत असें. पण बळवान इच्छाशक्तीमुळें त्या अजाणतांच अहिंसक असह-कार-कलेच्या आचरणाच्या बाबतींत माझ्या गुरु झाल्या. तिच्या आचरणाचा आरंभ माझ्या स्वतःच्या कुटुंबापासूनच झाला. १९०६ त जेव्हां त्या ( असहकारा ) ला मी राजकीय क्षेत्रांत रुजू केलें तेव्हां त्याचें अधिक व्यापक व मुद्दाम योजलेलें सत्याग्रह असें नांव पडलें. दक्षिण आफ्रिकेंत हिंदी जेल्यात्रा सुरु झाली तेव्हां श्री. कस्तुरबा सत्याग्रहींपैकीं एक होत्या. माझ्या-

* 'आत्मकथा', खंड २ रा, पृ. २८-३०.

पेक्षां त्यांना जास्त शारीरिक त्रास झाला. किती तरी वेळां जेलमध्यें जाऊन आल्या होत्या तरी जेथें सर्व सुखसोयी मिळत आहेत अशा या वर्तमान कैदखान्यांत त्यांना जमलें नाहीं. इतर अनेकांबरोबर माझी व नंतर लगेच त्यांची धरपकड झाली, त्यामुळें त्यांना मोठा धक्का बसला व त्यांचें मन खट्टू झालें. माझ्या धरपकडीसाठीं त्यांची मुळींच तयारी नव्हती. मी त्यांना खात्री दिली होती कीं, सरकारला माझ्या अहिंसेवर विश्वास आहे, आणि मी स्वतः पकडून घेऊं इच्छित नाहीं तोपर्यंत ते मला पकडणार नाहींत. खरोखर, त्यांच्या ज्ञानतंतूंना एवढा जबर धक्का बसला कीं, त्यांच्या धरपकडीनंतर त्यांना तीव्र अतिसार झाला व त्यांच्याबरोबरच पकडलेल्या डॉ. सुशीला नय्यर यांनीं त्यावर उपचार केले नसते तर या जेलमध्यें मला भेटण्यापूर्वीच त्यांचा देह मुक्त झाला असता. माझ्या हजेरीमुळें त्यांना आश्वासन मिळालें व अधिक कांही उपचार केल्यावांचूनच अतिसार बरा झाला. पण खट्टू झालेलें मन खट्टूच राहिलें. त्यामुळें बोलतां बोलतां संतापाव्या असा त्यांचा स्वभाव झाला, व त्या योगानें पीडा सहन करतां करतां हळुहळु देह मुक्त झाला."

# ६

# अपरिग्रहाची दीक्षा

बापूंच्याबरोबर त्यांच्या कित्येक व्रतांत अनायासें व इच्छापूर्वक, आणि कित्येक व्रतांत सुरवातीला मनांतून नसतां व आयासपूर्वक पण नंतर समजुतीनें अशा रीतीनें बा सहभागी झाल्या होता. अपरिग्रहाच्या बाबतींत बांना चांगलेच प्रयत्न करावे लागले. त्यांतील पहिला प्रसंग आत्मकथेंतून बापूंच्या शब्दांत दिला आहे :

"लढाईच्या (सन १८९७ ते '९९ पर्यंतचें बोअर युद्ध) कामांतून मोकळा झाल्यानंतर मला वाटूं लागलें कीं यापुढें माझें काम दक्षिण आफ्रिकेंत नसून स्वदेशीं आहे. मी माझ्या सहकाऱ्यांजवळ मला मोकळा करण्याबद्दल मागणी केली. मोठ्या मुष्किलीनें ती मागणी एका अटीवर मान्य झाली. अट अशी होती कीं, एका वर्षाच्या आंत जर हिंदी समाजाला माझी जरूर पडली तर मीं परत दक्षिण आफ्रिकेला यावें. मला



परत स्वदेशांत (१९१५)

ही अट कठीण वाटली, पण मी प्रेमपाशांनीं जखडलेला होतों. मित्रांचें म्हणणें नाकारणें मला शक्य नव्हतें. मी वचन दिलें व परवानगी मिळविली.

"यावेळीं माझा निकट संबंध नाताळशींच होता असें म्हणतां येईल. नाताळांतील हिंदी लोकांनीं मला प्रेमामृतानें न्हाऊं घातलें. टिकटिकाणीं मानपत्रें देण्यासाठीं सभा झाल्या आणि प्रत्येक ठिकाणाहून मौल्यवान भेटी आल्या. भेटींमध्यें सोन्याचांदीच्या वस्तु होत्याच, पण शिवाय हिरेमाणकांच्या वस्तूदेखील होत्या.

"शिवाय या नजराण्यांमध्यें कस्तूरबाईसाठीं पन्नास गिनींचा एक हारहि मिळाला होता. परंतु तिला मिळालेल्या वस्तूहि माझ्या सेवेबद्दलच होत्या. त्यामुळें त्यांना वेगळ्या पाडतां येत नाहींत.

"यापैकीं मुख्य नजराणे ज्या दिवशीं संध्याकाळीं मिळाले त्या दिवसाची रात्र मी बावरलेल्या स्थितींत जागून काढली. खोलींत येरझारा घालीत राहिलों. पण काय करावें याचा निर्णय होईना. शेकडों रुपयांचे नजराणे सोडून देणें कठिण वाटे, पण ते ठेवून घेणें त्याहून कठिण वाटत होतें.

"मी एक असले नजराणे पचवूं शकेन; पण माझ्या मुलांचें काय ! पत्नीचें काय ? त्यांना मी सेवेचें शिक्षण देत होतों, सेवेबद्दल मोबदला घेणें योग्य नाहीं असें सांगत असें. घरामध्यें मी मौल्यवान दागिने ठेवीत नसें. राहणी अधिकाधिक साधी होत होती. मग या दागिन्यांचें आणि जवाहिरांचें मीं काय करावें ?

"मी या वस्तु ठेवून घेतां कामा नये, अशा निर्णयावर मी आलों. पारशी रुस्तुमजी इत्यादिकांना त्या दागिन्यांचे ट्रस्टी नेमून त्यांच्या नांवें लिहून देण्याचा लेख लिहून काढला, आणि सकाळीं बायकामुलांचा विचार घेऊन स्वतःचा भार हलका करण्याचा निश्चय केला.

"धर्मपत्नीची समजूत पाडणें कठिण जाईल हें मला माहीत होतें. मुलांची समजूत घालायला मुळींच अडचण येणार नाहीं अशी मला खात्री होती. त्यांना वकील नेमण्याचा विचार केला.

"मुलांची लगेच समजूत पटली. 'आम्हांला या दागिन्यांची जरूर नाहीं. आपण ते सर्व परत करावेत. आणि त्यांतूनहि आम्हांला अशा वस्तु

इच्छाशा वाटल्याच तर आपल्याला स्वतःलाच त्या घेतां येणार नाहींत काय ? असें ते म्हणाले.

"मला आनंद वाटला. 'तर मग आईची तुम्ही समजूत घालाल ना ?' मी विचारलें.

"'जरूर, जरूर. तें आमचें काम. तिला तरी दागिने थोडेच अंगावर घालायचे आहेत ! ती ठेवणार आमच्यासाठीं म्हणूनच. आम्हांला ते नको असले म्हणजे ती कशासाठी हट्ट धरील ?

"पण मला वाटलें होतें त्याहून तें काम कठिण ठरलें. 'तुम्हांला एक नसेल जरूर, तुमच्या मुलांनाहि नसेल. मुलांचें काय, जशीं चढवावीं तशीं चढतात. मला नाहीं घालूं दिलेत तरी हरकत नाहीं, पण माझ्या सुनांचें काय ? त्यांच्या तर उपयोगी पडतील ? आणि उद्यांचा दिवस कसा येईल हें तरी कोणीं पाहिलें आहे ? इतक्या प्रेमानें दिलेल्या वस्तु परत करणें बरें नाहीं.' अशा तऱ्हेनें वाग्धारा सुरू झाली आणि त्यांतच अश्रुधारा येऊन मिसळली. मुलें भक्कम राहिलीं. मला डगमगण्याचें कारणच नव्हतें.

"मी हळूच म्हटलें, 'मुलगे लग्न करतील तेव्हांची गोष्ट. आपल्याला कोठें बालवयांत लग्नें करून द्यायचीं आहेत ? मोठे झाल्यावर स्वतःला वाटेल त्याप्रमाणें करीत ना ? आणि आपल्याला तरी दागिन्यांची हौस वाटणाऱ्या सुना थोड्याच शोधायच्या आहेत ? इतक्या उपर कांही दागिने करावेच लागले तर मी कुठें गेलों नाहीं ना ?'

"'तुमचे पराक्रम कळले ! माझे दागिनेहि काढून घेतले तेच तुम्ही कीं नाहीं ? मला धड घालूं दिले नाहींत ते तुम्ही सुनांसाठीं काय घेणार ? मुलांना तर आजपासून बैरागी बनवतां आहां ! हे दागिने परत नाहीं करायचे. त्यांतून माझ्या हारावर तुमचा काय हक्क ?'

"'पण तो हार तरी तुझ्या कामगिरीबद्दल मिळाला आहे कीं माझ्या कामगिरीबद्दल ?' मी विचारलें.

"'त्याचें काय मोठें ? तुमची कामगिरी ती माझी पण खरीच. मला रात्रंदिवस राबविलीत ही काय माझी सेवा नव्हे ? मला रडवूनहि वाटेल त्याला घरांत ठेवलेत, आणि माझ्याकडून त्याची चाकरी करविलीत, तें कुठें गेलें ?'

"हे सर्व बाण तीक्ष्ण होते. त्यांतून कित्येक लागतहि होते. पण दागिने तर मला परत करावयाचेच होते. पुष्कळशा गोष्टींबद्दल मी जेम तेम कबूली मिळविली. १८९६ मध्यें मिळालेल्या आणि १९०१ सालीं मिळालेल्या भेटी परत दिल्या. त्यांचा ट्रस्ट केला आणि त्यांचा सार्वजनिक कार्यासाठीं माझ्या किंवा ट्रस्टींच्या इच्छेनुरूप उपयोग व्हावा अशी अट ठरवून त्या बँकेंत ठेवल्या. . . .

"या कृत्याबद्दल मला कधींहि पश्चात्ताप वाटलेला नाहीं. जसजसा काळ गेला तसतसा कस्तूरबालाहि त्यांतील रास्तपणा समजून आला. आम्ही पुष्कळ मोहांपासून बचलों आहोंत.

"समाजसेवकाला खाजगी नजराणे घेतांच येत नाहींत असा माझा अभिप्राय बनला आहे."*

* * *

याप्रमाणें बांना अपरिग्रहाची प्रथम दीक्षा सन १९०१ त मिळाली, पण त्यांना याहून पक्की दीक्षा इतर गुरूंपासूनच मिळावयाची होती.

साबरमती आश्रमांत चोरांचा उपद्रव नेहमींच होत राहिला आहे. अल्बत् चोराला फार किंमती वस्तु तर तेथें मिळायच्या नाहींतच. पण आपल्यासारख्या गरीब देशांत थोड्याशा कपड्यालत्त्यांसाठीं किंवा भांड्यांकुंड्यांसाठींहि गरीब माणसें चोरी करायला प्रवृत्त होतात. वेळोंवेळीं आश्रमांत होणाऱ्या अशा चोऱ्यांपैकीं एक चोरी बांच्या खोलींत झाली. नक्की सांगतां येत नाहीं, पण बहुतेक १९२६ किंवा '२७ साल असेल. चोर कपड्यांनीं भरलेल्या दोन ट्रंका उचलून घेऊन गेले. त्यांतील कपडे काढून घेऊन व पेट्या जवळच्या शेतांत फेकून देऊन ते निघून गेले. चोरीवरून गोष्टी निघाल्या असतां बापूंनीं असा प्रश्न काढला कीं बांजवळ दोन ट्रंका भरून कपडे असतीलच कसे? आणि कशासाठीं असावेत? रोज निरनिराळ्या साड्या नेसणें, असलें कांहीं बा करीत नाहींत. बा म्हणाल्या कीं, चि. रामी व चि. मनु (हरिलालभाईच्या दोन मुली) यांची आई वारलीच आहे; पण कधीं माझ्याकडे आल्या तर दोन कपडे तर त्यांना दिले पाहिजेत कीं नाहीं? त्यासाठीं भेटींत

* 'आत्मकथा', खंड १ ला, पृ. २६४–६७.

आलेल्या साड्या व खादी मी ठेवून दिली होती. अल्बत्, बापूंचा मुद्दा हा होता कीं, आपणाला असा सांठा करतांच येत नाहीं, आणि साड्या किंवा खादी व्यक्तिगत भेट म्हणून मिळाली असली तरीहि तीं जर तात्कालिक जरूरीची असेल तरच ठेवतां येईल आणि जास्त असेल तर आश्रमाच्या कार्यालयांत जमा केली पाहिजे. त्या दागिन्यांप्रमाणेंच यावेळींहि या वस्तु बांना स्वतःसाठीं नको होत्या. मातृहृदयाची मुलींना कांहीं तरी द्यावें अशी प्रवृत्ति होते म्हणूनच बांनीं साड्या व खादी सांठविलीं होतीं. 'आपणाला असा व्यवहार ठेवून चालवयाचें नाहीं. मुली आपल्याकडे आल्या तर राहतील आणि खातील पितील, पण गरीबीचें व्रत धारण करणाऱ्याला असल्या भेटी देणें परवडणार नाहीं' वगैरे गोष्टींची बापूंनीं सायंकाळीं प्रार्थनेंत चर्चा केली. या 'चोर-गुरू' कडून मिळालेल्या दीक्षेनंतर बांनीं असें एक दोन कपड्यांसारखेंहि कांहीं सांठविलें नाहीं.

वैयक्तिक गरजांकडे पाहतां बांना अपरिग्रह अगदीं सहजसाध्य असा होता. स्वतःला कट्टे आश्रमवासी म्हणविणाऱ्यांनींहि बांचा साधेपणा पाहून लाजावें. मिरांबहेन लिहितात कीं : "जेव्हां आम्ही लांबचा व त्रासाचा प्रवास करीत असूं तेव्हां बापूजी म्हणत कीं, 'बांच्यापुढें आपण सगळे हरतो. इतकें कमी सामान व इतक्या कमी गरजा दुसऱ्या कुणाच्या आहेत? साधेपणाबद्दल माझा एवढा आग्रह असूनहि माझी सामग्री त्यांच्या-पेक्षां दुप्पट आहे.' आमचे जागसूदपणें प्रयत्न चालले असतांहि बांच्या स्वाभाविक असूनहि अचूक अशा स्वच्छ व भव्य साधेपणाबरोबर चढाओढ करणें आम्हाला अशक्य होतें. सर्व मंडळींत त्यांची वळकटी सर्वांत लहान असे. आणि त्यांची लहानशी पेटीसुद्धां केव्हांहि अव्यवस्थित किंवा खचून भरलेली नसे."

पण ही भौतिक अपरिग्रहाची गोष्ट झाली. बापूंच्या बरोबर राहून बांनीं हळुहळु आपल्या आकांक्षा व अभिलाषांचा परिग्रह सोडला होता व हाच विशेष उच्च व विशेष भव्य असा अपरिग्रह होय.

बांच्या या अपरिग्रहाची अथवा त्यागाची बापू खूप कदर करीत. एकदां आश्रमांत नवीनच दाखल झालेल्या एका गृहस्थाबरोबर बापू बोलत होते. बापूंचें असें मत आहे कीं, चहा, कॉफीसारखीं पेयें अपायकारक

आहेत. त्या गृहस्थानें बापूंना म्हटलें : "तर मग या आश्रमांत राहूनहि कॉफी कशा पितात ?"

बापूंनीं लगेच उत्तर दिलें : "पण बांनीं किती सोडलें आहे तें तुम्हांला कुठें माहीत आहे ? ही त्यांची एक संवय राहिली आहे. तीहि सोडण्यास मी त्यांना सांगितलें तर माझ्यासारखा जुल्मी कोण म्हणावा ?"

अर्थात् बांनीं शेवटीं शेवटीं कॉफी पिण्याचेंहि आपण होऊन सोडलें होतें. जरूर वाटल्यास तुळस व मिऱ्यांचा काढा त्या पीत.

## ७

## जोहानिसबर्गमधील बांचें घर

सन १८९८त घडलेल्या प्रसंगाचें वर्णन 'सत्याग्रहाच्या गुरु' नांवाच्या प्रकरणांत केलें आहे. त्यावरून बापू जेव्हां डरबन (नाताळ) मध्यें वकीली करीत होते तेव्हां त्यांचें घर कसें होतें याची अंधुक कल्पना आपणाला येते. सन १९०५त ते ट्रान्सव्हालांत जोहानिसबर्ग येथें वकीली करीत होते, तेव्हांच्या बापू व बांच्या गृहस्थाश्रमाची कल्पना मिसेस पोलाक यांच्या 'मि. गांधी द मॅन' या पुस्तकावरून तसेंच 'आत्मकथे'वरून येते. मिसेस पोलाक लिहितात :

"घर शहराच्या बाहेर उत्तम मध्यमवर्गीय वस्तींत होतें. दोन मजल्यांचें व स्वतंत्र आवाराचें बंगल्याच्या थाटाचें घर होतें. कम्पाउन्डांत बगीचा होता व समोरच लहान लहान टेकड्या असलेलें मैदान होतें. इमारतींत एकंदर आठ खोल्या होत्या. मजल्यावरील वरांडा लांबरुंद व खूप हवा येईल असा होता. उन्हाळ्यांत तेथें निजणें शक्य होतें, व निजण्यासाठीं त्याचा उपयोग केला जातहि असे.

"कुटुंबांत गांधीजी, त्यांच्या पत्नी व तीन मुलें होतीं. मणिलाल ११ वर्षांचे, रामदास ९ वर्षांचे व देवदास ६ वर्षांचे होते. (हरिलाल त्यावेळीं स्वदेशीं गेले होते.) त्या शिवाय तार ऑफिसांत काम करणारे एक तरुण इंग्रज, गांधीजींच्या नात्याचा एक हिन्दी तरुण, तसेंच मि. पोलाक एवढे होते. माझी त्यांत भर पडली. तेव्हा अधिक कुणासाठीं घरांत सोय राहिली नाहीं.

" सकाळीं साडे सहा वाजतां घरांतील पुरुषमंडळी दळण्याचें काम करीत (बापूंनीं जीवनांतील परिवर्तन या वेळीं सुरू केलेलें होतें हें लक्षांत ठेवावें), कारण रोटी घरींच करण्यांत येत असे. एका खोलींत एक जातें ठेवण्यांत आलें होतें. तेथें सर्व एकत्र होत. दळण्याचें काम अर्ध्या-एक तासांतच संपत असे, पण जात्याच्या आवाजापेक्षांहि गप्पा व हंसण्याचा आवाज मोठा होत असे. कारण त्यावेळीं घरांत हास्याचे फवारे वारंवार उडत असत. उपयुक्ततेच्या दृष्टीनें कामाच्या महत्त्वाखेरीज त्या कामांतून सकाळचा व्यायाम होत असे. दुसरा व्यायाम दोरीवरील उड्यांचा असें. बापू त्यांत निष्णात होते.

" घरांत संध्याकाळचा जेवणाचा वेळ सर्वांत अधिक आनंदाचा असे. सर्व घर त्याचवेळीं एकत्र होत असें. बापूंना पाहुणचार करण्याची फार आवड होती. तेव्हां कोणी ना कोणी पाहुणा नाहीं असा दिवस क्वचितच जात असे. दररोज संध्याकाळीं जेवण्यास दहा ते पंधरा माणसें असत.

" जेवणांतील पदार्थ फार साधे असत; आणि टेबलावर सर्व मांडून ठेवून जेवायला बसत, त्यामुळें वाढण्यासाठीं कोणी नोकर उभा असण्याची जरूर पडत नसे. पानांत प्रथम दोन-तीन भाज्या, डाळ, कडक भाजलेल्या रोट्या, शेंगदाणे किंवा इतर कसल्या तरी बिया वाटून केलेलें लोणी, तसेंच अनेक प्रकारच्या कच्च्या भाजीपाल्याच्या कोशिंबिरी, एवढें वाढण्यांत येत असें. दुसऱ्या खेपेच्या वाढपांत दूध व फळें घेण्यांत येत; आणि त्यानंतर कॉफी किंवा लेमनेड ऋतुमानाप्रमाणें गरम किंवा थंड घेत. जेवण्यांत कधीं घाई होत नसे. टेबलाशीं तब्बल एक तास जात असे; व जेवतां जेवतां अनेक प्रकारच्या चर्चा चालत. साधारणपणें गंमतीच्या विषयांसंबंधीं गप्पा, विनोद आणि थट्टा-मस्करी चाले. बापूंमध्यें विनोदवृत्ति खूपच आहे व कांहीहि गंमतीची गोष्ट निघाली कीं ते खूप हंसत.

" एकदा कित्येक युरोपियन जेवायचें आमंत्रण लावून घेऊन आमच्याकडे आले. बापूंची कांहीं त्यांच्याशीं फारशी ओळख नव्हती. आणि बांची तर मुळींच ओळख नव्हती. त्यांनीं आल्यावर गृहजीवना-विषयीं सरळ उघडपणें व असभ्य वाटावी अशा कुतुहलवृत्तीनें प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. व्यक्तिगत गोष्टीविषयींच्या प्रश्नांत तर तिरस्कारहि दिसून येत होता. पण बापू मात्र शांतपणें उत्तरें देत होते; आणि हिंदी

लोक काय करतात व काय करीत नाहींत याविषयींच्या त्यांच्या कित्येक गोष्टी ऐकून खूप हंसतहि होते. परंतु बांना हें सर्व पाहून राग आला, व आम्ही जेवण्याच्या खोलींत येण्यापूर्वीच त्या निघून गेल्या. बापूंनी त्यांना बोलाविण्यास कुणाला तरी सांगितलें, पण त्या आल्या नाहींत. म्हणून ते बोलावण्यास गेले, पण बांनीं खालीं येण्यास स्वच्छ नकार दिला. बापूंनीं येऊन बांच्या गैरहजेरीच्या कारणासंबंधीं कांहींतरी खुलासा केला व जेवण उरकलें. दुसरे दिवशीं मी बांना भेटलें तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, 'असल्या रिकामटेकड्या लोकांनीं घरांतील ताळतंत्र पाहायला यावें आणि माझी व माझ्या घराची कुचेष्टा करावी हें मला नाहीं सहन होत. अशा लोकांना मी नाहींच भेटणार. बापूंना भेटायचें असेल तर ते खुशाल भेटोत.' मला वाटतें बांनीं हा निश्चय सोडावा म्हणून बापूजींनीं त्यांना समजावून पाहिलें, पण त्या आपल्याच मताला चिकटून राहिल्या व बापूजींच्या कुठल्याहि युक्तिवादानें ढळल्या नाहींत."

जीवनांत परिवर्तन करून आपलें घर कशा तऱ्हेचें बनविलें त्या विषयीं आत्मकथेंत बापू लिहितात :

"बॅरिस्टरच्या घरांत जितका साधेपणा आणतां येण्यासारखा होता, तेवढा तर आणलाच; तरी पण कांहीं सामान ठेवल्याशिवाय चालण्यासारखें नव्हतें. खरा साधेपणा वाढला तो अंतःकरणाचा. प्रत्येक काम स्वतःच्या हातानें करण्याची हौस वाढली, आणि त्यांत मुलांनाहि तयार करूं लागलों.

"बाजारची रोटी घेण्याऐवजीं घरच्या घरींच आंबवणाशिवायची क्यूनेच्या सूचनेनुरूप रोटी हातानें तयार करूं लागलों. तिला गिरणीचें पीठ उपयोगाचें नव्हतें. शिवाय गिरणींत दळून आणलेल्या पिठाऐवजीं हातानें दळलेलें पीठ वापरण्यांत साधेपणा, आरोग्य व पैशाची अधिक काटकसर हीं साधतात, असेंहि मला वाटलें. म्हणून हातानें चालवण्याचें एक जातें सात पौंड देऊन खरेदी केलें. त्याचें चाक जड होतें. तें दोघांना सहज चालवितां येई, पण एकट्याला जड पडे. हें जातें फिरवण्यास मुख्यतः पोलाक, मी व मुलें लागत असूं. कस्तूरबाई त्यावेळीं स्वैंपाकांत गुंतलेली असे, पण तीहि कधीं कधीं येई. मिसेस पोलाक आल्या, तेव्हां त्याहि यांत सामील झाल्या. हा व्यायाम मुलांना चांगला फायदेशीर झाला. त्यांच्याकडून हें

किंवा दुसरें कसलेंहि काम मी कधीं जबरदस्तीनें करून घेतलेलें नाहीं, पण ते आपण होऊनच खेळ म्हणून जातें फिरवायला येत. दमले म्हणजे सोडून जाण्याची त्यांना मोकळीक होती. परंतु कारण कांहींहि असो, पण हीं मुलें काय किंवा इतरहि काय, ज्यांची माहिती आपल्याला पुढें होणार आहे, तींहि सर्वच मला खूप काम करून देत असत. माझ्या नशिबानें तिळ्या मुलांशींहि प्रसंग येत असे, नाहीं असें नाहीं; पण बहुतेक जण दिलेलें काम हौसेनें करीत. 'दमलों' म्हणणारे त्या वेळच्या मुलांमध्यें तरी फारसे कोणी आठवत नाहींत.

"घरच्या साफ–सफाईसाठीं एक नोकर होता. तो कुटुंबांतीलच एक होऊन राहत असे, आणि त्याच्या कामांत मुलेंहि भरपूर भाग घेत. पाय–खान्यांतील मळ काढून न्यायला म्युनिसिपालिटीचा नोकर येत असे; पण पायखान्याची खोली साफ करणें, बैठक धुणें वगैरे कामें नोकराकडे देण्यांत येत नसत. तशी अपेक्षाहि आम्ही बाळगीत नसूं. तें काम आम्ही जातीनें करीत असूं, व त्यांतहि मुलांना शिक्षण मिळे. त्याचा परिणाम असा झाला कीं, माझ्या एकाहि मुलाला पायखाने साफ करण्याची खंत वाटत नाहीं; आणि आरोग्याचे सामान्य नियमहि ते सहजासहजीं शिकले आहेत. जोहानिसबर्गमध्यें आजारी तर कुणी क्वचितच पडत असे. कोणी पडला तर शुश्रूषेला मुलें असत आणि तें काम तीं आनंदानें करीत."*

८

## बांची दृढता

हिंदु धर्माचे संस्कार बांमध्यें किती खोलवर पोंचले होते त्याविषयींचा हा एक प्रसंग आहे. मृत्यु आला तरी चालेल, पण मांस व दारू घेऊन 'मनुष्यदेह' बाटविणार नाहीं, असा त्यांचा निश्चय होता. हा प्रसंग बापूजींच्या आत्मकथेंतून घेतला आहे.

"कस्तूरबाईला वारंवार रक्तस्राव (धुपणी) होत असे. एका डॉक्टर मित्रानें शस्त्रक्रिया करून घेण्याची शिफारस केली. थोडे आढेवेढे घेतल्यानंतर पत्नी शस्त्रक्रिया करून घेण्यास कबूल झाली. शरीर तर अतिशय

* 'आत्मकथा', खंड २, पृ. ७३–७४

क्षीण होऊन गेलें होतें. डॉक्टरांनीं क्लोरोफॉर्म न देतांच शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रियेच्या वेळीं वेदना तर खूप होत होत्या; पण ज्या सोशिकपणानें कस्तूरबाईनें तें सर्व सहन केलें तो पाहून मी तर आश्चर्यचकित झालों. शस्त्रक्रिया निर्विघ्नपणें पुरी झाली. डॉक्टर व त्यांची पत्नी यांनीं कस्तूरबाईंची उत्तम शुश्रूषा केली.

"ही गोष्ट डरबनमध्यें घडली होती. दोनतीन दिवसांनीं डॉक्टरांनीं मला निश्चितपणें जोहानिसबर्गला जाण्याची परवानगी दिली. मी गेलों. थोडक्याच दिवसांनीं बातमी आली कीं कस्तूरबाईंचें शरीर बिल्कुल सुधारत नाहीं व तिला अंथरुणांत उठून बसवतहि नाहीं. एकदा तर ती बेशुद्धहि झाली होती. डॉक्टरांना माहीत होतें कीं मला विचारल्याशिवाय कस्तूरबाईला दारू किंवा मांस औषधासाठीं किंवा अन्न म्हणून देतां कामा नये. डॉक्टरांनीं मला जोहानिसबर्गला टेलिफोन केला.

"'तुमच्या पत्नींना मांसाचा सुरवा किंवा गोमांसाचा काढा देणें आवश्यक आहे, असें मला वाटतें; तुमची परवानगी पाहिजे.'

"मी उत्तर दिलें, 'मी तशी परवानगी देऊं शकत नाहीं. पण कस्तूरबाई स्वतंत्र आहे. तिला विचारण्यासारखी स्थिति असेल तर विचारा व तिची इच्छा असेल तर बेलाशक द्या.'

"'रोग्याला असल्या गोष्टी विचारणें मला पसंत नाहीं. तुम्ही समक्ष इकडे येणें आवश्यक आहे. मला योग्य वाटेल तें खाऊं घालण्याची मला परवानगी नसेल तर तुमच्या पत्नीच्या जिवाबद्दल मी जबाबदार नाहीं.'

"मी त्याच दिवशीं डरबनची गाडी पकडली. डरबनला पोंचलों. डॉक्टरनीं समाचार सांगितला, 'मीं तर सुरवा अगोदर देऊन तुम्हाला टेलिफोन केला होता.'

"'डॉक्टर, मी याला दगा समजतों,' मीं म्हटलें.

"'औषधोपचार करतांना दगाबिगा वगैरे मी कांही समजत नाहीं. आम्ही डॉक्टर लोक अशा प्रसंगीं रोग्यांना किंवा त्यांच्या आप्तेष्टांना फसविण्यामध्येंच पुण्य समजतों. कसेंहि करून रोग्याला बचावणें हा आमचा धर्म आहे,' डॉक्टरनीं दृढपणें जबाब दिला.

"मला फार दुःख झालें. मी गप्प राहिलों. डॉक्टर माझे स्नेही होते. त्यांचे न् त्यांच्या पत्नीचे माझ्यावर उपकार होते. पण असलें वर्तन सहन करण्याची माझी तयारी नव्हती.

"'डॉक्टर, अजून काय तें स्पष्ट सांगा. काय करायचें म्हणतां? माझ्या पत्नीला मी तिच्या संमतिखेरीज मांस खाऊं घालूं देणार नाहीं. मांस न खाल्ल्यामुळें तिचा मृत्यु होणार असेल तर तो सहन करण्याची माझी तयारी आहे.'

"डॉक्टर म्हणाले, 'तुमचा वेदान्त माझ्या घरीं तरी चालणार नाहीं. मी सांगतों कीं आपल्या पत्नीला माझ्या घरीं तुम्ही ठेवाल तोपर्यंत मी जरूरीप्रमाणें मांस किंवा जें जें कांही खाऊं घालणें योग्य असेल तें तें खाऊं घालीन. तसें नको असेल तर तुम्ही आपल्या पत्नीला घेऊन चला. मी होऊन तिला आपल्या घरांत मरूं देणार नाहीं."

"'तर मग तुमचें असें म्हणणें आहे कीं काय कीं, मी आपल्या पत्नीला आतांच घेऊन जावें?'

"'मी कुठें म्हणतों आहे कीं घेऊन जा? माझें एवढेंच म्हणणें कीं, माझ्यावर कसलाहि निर्बंध घालूं नका. तसें कबूल असल्यास आम्ही दोघांकडून होईल तेवढी शुश्रूषा आम्ही करूं, आणि तुम्ही खुशाल चला. एवढी सरळ गोष्टसुद्धां जर तुम्हाला समजत नसेल तर मात्र मला निरुपायास्तव सांगावें लागणार कीं, आपल्या पत्नीला घेऊन चला.'

"मला अंधुक स्मरतें कीं माझ्या मुलांपैकींहि एकजण त्या वेळीं माझ्याबरोबर होता. मी त्याचाहि विचार घेतला. त्यानें सांगितलें, 'तुम्ही म्हणतां तें मला कबूल आहे. आईला मांस खाऊं घालतां कामा नये.'

"नंतर मी कस्तूरबाईपाशीं गेलों. ती फार अशक्त झाली होती. तिला कांहींहि विचारणें माझ्या जिवावर आलें. परंतु कर्तव्य म्हणून मीं तिला वरील हकीकत थोडक्यांत सांगितली. तिनें दृढतापूर्वक उत्तर दिलें, 'मला मांसाचा सुरवा घ्यावयाचा नाहीं. मनुष्यदेह वारंवार मिळत नसतो. तुमच्या मांडीवर डोकें टेकून मी मेल्यें तरी बेहेत्तर; पण माझ्यानें हा देह बाटवला जाणार नाहीं.'

"मला समजावून सांगतां आलें तेवढें मीं सांगितलें आणि म्हटलें 'तूं माझ्या विचाराप्रमाणें वागायला बांधलेली नाहींस.' आमच्या माहितींतील कित्येक हिंदु मांस व मद्य घेत असत, तेंहि सांगितलें. परंतु तिनें विचार बदलला नाहीं, आणि म्हणाली, 'मला येथून घेऊन चला.'

"मला फार समाधान वाटलें. घेऊन जाण्याची भीति वाटली पण निश्चय करून टाकला. डॉक्टरांना पत्नीचा निश्चय कळविला. डॉक्टर रागावून म्हणाले, 'तुम्ही तर घातकी पति दिसतां! असल्या दुखण्यांत त्या बिचारीपाशीं असली गोष्ट काढतांना तुम्हाला शरम तरी कशी नाहीं वाटली? मी तुम्हांला सांगतों कीं, तुमची पत्नी येथून हलविण्यासारख्या स्थितींत नाहीं. यत्किंचितहि हिसके सहन करण्यासारखें तिचें शरीर राहिलेलें नाहीं. रस्त्यांतच तिचा प्राण गेला तर मला आश्चर्य वाटणार नाहीं. इतक्याहि उपर तुम्ही हट्टच चालविणार तर तुमचे तुम्ही मुखत्यार आहां. सुरवा देण्याची मला मोकळीक नसेल तर, एक रात्रभरहि आपल्या घरांत ठेवण्याची जबाबदारी मी स्वीकारणार नाहीं.'

"पाऊस झिम झिम पडत होता. स्टेशन दूर होतें. डरबन ते फिनिक्स आगगाडी व फिनिक्स स्टेशनाचेपुढें सुमारें अडीच मैल पायीं जावयाचें होतें. धोका तर भरपूर होता. पण ईश्वर साहाय्य करणारा आहे अशी मी मनाची समजूत केली. मी एक मनुष्य अगोदर फिनिक्सला पाठविला. फिनिक्समध्यें आमचेपाशीं हॅमक होतें. हॅमक म्हणजे जाळीदार कापडाची झोळी किंवा पाळणा. त्याचीं टोकें बांबूला बांधलीं म्हणजे रोग्याला त्याच्यांत सुखानें झुलत रहातां येतें. वेस्ट यांना निरोप पाठविला होता कीं तें हॅमक, एक बाटली गरम दुधाची, एक बाटली गरम पाण्याची आणि सहा माणसें एवढें घेऊन त्यांनीं स्टेशनवर यावें.

"दुसरी आगगाडी निघण्याची वेळ झाली तेव्हां मी रिक्षा मागविली; आणि त्या भयंकर स्थितींतच पत्नीला तिच्यामध्यें बसवून मीं स्टेशनचा रस्ता धरला.

"पत्नीला मीं धीर देण्याची जरूरच नव्हती, उलट तिनेंच मला धीर देऊन म्हटलें, 'मला कांहीं व्हावयाचें नाहीं. तुम्ही काळजी करूं नका.'

" हाडांच्या त्या सांपळ्याचें वजन विशेष नव्हतेंच. अन्न बिल्कुल जात नसे. गाडीच्या डब्यापर्यंत पोंचण्यासाठीं स्टेशनच्या विशाल प्लॅटफॉर्मवरून दूरपर्यंत चालत जावयाचें होतें. तेथें रिक्षा जाण्यासारखी नव्हती. मी तिला धरून डब्यापर्यंत घेऊन गेलों. फिनिक्स स्टेशनवर तो झोळी आलीच होती. तींतून आम्ही दुखणाइताला त्रासाशिवाय उचलून नेलें. तेथें केवळ पाण्याच्या उपचारांनीं शरीर हळुहळु सुधारत गेलें.

" फिनिक्सला पोंचल्यानंतर दोन तीन दिवसांनीं एका स्वामींचें आगमन झालें. आमच्या 'हट्टाची' गोष्ट ऐकून त्यांना दया आली आणि ते आम्हां दोघांची समजूत घालण्यासाठीं आले. मला स्मरतें त्याप्रमाणें स्वामी आले त्यावेळीं मणिलाल आणि रामदासहि तेथें होते. स्वामीजींनीं मांसाहाराच्या निर्दोषतेवर प्रवचन चालविलें. मनुस्मृतींतील श्लोकांचें प्रमाण दिलें. पत्नीच्या देखत त्यांनीं हें संभाषण चालविलेलें मला आवडलें नाहीं; पण शिष्टाचाराखातर मी तें संभाषण चालूं दिलें. मला मांसाहाराच्या पुष्ट्यर्थ मनुस्मृतीच्या प्रमाणाची जरूर नव्हती. मला ते श्लोक माहीत होते. ते प्रक्षिप्त आहेत असें मानणारा एक पक्ष आहे हेंहि मला माहीत होतें. आणि ते प्रक्षिप्त नसले तरीहि अन्नाहारासंबंधींचे माझे विचार स्वतंत्रपणेंच बनलेले होते. कस्तूरबाईची श्रद्धा आपलें काम करीतच होती. तिला बिचारीला शास्त्रांचें प्रमाण काय कळणार? वाडवडिलांची रूढि हाच ती धर्म समजत होती. मुलांचा बापाच्या धर्मावर विश्वास होता. त्यामुळें ते स्वामींबरोबर विनोदच करीत होते. अखेरीला कस्तुरबाईनेंच पुढीलप्रमाणें बोलून तो संवाद थांबविला:

" 'स्वामीजी, तुम्ही कांहीं म्हणा, पण मला मांसाचा सुरवा खाऊन बरें व्हायचें नाहीं. यापुढें तुम्ही माझें डोकें उठविणार नाहीं तर उपकार होतील. इतर गोष्टी तुम्हाला बोलायच्या असतील त्या मुलांच्या वडिलांबरोबर तुम्ही मागाहून करून घ्या. मी माझा निश्चय तुम्हाला सांगून टाकला.' "*

* 'आत्मकथा', खंड २ रा पृ. ८९-९३.

# ९

# बापूंना वांचविलें

बापूंनीं जसें बांना आजारांतून वांचविलें, तसेंच बांनीं बापूंनाहि अद्‌भुतपणें वांचविलें आहे. बापू आज आपणांजवळ आहेत ते बांच्याच प्रभावानें असें म्हटलें तर अगदींच खोटें नाहीं.

दूध हें प्राणिजन्य व म्हणून मांसासारखा आहार आहे असें मानून बापूंनीं बऱ्याच दिवसांपासून दूध सोडलें होतें. त्यांतहि त्यांना जेव्हां समजलें कीं, जास्तींत जास्त दूध मिळावें म्हणून गाई व म्हशींवर कलकत्ता व इतर शहरांतून मूत्राशयावर 'फुक्क्या'ची क्रिया करण्यांत येते, तेव्हांपासून त्यांनीं दूध न घेण्याची प्रतिज्ञा केली होती. त्यावेळीं बापूंचा मुख्य आहार भाजलेले व कुटलेले शेंगदाणे, गूळ, केळीं, दोन तीन लिंबांचें पाणी, असा होता. एक दिवस शेंगा जास्त खाल्ल्या गेल्यामुळें बापूंना जरासा मुरडा झाला. त्यांनीं त्याच्या–कडे लक्ष दिलें नाहीं. दुसरे दिवशीं कांहीं तरी सण होता. बापू दूध किंवा तूप घेणार नाहींतच, म्हणून त्यांच्यासाठीं गव्हाच्या भरडीची लापशी तेलां–तून केली होती व सबंध मुगाचें घट्ट वरण केलें होतें. बापूंचा खायचा विचार नव्हता; पण कांहींसे स्वादाला बळी पडून व कांहींसे बांना संतुष्ट करण्या–साठीं बापू जेवावयास बसले. जरासें खाण्याच्या विचारानें बसले पण सहजीं जास्त खाल्लें गेलें. खाल्ल्यास तास झाला असेल नसेल तोंच भयंकर मुरडा सुरू झाला. हा काळ प्रसिद्ध खेडाजिल्हा सत्याग्रहानंतरचा रिक्रूट भरतीचा होता; व त्या संबंधांत त्यांना त्याच दिवशीं सायंकाळीं नडि–आदला जावयाचें होतें. मुरड्याकडे दुर्लक्ष करून गेले, पण तेथें रोग खूप वाढला. पाव पाव तासानें परसाकडेस होऊं लागली; व चोवीस तासांतच बापूंचें कसलेलें शरीर अगदीं खिळखिळें होऊन गेलें. डॉक्टर आले पण औषध न घेण्याच्या त्यांच्या आग्रहापुढें कुणाचें कांहीं चाललें नाहीं. उत्तम शुश्रूषा चालली असतांहि शरीर क्षीण होत चाललें. पाण्याचे व असेच दुसरे उपचार करून बापूंनीं रोग तर हटवला. पण शरीरांत कांहीं केल्या ताकद आली नाहीं. दोन तीन मित्रांनीं दूध नाहीं तर मांसाचा सुरवा किंवा अंडीं खायचा आग्रह केला. पण दुधालाच मांसाप्रमाणें मानून सोडणारा

असलें खायला कसा हो म्हणेल? माथेरानला गेल्यास शरीर भरेल असा सल्ला मिळाल्यावरून बापू माथेरानला गेले. पण तेथील पाणी जड असल्यामुळें तेथें मुळींच बरें वाटलें नाहीं, म्हणून मुंबईस आले. तेथें डॉक्टर दलालनीं त्यांचें शरीर तपासलें व आपले इलाज सुरू करण्यापूर्वी म्हटलें:
"तुम्ही दूध घेणार नाहीं तोंपर्यंत मला तुमचें शरीर सुधारतां येणें शक्य नाहीं. तुम्हाला दूध व लोह आणि सोमलचें इंजेक्शन घेतलेंच पाहिजे. एवढें कराल तर तुमचें शरीर पुन्हा बरोबर भरून आणण्याची गॅरंटी मी घेतों."

"इंजेक्शन द्या पण मी दूध घेणार नाहीं."

"तुमची दुधाविषयीं काय प्रतिज्ञा आहे?"

"गायी-म्हशींवर फुकयाची क्रिया होते हें कळल्यावर दुधाविषयीं मला तिरस्कार आला; व तो माणसाचा आहार नाहीं असें मी नेहमींच मानीत आलों असल्यानें मी दुधाचा त्याग केला."

"तर मग बकरीचें दूध घेतां येईल." बापूंच्या खाटेपाशीं बा उभ्या होत्या त्या उद्गारल्या.

"बकरीचें दूध घ्या म्हणजे माझें काम झालें," आपल्याला हवी तीच गोष्ट झाली म्हणून उत्साहित होऊन डॉक्टरांनीं म्हटलें.

बापूंनीं बा व डॉक्टर यांचा सल्ला मान्य केला. बापूंसारख्या सत्याच्या पुजाऱ्याला प्रतिज्ञेंतील प्राण नष्ट केला म्हणून दुःख झालेंच. पण प्रतिज्ञेचा शब्दार्थ पाळला गेला.

अशा रीतीनें बांच्या समयसूचकतेनें व सहजबुद्धीनें बापूंना वांचविलें असें म्हणतां येईल.

# १०

# पहिल्या स्त्री-सत्याग्रही

सध्या जेलमध्यें जाणें ही अतिशय सोपी गोष्ट होऊन बसली आहे; पण पूर्वी जेलचें नांव ऐकतांच लोक घाबरत असत. तेव्हां स्त्रीनेंहि कैदेंत जाण्यास हरकत नाहीं अशी कुणाला कल्पनाहि नव्हती. पण बापूजी कल्पनेंतहि नसतील अशीं पुष्कळ कार्यें करीत व करवीत आले आहेत. दक्षिण आफ्रिकेंत १९१३ सालीं असा कायदा पसार झाला कीं ख्रिस्ती धर्माप्रमाणें झालेलीं लग्नें — व हीं लग्नखात्याच्या अंमलदाराजवळ रजिस्टर झालेलीं असावीं लागतात — वगळून इतर लग्नांना कायद्यांत स्थान नाहीं. म्हणजे हिंदु, मुसलमान, पारशी वगैरे धर्मांप्रमाणें झालेलीं लग्नें वरील कायद्यामुळें रद्द ठरलीं. त्यामुळें बऱ्याच विवाहित हिंदी स्त्रियांचा दर्जा आपल्या पतींच्या 'धर्मपत्नी' म्हणून होता तो जाऊन 'राख' असा झाला. ही स्थिति स्त्री व पुरुष दोघांनाहि सहन होण्यासारखी नव्हती. बापूंनीं हा कायदा रद्द करण्यासाठीं तेथील सरकाराबरोबर वाटाघाट केली, पण त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. तेव्हां त्यांनीं सत्याग्रह करण्याचें नक्की केलें. या लढ्यांत स्त्रियांनाहि बोलावण्याचा निश्चय केला. 'दक्षिण आफ्रिकाना सत्याग्रहनो इतिहास' या पुस्तकांत बापू लिहितात :

"स्त्रियांना कैदेंत पाठविणें म्हणजे फार धोक्यांत पाऊल टाकणें आहे याची मला जाणीव होती. फिनिक्समध्यें रहाणाऱ्या बहुतेक स्त्रिया माझ्या नातलग; तेव्हां केवळ माझ्या लाजेकाजेनेंच त्या कैदेंत जाण्याचा विचार करतील व नंतर आयत्या वेळीं घाबरून किंवा जेलमध्यें गेल्यावर त्रासून माफी वगैरे मागतील, तर मला आघात बसेल. लढा एकदम कमजोर होईल, इतकेच. माझ्या पत्नीला लढ्यांत पडण्यास प्रवृत्त न करण्याचा माझा निश्चय होता. तिला नाहीं म्हणतांहि येणार नाहीं व हो म्हटलें तर त्या 'हो'ला किती किंमत द्यावी तें मला सांगतां येण्यासारखें नव्हतें. अशा जोखमीच्या कामांत स्त्री आपण होऊन पाऊल टाकील तेवढेंच पुरुषानें पत्करलें पाहिजे व

तें टाकलें नाहीं तरीहि पतीनें त्याविषयीं मुळींच दुःख करूं नये हें मला समजत होतें; म्हणून मीं तिच्याजवळ याविषयीं कांहीहि बोलावयाचें नाहीं असें ठरविलें. दुसऱ्या स्त्रियांजवळ मीं बोलणें काढलें. त्या जेलयात्रेला तयार झाल्या. वाटेल तें दुःख सहन करून.हि कैद पुरी भोगूं अशी मला खात्री दिली. या सर्व गोष्टींचा सारांश माझ्या पत्नीनेंहि माहित करून घेतला व मला म्हणाली :

" 'मला या गोष्टीची बातमी देत नाहीं म्हणून मला वाईट वाटतें. माझ्यांत अशी काय कमतरता आहे कीं मी जेलमध्यें न जावें ? मलाहि तोच मार्ग चोखाळायचा आहे कीं जो चोखाळण्याचा आपण या बायकांना सल्ला दिला आहे.'

"मी म्हटलें : 'मला तुला दुःख द्यायचें कारणच नाहीं. यांत अविश्वासाचा प्रश्न नाहीं. तूं गेल्यानें मी खुषच होईन. पण माझ्या सांग-ण्यावरून तूं गेलीस असें थोडेसेंहि भासलें तरी तें मला आवडणार नाहीं. असलीं कामें सर्वांनीं आपल्या हिंमतीवर करावींत. मी म्हणालों म्हणजे स्वाभाविकपणेंच तूं माझें वचन उचलून धरण्यासाठीं जाशील; पण नंतर कोर्टांत उभी राहतांच कांपूं लागलीस, व माघार घेतलीस किंवा जेलच्या दुःखामुळें त्रासून गेलीस तर त्यांत तुझा दोष मी समजणार नाहींच, पण माझी काय स्थिति होईल ? मी तुला कसा थारा द्यावा ? व जगापुढें कसें उभें राहावें, अशा भीतीनें मी तुला चाळवली नाहीं.'

"मला उत्तर मिळालें : 'मी माघार घेऊन सुटून आलें तर मला पाळूं नका. माझीं मुलें सहन करूं शकतात, तुम्हीं सर्व सहन करूं शकतां, आणि मीच एकटी सहन करूं शकणार नाहीं, असें आपण कसें मानतां ? मला या लढ्यांत सामील झालेंच पाहिजे.'

"मी उत्तर दिलें : 'तर मलाहि तुला सामील केलीच पाहिजे. माझी अट तुला माहीत आहेच. माझा स्वभाव तुला माहीत आहे. अजूनहि विचार करायचा असेल तर कर; व पोक्त विचार केल्यावर सामील होऊं नाहीसें वाटलें तर तसें करण्यास तूं मोकळी आहेस असें समज; आणि निश्चय बदलण्यांत अजूनहि कांहीं लाज वाटण्याचें कारण नाहीं हेंहि समजून चाल.'

"मला उत्तर मिळालें: 'विचारविचार कांहींच करावयाचा नाहीं. माझा निश्चयच आहे.'"*

* * *

बापूंनीं लढा सुरू केला व सुरुवातीलाच बा व दुसऱ्या तीन स्त्रिया जेलमध्यें गेल्या. वॉल्कस्टच्या तुरुंगांत त्यांना ठेवण्यांत आलें त्याच्या दुसऱ्याच दिवशीं घडलेला प्रसंग श्री. प्रभुदास गांधींनीं 'जीवननुं परोढ' ('जीवनाची पहाट') नांवाच्या लेखमालेंत दिला आहे. तेथील जेलरला गुजराती येत नव्हतें व बायकांना इंग्रजी येत नव्हतें. त्यांचीं नांवें, व इतर माहिती लिहून घ्यावयाची होती. छगनलाल गांधींना दुभाष्याचें काम करण्यासाठीं जेलरनें ऑफिसांत बोलाविलें, व कारकुनाच्या प्रश्नांचीं उत्तरें विचारून घेण्यास सांगितलें.

कारकून (बांकडे पाहून): या पहिल्या उभ्या आहेत त्यांचें नांव विचारा.

छगनलाल गांधी (बांना): या कृष्णभवनांतील पहिली रात्र कशी गेली!

बा: आम्ही काळोख झाल्याबरोबर भजनकीर्तन करून निवांतपणें झोपीं गेलों.

छगनलाल गांधी (कारकुनाला): यांचें नांव कस्तूरबा.

कारकून (बांकडे पाहून): या विवाहित आहेत?

छगनलाल गांधी (बांना): रात्रीं जेवण झालें?

बा: मला फलाहार पाहिजे. या सर्वांनीं रोटी व भाजी आली ती हुंगून ठेवून दिली. असल्या किळसवाण्या भांड्यांत कसें जेवावें? अन् अशी वास येणारी भाजी तोंडांतहि कुणाला घालवेल?

छगनलाल गांधी (कारकुनाला): त्या विवाहित आहेत. त्यांच्या पतीचें नांव मोहनदास करमचंद.

नंतर वय, जात, मूळ ठिकाण, वगैरे प्रश्न एकानंतर एक चारी जणींना विचारले व छगनलाल गांधींनीं पहिल्या रात्रीची पुरी माहिती मिळविली व कळविली. बांच्या फलाहाराचें काय करावें याची चर्चाहि झाली व कळविलें कीं, हनुमानजी (मि. कॅलनबॅक) वॉल्कस्टला आले

* 'दक्षिण आफ्रिकाना सत्याग्रहनो इतिहास', खंड २रा, पृ. १२०-२२.

आहेत व ते जेलरला भेटून फळें पोंचविण्याची व्यवस्था करणार आहेत अशी बातमीहि आली आहे.

पण तीनचार दिवसांत सर्वांची बदली मॅरित्सबर्गच्या तुरुंगांत झाली. बदली होण्यापूर्वी बातमी आली कीं, बांना फळें देण्यांत आलीं नाहींत व बांची तर प्रतिज्ञा होती कीं, जेलमध्यें कांहीं झालें तरी फलाहारच करावयाचा ! जर तुरुंगाधिकाऱ्यांनीं फळें हवीं तशीं दिलीं नाहींत तर उपाशी राहावयाचें, मरण्याची वेळ आली तरी मरून जायचें. या प्रतिज्ञेला जेलच्या अधिकाऱ्यांनीं झिडकारलें व म्हटलें, 'असे चाळे करायचे होते, तर जेलमध्यें कशाला आल्यात ?'

बांना दुसरा उपायच राहिला नव्हता. त्यांनीं उपवास सुरू केला. एक, दोन, तीन दिवस झाले. तेव्हां मात्र त्यांच्यावर तुटून पडणारी मेट्रन नरम आली व म्हणूं लागली : "आम्हाला सकाळीं एकवेळ चहा मिळत नाहीं तर आमचें डोकें फिरून जातें आणि तुम्ही वाळकुंड्या शरीरानें तीन तीन दिवस खाल्ल्यावांचून कशा राहूं शकतां ? आम्ही लाचार आहोंत. तुमच्यासाठीं कांहीं करतां येत नाहीं. जेलमध्यें पाहिजे तें खायला मिळत नाहीं. मेहरबानी करून जें मिळत आहे त्यावरच भागवा."

पांचव्या दिवशीं सरकारनें नमतें घेतलें व बांना फळें मिळालीं. पण तीं इतकीं कमी प्रमाणांत मिळालीं कीं खरें पाहतां बांना तीन महिने अर्धपोटीं राहावें लागलें. फक्त तीन केळीं, चार प्रून्स, दोन टोमॅटो व दोन लिंबें. यांत भुईमुगासारखी कुठलीहि वस्तु नव्हती कीं ज्यामुळें तेलतुपाची गरज भागेल. तीन महिन्यांनीं बा तुरुंगाच्या दरवाज्यांतून बाहेर आल्या तेव्हां अगदीं हाडांचा सांपळा झाल्या होत्या. त्यांचें दर्शन घडणाऱ्याच्या डोळ्यांतून आंसवें पडल्यावांचून राहिलीं नाहींत.

# ११

## बांची शुश्रूषा

मॅरित्सबर्गच्या तुरुंगांतून सुटल्या त्यावेळीं बांची तब्येत फारच खराब झाली होती, असें मागील प्रकरणीं आलेंच आहे. बापू त्यांना घेण्यास जेलवर गेले होते. बांची तब्येत व कृश झालेलें शरीर पाहून बापू पहिलेंच वाक्य बोलले: "तूं तर फारच बुड्ढी झालीस!" तुरुंगांतच बांची तब्येत बिघडूं लागली होती. बाहेर आल्यावरहि ती सुधारण्याऐवजीं जास्त जास्त बिघडूं लागली. जठराग्नि मंद झाल्यामुळें उलट्या होत व सर्व शरीरावर सूज आली होती. त्यावर बापूंनीं घरगुती औषधें दिलीं, पण बांची सूज समूळ गेली नाहीं, व थोड्याच दिवसांत उलटली. हातापायावर सूज फारच वाढली. डॉक्टरांनीं खूप इलाज केले पण कांहीं फरक पडला नाहीं. शेवटीं डॉक्टरी औषधांचा बांना कंटाळा आला. बापूंनीं बांना म्हटलें, "जर तुझा माझ्यावर विश्वास असेल तर मी तुझ्यावर माझा प्रयोग करून पाहतों." बांनीं होकार देत म्हटलें, "तुम्हीं जसें सांगाल तसें करीन." बापूंनीं म्हटलें कीं उपवास करावे लागतील व औषध म्हणून कडुनिंबाचा रस घ्यावा लागेल. बांनीं तेंहि मान्य केलें व त्या दिवसापासूनच बापूंचे उपचार सुरू झाले.

चवदा दिवस बापूंनीं बांना उपास घातले व कडुनिंबाचें सेवन करविलें. या दिवसांत बापूंनीं बांची जी सेवा केली तिचें वर्णन करण्या-साठीं शब्द मिळणें कठिण आहे. सकाळीं बापू स्वतः बांचें तोंड धूत. कॉफीहि स्वतः तयार करून पाजीत. एनीमा देत. पॉट् साफ करून येत. बापू बांना सबंध दिवस उन्हांत निजवीत. त्यांच्या घरासमोर बाहेरच्या बाजूस एक बकायनचें (एक प्रकारचा कडुनिंब) झाड होतें. बांचें शरीर तर अगदींच कृश झालेलें होतें. लहान मुलाला आणावें तसें बापू बांना दोन्ही हातांवर घेऊन बाहेर आणीत व झाडाखालच्या खाटेवर निजवीत. ऊन्ह फिरे तशी बांची खाट फिरवीत. सायंकाळीं परत उचलून आंत आणीत.

बापू बांचें सगळें करीत. पण त्यांना केसांची वेणी घालतां येत नसे, म्हणून काशीकाकी रोज वेणी घालण्यास येत. एक दिवस त्यांना

जरासा उशीर झाला. तेव्हां बापू स्वतः डोकें विंचरूं लागले. तेल लावून केंसांतील गुंतहि काढली. तेवढ्यांत त्या येऊन पोंचल्या. बापू त्यांना म्हणतात, "घ्या, आतां तुम्ही करा. मला वेणी घालणें बरोबर साधत नाहीं."

बांच्या सुजेवर रोज कडुनिंबाच्या तेलानें मालीश करीत. एक दिवस पितळेच्या बशींत तेल काढलें होतें. दुसऱ्या दिवशीं बापूंनीं बांसाठीं कॉफी तयार केली व कपबशींत ओतण्याच्या विचारांत असतां काशीकाकी आल्या. बापूंना वास फारच थोडा येतो. म्हणून त्या बशीला तेलाचा वास येतो कीं काय तें समजण्यासाठीं त्यांना म्हणाले, "जरा हुंगून पाहा ना वास येतो कीं काय?"

काशीकाकीनें म्हटलें, "हो, वास येतोय."

तेव्हां बापू म्हणाले, "जर मी यांत कॉफी घेऊन गेलों असतों तर मेलोंच असतों ना?" जणूं कांहीं बापू बांना इतके भीतच होते!

बापूंच्या सेवेचें फळ मिळालें व बा त्या आजारांतून अगदीं बऱ्या झाल्या.

* * *

इंग्रज सरकारविरुद्ध केलेले बापूंचे अनेक सत्याग्रह आपणाला माहीत आहेतच. मित्रांबरोबरहि बापूंनीं केव्हां केव्हां सत्याग्रह केला आहे. एकदां बांबरोबर सत्याग्रह करण्याचा प्रसंगहि बापूंवर आला होता. 'घरांत सत्याग्रह' या मथळ्याखालीं याचें वर्णन आत्मकथेंत बापूंनीं केलें आहे.

"शस्त्रक्रियेनंतर कस्तूरबाईचा रक्तस्राव कांहीं काळ बंद झाला खरा, पण तो उलटला तो कांहीं केल्या बंद होईना. निव्वळ पाण्याच्या उपचारांनीं कांहीं होईना. पत्नीला माझ्या उपचारांबद्दल विशेष आस्था वाटत होती असें नाहीं, पण त्याचेबद्दल तिरस्कारहि नव्हता. दुसरीं औषधें पाहिजेत असा तिचा आग्रह नव्हता. म्हणून जेव्हां माझे इतर उपचार व्यर्थ गेले तेव्हां मीं मीठ व कडदण सोडण्याबद्दल विनवणी केली. पुष्कळ समजूत घालून पाहिली, माझ्या सांगण्याच्या पुष्ट्यर्थ कांहीं कांहीं मजकूर वाचून दाखविला; पण ऐकेना. शेवटीं तिनें सांगितलें, 'कडदण आणि मीठ सोडायला तुम्हाला कोणी सांगितलें तर तुम्हीसुद्धां सोडणार नाहीं.' मला वाईट वाटलें व हर्षहि झाला. माझें प्रेम वर्षविण्याची मला संधि मिळाली. त्या हर्षाच्या भरांत मी लगेच म्हटलें, 'तुझी समजूत चुकीची

आहे. मला दुखणें आलें आणि वैद्यानें हीचशी काय पण दुसरी कोण-तीहि वस्तु सोडायला सांगितलें तर अवश्य सोडून देईन. पण तें राहूं दे, मीं कडदण व मीठ एक वर्षापुरतीं सोडलीं. तूं सोड किंवा न सोड, त्याचा माझ्या निश्चयाशीं संबंध नाहीं.'

"पत्नीला अतिशय पश्चात्ताप झाला. ती गहिंवरून म्हणाली, 'मला क्षमा करा, तुमचा स्वभाव माहीत असून बोलण्याच्या भरांत बोलून गेलें; आतां मी तर मीठ, कडदण खाणार नाहींच, पण तुम्हीं आपला शब्द परत घ्या. ही तर मला बेसुमार शिक्षा केलीत असें म्हटलें पाहिजे.'

"मी म्हटलें, 'तूं मीठ, कडदण सोडशील तर फारच चांगलें. मला खात्री आहे कीं, त्यापासून तुला फायदाच होईल. पण केलेली प्रतिज्ञा मला बदलतां येणार नाहीं. माझा त्यामुळें तरी फायदाच होणार. कोणत्याहि निमित्तानें माणसानें संयम पाळला तर त्यापासून त्याला लाभच आहे. यासाठीं तूं मला आग्रह करूं नकोस. शिवाय माझी मला परीक्षा होईल, आणि त्या दोन वस्तु सोडण्याचा तूं जो निश्चय केला आहेस, त्या तुझ्या निश्चयाला चिकटून राहण्याच्या कामीं तुलाहि मदत मिळेल.' एवढें सांगितल्यावर माझी आणखी समजूत घालण्याचा प्रश्नच राहिला नाहीं. 'तुम्ही म्हणजे पक्के हट्टी. कोणीं सांगितलेलं ऐकायचेंच नाहीं,' असें म्हणून पसाभर अश्रू ढाळून ती शांत राहिली.

"याला मी सत्याग्रह या नांवानें संबोधूं इच्छितों; आणि माझ्या जीवनांतील मधुर स्मरणांपैकीं तें एक आहे अशी माझी समजूत आहे.

"यानंतर कस्तूरबाईची तब्येत खूप सुधारली. मीठ व कडदण यांचा त्याग त्याला कारणीभूत झाला कीं नाहीं, किंवा किती अंशीं कारणीभूत झाला, कीं त्या त्यागामुळें आहारामध्यें घडून आलेले इतर लहानमोठे फेर-फार कारणीभूत झाले, कीं यानंतर इतर नियमांचें पालन करवून घेण्या-बाबत मी जपत असें तें कारणीभूत झालें, कीं वरील प्रसंगामुळें झालेला मानसिक उल्हास निमित्तरूप झाला—तें मी सांगूं शकत नाहीं. परंतु कस्तूरबाईचें क्षीण होऊन गेलेलें शरीर सुधारूं लागलें, रक्तस्राव बंद झाला आणि 'वैद्यराज' या नात्यानें माझी प्रतिष्ठा कांहींशी वाढली."*

---

* 'आत्मकथा', खंड, २ रा पृ. ९५-९६

## १२

# बांचें इंग्रजी

आफ्रिकेंतील वातावरण चारी बाजूंनीं इंग्रजीनें भरलेलें असावें हें स्वाभाविक आहे. बापूंचे सोबती बहुतेक इंग्रज असत. नंतर हिंदुस्थानांत आले तेथेंहि आश्रमांत अनेक भाषा बोलणारांचें मंडळ असे व त्यांत इंग्रजी भाषेचा उपयोग बऱ्याच प्रमाणांत करण्याची जरूर पडे. त्यामुळें बा जरी इंग्रजी शिकल्या नव्हत्या तरीहि त्या प्रसंगोपात्त सुटे सुटे इंग्रजी शब्द योजून आपलें गाडें चालवूं शकत.

मिसेस पोलाक विलायतेहून दक्षिण आफ्रिकेंत आल्या होत्या व त्या मि० पोलाक यांच्याबरोबर लग्न करून बापूंच्या घरींच राहूं लागल्या होत्या. त्या लिहितात: "बा मोडकें तोडकें इंग्रजी बोलत, पण फारसें नाहीं. पहिल्या दिवशीं तर आम्ही एकमेकींना फारशा भेटलोंहि नाहीं. पण दुसऱ्याच दिवसापासून गांधोजी व माझे पति ऑफिसांत गेले म्हणजे आम्ही दोघी घरांत एकट्या राहत असूं. नंतर आम्हाला कांहीं झालें तरी एकमेकींशीं बोलणें भागच होतें. थोड्याच काळांत बांचें इंग्रजी सुधारलें व माझ्या बाबतींतील त्यांचा संकोच निघून गेला. नंतर आम्ही इंग्रज मित्रांना भेटावयास गेल्यावर तेथील गप्पागोष्टींत त्या देखील चांगला भाग घेत असत."

बा तेथें कसें इंग्रजी बोलत त्याचे नमुने मिसेस पोलाक यांच्या 'मि. गांधी द मॅन' या पुस्तकांतून देत आहे. एकदां असें झालें कीं मि. पोलाक बापूजींवर थोडेसे चिडले होते. घरांत ते कुणाशीं बोलत ना व फुरंगटून फिरत. तेव्हां बांनीं मिसेस पोलाकना विचारलें:

"What the matter Mr. Polak? What for he cross?"—मि. पोलाकना काय झालें आहे? एवढे कां चिडले आहेत?

मिसेस पोलाक म्हणाल्या कीं, बापूंवर चिडले आहेत.

तेव्हां बांनीं विचारलें:

"What for he cross Bapu? What Bapu done?" बापूंवर कां चिडले आहेत? बापूंनीं काय केलें?

नंतर मिसेस पोलाक यांनीं झालेली सर्व हकीकत सांगितली, तेव्हां बांनीं उत्तर दिलें: "Oh, Oh,"—हं, हं. मिसेस पोलाक या 'हं, हं' चा असा अर्थ करतात कीं, मि० पोलाक बापूंवर चिडले त्यामुळें बांना दुःख झालें नाहीं, कारण स्वतःहि या प्रसंगीं बापूंवर चिडल्या होत्या; व बापूंवर एवढें प्रेम असणाऱ्या माणसाला त्यांच्यावर चिडायला कारण सांपडावें यावरून आपलें चिडणेंहि सकारणच होतें, असें बांना आश्वासन मिळालें.

बा असलें इंग्रजी आफ्रिकेहून परत आल्यावर इथेंहि बोलत. आश्रमांत गोरे लोक पाहुणे आले तर त्यांचें स्वागत करणें, त्यांना कुशल प्रश्न विचारणें, कांहीं हवें नको विचारणें वगैरे साधारण बोलणेंचालणें बा उत्तम प्रकारें करीत. अशा रीतीनें त्यांना इंग्रजी बोलतां येत असें, पण '३० सालीं कैदेंत ६० वर्षांच्या वयांत त्यांनीं इंग्रजी लिहा–वाचायला शिकण्याचा जो प्रयत्न केला त्याविषयीं त्यांच्याबरोबरच कैदेंत असलेल्या सौ. लाभुबहेन 'स्त्री–जीवन' मासिकाच्या बांविषयींच्या खास अंकांत पुढीलप्रमाणें लिहितात:

"बांना कळलें कीं मला इंग्रजी येतें, त्याबरोबर माझ्याजवळ इंग्रजी शिकावयाला त्यांनीं सुरवात केली. एवढ्या मोठ्या वयांत एवढें मोठें स्थान शोभवीत असतां माझ्याजवळ इंग्रजी शिकायला बसण्यांत त्यांना नाहीं वाटला कमीपणा कीं नाहीं वाटली लाज. त्यांना एकच ध्यास होता कीं बापूंचा पत्ता इंग्रजींत स्वतः लिहावा. 'ए बी सी डी' वर कित्येक दिवस मेहनत करावी लागूनहि त्या कंटाळल्या नाहींत. एकच्या एकच नांव पंचवीस वेळां लिहितांना त्यांना कधीं थकवा आला नाहीं, किंवा लवकर नवे शब्द किंवा वाक्यांकडे धावायचें त्यांच्या मनांतहि आलें नाहीं. त्या म्हणत, 'इंग्रजी आलें तर बापूंना पत्र लिहिल्यावर त्यावरचा पत्ता कुणापासून लिहून तर घ्यावा लागणार नाहीं ना? आणि टपालाची रास आली तर त्यांतील माझें पत्र स्वतःच ओळखून घेऊं शकतील ना?'"

* * *

पू. बापूजी १९२२ पासून '२४ पर्यंत येरवडा जेलमध्यें होते. तेव्हां एका कैद्याच्या आहारासंबंधीं त्यांनीं सुपरिन्टेन्डेन्टकडे कांहीं मागणी केली. सुपरिन्टेन्डेन्टनें तिचा स्वीकार केला नाहीं. त्यामुळें बापूजींच्या मनाला फार लागलें व त्यांनी फक्त दुधावर राहायचें नक्की केलें. असे चार आठवड्यांपर्यंत चाललें व तेवढ्या दिवसांत त्यांचें वजन १०४ पौंडांवरून ९० वर आलें. बा वगैरे आप्तजन त्यांना भेटायला गेले तेव्हां जिना चढ-तांना बापूंचे पाय वांकडे तिकडे पडले. बांनीं बापूंची ती अवस्था पाहिली व कारण विचारलें. बापूंना मनांत नसतां आपली सर्व कथा बांना सांगावी लागली. सर्वांनीं मिळून त्यांना हा प्रयोग बंद करून फळें खाण्याचा आग्रह केला व बापूंनीं तो मान्य केला.

हें पाहून येरवड्याच्या सुपरिन्टेन्डेन्टनें बांना म्हटलें: "मि. गांधी असं सगळं करतात त्यांत माझा कांहींच दोष नाहीं."

बांनीं उत्तर दिलें: "Yes, Yes, I know my husband. He always mischief."

या एका वाक्यानें बांनीं आपल्या मोडक्यातोडक्या इंग्रजींतहि बापूंच्या सगळ्या चारित्र्याचेंच वर्णन करून टाकलें नाहीं काय? "माझ्या पतींना मी ओळखतें. कधीं शांतपणें बसून राहतील असे नाहींत. त्यांना रोजच्या रोज कांहींतरी मस्ती सुचतच असते." एवढ्या शब्दांत बापूंच्या जीवनाचें सार नाहीं का येऊन जात? १८९३ त दक्षिण आफ्रिकेंत पाय ठेवला तेव्हांपासून तों आजपर्यंतच्या या एकावन वर्षांत बापू कधीं शांत बसून राहिले आहेत? आज सबंध दुनियेंत एक क्षणहि शांत न बसणारा व दुसऱ्यांना बसूं न देणारा बापूंसारखा दुसरा कोण आहे? बापूंना हाडीं-मासीं जाणणाऱ्या बांवाचून अशा एका वाक्यांत त्यांच्या चारित्र्याचें इतकें हुबेहूब आणि खोल अर्थाचें वर्णन कोण करूं शकणार? व त्या वर्णना-साठीं इंग्रजीच्या अर्धवट ज्ञानाची नडहि आली नाहीं. इंग्रजीचे मोठमोठे पंडितहि अशा एका वाक्यांत बापूंचें कसचें वर्णन करूं शकणार होते?

# १३

## खादी-परिधान

बांना आपल्या पेहरावाच्या व कपड्यांच्या पसंतीच्या बाबतींत बापूंच्या इच्छा व सूचनांप्रमाणें वागावें लागलें आहे, किंवा असें पाहिजे तर म्हणा कीं, या वागल्या आहेत. बांनीं सन १९१९–२० त खादी धारण केली. पण या घटनेपर्यंत येण्यापूर्वीं सन १८९६ मध्यें दक्षिण आफ्रिकेला जाण्याच्या वेळीं बापूंनीं त्यांच्या पेहरावांत कसला फेरफार करावयास लावला तें आपण पाहूं या. बापूजी आत्मकथेंत सांगतात :

"कुटुंबासहित समुद्रप्रवास मी हा प्रथमच करीत होतों. मीं अनेक वेळां लिहिलें आहे कीं, हिंदु लोकांमध्यें विवाह बालवयांत होत असल्यामुळें आणि मध्यम वर्गाच्या कुटुंबांमध्यें बहुधा नवरा शिकलेला आणि बायको निरक्षर अशी स्थिति असल्यामुळें पतिपत्नींच्या जीवनांमध्यें अंतर पडतें, व पतीला पत्नीचा शिक्षक बनावें लागतें. मला माझ्या धर्मपत्नीच्या व मुलांच्या पोशाखाची आणि खाण्यापिण्याच्या व बोलण्याच्या पद्धतीची काळजी घ्यावी लागत होती. त्यांना रीतभात शिकवावी लागत होती. कित्येक गोष्टी आठवल्या म्हणजे मला अजूनहि हंसूं येतें. हिंदु पत्नीच्या दृष्टीनें पतिपरायणता हाच सर्वश्रेष्ठ धर्म. हिंदु पति स्वतःला पत्नीचा ईश्वर समजतो. अर्थात् पति नाचवील तसें पत्नीला नाचावें लागतें.

"ज्या काळासंबंधीं मी लिहीत आहे त्याकाळीं माझी अशी समजूत होती कीं, सुधारलेल्या लोकांत आपली गणना व्हायला पाहिजे असेल तर आपला बाह्याचार शक्य तोंपर्यंत युरोपियन लोकांशीं जुळता असला पाहिजे. असें केल्यानेंच आपली छाप पडणार; आणि छाप पडल्याशिवाय देशसेवा साधावयाची नाहीं.

"यासाठीं पत्नीचा आणि मुलांचा पोशाख मीच पसंत केला. मुलें काठियावाडी बनिये म्हणून नजरेंत भरावींत हें कसें बरें वाटावें? पारशी हे हिंदी लोकांत अधिकांत अधिक सुधारलेले. म्हणून जेथें युरोपियन पोशाखाचें अनुकरण अयोग्य वाटलें तेथें पारशी पोशाखाचें केलें. पत्नीसाठीं साड्या पारशी बाया वापरतात तसल्या घेतल्या; मुलांसाठीं पारशी कोट,

पाटलोण घेतलीं. सर्वांना पायमोजे बूट तर पाहिजेतच. पत्नीला त्याचप्रमाणें मुलांना दोन्ही वस्तु कित्येक महिने आवडत ना. बूट लागत, पायमोजांना घाण सुटे, पाय सुजत. या अडचणींवर माझ्याजवळ प्रत्युत्तरें तयार असत. उत्तरांच्या समर्पकपणापेक्षांहि हुकुमाचें बळच जास्त होतें. अर्थात् पत्नींनें व मुलांनीं नाइलाजास्तव पोषाखांतील फेरफारांचा स्वीकार केला. तितक्याच नाइलाजानें व त्यापेक्षां देखील अधिक कंटाळ्यानिशीं जेवतांना सुरीकाट्यांचा उपयोग सुरू केला. माझा मोह जेव्हां दूर झाला, तेव्हां परत त्यांनीं मोजे, बूट, व सुरीकांटा यांचा त्याग केला. फेरफार ज्याप्रमाणें दुःखकारक झाला, त्याचप्रमाणें एकदां संवय पडल्यानंतर त्याचा त्यागहि दुःखकारक झाला. पण आतां मला दिसत आहे कीं, सुधारणेची कांत टाकून दिल्यामुळें आम्हाला पुष्कळ हलकें वाटूं लागलें आहे."*

बांना बूटमोजे जसे बरेच महिनेपर्यंत आवडले नाहींत, तशीच त्यांना खादी वापरायला लावतांनाहि बरेच महिने नसले तरी बरेच दिवस तरी बापूंना लागलेच. रौलेट कायद्याविरुद्ध चाललेला सत्याग्रहाचा लढा तहकूब केल्यावर बापूंनीं 'स्वदेशी'चें काम अतिशय जोरांत हातीं घेतलें. त्या वेळच्या स्वदेशी व्रतांत कांहीं महिनेपर्यंत गिरणीचें कापडहि मान्य करण्यांत आलें होतें. पण थोड्याच काळांत बापूंनीं पाहिलें कीं गिरणी कापडाचे प्रचारक होण्याची आपणाला गरज नाहीं. खरी जरूर परदेशांहून येणारें कापड बंद करण्यासाठीं जास्त कापड उत्पन्न करणें ही आहे, व तें सूत-रहाटाच्या योगेंच उत्तम प्रकारें साधूं शकेल. म्हणून बापूंनीं सर्वांना रहाट चालवण्याचा व खादी वापरण्याचा आग्रह सुरू केला. पण त्यावेळीं मोठ्या पन्ह्याची खादी तयार होत नसे. ३७ इंच पन्ह्याची खादी कशीबशी विणली जात होती; व खादीचीं धोतरें किंवा साड्या जर वापरायच्या असतील तर सहा किंवा सात नंबराच्या सुताची असल्या अरुंद पन्ह्याची खादी सांधवून तसें करावें लागत होतें. सांधवलेल्या असल्या साडीचें वजन अडीच ते तीन रत्तल होत असावें. असली साडी फारच जड होणार, आपणांला उचलवणारहि नाहीं, अशीं कारणें सांगणाऱ्या बायकांना बापूजी केव्हां केव्हां सांगत कीं, नऊ नऊ महिने मुलाला पोटांत

* 'आत्मकथा,' खंड १ ला, पृ. २२३-२४.

बाळगणाऱ्या स्त्रियांना, देशासाठीं, आपल्या गरीब बहिणींच्या अन्नासाठीं, एवढी साडी कां म्हणून जड वाटावी?

आश्रमांतहि रोज बापू सर्व स्त्रियांना खादी वापरण्याविषयीं समजावून सांगत. बापूंचा तो युक्तिवाद ऐकून साडीच्या जडपणाचें कारण कोणी पुढें करीत नसे, पण रोज धुण्यास कठीण पडतें असा मुद्दा स्त्रिया फार जोरानें पुढें करीत. बापूजी म्हणत कीं, आम्ही तुम्हाला तुमच्या साड्या धुवून देऊं. असा विनोद चाले. या सर्व युक्तिवादांत स्त्रियांचें पुढारीपण बा घेत. बापू बरेच वेळां म्हणत कीं, 'बाला बूटमोजे घालायला लावतांना मला कांहीं तिची कमी खुशामत करावी लागली नाहीं, तशीच ते पुन्हा सोडायला लावतांनाहि थोडीशी खुशामत करावीच लागली. पण आतां असें दिसतें कीं, बूटमोजे वापरावयास लावतांना कराव्या लागलेल्या खुशामतीपेक्षां खादीची साडी नेसावयास लावतांना जास्त खुशामत करावी लागेल.' मला मिळालेल्या माहितीवरून असें कळतें कीं, श्री. सरलादेवी चौधराणींनीं खादीची साडी नेसण्यांत आघाडी गांठली. खादीचें लुगडें नेसण्यांत सर्व देशांत कदाचित् त्याच पहिल्या असतील. त्यावेळीं त्या आश्रमांतच राहत असत. नंतर बांनींहि लगेच खादीची साडी धारण केली व थोड्यांच दिवसांत सर्व भगिनी खादी वापरणाऱ्या झाल्या. त्यानंतर मोठ्या पन्ह्याची खादीहि विणण्यांत येऊं लागली व स्वतः कांतणाऱ्याला तर खादीची कुठलीच अडचण उरली नाहीं.

नंतर बांचें खादीवर केवढें प्रेम बसलें तें दाखविण्यासाठीं एक प्रसंग देतें. एक दिवस बांच्या पायाच्या करंगळींतून रक्त निघालें. बा खादीची पट्टी बांधीत होत्या इतक्यांत एका बाईनें पातळ कापडाची पट्टी आणून दिली व म्हटलें, "या तलम कपड्यामुळें घासलें जाणार नाहीं व पट्टी बरोबर बांधतां येईल." "मला खादीची पट्टी असेल तरच चालेल. ती जाडीभरडी असली तरी मला खुपणार नाहीं," असें म्हणून बांनीं खादीचीच पट्टी बांधली.

बापूजींनीं आगाखान महालांत उपवास सुरू केला तेव्हां त्यांना भेटायला आलेल्या आश्रमांतील एका मुलीला बांनीं सेवाग्रामांत पडलेले आपले कपडे निरनिराळ्या व्यक्तींना वाटून देण्यास सांगितलें, व अशी सूचना केली कीं, "बापूजींनीं आपल्या हातानें कांतलेली व माझ्यासाठी खास

तयार केलेली साडी मात्र माझ्याकडेच जेलमध्यें पाठवून दे. माझ्या मरणा-नंतर माझ्या देहावर ही साडी गुंडाळावयाची आहे."

साधारणपणें बांची साडी बापूंनीं कांतलेल्या सुताचीच बनत असे, व बा चितेवर चढल्या त्याहि बापूंच्या हातानें कांतलेल्या सुताची साडी नेसूनच.

# १४

## आश्रमाच्या बा

बापूंना 'बापू'च राहूं देण्यांत बांचा वांटा जसा मोठा आहे तसाच आश्रमाला 'आश्रम'—सामान्य मानवांचें आश्रयस्थान—म्हणून राहूं देण्यांतहि बांचा वांटा मोठा आहे. बापूंनीं अमदाबाद येथें स्थापलेल्या आश्रमाचें काय नांव ठेवावें याविषयीं बोलणें चाललें असतां एक नांव 'तपोवन' असेंहि सुचविण्यांत आलें होतें. बापूंचा आश्रम असें 'तपोवन' झाला असता, तर कुणाला माहीत त्यांत कसले लोक राहत असते! जीं साधारण माणसें आतां आश्रमवासी म्हटलीं जातात त्यांना कदाचित् त्यांत स्थानच मिळालें नसतें. सार्वजनिक कार्यांसाठीं किंवा वैयक्तिक कारणांसाठीं बापूजींना भेटायला येणारीं माणसें त्या तपोवनांत एक दिवसहि राहूं शकलीं असतीं कीं नाहीं शंकाच आहे.

बापूंचें तप सूर्याच्या तापासारखें कडक असतें. सूर्याचा ताप जसा दुनियेला कल्याणदायीच होतो, तसें बापूंचें तप दुनियेला कल्याणकारीच आहे. पण सूर्याच्या तापाच्या फार जवळ जाणाऱ्यांचा जसा दाह होईल, तसेच बापूजींच्या फार जवळ राहणें म्हणजे सुद्धां एक प्रकारें तावून निघण्यासारखें आहे. बापूंच्या जवळ असणाऱ्यांच्या असल्या कठिण अग्निपरीक्षेच्या वेळीं बा नेहमीं त्यांची ढाल होऊन राहत असत, व बापूंच्या आंचेनें त्यांना भाजूं देत नसत. हें सर्व बानीं ज्ञानपूर्वक किंवा योजनापूर्वक केलें असें नव्हे तर सहजासहजींच केलें आहे.

आश्रमांत राहणाऱ्या स्त्रियांची ढाल बा कशा बनत असत याचें एक उदाहरण देतें.

आश्रमांत असा एक नियम होता कीं, सर्वांचें एक संयुक्त स्वैंपाकघर असावें. प्रत्येक जणानें आपल्या वाट्याला आलेलें काम करून टाकावें. आणखी असाहि एक नियम पाळला जाई कीं, आश्रमांत होणाऱ्या भाजीपाल्याचाच उपयोग करावा, बाहेरून भाजी वगैरे मागवूं नये. संयुक्त स्वैंपाकघरांत आश्रमांतील शेतांत वाजणाऱ्या तांबड्या भोपळ्यांचीच भाजी रोज होई. भोपळ्याची भाजी म्हणजे भोपळ्याच्या मोठ्या मोठ्या पाण्यांत उकडलेल्या फोडी. आंत मीठसुद्धां घालायचें नाहीं. ज्याला हवें असेल त्यानें वरून मीठ घ्यावें. माझ्या आईनें ही भाजी खाल्ली कीं तिच्या पोटांत वात धरे व तिला चक्कर येऊं लागे. दुर्गामावशीच्या पोटांत वायु धरत असे व मग ढेंकरा येत. इतर बऱ्याच बायकांना ही भाजी मानवत नसे. बापूजी सर्वांना चढवीत असल्यामुळें व कांहींसें संकोचामुळें स्त्रियांपैकी कोणीच बापूजींना ही गोष्ट सांगत नसत; पण बांबरोबर होणाऱ्या गप्पागोष्टींत ह्या सर्व गोष्टी निघत. माझ्या आईनें या रोजच्या भोपळ्याच्या भाजीविषयीं एक गरबी(गीत) रचली. बांच्या ऐकण्यांत तें आलें तेव्हां लगेच बा बापूंजवळ जाऊन थडकल्या व त्यांना म्हणाल्या : " तुमची भोपळ्याची भाजी खाऊन मणिबहेनच्या पोटांत वात धरतो व चक्कर येते. दुर्गाबहेनला ढेंकरा येतात. भोपळ्याची भाजी काय नुसती उकडून होते ? त्यांत मेथीची फोडणी, गरम मसाला अन् इतर सगळें घातलें तरच ती बाधत नाहीं. नाहींतर भोपळा काय बाधल्याशिवाय राहील ? "

या गरबींत विनोदासाठीं आश्रमांतील स्वैंपाकघराची थोडी मस्करी केली होती; म्हणून कित्येक आश्रमवासी माझ्या आईला म्हणूं लागले कीं, हा तुम्ही बापूंचा अपमान केला म्हणावयाचा. पण त्यांत अपमान वाटण्या-सारखें कांहीं नव्हतेंच, केवळ गोड विनोद होता. दुसरे दिवशीं प्रार्थनेनंतर बापूंजींनीं सांगितलें कीं, आपल्या आश्रमांत एक कवि निपजले आहेत, त्यांचें काव्य आपणांस ऐकावयाचें आहे. नंतर आग्रह करून बापूंनीं माझ्या आई जवळून भोपळ्यावरची गरबी म्हणून घेतली. गरबी संपल्यावर बापूंनीं म्हटलें : " चला, तुमची फिर्याद मंजूर आहे. ज्यांना फोडणीची व मसाल्याची भाजी खायची आहे त्यांनीं आपलीं नांवें लिहवावींत."

बा म्हणतात : "असें कुणी तुम्हाला आपलें नांव देणार नाहीं. आम्ही बायका आपापसांत नक्की करूं. "

बापूंनीं म्हटलें: "ठीक, तसें करा. पण असें पहा. कुणा मुलाला त्यांत घेऊं नका. मुलांना मसाल्याशिवायची भाजीच पसंत पडते."

बांनीं म्हटलें: "असें म्हणत म्हणत पोरांना चढवा आणि ठेवा आपल्यापाशीं. हीं सर्व मुलें कितीशीं तुमचीं राहणार आहेत तें मी जाणतें."

नंतर सर्व बायकांनीं मिळून नांवें नक्की केलीं. मसाला खाण्याची मोकळीक मिळविली. पण बापूजी कांहीं तो सुखानें खाऊं देत नव्हते. बायकांची पंगत त्यांच्या समोरच बसे. तेव्हां बापू जेवतां जेवतां विनोदानें म्हणत: "कां, फोडणी कशी काय झाली आहे? भाजी चांगली मसालेदार झाली आहे ना?"

त्यावर बासुद्धां विनोदानें म्हणत: "आपणहि कुठें कमी होतां? पूर्वीं दर रविवारीं मला पुरणपोळ्या अन् भजीं किंवा अळवाच्या वड्या करायला लावून चापून खात होतात ते आपणच होतां कीं दुसरें कोणी?"

असाच एक दुसरा प्रसंग आहे.

आश्रमांत प्रत्येकानें अमुक एक ठरवलेल्या किंमतीचाच साबण वापरावा असा नियम होता. आश्रमांतील बायकांना ठरवलेल्या किंमतीचा साबण पुरत नसे. याविरुद्ध तक्रार करणें म्हणजे बापूंच्या नियमाविषयीं विरोध दाखविणें असाच अर्थ झाला असता. तरीहि सर्व बायकांनीं मिळून सगळ्यांच्या सहीचा एक अर्ज तयार केला. बांनींहि त्यावर सही केली, व तो बापूंजवळ दिला. अर्जांत बांचें नांव पाहून अर्ज करणाऱ्यांपैकीं मुख्य बाईला संबोधून बापूंनीं म्हटलें, "हिनें तर आम्हा दोघांत भांडण लावून दिलें!" हें सांगायला नकोच कीं बापूंनीं अर्ज मंजूर केला व बायकांना जास्त साबण मिळूं लागला.

* * *

सेवाग्रामांत बापूंच्या झोंपडीकडे जाण्यापूर्वीं बांची झोंपडी लागे. बा ओटीवर बसून कांतीत किंवा कांहींतरी काम करीत बसत. कोणी नवा पाहुणा आला तर त्याला प्रथम बांचें दर्शन होई. त्याची ओळख असो नसो, बा फार प्रेमानें त्याचा सत्कार करीत. कुठून आलां? सरळ येथेंच आलांत कीं वर्ध्याला थांबून आलांत? जेवलांत कीं नाहीं? गाडींत फार त्रास तर नाहीं ना झाला? वगैरे सर्व बारीक सारीक हकीकत विचारून घेत. जेवले नसतील तर जेवूं घालीत. आलेल्या पाहुण्यानें बापूंजींजवळ

फक्त ज्या कामासाठीं आले असतील त्यासंबंधीं बोलावें; बाकीची सर्व अडचण बा दूर करीत. आश्रमांत रहाणाऱ्यांनाहि बा मधून मधून विचारीत: खाण्यापिण्याचें बरोबर जमतें ना? कांही गैरसोय होऊं देऊं नका हं! कांहीं हवें असेल तर मला सांगा. लहान मुलें असतील तर त्यांना मधल्या वेळचें खायलाहि देत. आश्रमांत आदरसत्काराचें किंवा लाड पुरवून घेण्याचें स्थळ म्हणजे बा.

पंडित मोतीलालजींसारखे लोक वाटेल तितके दिवस आश्रमांत राहूं शकत ते बांच्यामुळेंच. बांच्याशिवाय राजाजींना चहा कॉफी कोणाकडून मिळाली असती? जवाहरलालजींना सुद्धां खास चवीचा चहा कोठून मिळता? मीठुबहेननां जिवंत ठेवावयाचें असेल तर त्यांना चहा दिलाच पाहिजे अशा रीतीनें त्यांचा पक्ष बांखेरीज दुसऱ्या कोणी उचलून धरला असता?

* * *

बऱ्याच वर्षांपूर्वींची गोष्ट आहे. गोशीबहेन एक दिवस आश्रमांत आल्या होत्या. आश्रमांत अशी रीत आहे कीं जेवल्यावर प्रत्येकानें आपापलें ताट घासून टाकावें. सगळे जेवायला बसले. बा व गोशीबहेन जवळ जवळ बसल्या होत्या. एकेकजण जेवून आपलें ताट घेऊन जाऊं लागला. गोशीबहेननें केव्हांहि भांडीं घासलेलीं नव्हतीं. त्यांचें जेवण तर संपलें, पण मग चुळबुळ करूं लागल्या कीं आतां काय करावें? तेवढ्यांत बांचें जेवण झालें. त्यांनीं हळूच गोशीबहेनचें ताट ओढून घेतलें. गोशीबहेन अधिकच गोंधळल्या अन् लाजल्या. बांना का ताट घासायला लावायचें? पण बांना त्यांची अडचण समजली होती, म्हणून त्या म्हणाल्या: 'बहेन, तुम्ही केव्हांहि भांडें घासलें नाहीं, तेव्हां तुम्हांला साधणार नाहींच. मला रोजचीच संवय आहे. एक ताट मला कांहीं जास्त नाहीं होणार.'

बापूंनीं आश्रमाचें एक नांव 'हॉस्पिटल' असेंहि ठेवलें होतें. रोग्यांना आपल्याजवळ ठेवून घेऊन त्यांची सेवाशुश्रूषा करण्याची बापूंना फार आवड. आपण एक उत्तम नर्स व डॉक्टर आहोंत असें बापू मानतात, व आहारासंबंधीचे किंवा नैसर्गिक उपचारांचे आपले प्रयोग जसे स्वतःवर करतात तसेच दुसऱ्यांवर करून पाहायलाहि तयार असतात. स्वतःच्या या प्रवृत्तींतून त्यांना एक प्रकारचें मानसिक आश्वासन मिळतें. सरदार

वल्लभभाईसारखे लोकहि बापूंचे रुग्णाईत आहेत. आश्रम अशा तऱ्हेचें इस्पितळ असल्यामुळें बाहेरून बापूंसाठीं आलेल्या फळांच्या भेटींपैकीं बहुतेक फळांचा उपयोग आजाऱ्यांसाठींच होत असतो. आश्रमांतील नीरोगी माणसांच्या वांट्याला फळें क्वचितच येत. बांना यांत कांहींहि अयोग्य वाटत नसे. पण कधीं कधीं फळें भरपूर असत तेव्हां आजारी नसणाऱ्यांचेंहि तोंड गोड करण्याची इच्छा बांना होई. स्वैंपाकघरांतील व्यवस्थापकाची प्रवृत्ति स्वाभाविकच फळें सांठवून ठेवण्याकडे असे. पण बांना तें पसंत नसे. त्यांच्या जर नजरेला आलें कीं फळें जास्त आहेत, तर लगेच जरूर तेवढीं फळें ठेवायला सांगून बाकीचीं पंगतींत वाढावयास सांगत. त्यावेळीं स्वैंपाकघराच्या व्यवस्थापकाला कानपिचकीहि देत, " तो आहे लोभी – बापूंपेक्षांहि कांकणभर जास्त." असली टीका व्यवस्थापकापेक्षांहि बापूंना उद्देशूनच अधिक असे.

अन् आश्रमांत बा नसल्या म्हणजे बरेच वेळां सणासुदीचा दिवस आला तरी कळत नसे. बा सगळ्या एकादश्या करीत अन् सर्व सणांचे दिवसहि लक्षांत ठेवीत; व त्या दिवशीं सर्व आश्रमवासीयांना बांचा कांहीं ना कांहीं प्रसाद मिळावयाचा. अशा तऱ्हेनें बांमुळें आश्रमांत आनंदाचें वातावरण खेळत असे.

पण आतां सेवाग्रामला जाऊं तेव्हां बांचा तो सदा हंसतमुख असणारा चेहरा, व बांचा तो फळादिकांचा प्रसाद, कुठे मिळायचा आहे? बांवांचून मनोभावानें कोण 'या बसा' म्हणेल? आईवांचून घर सुनें वाटतें, तसाच बांवांचून आश्रमहि सुनाच वाटणार.

## १५

# हरिजनांच्या बा

बा ह्या सर्व देशाच्या बा (आई) होऊन गेल्या. त्यांच्या मनांत कधींहि जातिविषयक भेदभाव असा नव्हताच. पण स्वच्छता व स्पर्शास्पर्श यांविषयींच्या जुन्या वैष्णव संस्कारांमुळें हरिजनांच्या बा होण्यास त्यांना जरासा वेळ लागला खरा. मात्र हा जुना तिटकारा गेल्यावर त्यांनीं हरिजन व सवर्ण यांमध्यें कसलाहि भेदभाव ठेवला नाहीं.

अहमदाबादला बापूंनीं सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली त्यावेळीं त्यांनीं मित्रांसमक्ष आपले अस्पृश्यतानिवारणासंबंधीचे विचार स्पष्टपणें सांगितले होते: "जर कोणी लायक अंत्यज ('हरिजन' शब्द त्यावेळीं रूढ झाला नव्हता) इसम आश्रमांत येऊं म्हणेल तर मी त्याला अवश्य घेईन."

"पण तुमच्या अटी पाळूं शकेल असे अंत्यज कुठें रस्त्यावर पडले आहेत?" – असें म्हणून एका वैष्णव मित्रानें मनांतल्या मनांत संतोष मानला.

आश्रम स्थापून थोडे महिने झाले असतील नसतील तोंच आश्रमांतील नियम पाळूं शकेल अशा एका प्रामाणिक अंत्यज कुटुंबाला आश्रमांत दाखल करून घेण्याबद्दल ठक्करबापांनीं शिफारस केली. बापूंना हें पाहिजेच होतें. दूदाभाई, त्यांची पत्नी दानीबहेन व एक लहान मुलगी लक्ष्मी हीं आश्रमांत येऊन पोंचलीं.

आश्रमांत मोठी खळबळ उडाली. आफ्रिकेंत बापूजींकडे अंत्यज येत व राहत. पण हा होता स्वदेश. इथें अंत्यज कुटुंबाबरोबर राहतांना बांचें व इतर स्त्रियांचें मन जरासें कचरूं लागलें. त्यांना अंत्यजांना शिवण्यांत कांही दोष वाटत नव्हता. पण स्वैंपाकघरांत व पाणीघरांत या लोकांना जाऊं देण्याच्या आड त्यांचे ते जुने वैष्णव संस्कार येऊं लागले. फुलपात्र तोंडाला लावून पाणी प्यायल्यावर तें भांडें घांसलेंच पाहिजे. धुतल्यावांचून जर तें भांडें पाणकट्ट्यावर ठेवलें गेलें तर बांचा जीव तुटे लागे. कांहीं पदार्थ वाढतांना पळी किंवा चमचा ताटाला जरासा लागला

तरी ती पळी किंवा चमचा उष्टावला म्हणून समजावयाचें व त्याला वेगळा घासण्याच्या भाड्यांत नेऊन ठेवलाच पाहिजे. बिचारीं दूदाभाई व दानीबहेन ही सर्व काळजी घेण्याचा प्रयत्न करीत, पण चुकूनमाकून जरी त्यांच्याकडून ही गोष्ट पाळली गेली नाहीं तरी बांना तें आवडत नसे. दानीबहेनबद्दल त्यांना कांहीं नावड नव्हती, पण त्या उदासीनता बाळगीत. ही उदासीनता काढून टाकण्याला बांना पुष्कळ वेळ लागला. नंतर दूदाभाई व दानीबहेन यानीं इतर कांहीं खाजगी कारणांनीं आश्रम सोडला व बापूंनीं आग्रहानें त्यांची मुलगी लक्ष्मी हिला आश्रमांत ठेवून घेतलें आणि तिला आपण दत्तक घेतली आहे, असें जाहीर केलें. तिची सर्व प्रकारची निगा राखण्याचें काम बांवर सोंपविण्यात आलें. या प्रसंगींहि सुरुवातीला बांना थोडी अडचण भासली असेलच. पण थोड्याच दिवसांत बांनीं लक्ष्मीला आपलीशी केली. एकदा मनानें नक्की केलें कीं, हिला आपली मुलगी मानावयाची, मग तिची निगा राखण्यांत त्या माघार घेणाऱ्या नव्हत्या. लहान मूल थोडें फार भांडखोर असावयाचेंच किंवा एखाद वेळेस हट्टनहि बसावयाचें. तसें लक्ष्मीनेंहि भांडून बांना नकोसें केलें असेल. पण बांनीं त्याचें केव्हांहि वाईट वाटून घेतलें नाहीं. एवढेंच नव्हे तर लक्ष्मीबहेनवर, अन् ती मोठी झाल्यावर तिच्या मुलांवर, बांनीं प्रेमाचा वर्षावच केलेला आहे.

* * *

कांहीं वर्षांपूर्वीं सेवाग्राम आश्रमांत घडलेला प्रसंगहि येथें देण्यासारखा आहे.

नागपूरच्या कित्येक हरिजनांनीं मध्यप्रांताच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळांत हरिजन मंत्री घेतला नाहीं म्हणून बापूंविरुद्ध सत्याग्रह करण्याचें जाहीर केलें. त्यांनीं अशी व्यवस्था केली होती कीं, पांच पांच हरिजनांनीं सेवाग्राम आश्रमांत जाऊन बापूंच्या समोर बसून उपवास करावा. पांच हरिजनांची एक तुकडी सेवाग्रामला येई व तेथें २४ तास बसून उपवास करी. नंतर दुसरी तुकडी येऊन ती उपवास सुरू करी व पहिली तुकडी तेथून निघून जाई. अशा रीतीनें तुकड्यांची अदलाबदल होई. बापूंनीं प्रेमानें या विरोधी हरिजनांचें आदरातिथ्य केलें व त्यांची राहण्याबसण्याची सोय करून दिली. जागा पसंत करण्याचें हरिजनांवरच ठेवलें. त्यांनीं बांची ओसरी पसंत केली.

बांच्या झोंपडींत एक मोठी व एक लहान अशा दोन खोल्या आहेत. लहान खोली न्हायला व कपडे बदलण्याला म्हणून आहे. बापूंनीं बांना बोलावून म्हटलें, "या हरिजनांना तुझी मोठी खोली देशील ना?"

आपल्या विरुद्ध उपवास करण्यासाठीं आलेल्या या हरिजनांची बापूंनीं अशी सोय करून द्यावी व आपल्याला न्हाण्याची खोली वापरावी लागेल अशी परिस्थिति उत्पन्न करावी हें बांना आवडलें नाहीं; व त्या बापूंना खोंचून म्हणाल्या :

"यांना तुम्हीं आपलीं मुलें म्हणून ठेवून घेतलें आहे, तर आपल्याच झोंपडींत बसवा ना?"

"हो, हीं माझीं मुलें तीं तुझीं सुद्धां आहेतच ना?"

अट्टहास्य करीत बापूंनीं बांना निःशस्त्र केल्या व त्या हरिजनांची बांनीं आपल्या खोलींत सोय करून दिली. त्यांची सगळी दंगल बा सहन करीत एवढेंच नव्हे, तर पाणी वगैरे कांहीं हवें नको असेल त्याचीहि काळजी घेत.

## १६

## बांची दिनचर्या

या प्रकरणांत बा आपला सर्व दिवस कसा घालवीत त्याचें वर्णन करावें म्हणतें. त्यांत बापूंची परिचर्या सूर्याच्या स्थानीं आहे. 'बा' म्हणून किंवा आश्रमवासिनी म्हणून त्यांचा जो धर्म होता त्यानें त्यांचा बाकीचा वेळ अडविलेला असे. आपलीं व्यक्तिगत कामें त्या केव्हां करून घेत तें कुणालाहि कळत नसे.

बा नेहमीं पहाटे चार वाजतां होणाऱ्या प्रार्थनेच्या वेळीं उठण्याचा आग्रह धरीत. प्रार्थनेनंतर बापूंना अर्धापाऊण तास झोंपीं जाण्याची संवय आहे, पण बा उठल्यावर परत निजत नसत. बापूजी पुन्हा उठण्यापूर्वी त्यांच्यासाठीं गरम पाणी व मध किंवा जें कांहीं बापू सकाळीं घेणार असतील तें तयार करण्यांत किंवा करवून घेण्यांत त्या गढून जात. 'करवून

घेण्यांत' एवढ्यासाठीं लिहिलें कीं बापूंचीं असलीं वैयक्तिक कामें करण्याची पुष्कळांना इच्छा असे व त्यासाठीं आंतून केव्हां केव्हां चढाओढहि चाले. अशा उमेदवारांना बा बापूंचीं कामें वांटून देत. पण कुणावरहि काम सोंपवून दिलें तरी बा जवळ उभ्या राहून काम बरोबर होत आहे कीं नाहीं तें पाहत. बा अशा रीतीनें देखरेख करीत त्याचें सार्थक कसें होत असे त्याचें एक उदाहरण श्री. कुसुमबहेन देसाई यांनीं दिलें आहे. एकदां अलीगढला बापूजीसाठीं दूध गाळण्याची सेवा करण्याचें काम एका गृहस्थांनीं फार हट्टानें बांकडून मागून घेतलें अन् दूध गाळलें व तें दूध बापूजींना दिलें. दुधांत एक केस बापूजींच्या दृष्टीस पडला. बांना विचारतां त्यांनीं झालेली सर्व हकिकत सांगितली. बापूजींनीं म्हटलें: 'परिणाम पाहिलास ना! आंत केस राहिला आहे.' त्या दिवशीं बापूंनीं दूध घेतलें नाहीं. बांना फार दुःख झालें व त्या म्हणाल्या, "कुणाला करूं दिलें नाहीं तर त्याला घुस्सा येतो, अन् काम करायचें तर जमत नाहीं. सबंध दिवस आणि रात्र डोकेफोड करायची व पोटांत तर एक वेळचेंहि अन्न जात नाहीं."

म्हणून बांनीं साधारणपणें असा रिवाज ठेवला होता कीं, दुसऱ्यानें काम केलें असलें तरीहि भांडें बरोबर साफ आहे कीं नाहीं, वस्तु बरोबर तयार झाली आहे किंवा नाहीं, तें स्वतः पाहावें व बापूजींजवळ स्वतः घेऊन जावें; व खाण्याचें असो कीं पिण्याचें असो तें बापूजी संपवीपर्यंत त्यांच्याजवळ बसावें. नंतरहि भांडीं बरोबर साफ करून जागच्याजागीं ठेवलीं गेलीं आहेत कीं नाहींत तें पाहत. एखाद्या वेळीं कुणी मुलीनें भांडीं धुतलीं असतील व तीं बरोबर साफ झालीं नसतील तर बा स्वतः पुनः साफ करून घेत. बांना भांडीं नेहमीं चकचकीत ठेवण्याची संवय होती.

बापू सकाळीं सातएक वाजतां फिरायला जात, तेव्हां बा आपलीं स्नानादिक कामें आटोपून घेत व पूजा-पाठ करावयास बसत. तुपाचा दिवा (निरंजन) व उदबत्ती लावून त्या तासभर गीता व तुलसीरामायण वाचीत. त्यानंतर बा स्वैंपाकघरांत जाऊन ठेपत. स्वैंपाकघरांत काय चाललें आहे त्यांकडे त्यांची चट्कन् नजर जाई व कुणाला कांहीं सूचना करावीशी वाटल्यास त्या करीत. स्वैंपाकघरांत कुठलाहि जिन्नस उघडा असेल,

उरलेली भाजी किंवा उरलेलीं फळें वाईट होण्यासारखीं असतील, तर त्याकडे त्याच लक्ष देत. बा फार स्पष्टवक्त्या होत्या, त्यामुळें ज्याचें जसें असेल तसें त्याला सांगून टाकीत. तोंडानें 'हो हो' म्हणून अंगावर घेतलेलें काम बरोबर न करणाऱ्याबद्दल बांना अतिशय नापसंती असे; व म्हणून नवीन आलेलीं माणसं केव्हां केव्हां बांविषयीं नाराज होत असत. बांना सर्व वस्तु, कपडे, सगळेंच बरोबर लावलेलें व नक्की केलेल्या ठिकाणीं ठेवलेलें पाहिजे असे. जरा वांकडें तिकडें दिसलें तर स्वतःच ठेवावयास लागत. बांचें बोलणं ऐकून कुणाला वाईट वाटल्याचें बापूंना कळलें तर बापूजी म्हणत: "बांजवळ थोडाफार कडुलिंब असला तरी गोड साखर मात्र खूपच आहे."

वर लिहिल्याप्रमाणें बापूजींचें खाण्याचें बा स्वतःच तयार करीत किंवा कोणी करण्याचें आपल्या अंगावर घेतलें तर त्या स्वतः त्यावर देखरेख ठेवीत. बापूंसाठीं 'खाखरे' (पापडासारखे पातळ व कडक भाजलेले गव्हाचे फुल्के) एका वाटोळ्या डब्यांत ठेवण्यांत येतात. सगळे खाखरे डब्यांत व्यवस्थित ठेवले आहेत कीं नाहींत, सर्व सारख्या आकाराचे आहेत कीं नाहींत, एकादा जास्त पातळ किंवा जाड तर नाहीं, कुणाची कड तुटलेली तर नाहीं ना, जास्त शेकवल्यामुळें कुणी डागळला तर नाहीं, किंवा एकादा कच्चा तर नाहीं, त्यांत मीठ-सोडा बरोबर पडलें आहे कीं नाहीं,—हें सर्व बा स्वतः पाहत असत. बा स्वतः स्वैंपाकांत फारच सुग्रण होत्या. त्यामुळें त्या जेव्हां स्वतः खाखरे करीत तेव्हां ते आदर्श खाखरे होत व आजचे खाखरे बांच्या हातचे आहेत, असें बापूंनाहि कळून येई.

जेवणाची घंटा झाली आणि सगळीं स्वैंपाकघरांत आलीं कीं बापूजींना व खास पाहुण्यांना वाढून बा बापूजींच्या बाजूलाच जेवायला बसत. त्यावेळींहि त्यांचा एक डोळा बापूंकडेच असावयाचा. बापूजींजवळ एखादी माशी आलेली दिसली कीं त्यांचा हात पंख्याकडे गेलाच समजावा. जेवल्यावर स्वैंपाकघरांतून बापूंबरोबर बा त्यांच्या खोलींत येत व बापू वर्तमानपत्रें वाचूं लागले कीं बा त्यांच्या तळपायाला तूप चोळीत. बापूंचे डोळे मिटले कीं बा उठून आपल्या खोलींत जात व जरा आडव्या होत. पंधरा वीस मिनिटांत उठून तोंड धुवून स्वतः वृत्तपत्रें वाचीत.

तशा बा कमी शिकलेल्या व राजकीय गोष्टींत अजाणत्या म्हटल्या पाहिजेत, पण वृत्तपत्रांवरून आणि गप्पागोष्टींवरून त्या देशाच्या चालू परिस्थितीशीं उत्तम परिचय ठेवीत. गुजरात-काठियावाडकडील बातमी कळण्या-साठीं 'वंदे मातरम्' आणि 'गुजरात समाचार' वाचल्यावांचून कधींहि राहत नसत. 'हरिजन-बंधु' दर आठवड्याला येई तें रोज थोडथोडें मिळून सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचून टाकीत, व त्यामुळें निरनिराळ्या कार्यक्रमां-विषयीं बापूजींचे विचार त्यांना कळत असत. वृत्तपत्रें वाचून जगांत चाललेल्या हालअपेष्टांविषयीं बांना फार वाईट वाटे. एकदां चालू लढाईविषयीं बा म्हणाल्या : "ही लढाई जगाचा नाश करूनच बंद होणार कीं काय?" बंगालच्या उपासमारीविषयीं वाचल्यावर आगाखान महालांतून एका पत्रांत बा लिहितात : "बंगाल्यांतील बातम्या वाचून तर छाती फुटूनच जाते. बंगाल्यांत आकाशच कोसळलें आहे. ईश्वर काय करूं पाहत आहे कोणाला माहीत!"

बा लहानपणीं शिकूं शकल्या नाहींत खऱ्या, पण नंतर त्यांना शिकण्याची फार गोडी लागली होती. दररोज एखादा तास कुणाजवळ तरी बा कांहींना कांहीं शिकत. राष्ट्रभाषा हिन्दुस्तानी बरोबर समजली पाहिजे म्हणून हिन्दीचा कधीं कधीं अभ्यास करीत; किंवा कितीक वेळां कुणाबरोबर तरी तुलसीरामायण किंवा गीता यांचा अभ्यास करीत. गीतेंतील श्लोक शुद्ध म्हणण्याचा, तसेंच श्लोक तोंडीं करण्याचा, प्रयत्न त्या सतत करीत. शेवटीं शेवटीं आगाखान महालांत त्यांनीं बापूंजवळ गीतेच्या श्लोकांचे शुद्ध उच्चार शिकण्यास सुरुवात केली होती. ७५ वर्षांच्या बा ७५ वर्षांच्या बापूंजवळ बसून एखाद्या निष्ठावंत शिष्याच्या उत्साहानें गीता शिकत आहेत हें दृश्य किती अद्‌भुत असेल बरें!

बा जें कांहीं शिकण्यास घेत तें खूप श्रद्धेनें शिकत व एवढें वय झालें होतें तरी एखाद्या विनयी विद्यार्थ्याप्रमाणें शिकावयास बसत. त्यांना लिहायला सांगितलें तरी तेंहि त्या लहान विद्यार्थी 'धडा' तयार करतात तसें दुसऱ्या दिवशीं लिहून आणीत, व वाटेल तेवढ्या चुका निघाल्या तरी त्या सुधारून पुन्हा लिहितांना त्यांना कंटाळा येत नसे.

वृत्तपत्रें व वर्ग झाल्यावर त्या कांतायला बसत. दररोज चारशें ते पांचशें 'तार' त्या कांतीत. आजारामुळें आंथरुणावर पडून असल्या तरच त्यांचें कांतणें थांबे. आजारांतून उठल्यावर अशक्तपणा असला तरीसुद्धां त्या कांतणें सुरू करीत. आश्रमांत प्रार्थनेनंतर प्रत्येकानें किती सूत कांतलें तें नोंदून ठेवण्यांत येतें. त्यांत जास्त सूत कांतणाऱ्यांपैकीं बा एक होत्या.

एवढें काम होईतों चार वाजायला येत. मग बा परत जेवणघरांत जात. बापूंचें खाण्याचें तयार करीत किंवा करवीत व इतर गोष्टींकडे लक्ष देत. बापूजी पांच वाजतां जेवावयास बसत तेव्हां त्यांच्याजवळ बसत. पुष्कळ वर्षांपासून बांनीं रात्रीचें जेवण सोडलें होतें. फक्त कॉफी पीत, व अखेरच्या चारएक वर्षांपासून कॉफीहि सोडली होती. दुधांत तुळस व मिरीं घालून थोडें उकळून तें पीत.

सायंकाळीं बापू फिरायला गेले म्हणजे बा आश्रमांत कुणी आजारी असेल तर त्याच्याजवळ जाऊन बसत, व मग इतर बायकांसह त्यासुद्धां फिरायला निघत व आश्रमापासून कांहीं अंतरावर बापू समोरून येतांना भेटले कीं त्यांच्याबरोबर परत येत.

फिरून आल्यावर संध्याकाळचीं प्रार्थना होत असे. त्यांत बा असावयाच्याच. सायंकाळच्या प्रार्थनेंत रामायण म्हटलें जाई त्यांतहि बा अगदीं समरस होऊन जात.

प्रार्थनेनंतर थोडा वेळ सर्व स्त्रियांसह बा गप्पागोष्टी करीत व मग आपली अन् बापूंची निजण्याची तयारी करीत. निजण्यापूर्वीं बापूंच्या डोक्याला तेल चोळण्याचें काम जवळ जवळ शेवटपर्यंत नियमितपणें त्यांनींच केलें आहे. पहाटे पुन्हां चार वाजतां उठत व तें न् तेंच रहाटगाडगें चालू होई.

अशा प्रकारें बांच्या दिनचर्येंत बापूंची परिचर्या हें मुख्य अंग होतें. त्याविषयीं मीरांबहेन लिहितात:

"मीसुद्धां बरींच वर्षें बापूंची परिचर्या केली आहे. त्यावेळीं बांच्या अजब गुणांचें मला दर्शन घडलें. बरेच वेळां असें होई कीं, बापूंच्या व्यक्तिगत गरजांची काळजी घेण्याचें काम आम्हां दोघींवरच येऊन पडे. बापूंच्या वारा-वावटळीसारख्या चालणाऱ्या प्रवासांत तर बऱ्याच गैरसोयी न् अडचणी येत. पण अविरत नियमितपणानें हें काम बा सुंदर तऱ्हेनें

करीत. बापूंचें खाण्याचें तयार करणें व बापूंना मालिश करणें हीं कामें त्या आपल्याच हातीं ठेवीत. त्यांत कुठें कुठें माझी थोडीशी मदत घेत. कपडे धुणें तसेंच सामान बांधणें-सोडणें माझ्या हवालीं होतें. पण त्यांतहि बांची तीक्ष्ण नजर सतत माझ्या कामावर असेच. बांना जणूं कांहीं कधीं थकवा वाटतच नसे. सभेंत किंवा मुलाखतींत बापूंना रात्रीं कितीहि उशीर झाला तरी त्यांच्या डोक्यावर तेल चोळण्यासाठीं व त्यांचें थकून भागून गेलेलें शरीर चेपण्यासाठीं बा वाट पाहत बसून असायच्याच. पहाटे चार वाजतां परत प्रार्थनेला येत व बापूंच्या सेवेला लागत. त्या प्रमाणाबाहेर गप्पागोष्टी करून बापूंचा वेळ केव्हांहि फुकट दवडीत नसत. बापूंच्या आजुबाजूच्या सर्व माणसांत बापूंना त्या कमींत कमी त्रास देत व त्यांची जास्तींत जास्त सेवा करीत.

"शेवटच्या दिवसांत त्या आजारी असत, तेव्हां बापूंचें काम त्या स्वतः करूं शकत नसत; पण त्या कामावर देखरेख ठेवण्याचें अगदीं शेवटच्या घटकेपर्यंत त्यांनीं सोडलें नाहीं. आगाखान महालांत जेव्हां त्यांची तब्येत झपाट्यानें बिघडत चालली तेव्हां त्यांच्यानें एका खोलींतून दुसऱ्या खोलींत चालून जाववत नसे, म्हणून चाकाच्या खुर्चीतून त्यांना फिरवावें लागे. एक दिवस व्हरांड्यांत आपल्या आंथरुणावर पडल्या पडल्या बापूंना सायंकाळचें खाणें खातांना बा पाहत राहिल्या होत्या. खोलींत जायची वेळ झाली होती. तेव्हां ती खुर्ची घेऊन बांपाशीं जाऊन मी म्हटलें : 'चला बा, आंत जायची वेळ झाली आहे.' बांनीं उत्तर दिलें, 'जरा थांब, बापूजींचें खाणें झालें कीं जाऊं.' अशा तऱ्हेनें आंथरुणाला खिळल्या होत्या तेव्हां सुद्धां त्यांचा जीव बापूंच्या सेवेंत तल्लीन होता."

बांसारख्या निष्ठावन्त परिचारिकेची उणीव बापूंना आज किती भासत आहे त्याची कांहीशी कल्पना पुढील दोन प्रसंगांवरून येऊं शकेल.

अगदीं अलीकडची गोष्ट आहे. एक दिवस मी बापूंपाशीं बसलें होतें. त्यांचें खायचें रोज बरोबर साडे अकरा वाजतां येतें. पण त्या दिवशीं पावणे बारा वाजतां आलें. तेव्हां खाण्याचें घेऊन आलेल्या बाईला बापू म्हणतात : "बा कायमची येथें बसलीच आहे असें आपण समजलें पाहिजे. नक्की केलेल्या वेळेपेक्षां एक मिनिट देखील उशीरां बा खाण्याचें आणीत नसे,

व जर तें काम दुसऱ्यावर सोंपविलेलें असेल तर एक मिनिट उशीर झाला तरी धडपड सुरू करीत असे. लगेच उठून 'जेवणघरांत जाई व धामधूम करून टाकी. आगाखान महालांत आजारी होती व स्वतःला कांहीं करतां येत नव्हतें, तेव्हांहि घड्याळाकडे नजर ठेवी व माझें खाणें वेळेवर आलें नाहीं तर हाकाहाक करून सोडी. मी म्हणें कीं, 'येथें कुठें वेळ संभाळावयाची आहे ! जरा उशीर झाला तर काय झालें !' तर बा लगेच उत्तर देई, 'पण मला माहीत आहेना कीं, तुम्ही इथेंहि आपल्या वेळा बरोबर पाळतां. तर मग जरासा उशीरहि कां म्हणून व्हावा !' "

दुपारीं जेवल्यावर अलीकडे बापू पायाला तूप चोळायला नको म्हणत. सर्व मुली तूप चोळून घेण्यासाठीं आग्रह करूं लागल्या तेव्हां फारच दुःख-पूर्ण आवाजांत ते म्हणाले : "मला तूप चोळून घ्यायचें असतें, तर बा कां मरून गेली असती ?"

त्यांची चाकरी करणारे पुष्कळ आहेत, पण बांची चिकाटी व मनोभावना इतर मंडळींत कोठून असायला ? तरीपण सगळ्यांच्या आग्रहामुळें बापूंनीं पुन्हां तूप चोळून घेण्याचें सुरू केलें.

* * *

बा बऱ्याचशा नियमितपणानें आपली रोजनिशी लिहीत. त्यांच्या रोजनिशींतील थोडे नमुने पुढें दिले आहेत :

१९३३ च्या लढ्याच्या वेळीं बा खेडेगांवांत फिरत होत्या, त्या वेळच्या रोजनिशींतून कांहीं उतारे खालीं देतें :

सोजित्रा,
ता. २८-१-'३३

६ वाजतां उठणें. प्रार्थना. नित्यकर्म. रावजीभाईच्या घरीं जाणें. सर्व बायकांना भेटणें. गप्पागोष्टी. आराम. वर्तमानपत्र वाचणें. लिंबासीला जाण्यास निघालों, तेथील स्त्रीपुरुषांना भेटून त्यांच्या सुखदुःखाच्या गोष्टी ऐकून परत आलों. मलातजला येऊन झोंपीं गेलों.

मलातज,
ता. २९-१-'३३

६॥ प्रार्थना. नित्यकर्म. पत्रिका ऐकणें. बापूंना पत्र लिहिलें. खांधली व त्राणजाला जाऊन आलों.

३०-१-'३३

६॥ प्रार्थना. नित्यकर्म. कन्याशाळा व अंत्यज (महार) वाड्यांत जाऊन हरिजनांना भेटून आलों. ते कसला धंदा करतात तें सगळें पाहिलें. नंतर प्रार्थना.

४-२-'३३

५ वाजतां उठणें. प्रार्थना. नित्यकर्म. ८ वाजतां परिषदेचा प्रोग्राम होता. त्यांत सात बायकांना पकडलें. नंतर चावडीवर नेलें. नांवें लिहून घेतलीं. त्यानंतर जेवणाविषयीं विचारलें. गांवांतून तें आलें. तेव्हां जेवलों. स्टेशनवर जाण्यास निघालों. १२ वाजतां कठाणा स्टेशनवर उतरलों. फौजदारानें येऊन पाण्याची वगैरे चौकशी केली. नंतर स्टेशनावरच बसविलें. नांवें लिहिलीं व वॉरंटें तयार केलीं. नंतर तीन वाजतां गाडींत बसलों. बोरसदला येतांना रास स्टेशनावर बायकापुरुष भेटण्यास आले होते. ५ वाजतां बोरसदला आलों. केस चालवून लॉक-अप्मध्यें ठेवलें. मॅजिस्ट्रेटला भेटणें. प्रार्थना.

साबरमती जेलमधील रोजनिशींतून :

१६-२-'३३

मी येथें आलें तेव्हां मीरांबहेन त्याच दिवशीं सकाळीं आलेल्या होत्या. म्हणून आनंद झाला. आम्ही दोघी एकत्र राहतों. मी व मीरांबहेन बरोबर चाराच्या ठोक्याला प्रार्थना करतों. त्यानंतर मी निजतें. नंतर नित्यकर्म. न्हाणें धुणें वगैरे. कॉफी पिणें. दहा साडेदहा वाजतां सुपरिन्टेन्डेन्ट रोज येतात. सकाळीं डॉक्टर येतात. अकरा वाजतां जेवण. एक तास आराम. दोन ते साडेचारपर्यंत हिन्दी लिहिणेंवाचणें व सूतरहाटावर कांतणें. साडेपांचला जेवण. नंतर फिरणें. सातला प्रार्थना. वाचणें. गप्पागोष्टी व नऊ वाजतां झोंपीं जाणें.

२१-२-'३३

चार वाजतां प्रार्थना. गीता वाचतें—अनासक्तियोग. नंतर कांहीं वेळ निजतें. नित्यकर्म. ६॥ वाजतां अंग धुण्यास जातें. येऊन कॉफी पितें. नंतर वाचतें. 'जामे जमशेद' वाचतें. ११॥ भोजन. आराम. दोन ते पांच वाचणें, कांतणें, भोजन. तार नेहमीं ३०० कांततें.

१६-४-'३३

४ वाजतां प्रार्थना. गीता वाचली. नित्यकर्म. कांतलें ४०० तार. वर्तमानपत्र वाचलें. ११॥ भोजन. कांतलें. वाचणें लिहिणें. मी येथेंहि एकादशी करतें. आराम. नंतर हिन्दी व गुजराती लिहिणें वाचणें. कॉफी प्यालें गप्पा मारणें. येथें कांहीं कमी जास्त नाहीं. सायंकाळच्या प्रार्थनेनंतर भागवत ऐकतें. हल्लीं मीरांबहेन चन्द्रमा, पृथ्वी, सूर्य सगळें शिकवितात.

३-५-'३३

४ वाजतां प्रार्थना. गीता वाचणें. नित्यकर्म. कॉफी पिणें. वृत्तपत्र वाचणें. भोजन. काल वर्तमानपत्रांवरून समजलें कीं, बापूजी हरिजनांसाठीं आणखी एक उपवास करणार आहेत. ८-५-'३३ ला सोमवारच्या दिवशीं सुरू होईल. आपल्या अनुयायांवरचा गांधीजींचा विश्वास उडाला आहे. बापूजींजवळ जाण्यासाठीं फार उत्कंठा लागली आहे. बापूजींचा हा प्रश्न, ही तपश्चर्या, फार कठिण आहे.

८-५-'३३

४ वाजतां प्रार्थना. गीता वाचली. आजपासून बापूजींचा महायज्ञ सुरू होत आहे. येथें आम्हीं प्रार्थना केली होती. मला बापूजींजवळ घेऊन जातील अशी आशा वाटत होती, पण आज तिसरा उपवास झाला, मला बोलाविलें नाहीं. आतां तर वर्तमानपत्राची वाट पहातें कीं त्यांत काय असेल ! 'हरिजन' वाचलें. जीव तर टांगलेलाच्या टांगलेलाच रहातो.

१०-५-'३३

काल रामदास भेटावयास आला होता. ह्या वेळेला माझें नशीब फुटलेलें आहे. नाहीं तर मला कां घेऊन जात नाहींत ? काय करूं ? चिन्ता फार लागली आहे. यावेळींहि मी दूर आहें. मी बापूजींना तार केली आहे कीं, मला आपल्यापाशीं यावयाचें आहे, येथें माझा जीव अतिशय गोंधळला आहे. त्यांची तार आली, धीर सोडूं नकोस. नंतर दुसरी तार आली कीं, आपल्याला सरकारकडे परवानगी मागतां येत नाहीं, शान्ति बाळग. नंतर मी आपली कांतीत बसलें. प्रार्थना केली. दुसरे कांहींहि रुचत नव्हतें.

बांना बापूजींपाशीं घेऊन गेल्यानंतरच्या रोजनिशींतून:

१६-६-'३३.

४ वाजतां प्रार्थना. गीता वाचली जाते. नंतर नित्यकर्म. ५॥ वाजतां बापूजींना खाण्याचें दिलें. दूध वगैरे. ६॥ नंतर मी आंग धुवायला जातें. येऊन तुळशीला पाणी घातलें. लालजीचें दर्शन घेऊन कॉफी प्यालें. लाल औषधानें गुळण्या केल्या. ९ वाजतां बापूजींना खायचें दिलें. नंतर मातीची पट्टी बांधली. ११ वाजतां जेवण. १२ वाजतां बापूजींना खायचें दिलें. नंतर आराम. पायाला तूप चोळणें. कांतलें तार २००.

९-७-'३३

४ वाजतां प्रार्थना. गीता. नंतर नित्यकर्म. बापूंना खायचें दिलें. येथें काय काम असणार? बापूजीवांचून दुसरें कोणी नाहीं. बाळकृष्ण बापूजींचें खूप काम करतो. आणि प्रभावती तर त्यांच्याजवळून हलतच नाहीं. केशु देखील उभा असतो. मग मी काय करूं? बापूजीपाशीं जातें व परत येतें. त्या सगळ्यांत बसणें मला आवडत नाहीं. कांतलें.

## १७

# कर्मयोगी बा

गीतेंत सांगितलें आहे कीं, 'योगः कर्मसु कौशलम्'। या अर्थानें बा खऱ्याखुऱ्या कर्मयोगी होत्या. एक क्षणभर सुद्धां कामावांचून बसणें त्यांना अस्वाभाविक होऊन गेलें होतें. आणखी स्वतः जें काम करीत तें फारच कौशल्यानें व व्यवस्थितपणें करीत. व्यवस्थेची तर त्या चालतीबोलती मूर्तीच होत्या असें म्हटलें तरी त्यांत कांहीं चुकीचें होणार नाहीं. कुठली वस्तु जागेवर नसली तर तिकडे बांचें लक्ष गेल्याशिवाय रहायचें नाहीं. "ही वस्तु इथें कशी पडली? येथें कोणी झाडीत नाहीं काय?" वगैरे प्रश्न त्यांच्या तोंडून निघाल्यावांचून राहत नसत, व स्वतःच सगळें नीट ठेवूं लागत. बापूंच्या झोंपडींत जात तेव्हांहि त्यांची नजर बापूंचीं भांडीं, खडावा, वाहाणा, घड्याळ, कपडे वगैरेवर गेल्यावांचून राहत नसे. घड्याळ व वाहाणा साफ करून जागेवर ठेवीत. घांसल्यावाचून भांडीं पडलीं असतील तर स्वतः जाऊन घांसून आणीत.

बांची नजर अशी तीक्ष्ण असल्यामुळें त्यांच्या आजुबाजूच्या लोकांना फार जपून वागावें लागे. आश्रमवासीयांपैकीं कोणी कपडे व्यवस्थित घातले नसतील, केस बरोबर विंचरले नसतील, तर बा सहज बोलून जात कीं, "कपडे नीट कां नाहीं घातले ? हें काय सगळें वांकडेंतिकडें गुंडाळलें आहें ? केस कां नाहीं विंचरले ?" वगैरे. बा स्वतः व्यवस्थित होत्याच, पण दुसऱ्यापासूनहि त्या तशीच अपेक्षा करीत. या कारणानें बांसाठीं पोळी किंवा भाजी करायची असेल तेव्हां करणाराला फारच सावध रहावें लागे. त्यामुळें मुली बांना भीतहि असत. बा कांहीं फारसें म्हणत नसत, पण एखादा टीकेचा शब्द बोलल्यावांचून रहात नसत.

एवढ्या वयांतहि बांना आळस म्हणून माहित नव्हता. बा आळसानें पडून राहिलेल्या कुणाला क्वचितच दिसल्या असतील. त्यांचा उद्योगीपणा आजकालच्या तरुणांनाहि लाजून मान खालीं घालायला लावील असा होता. कधीं स्वैंपाकघरचें, कधीं भाजी निवडण्या–चिरण्याचें, तर कधीं कांतण्याचें, अशीं त्यांचीं एकामागून एक कामें चाललेलींच असत.

त्यांच्यासाठीं शौचकूपाची निराळी व्यवस्था करून देण्यासाठीं सर्वांचा फारच आग्रह असे, तरीहि ऊन्ह असो कीं थंडी असो कीं पाऊस असो, त्या आपल्या सार्वजनिक पायखान्यांतच जात. रात्रीचें मलमूत्राचें भांडें ('पॉट्') सुद्धां स्वतःच साफ करून आणीत. बांच्या खोलींत त्यांच्याजवळ नेहमीं दोन तीन मुली तरी असतच. पण बा आपलें काम मुळींसुद्धां त्या मुलींना करायला सांगत नसत. उलट कधीं कुणा मुलीला उशीर झाला तर स्वतः खोली झाडायला देखील लागत. सकाळीं उठून तोंड धुण्यासाठीं गरम पाणी आपणच जाऊन घेऊन येत. दांतण (दांत घासायची बाभळीसारख्या झाडाची काटकी–दंतधावन) स्वतःच ठेंचून (त्याची कुंचली करून) घेत. अखेरच्या ५–६ वर्षांपासून बांची तब्येत अगदीं ढांसळून गेली होती. बापू बांना रोज म्हणत : "तुझ्या इतक्या सगळ्या मुली आहेत, मग तूं कशाला धांवपळ करतेस ?" आजारी असल्या तर बा कांहीं दिवस दुसऱ्यांना काम सांगत, पण जरा बऱ्या झाल्या कीं परत स्वतःच उठून कामाला लागत. बांना दिसलें कीं अमुक मनुष्य खरें मनापासून काम करावयास तयार आहे, तर कधीं वेळ पडल्यास त्याला काम सांगत व तेंहि स्वतः करणें शक्य नसेल असेंच असे.

बा फारच स्पष्टवक्त्या होत्या. कधीं कधीं नव्या लोकांना त्याचें वाईट वाटत असे. पण थोड्याच वेळांत बांचा स्वभाव कळून आल्यानंतर त्यांच्या बोलण्यांत गोडवा वाटूं लागे. बापूजी कितीतरी वेळां म्हणाले आहेत कीं, "माझ्या व बाच्या निकट संबंधांत आलेल्या लोकांत असेच लोक अधिक आहेत कीं ज्यांची श्रद्धा माझ्यावर आहे त्यापेक्षां अनेक पटीनें जास्त बावर आहे." एके दिवशीं घनश्यामदासजी बिडला माझ्या वडिलांना विनोदानें म्हणाले: "तुमच्या आश्रमांतले सर्वच लोक थोडे फार चक्रम् आहेत."

माझ्या पिताजींनीं विचारलें: "बापू सुद्धां ?"

उत्तरादाखल ते म्हणाले: "हो, हो, ते तर मुळीं सर्वांहून जास्त. साबरमती आश्रमाचा मला फार अनुभव नाहीं. पण सेवाग्रामांत मला तरी एक बा व दुसऱ्या दुर्गाबहेन यांवांचून कोणी शहाणें माणूस दिसत नाहीं !"

बांना आपल्या नातेवाईकांबद्दल व मुलांनातवंडांबद्दल स्वाभाविकपणेंच खूप प्रेम होतें. बांनीं आपलें जीवन तर बापूंना म्हणजे आश्रमालाच अर्पण केलेलें होतें, तेव्हां आश्रम हेंच त्यांचें घर होतें. आपल्या एखाद्या मुलाच्या घरीं कधींमधीं जात खऱ्या, पण थोड्याच दिवसांत परत येत असत. आश्रम हा सार्वजनिक पैशावरच चाले. तेव्हां मुलांना आपल्याकडे कांहीं दिवस बोलवावयाचें असेल किंवा कुणी आजारी असतां आपल्यापाशीं ठेवून औषधोपचार करावयाचे असतील तर काय करायचें ? बापूंनीं यांतून मार्ग काढला. मुलांनीं यावें, रहावें, व आश्रमांतील कुणाकडूनहि काम करवून घेतलें तर त्याचा खर्च आश्रमाला द्यावा. बांना ही गोष्ट किती दुःखद वाटली असेल याची आपणाला सहज कल्पना येईल. आजोबां-आजींच्या घरीं मुलांनीं मजा करायला जायचें. आजीला मुलांना पाहतांच पोटांत आनंद मावेनासा व्हायचा. मग या आजोबांनीं मुलांना एक वेळ फुकट जेवायलाहि घालूं नये ! पण धन्य आहे बांची ! त्यांनीं बापूंची ही गोष्टहि मान्य केली. मुलें जायचीं असतील तेव्हां बा स्वतः आश्रमाच्या व्यवस्थापकाला सांगून टाकीत: "हें पहा, आतां हीं माणसें जायचीं आहेत. त्यांचा जो खर्च असेल त्याचें बिल त्यांना द्या."

१९२८ सालची गोष्ट आहे. साबरमती आश्रमाच्या जागेपासून थोड्या अंतरावर एक बंगला होता. तेथें चर्मालयाच्या प्रयोगाची सुरुवात

करण्यांत आली व एक आश्रमवासी गृहस्थ कांहीं मजूरांसह तेथें राहण्यास गेले. एके दिवशीं सकाळीं बातमी आली कीं, लुटारूंच्या एका टोळीनें तेथें राहणाऱ्या लोकांना मार दिला व सर्व सामानसुमान लुटून नेलें. गरीब मजूरांच्या घरांत मालमत्ता ती काय असणार ? पण ते या घटनेमुळें घाबरून गेले व या ठिकाणीं आम्ही राहणार नाहीं असें म्हणूं लागले. बापूंनीं म्हटलें : "मग आपण मजूरांवांचूनच चालवूं." सर्व मजूरांना रजा देण्यांत आली. संध्याकाळच्या प्रार्थनेंत बापूंनीं सूचना देऊन टाकली कीं उद्यापासून आपणच गोशाळेंत काम करावयाचें आहे.

दुसऱ्या दिवशीं नक्की केलेल्या वेळीं इतरांबरोबर बासुद्धां गोशाळेंत जाऊन पोंचल्या. तेथील व्यवस्थापकाला संकोच वाटूं लागला कीं, बांना काय काम द्यावें ? बांनीं ही गोष्ट ओळखली. त्यांनीं सरळपणें म्हटलें : "कां कांहीं काम नाहीं दाखवीत ? गाईसाठीं गवारीचा दाणा नाहीं भरडायचा ?"

व्यवस्थापक म्हणाले : "पण बा तुम्हाला—"

"नाहीं, नाहीं, आणा."

आणि त्या जाऊन जात्याशीं बसल्यासुद्धां व गात गात भरडूं लागल्या.

१९३१ मध्यें एकदा बा वेडछी आश्रमांत गेल्या होत्या. आश्रमाच्या व्यवस्थापकाच्या मनांत कल्पना अशी कीं बा खाटेवर बसतील व सभेची वेळ होतांच सभेंत येतील. म्हणून खाट तयार ठेवली होती. बा आल्या तेव्हां ते बांना म्हणाले : "बसा." पण बा कसल्या बसतात ? त्या सरळ स्वैंपाकघरांत गेल्या व स्वैंपाकांत मदत करूं लागल्या. व्यवस्थापकाच्या पत्नीला फारच आश्चर्य वाटलें. 'एवढ्या मोठ्या बा आपणाला मदत कशा करतील !' त्यांनीं बांना म्हटलें : "बा, तुम्ही करायचें राहूं द्या, मी आत्तां करून टाकतें." पण बा कसल्या सोडतात ? त्या म्हणाल्या : "एकीपेक्षां दोघी बऱ्या. आत्तां स्वैंपाक उरकून टाकूं अन् बरोबरच सभेला जाऊं." व खरोखर तसेंच केलें.

एखाद्या दिवशीं सकाळीं किंवा सायंकाळीं स्वैंपाकाच्या वेळीं जाहीर सभा किंवा असाच दुसरा कसला कार्यक्रम असला तर बा स्वैंपाकघरांत काम करणाऱ्यांना सांगत : "तुम्ही सगळीं जा. तुम्ही लहान आहांत.

तुम्हाला पाहायची अन् फिरायची हौस असणार. स्वैंपाकाचें काम मी करून टाकीन."

१९४१ त बा मरोलीस गेल्या होत्या. तेथून सेवाग्रामला यावयाच्या होत्या. सगळे बांची वाट पहात होते. एक बाई तर त्यांना भेटावयास म्हणून खास थांबल्या होत्या. सकाळची गाडी गेली. सायंकाळीं मुंबईहून गाडी यायची होती. त्या बाईंनीं बापूंना विचारलें: "बा आत्तां तरी येतील ना ?" बापू म्हणाले: "जर बा पैसेवाल्यांच्या बा असतील तर आतां येतील व गरीबांच्या बा असतील तर सुरतेकडून 'ताप्टीव्हॅली' (रेल्वे) नें सकाळीं येतील." आणि खरोखर बा दुसरे दिवशीं सकाळीं ताप्टीव्हॅलीनेंच आल्या व स्वतः गरीबांच्या बा आहेत हें आपोआपच सिद्ध होऊन गेलें.

सेवाग्रामांत एक दिवस एक मुलगी आजारी पडली. आजारी मुलीच्या शुश्रूषेला एक बाई होत्या व त्या तिचें कमोड (मलपात्र) वगैरे साफ करीत व औषध देत. एके दिवशीं शुश्रूषा करणाऱ्या बाई त्या मुलीचें कमोड धुवायचें विसरल्या. संध्याकाळ झाली. रात्रीं बांनीं कमोड पाहिलें. कांहींहि न बोल्तां स्वतः कमोड साफ करून आल्या. एक प्रेमळ आई आपल्या लहान कुटुंबासाठीं झिजते व झिजून घेण्यांतच सुख मानते हें आपणाला पुष्कळ घरीं पहावयास मिळतें. पण बा आपल्या अतिशय विशाल घरासाठीं तितक्याच स्वाभाविकपणें झिजत व त्यांमधून आत्मसुख मिळवूं शकत. 'कर्मयोगी' नांवाला त्यांच्यापेक्षां अधिक लायक कोण असूं शकेल ?

२ नं. ८३३२
१८ चरित्र ६५२

# हरिलालभाई

बा आणि बापू यांच्या सबंध जीवनांत हरिलालभाईचें प्रकरण फार करुण आहे. हरिलालभाई हे त्यांचे थोरले चिरंजीव. बापू वयाच्या एकोणीसाव्या वर्षी बॅरिस्टर होण्यास विलायतेस गेले ते हरिलालभाई अगदीं लहान असतांनाच गेले होते. बापू पुष्कळ वेळां म्हणत कीं, "हरिलालचा जन्म (सन १८८८त) मी जेव्हां मोहवश किंवा 'मूर्छित' दशेंत होतों तेव्हां झाला*. आणखी ज्याला मीं सर्व दृष्टीनें माझा 'मूर्छाकाळ', वैभवकाळ मानला आहे त्याचा तो साक्षीदार आहे. याचें स्मरण राहण्याएवढें त्याचें त्यावेळीं वय होतें. म्हणजे त्या वेळच्या माझ्या जीवनाचे संस्कार त्याच्यावर पडलेले आहेत." ही संस्कारांची गोष्ट कांहींहि असो, पण हरिलालभाईनीं बापूंविरूद्ध जें बंड केलें त्याचें मुख्य कारण मात्र, हरिलालभाईच्या मताप्रमाणें, असें होतें कीं, बापूंनीं त्यांना स्वतःला व त्यांच्या भावांना नीट शिक्षण दिलें नाहीं; एवढेंच नव्हे तर आपल्याजवळ राहणाऱ्या इतरांना ज्याअर्थी शिक्षणाची उत्तमोत्तम संधि दिली त्याअर्थी हेतुपूर्वक स्वतःच्या (बापूंच्या) मुलांना शिक्षणाची संधि मिळूं दिली नाहीं. हरिलालभाईना वाटलेला हा अन्याय त्यांच्या बंडखोरीच्या मुळाशीं आहे. बांनीं आपल्या साध्या पण मूलग्राही, व्यावहारिक बुद्धीनें पुष्कळ कोडीं उलगडण्यांत बापूंना मदत केली आहे; पण हरिलालभाईच्या प्रकरणीं बा विशेष कांहीं करूं शकल्या नाहींत.

सन १८९७च्या जानेवारींत बापू बांसह डरबनला उतरले तेव्हां त्यांच्याबरोबर तीन बालकें होतीं—दहा वर्षे वयाचा एक भाचा, नऊ वर्षांचे हरिलालभाई व पांच वर्षांचे मणिलालभाई. बापू स्वतःच लिहितात कीं, त्यांना कोठें शिक्षण द्यावें हा माझ्यापुढें मोठा विकट प्रश्न होता. गोऱ्यांसाठीं चालणाऱ्या शाळांत गांधींचीं मुलें म्हणून मेहरबानीनें व अपवादादाखल त्यांना येऊं दिलें असतें. पण इतर सर्व हिंदी बालकें जेथें शिकूं शकत नव्हतीं तेथें आपलीं मुलें पाठविणें बापूंना पसंत नव्हतें. ख्रिस्ती

* पहा–परिशिष्टांतील बापूंचें बांना लिहिलेलें पांचवें पत्र.

मिशनच्या शाळांमध्यें पाठविण्यास बापू तयार नव्हते. शिवाय गुजराती द्वारा शिक्षण देण्याचा आग्रह होता व तशी व्यवस्था कुठल्याहि शाळेंत नव्हती. घरीं शिकवील असा कोणी चांगला गुजराती शिक्षक मिळूं शकला नाहीं. बापू स्वतः शिकविण्याचा प्रयत्न करीत, पण कामामुळें त्यांत फारच अनियमितपणा होत असे. शिवाय, मुलें आईबापांपासून दूर राहूं नयेत, व सुव्यवस्थित घरांत बालकांना जें शिक्षण सहज मिळतें तें छात्रालयांत मिळत नाहीं, असें बापूंचें मत असल्यामुळें मुलांना परत स्वदेशीं पाटवून देण्यासहि बापू तयार नव्हते. तरीहि भाच्याला व हरिलालभाईना कांहीं महिने स्वदेशांत निरनिराळ्या छात्रालयांत ठेवून पाहिलें. पण थोड्याच दिवसांत त्यांना परत बोलवावें लागलें.

आपल्या शिक्षणाची कांहीं निश्चित व्यवस्था झाली नाहीं याचें हरिलालभाईना अतिशय वाईट वाटे, एवढेंच नाहीं तर मोठे झाल्यावर त्यांचा बापूंवर थोडासा रोषहि होता. “बापूंना चांगलें शिक्षण मिळालें आहे, मग आम्हांला कां नाहीं चांगलें शिक्षण देत? बापू सेवाभावाच्या, साधेपणाच्या व चारित्र्यविकासाच्या गोष्टी बोलतात, पण जें शिक्षण त्यांना मिळालें तें मिळालें नसतें तर आज जीं देशसेवेचीं कामें ते करूं शकतात तीं त्यांना करतां आलीं असतीं काय? आम्हीहि शिकून अशींच देशसेवेचीं कामें करूं, व शक्ति मिळविल्यावर साधेपणा वगैरे सुद्धां ठेवूं. सेवापरायण व साधें जीवन कंठण्याला आमचा विरोध नाहीं. पण अशिक्षित राहून आम्हांला कशी देशसेवा करतां येईल तें आम्हांला समजत नाहीं.” हरिलालभाईच्या सर्व म्हणण्याचें हें सार होतें.

बापू आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत निष्काळजी राहतात असें कांहीं अंशीं मि. पोलाक व मि. कॅलनबॅक यांचेंहि मत होतें. मि. पोलाक फार तिखट शब्दांत बापूंना सांगत कीं, तुम्ही मुलांना चांगलें इंग्रजी शिक्षण देत नाहीं त्यामुळें त्यांचें भवितव्य तुम्ही बिघडवून टाकीत आहां. मि. कॅलनबॅकना असें वाटे कीं, टॉल्स्टॉय् आश्रमांत तसेंच फिनिक्स आश्रमांत इतर खोडकर, दुर्वर्तनी व उनाड पोरांमधें बापू आपल्या मुलांना मिसळूं देतात याचा एकच परिणाम शक्य आहे, व तो म्हणजे त्यांना भटक्या पोरांची संगत लागेल व तीं बिघडल्यावांचून राहणार नाहींत. यांनाहि बापू मुलांच्या

शिक्षणाची कांहींहि काळजी घेत नाहींत म्हणून असंतोष वाटत होता. आपलीं बालकें कशींहि असोत, परंतु तीं मोठीं व्हावींत व त्यांनीं नांव काढावें अशी महत्त्वाकांक्षा प्रत्येक मातेला असणारच. त्यांतून हीं तर अतिशय चलाख व तेजस्वी बालकें होतीं, म्हणून बांची महत्त्वाकांक्षा सकारण होती. या सर्व तक्रारींविरुद्ध बापू आपले शिक्षणविषयक सिद्धांत व जीवनाच्या ध्येयाविषयींचें आपलें तत्त्वज्ञान पुढें करीत असत. मि. पोलाक व मि. कॅलनबॅक माना हालवीत आणि बा मन आवरून शांत होत.

बापूजींनीं आपल्या जीवनांत जें क्रांतिकारक परिवर्तन सन १९०४ पासून चालू केलें होतें तेंहि कदाचित् हरिलालभाईंना आवडलें नसावें. पण त्याची त्यांना फारशी पर्वा नव्हती. बापू धनसंग्रह करीत नाहींत याबद्दल दुःख वाटून घेण्यासारखे ते नव्हते. त्यांना कांहीं बापाच्या मिळ-कतीवर जगायचें नव्हतें. त्यांना शिकूनसवरून आपल्या स्वतःच्या मेहेनतीनेंच मोठें होण्याची हौस होती. अखेरीस त्यांनीं जेव्हां पाहिलें कीं बापूंच्याच ऑफिसांत क्लार्क म्हणून काम करणारे मि. रिच् व मि. पोलाक बापूंच्या मदतीनें व उत्तेजनानें इंग्लंडला जाऊन बॅरिस्टर होऊन आले, दुसरे दोन हिन्दी गृहस्थ मि. जोसेफ रॉयपन व मि. गॉड्फ्रे सुद्धां बापूंच्या प्रेरणेनें इंग्लंडला गेले व बॅरिस्टर होऊन आले व आपल्या धंद्याला लागले, आणि त्यानंतरहि सत्याग्रहाच्या लढ्यांत भाग घेतलेला एक पारशी युवक श्री. सोराबजी अडालजी याला बापूंनीं स्वतः बॅरिस्टर होण्यास इंग्लंडला पाठविलें — अशा कल्पनेनें कीं बापूंच्या गैरहजेरींत सोराबजी जनतेच्या सेवेचें काम अंगावर घेईल. पण दुर्दैवानें या होतकरू युवकाचें अकालीं अवसान झालें, — तेव्हां मात्र हरिलालभाईंच्यानें राहवलें नाहीं. या वेळीं त्यांचें वय वीस-एकवीस वर्षांचें होतें. दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रही लढ्यांत त्यांनीं चांगला भाग घेतला होता, व तीन वेळां तुरुंगांतहि जाऊन आले होते. त्यांना वाटे कीं ज्या इतर तरुणांना बापू बॅरिस्टर होऊं देतात किंवा होण्याला मदत करतात त्यांच्या इतकी योग्यता माझ्यांत नाहीं कीं काय? शेवटीं त्यांनीं बंड पुकारून पित्याचा त्याग केला व स्वदेशांत येऊन अभ्यास करण्याचा निश्चय केला. अर्थात बापू आपल्या विचाराच्या बाबतींत दृढ होते, परंतु आपल्या मुलाला हें समजावून सांगून आपण त्याला आपल्यापाशीं ठेवून

घेऊं शकलों नाहीं याचें दुःख, याविषयींचा अस्वस्थपणा त्यांना कांहीं कमी जाणवला नाहीं. या प्रसंगीं बांची काय दशा झाली असेल त्याची कल्पना करणेंहि कठिण आहे. बापूंपुढें निदान एका मोठ्या सिद्धांताचा प्रश्न होता, व मुलानें आपणाला सोडल्याचें दुःख सहन करण्यासाटीं सिद्धांतपालनाचें आश्वासनहि त्यांना होतें. पण बांजवळ काय होतें ? बांची तर मुलाला चालू शिक्षण मिळावें अशीच इच्छा होती. पण बापूंच्या सिद्धांता-मुळे असें शिक्षण मुलाला देण्याची कांहींहि व्यवस्था त्या करूं शकत नव्हत्या. पति व पुत्र या दोघांमध्यें त्यांचें हृदय कसें दुभंगून गेलें असेल ? केवढी तीव्र व्याकुळता बांना सहन करावी लागली असेल ?

हरिलालभाईनीं स्वदेशीं येऊन अभ्यास सुरू केला. बापूंनीं त्यांच्या खर्चाची सर्व व्यवस्था करून दिली. पण हरिलालभाई अभ्यास पुरा करूं शकले नाहींत. अभ्यास चालू असतांनाच काकाच्या व इतर नात्या-गोत्याच्या माणसांच्या सल्ल्यानें व मदतीनें त्यांनीं लग्न केलें. एकदोन वेळां मॅट्रिकमध्यें नापास झाल्यावर अभ्यास सोडला व धंदा सुरू केला. धंद्यांत चांगले यश मिळवलें. बापू फिनिक्स आश्रमांतील सोबत्यांना घेऊन स्वदेशीं परत आल्यानंतर त्यांनीं बापूंना एक पत्र लिहिलें. "माझे पिताजी, मि. एम्. के. गांधी, बार्-ॲट्-लॉ, यांना अनावृत पत्र" या नांवानें तें पत्र एक लहान पुस्तिकारूपानें त्यांनीं छापून काढलें. हें पत्र बहुतकरून वर्तमान-पत्रांत छापलें गेलें नाहीं. पण माझे वडील १९१७ त आश्रमांत शिरले व त्यानंतर हरिलालभाईकडूनच त्यांना तें वाचावयास मिळालें. त्या पत्राचा सारांश देतांना ते पुढील प्रमाणें लिहितात:

"त्या पत्रांतील लिहिण्याची शैली व त्यांतील युक्तिवाद वाचून हरि-लालभाईंच्या शक्तींविषयीं माझें उत्तम मत झालें होतें. बांना, तसेंच आपल्या लहान भावांना आणि स्वतःला बापूंच्या करवीं झालेल्या अन्यायाचें वर्णन करून हरिलालभाईनीं आपला रोष त्यांत ओतला आहे; व 'मला तुम्हीं शिकूं दिलें नाहीं तर नाहीं, पण अजूनतरी माझ्या भावांना शिकवा' अशी बापूंना त्यांनीं आग्रहपूर्वक विनंति केली आहे. व्रतांच्या बाबतींतील बापूंच्या हौसेमुळें आश्रमांत जे कोणी व्रतें करतील — अळणी खातील, एकभुक्त राहतील किंवा फलाहार करतील — ते बापूंचे कसे लाडके बनत, अशांना बापू एकदम ऋषि,

मुनि, तपस्वी अशीं किती मोठालीं विशेषणें लावीत, व ह्या तपस्व्यांना इतर सर्वांवर टीका करण्याचा कसा परवाना मिळत असे, याचें त्यांनीं गंमतीनें वर्णन केलें आहे. आश्रमजीवनाच्या नवीन आवेशांत कडक व्रतें व नियम पाळणारे व नंतर थोड्याच दिवसांत तीं सर्व व्रतें व नियम आणि आश्रमहि सोडून जाणारे लोक बांविषयीं टीका करीत-कीं, 'बा तर साखर फारच वापरतात' किंवा 'बांना कॉफी प्यायला पाहिजे असते' —ती ऐकून आपणाला किती संताप येत असे याचेंहि वर्णन त्यांनीं केलें आहे. शिवाय मणिलालभाई तसेंच रामदासभाई यांना अभ्यासाच्या वेळीं इतरांचीं कामें सांगण्यांत येतात व त्याबद्दल त्यांना जर कांहीं असंतोष वाटला तर बापू म्हणतात कीं: 'तुम्ही . . . ची चाकरी करतां हाच तुमचा उत्तम अभ्यास आहे. जो मनुष्य आपलें कर्तव्य करतो तो नेहमींच अभ्यास करीत असतो. तुम्ही म्हणतां कीं अभ्यास सोडावा लागतो. पण असें नाहींच मुळीं. तुम्ही सेवा करतांना अभ्यासच करीत असतां. अक्षर-ज्ञान काय मागाहूनहि मिळवितां येतें, पण सेवाचाकरी करायची संधि नंतर येईलच असें सांगतां येणार नाहीं.' असें कांहींतरी सांगून उगाच त्यांना चढवितां व त्यांना पुढील अभ्यास करूं देत नाहीं; आणि ती म्हण आहे ना कीं, 'नवरा मरो, नवरी मरो, पण भटाचें ताम्हन भरो,' त्याप्रमाणें 'कांहींहि होवो पण बापूंना राजी करा' अशा तऱ्हेनें आश्रमांत सर्व वागतात. इत्यादि गोष्टी लिहून आश्रमांत त्यांना जो दंभ म्हणून वाटला तोहि त्यांनीं उघडकीस आणला आहे.

"हें सबंध पत्र मी जवळजवळ २५ वर्षांपूर्वी एकदां वाचलें होतें. त्यांतील लक्षांत राहिलेली मुद्याची गोष्ट तुला लिहिली आहे. बाकीचें पत्र बरेंच लांबलचक आहे. अभ्यासकाळींच ते स्वतः कसे लग्न करून बसले, नंतर अभ्यास करूं शकले नाहींत याचें वर्णनहि त्या पत्रांत आहे."

बापूंनीं आपल्या मुलांना योग्य शिक्षण दिलें नाहीं अशा आक्षेपाविरुद्ध बापूंचें आत्मसमर्थन, तसेंच या बाबतींत त्यांची काय विचारसरणी होती ती, बापूंनीं आत्मकथेंत बरोबर दिलेलीं आहेत, म्हणून तीं येथें फिरून देण्याची गरज नाहीं. पण बांची विचारसरणी कांहीं बापूंसारखी नव्हती. त्यामुळें बांना मात्र ही एक मोठ्या दुःखाचीच गोष्ट झाली होती.

हें पत्र लिहिलें तेव्हां हरिलालभाई बहुतकरून कलकत्त्यांत कसल्या तरी व्यापारांत गुंतलेले होते. सन १९२० मध्यें त्यांच्या पत्नी सौ. गुलाब-बहेन मृत्यु पावेतों हरिलालभाईंचें जीवन थोडेंतरी बरें चाललें होतें. १९१९ च्या रौलट ॲक्ट सत्याग्रहांत सैनिक म्हणून त्यांनीं नांव दिलें होतें. पण गुलाबबहेन गेल्यानंतर हरिलालभाई कुमार्गाला लागले. त्यांना सुधारण्याचे बापूंनीं व बांनीं खूप प्रयत्न केले, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ते मुसलमान झाले, पुन्हां आर्यसमाजी झाले, ह्या सर्व गोष्टी जगाला माहीत आहेत. हरिलालभाईंचे दोन पुत्र (यांपैकीं एक मरण पावला आहे) व दोन मुली यांना बांनीं आपल्याजवळ ठेवून वाढवून आपल्या मनाचें समाधान करून घेतलें. तरीपण ते मुसलमान झाल्याचें जेव्हां बांनीं ऐकलें त्यावेळचें त्यांचें दुःख व वेदना वर्णन करणें अशक्य आहे. हरिलालभाईंना लिहिलेल्या त्यांच्या (पुढें दिलेल्या) पत्रांत तें थोडेसें व्यक्त होतें :

" चि. हरिलाल,

" माझ्या असें ऐकिवांत आलें आहे कीं, थोड्या दिवसांपूर्वी मद्रासमध्यें मध्यरात्रीं भर रस्त्यावर दारूच्या धुंदींत दंगामस्ती करण्याबद्दल पोलीसनें तुला पकडलें, व दुसरे दिवशीं मॅजिस्ट्रेटांच्या समोर उभें करण्यांत आलें, तेव्हां त्यांनीं तुला एक रुपया दंडाची सजा केली. तुझ्यावर एवढी मोटी दया दाखविली त्यावरून असें वाटतें कीं तीं फारच चांगलीं माणसें असलीं पाहिजेत. तुला एवढीशी नांवाला शिक्षा देण्यांत मॅजिस्ट्रेटांनींहि तुझ्या वडिलां-बद्दलचा आपला सद्भाव व्यक्त केला. परंतु या प्रसंगाची सविस्तर हकिकत ऐकल्यावर मला तर अतिशयच दुःख होत आहे. त्या रात्रीं तूं एकटा होतास कीं कुणा मित्रांच्या संगतींत होतास तें मला ठाऊक नाहीं, परंतु तुझें हें वर्तन मात्र खरोखर अतिशय अयोग्य असेंच होतें.

" तुला काय म्हणावें हेंच मला सुचत नाहीं. कित्येक वर्षांपासून मी तुला आपल्या वर्तनावर ताबा ठेवण्याची विनवणी करीत आलें आहे, पण तूं तर दिवसेंदिवस अधिकाधिक बिघडत चालला आहेस. आतां तर मला जिवंत राहणेंहि कठिण झालें आहे. तुझ्या आईबापांना त्यांच्या जीवन-संध्येच्या समयीं तूं किती दुःख देतो आहेस याचा जरा विचार कर.

" तुझे बापूजी कोणाजवळहि या बाबतींत मुळींसुद्धां बोलत नाहींत. परंतु तुझ्या वर्तनानें होणाऱ्या आघातांमुळें त्यांचें हृदय शतधा विदीर्ण होत आहे. आमच्या भावनेला असें वारंवार दुखविण्यांत तूं मोठें पाप करीत आहेस. आमच्या येथें पुत्र म्हणून जन्मून तूं दुश्मनासारखा वागत आहेस.

" माझ्या ऐकण्यांत आलें आहे कीं, अलीकडे अलीकडे तूं आपल्या वडिलांची अतिशय टीका व निंदा करूं लागला आहेस. तुझ्यासारख्या बुद्धिमान मुलाला हें शोभत नाहीं. तुझ्या बापूजींची निंदा करण्यांत तुझा तूंच उघडकीला येत आहेस, याचें तुला मुळींसुद्धां भान नाहीं. त्यांच्या हृदयांत तुझ्याविषयीं प्रेमावांचून दुसरें कांहींच नाहीं. चारित्र्याच्या शुद्धतेला ते अतिशय महत्त्व देतात हें तूं जाणतोसच. परंतु त्यांच्या सल्ल्याला तूं मुळींसुद्धां जुमानलें नाहींस. आणि असें असूनहि त्यांनीं तुला आपल्याजवळ ठेवण्याची, तुझें जेवणखाण व कपडेलत्ते करण्याची, व तुझी निगा राखण्याचीसुद्धां मागणी केली आहे. पण तूं मात्र नेहमींचा कृतघ्नच राहिला आहेस. या जगांत त्यांच्यावर कितीतरी जबाबदाऱ्या आहेत. याहून दुसरें कांही ते तुझ्यासाठीं करूं शकणार नाहींत. ते आपल्या या दुर्दैवाबद्दल फक्त शोकच करूं शकतील. परमेश्वरानें त्यांना प्रबळ इच्छाशक्ति दिलेली आहे. त्यांच्या जीवनांतील उमेद पूर्ण व्हायला ईश्वर त्यांना हवें तेवढें दीर्घायुष्य देवो. परंतु मी मात्र एक दुबळी वृद्ध स्त्री आहे, व तूं जी मानसिक व्यथा उत्पन्न करतो आहेस ती सहन करण्याला मी असमर्थ आहे.

" तुझ्या बापूजींना दररोज अनेक लोकांकडून तुझ्या वर्तनाविषयींच्या तक्रारींचीं पत्रें येतात. या सर्व बदनामीचे कडू घोट त्यांना पिऊन टाकावे लागत आहेत. परंतु मला मात्र कुठें जाण्यासारखें एकहि स्थळ तूं ठेवलें नाहींस. शरमेनें अर्धमेली झालेली मी मित्रांत किंवा अनोळखी लोकांमध्यें हिंडूंफिरूं शकत नाहीं. तुझे बापूजी तुला नेहमीं क्षमाच करीत आले आहेत. परंतु परमेश्वर तुझें हें वर्तन सहन करणार नाहीं.

" मद्रासमध्यें तर तूं कुणा अब्रूदार व प्रतिष्ठित व्यक्तीच्या घरीं पाहुणा म्हणून उतरला होतास. परंतु त्यांचें घर सोडून रस्त्यावर असलें गैरवर्तन करून त्यांच्या पाहुणचाराचा तूं दुरुपयोग केला आहेस. तूं आपल्या वर्तनानें त्यांना किती खालीं पाहावयास लावलें असशील !

"दररोज सकाळीं जागी होतांच हृदयांत अशी धडकी बसते कीं वर्तमानपत्रांत तुझ्या एकाद्या नवीनच दुर्वर्तनाची ताजी बातमी तर आली नसेल ना? मी बरेच वेळां विचार करतें कीं तूं कोठें असशील? कोठें निजत असशील? काय खात असशील? कदाचित तूं निषिद्ध पदार्थहि खात असशील. अशा तऱ्हेच्या विचारांनीं कितीक रात्रीं मला झोंपहि येत नाहीं. तुला भेटायचें किती तरी वेळां मनांत येतें पण तूं कुठें भेटशील तेंच मला माहीत नसतें. तूं माझा पहिला पोटचा गोळा आहेस व तुझें वय ५० वर्षांचें आहे. कदाचित् तूं माझाहि मानभंग करशील या शंकेनें तुझ्यापाशीं येण्याचीसुद्धां मला भीति वाटते.

"आपल्या वाडवडिलांचा धर्म तूं कोटल्या कारणानें सोडलास तें मला माहीत नाहीं. ती तुझी स्वतःची खाजगी बाब आहे. पण मी असें ऐकतें कीं तूं निर्दोष व अज्ञानी लोकांना आपल्या पावलांवर पाऊल टाकून चालण्याचा सल्ला देत असतोस. तुला स्वतःच्या मर्यादांची केव्हां जाणीव होणार? धर्माविषयीं तुझें ज्ञान तें केवढें? तुझ्या बापूजींच्या नांवामुळें लोकांची दिशाभूल होऊन ते आडमार्गाला लागतील. धर्मप्रचार करायला तूं लायक नाहींस. तूं पैशाचा गुलाम होऊन गेला आहेस. जे लोक तुला पैसे देतात ते तुला आवडतात. पण तूं तर दारूवरच पैसा उधळून टाकीत आहेस, व नंतर व्यासपीठावरून भाषणें करतोस. तूं आपला स्वतःचा व आपल्या आत्म्याचा घात करीत आहेस. तूं असेंच करीत राहिलास तर शेवटीं सर्वच तुझ्यापासून दूर पळतील. म्हणून शांतपणें विचार करून तूं आपला मूर्खपणा सोडून द्यावास म्हणून मी तुला विनंती करीत आहें. तुझें धर्मांतर मला आवडलें नव्हतें, तरीपण तुझें जीवन सुधारण्याविषयीं तूं जें निवेदन केलें होतेंस त्यामुळें मीं समाधान मानलें होतें; व यानंतर तूं आपलें आयुष्य स्थिरपणें घालवशील या विचारानें मनांतल्या मनांत राजी झालें होतें. पण माझी ही आशाहि धुळीस मिळाली आहे. थोड्या दिवसांपूर्वी मुंबईस तुझ्या कित्येक जुन्या मित्रांनीं व हितचिंतकांनीं तुला पहिल्यापेक्षांहि जास्त वाईट अवस्थेंत पाहिला होता. तूं जाणतोसच कीं तुझ्या वर्तनानें तुझ्या मुलाला किती दुःख होत आहे. आणखी तुझ्या या विचित्र वर्तनामुळें होणाऱ्या शोकाचा भार सहन करणें तुझ्या मुलीला व जांवयाला अधिकाधिक कठिण होत चाललें आहे."

हरिलालभाईच्या धर्मांतराविषयीं व नंतरच्या त्यांच्या हालचालींविषयीं कुतूहल दाखविणाऱ्या मुसलमान बंधूंना संबोधून बा लिहितात :

"तुमचें काम मी समजूंच शकत नाहीं. जे माझ्या मुलाच्या हल्लींच्या कार्य-प्रवृत्तींत सक्रिय भाग घेत आहेत त्यांना उद्देशूनच मी हें म्हणत आहे. ही गोष्ट मला माहीत आहे व तिचा विचार करतां आनंदहि होत आहे कीं, विचारशील मुस्लिम जनतेच्या फार मोठ्या भागानें व जन्मभर आमच्याशीं मित्रत्वाचें नातें असलेल्या मुस्लिम मित्रांनीं या सर्व घटनेबद्दल नापसंती दर्शविली आहे. आज त्या महापुरुष डॉक्टर अनसारींची फार मोठी उणीव भासत आहे. त्यांनीं माझ्या मुलाला व तुम्हालाहि फार उत्तम सल्ला दिला असता. परंतु असेच दुसरेहि पुष्कळ प्रतिष्ठित व दिलदार गृहस्थ आहेत व ते तुम्हाला योग्य सल्ला देतीलच, अशी मला आशा आहे. या मानीव धर्मांतरानें माझा मुलगा सुधारण्याऐवजीं उलट जास्त वाईट व्यसनांत पडला आहे. तुम्ही त्याच्या दुष्कृत्यांबद्दल त्याला ठपका दिला पाहिजे, व त्याला चांगल्या मार्गाला लावला पाहिजे. कित्येक लोकांची तर माझ्या मुलाला मौल्वी पदवी देण्यापर्यंत मजल गेली आहे! असें करणें वाजवी आहे काय? तुमचा धर्म काय दारुड्याला मौल्वी म्हणण्याची परवानगी देतो? मद्रास-मध्यें त्याच्या दंगेखोर वर्तनानंतरसुद्धां कित्येक मुसलमान लोक स्टेशनावर त्याला निरोप देऊन सन्मान करायला जमले होते!

"याप्रमाणें त्याला एवढें मोठें महत्त्व देण्यांत तुम्हाला काय आनंद वाटत असेल तें मला समजत नाहीं. जर तुम्ही त्याला आपला खरा भाई मानीत असतां तर तुम्ही अशा तऱ्हेनें वागला नसतां. कारण तुमचें वर्तन त्याला मुळींसुद्धां हितकारक नाहीं. तुमचा इरादा जर जगासमोर आमचें हंसें करायचाच असेल तर मला तुम्हाला कांहींहि सांगावयाचें नाहीं. तुम्ही तुमच्याकडून होईल तें करूं शकतां. मात्र एका घायाळ मातेचा दुबळा आवाज तुमच्यावर वजन असलेल्या कुणा लोकांच्या अंतःकरणाला जागृत करील व ते कदाचित् तुम्हाला समजावून सांगू शकतील. पण माझ्या मुलाला उद्देशून मी जें म्हटलेलें आहे तें पुन्हा तुम्हाला सांगणें माझें कर्तव्य आहे—कीं, तुम्ही जें करीत आहांत तें खुदाच्या नजरेला वाजवी वाटणार नाहीं."

बांना आपल्या मुलाविषयीं तळमळ वाटावी हें स्वाभाविक होतें. हरिलालभाईहि जरी बा-बापूंना सोडून निघून गेले तरी त्यांच्या हृदयांत बांविषयीं फारच मान व प्रेम होतें. त्यांना असें वाटत असे कीं, राजाची राणी होण्यासाठीं जन्मलेल्या बांना बापू नाहक एवढे कष्ट सोसायला लावीत आहेत. बांना भेटण्यासाठीं ते केव्हां केव्हां आश्रमांत येतहि असत. त्यांची स्थिति अगदीं खराब झाल्यावर, कदाचित्, आश्रमांत येण्याला त्यांना संकोच वाटत असावा. पण म्हणून कांहीं बांवरील प्रेम थोडेंच कमी होणार! अगदीं हलाखीच्या स्थितींत एकदां ते बांना भेटले असतां एक फार करुण प्रसंग घडला; त्यावरून त्यांचा बांविषयींचा प्रेमभाव स्पष्ट दिसून येतो.

एकदां बा व बापू आगगाडीनें प्रवास करीत होते. जबलपूर मेल कटणी स्टेशनावर आली तेव्हां इतर स्टेशनापेक्षां निराळाच जयजयकार ऐकूं आला— "माता कस्तूरबाकी जय." बांना त्यामुळें जरा आश्चर्य वाटलें. त्यांनीं खिडकींतून तोंड बाहेर काढलें तों समोरच हरिलालभाई उभे होते.

एक वेळचें भरदार शरीर आज अगदीं ढांसळून गेलें होतें. पुढले सगळे दांत पडून गेलेले होते. कपडे अगदीं फाटलेले. खिडकीजवळ येऊन लगेच त्यांनीं खिशांतून एक मोसंबें काढलें: "बा, हें तुमच्यासाठीं आणलें आहे."

बा यावर उत्तर देण्याच्या आधींच बापूजी खिडकीजवळ येऊन पोंचले. त्यांनीं विचारलें: "माझ्यासाठीं कांहीं नाहीं आणलें?"

हरिलालभाईंनीं म्हटलें: "नाहीं, हें बांसाठींच आणलें आहे. तुम्हांला मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, या बांच्या प्रभावानेंच तुम्ही एवढे मोठे झालां आहांत."

"यांत तर कांहीं शंकाच नाहीं. पण आतां तुला आमच्याबरोबर यायचेंय?"

"नाहीं, मी फक्त बांला भेटायला आलों होतों."

बापू परत आपल्या जागेवर जाऊन बसले. मायलेकांचा संवाद पुढें चालू झाला.

"घे, बा, हें मोसंबें."

"कोठून आणलेंस?"

"वाटेल तेथून आणलें असेल. तुझ्यासाठीं मी प्रेमानें आणलें आहे. भीक मागून आणलें आहे."

बांनीं मोसंबें आपल्या हातांत घेतलें. पण तरीहि हरिलालभाईना पूर्ण संतोष वाटला नाहीं. त्यांनीं म्हटलें :

"बा, हें मोसंबें तूंच खाल्लें पाहिजे. तूं खाणार नसशील तर तें मला परत देऊन टाक."

"आण, आण, तें मोसंबें मीच खाईन." कांहीं वेळ त्यांच्या-कडे निरखून पाहून बांनीं म्हटलें: "पहा तर खरी तुझी ही हालहवाल! तूं कोणाचा मुलगा आहेस याचा तरी विचार कर! चल ना आमच्याबरोबर."

पण हें शेवटचें बोलणें थांबविणें त्यांना चांगलेंच जमलें होतें. "त्याविषयीं बोलूंहि नकोस. माझ्याच्यानें या स्थितींतून वर येतां येणार नाहीं."

बांचे डोळे भरून आले. गार्डाची शिटी वाजली. गाडी चालू झाली. शेवटीं शेवटीं हरिलालभाईनीं परत म्हटलें "बा, तूंच मोसंबें खा हां!"

गाडी थोडी पुढें गेली तेव्हां बांच्या लक्षांत आलें कीं आपण तर त्याला कांहींच दिलें नाहीं. "अरे बिचाऱ्याला कांहीं फळेंहि दिलीं नाहींत! उपाशी मरत असेल. अजून पाहूं या कांहीं उपाय आहे का तें."

करंडयांतून फळें काढून बाहेर पाहिलें तों गाडी प्लॅटफॉर्म सोडून पुढें आली होती.

दुरून एक क्षीण आवाज ऐकूं आला :

"माता कस्तूरबाकी जय!"

## १९

## सार्वजनिक क्षेत्रांत

दक्षिण आफ्रिकेंत असतां तुरुंगांत जाण्यापलीकडे तेथील सार्वजनिक कार्यांत बांनीं भाग घेतला असेलसें दिसत नाहीं. पण हिन्दुस्थानांत आल्यावर मात्र बापूजींनीं जीं जीं कार्यें अंगावर घेतलीं त्या सर्वांत बांनीं एखाद्या कसलेल्या सैनिकाला शोभेल अशा तऱ्हेनें भाग घेतला आहे. बांना जाहीर सभा, मिरवणुका किंवा असले देखावे यांची बिलकुल आवड

नव्हती. पण जेथें विधायक काम करायचें असेल, आपल्या उपस्थितीनें व सहानुभूतीनें लोकांस उत्तेजन व धीर द्यावयाचा असेल, अशा ठिकाणीं तीं तीं कामें करण्यास बा तत्पर राहिल्या आहेत.

* * *

## चंपारण्यांत

बापूंनीं हिन्दुस्थानांत आल्यावर पहिला सत्याग्रहाचा लढा सुरू केला तो चंपारण्यांत. त्यांत सविनय कायदेभंग केल्याबरोबरच विजय मिळाला असें म्हणतां येईल. पण बापूजींना वाटलें कीं, चम्पारण्यांत चांगलें काम करावयाचें असेल तर खेडेगांवांमध्यें कित्येक सेवकांनीं कायमचें ठाणें दिलें पाहिजे व त्यांच्या सुखदु:खांत भाग घेऊन लोकांना शिक्षण दिलें पाहिजे. बिहारसारख्या गरीब प्रांतांत पगारी सेवक ठेवणें परवडणार नाहीं; व वाटेल तसल्या सेवकांकडून तें काम होण्यासारखें नाहीं. गांवच्या लोकांजवळ पैसा नव्हता. पण ज्या गांवचे लोक राहण्याची जागा व कचा शिधा देण्याची सोय करीत असतील तेथें सेवकांची व्यवस्था करण्याचें बापूजींनीं ठरविलें. या कामासाठीं बापूंनीं स्वयंसेवकांची जाहीर रीतीनें मागणी केली. महाराष्ट्र व गुजरातमधून सुसंस्कृत व कुशल सेवक मिळूं शकले; व बापूंनीं आश्रमांतूनहि कांहीं बायकापुरुषांना बोलावून नेलें. गुजरातमधून गेलेल्या स्त्रियांना जें कांहीं ज्ञान होतें तें गुजरातीचेंच काय तें थोडें बहुत होतें. मुलांना त्या हिन्दी कशा शिकविणार ? बापूंनीं बायकांना समजावून सांगितलें कीं, त्यांना व्याकरण नव्हे तर सभ्यतेचें जीवन शिकवावयाचें आहे; लिहिण्या-वांचण्यापेक्षां त्यांना स्वच्छतेचे नियम शिकवावयाचे आहेत. आलेल्या बायकापुरुषांच्या दोनदोन तीनतीन जणांच्या तुकड्या पाडल्या व त्यांना खेडेगांवांमधून ठेवलें. भीतिहरवा नांवाच्या गांवांत एका लहान मंदिरांतील बुवाच्या मदतीनें मंदिरखात्याच्या धर्मादायांतील थोड्याशा जमिनींत झोंपडें उभें करून एक शाळा सुरू करण्यांत आली होती. तेथें बा व दुसरे दोन गृहस्थ राहूं लागले.

या शाळेंत कमींत कमी सोयी होत्या. या प्रदेशांतील हवाहि चांगली नाहीं; व हिमालयाच्या पायथ्याच्या फार जवळ असल्यामुळें तेथें हिंवाळ्यांत थंडी खूप पडत असे. राहण्याच्या झोंपडीवर पिंजलेला कापूस पसरला आहे

कीं काय असें वाटण्याइतकें दंव सकाळीं जमलेलें दिसून येत असे. या शारीरिक गैरसोयींव्यतिरिक्त, तेथील जवळच्या कोठीचा साहेब सगळ्या निळीच्या मळेवाल्यांमध्यें अत्यंत वाईट समजला जाई. म्हणूनच बापूंनीं बांना तेथें ठेवलें होतें. बा गांवांत फिरण्याचें व औषधें देण्याचें काम करीत, तें या नीलवराला सहन झालें नाहीं. "मि. गांधी अनवाणी हिंडून, कपड्यांलत्त्यांत साधेपणा ठेवून, लोकांत अंधश्रद्धा उत्पन्न करून तिचा लाभ घेऊं पाहतात. एवढेंच नव्हे तर ते जेव्हां इतर राजकीय चळवळी करण्यासाठीं बाहेर जातात तेव्हां मिसेस गांधी येथें लोकांत खळबळ उडविण्याचें आपल्या पतीचें काम चालू ठेवतात." अशा तऱ्हेच्या न शोभणाऱ्या टीका या मळेवाल्यानें वर्तमानपत्रांतून केल्या.

राजकीय गोष्टींपासून अगदीं अलिप्त, केवळ भूतदयेच्या प्रेरणेनेंच रोग्यांना औषध देण्याचें काम करणाऱ्या, खेडेगांवची भाषाहि बोलूं न शकणाऱ्या व हिंदुस्थानीसुद्धां मोडकें तोडकें बोलतां येतें अशा, तसेंच वर्तमानपत्रांत इंग्रजींतून करण्यांत आलेल्या आक्षेपांविषयीं कुणी गुजरातींतून समजावून सांगितल्यावांचून ज्यांना कांहीं समजणें शक्य नाहीं इतक्या थोडया शिकलेल्या बा या मिजासखोर मळेवाल्यांना लोकांत क्षोभ उत्पन्न करणाऱ्या आहेत असें वाटलें!

एकदां बा व त्यांचे सोबती खेडेगांवांत फिरावयास गेले होते; तेथून येऊन पाहतात तों राहण्याची व शाळा भरविण्याची अशा दोन्ही झोंपड्या जळून खाक झालेल्या. राखाडीवांचून तिथें नांवालासुद्धां कांहीं उरलें नव्हतें. कामांत विघ्न उत्पन्न करण्याच्या हेतूनें कुणा द्वेषी माणसानें आग लावली होती यांत शंका नव्हती. बा व त्यांचे सोबती श्री. सोमण यांचा तर असा आग्रह होता कीं, शाळा एकहि दिवस बंद राहतां कामा नये. सर्व रात्र जागून पुन: कळक व गवत यांची एक झोंपडी उभी केली. नंतर तेथें पक्की इमारत बांधण्यांत आली; व ती अजून कायम आहे.

भीतिहरवाजवळच एक लहान गांव आहे. बापूजी फिरत फिरत त्या गांवीं गेले. तेथें कित्येक स्त्रियांचे कपडे अतिशय मळके दिसले. बापूजींनीं त्या बायकांना कपडे धुण्याविषयीं समजावून सांगण्यास बांना सुचविलें. बायकांजवळ बोलणें काढलें. त्यापैकीं एक बाई बांना आपल्या झोंपडींत

घेऊन गेली व म्हणाली : "तुम्हीच पाहा, येथें कांहीं पेटी-कपाट नाहीं कीं त्यांत कपडे ठेवलेले असतील. माझ्याजवळ मीं नेसल्यें आहे तेवढीच साडी आहे. ती मीं कशी धुवावी ? महात्माजींना सांगा कीं कपडे देण्याची व्यवस्था करा म्हणजे मी रोज अंग धुवायला व रोज कपडे बदलायला तयार आहें."

बांनीं बापूंना सर्व हकिकत सांगितली. हिन्दमातेची ही अवस्था पाहून बापूंचें हृदय कळवळून आलें.

* * *

## खेडा सत्याग्रह

चंपारण्याचे काम चालूच होतें; इतक्यांत खेडा जिल्ह्यांत सत्याग्रह सुरू झाला. त्यावेळीं बासुद्धां बापूंबरोबर खेडा जिल्ह्यांतील गांवांतून फिरत होत्या. केव्हां बापूंबरोबर राहत, तर कधीं एकट्या फिरत.

खेडा जिल्ह्यांतील तोरणा गांवीं मामलेदारानें एकदम हल्ला करून तेवीस घरीं जप्त्या केल्या व त्यानें स्त्रियांचे दागिने, हंडे, घागरी, दुभत्या म्हशी वगैरे वस्तु जप्तींत घेतल्या. याची बातमी बांना लागतांक्षणीं त्या तोरणा गांवांतील लोकांना दुःखाच्या वेळीं धीर देण्यासाठीं धांवल्या. त्यांच्या आगमनानें लोकांच्या आनंदाला सीमा राहिली नाहीं, व स्त्रियांनीं तर खरोखरच फुलांचा वर्षाव केला. तेथील स्त्रियांच्या सभेंत लढ्याचें मर्म व धर्म समजावून सांगतांना बांनीं एक ल्हानसें पण परिणामकारक भाषण केलें :

"आपल्या पुरुषमंडळींनीं सत्यासाठीं सरकारबरोबर जो लढा सुरू केला आहे त्यांत आपण त्यांना प्रोत्साहन दिलें पाहिजे. सरकार जें दुःख देईल तें सहन करावें. आपली मालमत्ता घेऊन जाऊं लागलें तर नेऊं द्यावी. आपली जमीन हिसकावून घेतली तर घेऊं द्यावी. पण सरकारला एक पैसाहि देऊन खोटें ठरूं नये. कारण रयत जर सरकारला म्हणते आहे कीं धान्य पिकलें नाहीं, तर सरकारनें तें मान्य केलें पाहिजे. तरीहि तें मानीत नाहीं व दुःख देत आहे, तेव्हां आपण दुःख सोसावें; पण आपल्या प्रतिज्ञे-पासून ढळूं नये. सरकारी नोकरांना डरूं नये, पण हिंमत ठेवावी; व आपल्या भावांना, पतींना व मुलांना धीर द्यावा."

बांच्या या साध्या पण उत्साहदायक आणि प्रेरक शब्दांनीं लोकांना उत्साह वाटला व कित्येक बहादूर स्त्रियांनीं त्यांना वचन दिलें कीं,

"जर तुम्हीं आमच्यासाठीं एवढालीं दुःखें सहन करतां, तर मग आम्ही कशाला डरावें ? आम्ही हिंमत बाळगूं व सरकारला पैसे देऊं देणार नाहीं."

*　　　*　　　*

## स्वराज्याच्या पहिल्या लढ्यांत

१९२२ सालीं बापूंजींना पकडण्यांत येऊन ६ वर्षांची शिक्षा करण्यांत आली. ही शिक्षा ऐकून सर्व देश हळहळला. त्यावेळचा बांचा संदेश एका वीरांगनेला शोभेल असाच आहे :

"माझ्या पतींना आज ६ वर्षांची सजा झाली आहे. या कडक शिक्षेमुळें मी थोडीशी अस्थिर-बेचैन-झालें आहे, हें मला कबूल केलें पाहिजे. पण आपण मनांत आणलें तर शिक्षेची मुदत संपण्यापूर्वींच आपण त्यांना जेलमधून सोडवून आणूं शकूं.

"या कामीं यश मिळविणें ही आपल्या हातची गोष्ट आहे. जर आपणाला अपयश मिळालें तर त्यांत आपलाच दोष असेल; व म्हणूनच मी माझ्या दुःखांत समदुःखी असणाऱ्या व माझ्या पतीबद्दल प्रेम बाळगणाऱ्या सर्व स्त्री-पुरुषांना विधायक कार्यक्रमांत रात्रंदिवस गढून जाऊन तो यशस्वी करण्याची विनंती करीत आहें. रचनात्मक कार्यक्रमांत चरखा फिरविणें व खादी तयार करणें हें काम मुख्य आहे. गांधीजींना झालेल्या शिक्षेचें प्रत्युत्तर आपण या प्रकारें देऊं या :

(१) सर्व स्त्री-पुरुषांनीं परदेशी कापड वापरणें सोडून द्यावें व स्वतः खादी वापरून इतरांना तसें करण्यास समजावून सांगावें.

(२) सर्व स्त्री-पुरुषांनीं कांतणें हें स्वतःचें धार्मिक कर्तव्य मानावें व इतरांना तसें करण्यास समजावून सांगावें.

(३) सर्व व्यापाऱ्यांनीं परदेशी कापडाचा व्यापार बंद करावा."

बांच्या खऱ्याखुऱ्या अंतःकरणापासूनच्या या संदेशाचा लोकांवर फारच चांगला परिणाम झाला. ठिकठिकाणीं परदेशी कापडाच्या होळ्या

पेटूं लागल्या. सूतरहाटांचा गुंजारव सुरू झाला व कित्येक लोकांनीं शुद्ध खादी वापरणें सुरू केलें.

बापूंना साबरमतीहून येरवड्यास घेऊन गेले. बांना फार दुःख झालेंच पण त्यांनीं स्वस्थता ढळूं दिली नाहीं. अशा प्रसंगीं बांचें खरें तेज चमकत असे. नेहमींच्या कमी बोलक्या अन् स्वैंपाकघरांतील काम संभाळणाऱ्या बा तरुणांना लाज वाटावी अशा उत्साहानें सार्वजनिक कामासाठीं बाहेर पडल्या. "आतां मला आश्रमांत चैन पडत नाहीं. आतां माझ्यानें बापूंचें काम जेवढें होईल तेवढें मी केलें पाहिजे. बापू कार्यकर्त्यांना खेडेगांवीं व रानी-परजवस्तींत जाऊन राहण्याचा आदेश देऊन गेले आहेत. तेव्हां मलाहि खेडेगांवीं घेऊन चला," असें बा म्हणत. स्व. दयाळजीभाईंच्या आईबरोबर (गुजरात) विद्यापीठाच्या निधीसाठीं सुरत जिल्ह्यांत तसेंच नंदुरबारपर्यंत बा फिरल्या; व बारडोलींत सूत कांतण्याच्या कार्याला जोर आणून देण्यासाठीं गांवों-गांवीं बा बैलगाडींतून फिरल्या. स्वराज्य-पक्षाची स्थापना झाली व बापूंच्या विधायक कार्यावरची भलभल्यांची श्रद्धा डगमगूं लागली होती, अशा वेळीं बा अनन्य निष्ठेनें व दृढतेनें बापूंच्या कार्यक्रमावर विश्वास ठेवीत व मोजक्या वाक्यांत लोकांना प्रेरणा देत :

"उत्साहाचा जोर वाढत असतो तेव्हां सर्वजण साथीला असतात. पण उत्साह मावळला असतां टिकतात ते खरे. दक्षिण आफ्रिकेंतहि अशीच निराशा पसरली होती, पण स्त्रिया व खाणींतील मजूर उठले आणि जय झाला. तशीच माझी खात्री आहे कीं, अखेरीस सत्याचाच जय व्हावयाचा आहे."

बांचे हे शब्द ढंगदार वक्त्याच्या भाषणापेक्षां जास्त खोल परिणाम करीत. याच सुमारास बांनीं सोनगढ तालुक्यांतील जंगलामध्यें डोसवाड्यांत रानीपरज लोकांच्या दुसऱ्या परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें व हजारों रानीपरजांना दारू सोडून सूतरहाटावर कांतण्यास व भजन करावयास लाविलें.

* * *

## दांडीकूच आणि धरासणाच्या-'३० च्या लढ्यांत

या लढ्यांत बांनीं केलेल्या कामगिरीचें वर्णन श्री. मीठुबहेन पिटिट यांच्या शब्दांतच दिलें आहे :

१९३० मध्यें दांडीकूचच्या वेळीं बायकांनीं बापूंना विचारलें कीं आतां आम्हीं काय करावें? तेव्हां बापूंनीं म्हटलें :

'तुमच्यासाठीं मीं सुंदर काम शोधून ठेवून दिलें आहे. स्त्रियांनीं जेलमध्यें जायचें नाहीं; पण विदेशी कापडाचा बहिष्कार व मद्यपाननिषेधाचें काम करावयाचें आहे; आणि जरूर वाटल्यास त्यासाठीं निरोधन-पिकेटिंग-सुद्धां करावयाचें आहे.'

६ एप्रिलला दांडीचा मीठ सत्याग्रह झाल्यावर बापूंनीं जी सभा भरविली तींत या गोष्टीवर खास भार दिला होता. नवसारीजवळ वीजलपूर येथें स्त्रियांची खास परिषद् भरविली. परिषदेंत चार ते पांच हजार स्त्रिया हजर होत्या. अमदाबाद व मुंबईहूनहि पुढारी स्त्रिया आल्या होत्या. त्या परिषदेंत बापूंच्या सल्ल्यावरून 'स्त्री स्वराज्य संघा' ची स्थापना करण्यांत आली आणि विदेशी कापडाचा बहिष्कार तसेंच मद्यपाननिषेध यांसाठीं सुरत शहरांत व जिल्ह्यांत शिबिरें सुरू करण्याची रूपरेषा आंखण्यांत आली. स्त्रियांना मदत करण्यासाठीं गुजरातचे प्रसिद्ध पुढारी डॉक्टर सुमन्त महेता यांची निवड करून बापूंनीं त्यांना म्हटलें : 'तुम्हीं स्त्रियांचें नेतृत्व घेऊं नये; नेतृत्व बा व मीठुबहेनच करतील. तुम्ही मात्र मुनीम म्हणूनच मदत करा.'

मीठुबहेनला यामुळें संकोच वाटला व त्या बापूंना म्हणाल्या कीं, तुम्ही आमच्या शक्तीचें प्रमाणाबाहेर मूल्यमापन करीत आहां. पण बापूंनीं आपलें म्हणणें सोडलें नाहीं; कारण बांची तत्त्वनिष्ठा व कार्यशक्ति यांचा त्यांना चांगला परिचय होता. बांच्या व्यक्तित्वानें आकर्षित होऊन छावणींत शेंकडों स्त्रियांची भरती झाली. सुरत शहरांत मागसल्या गणल्या गेलेल्या जातींतूनहि शेंकडों स्त्रिया आपल्या आयुष्यांत पहिल्यांदाच बाहेर पडल्या. त्या सर्वांना हिंमत व प्रेरणा बांपासूनच मिळाली. 'बा कुठें इंग्रजी शिकल्या आहेत? त्या हें काम करूं शकतात, मग आम्हाला त्यांच्या साथीला कां उभ्या राहतां येणार नाहीं?' बांच्या जीवनावरून त्यांना आत्मश्रद्धा उत्पन्न झाली. परिणाम असा झाला कीं अट्टल दारूबाज मानलेल्या सुरत जिल्ह्यांतील दारू-ताडीच्या गुत्यांसमोर चिमणी सुद्धां फिरकत नाहींशी झाली. सरकारला नीतिनियम बाजूला सारून दारू-ताडीची फेरी करून विक्री करूं द्यावी लागली. खेडेगांवांमधूनहि

अजूनपर्यंत सभ्यपणा बाळगून राहिलेल्या सरकारनें स्त्रियांना छावणीसाठीं कोणी घर देऊं नये अशी तजवीज केली. पण स्त्रिया डगमगल्या नाहींत. मांडव बांधून त्यांत त्यांनीं शिबिरें सुरू केलीं. मांडव जाळण्यांत येऊं लागले व भांडींकुंडीं जप्त होऊं लागलीं; तेव्हां बा म्हणाल्या, 'आपण चटयांच्या झोंपड्या अन् मातीचीं भांडींच ठेवूं. मग काय घेऊन जाणार आहेत ?'

बा छावणींत असतांनाच बापू पकडले गेल्याची बातमी आली. ही बातमी ऐकून त्यांनीं जनतेला स्वदेशभक्तीनें भरलेला असा संदेश दिला :

"आज पहाटे ४ वाजतां मी प्रार्थना करीत होतें तेव्हांच मला बापूंचें चिंतन घडलें. रात्रीं आमच्या छावणीच्या बाजूनें मोटारींची धांवपळ बरीच ऐकूं येत होती. तेव्हां मनांत शंका आली होतीच. प्रार्थनेनंतर लगेच नवसारी शिबिरामधून बातमी आली कीं गांधीजींना मध्यरात्रीं घेऊन गेले.

"सकाळीं कराडी शिबिरांत मी जाऊन आलें. आश्रमवासीयांना भेटलें. त्यांच्याकडून ऐकलें कीं, दोन मोटारी भरून हत्यारबंद शिपायी बरोबर घेऊन अंमलदार आले होते. गांधीजींभोंवती शिपायांचा वेढा पडला व कांहीं वेळ तर कोणा आश्रमवासीयालाहि त्यांच्याजवळ जाऊं दिलें नाहीं. कराडी गांवच्या लोकांना समजतांच ते धांवून आले. पण असें म्हणतात कीं शिपायांनीं त्यांना आंत जाऊं दिलें नाहीं. या सर्व गोष्टी ऐकून मला फार वाईट वाटलें. सरकारच्या वेडेपणाबद्दल मला हंसूं आलें. गांधीजींना पकडायला काय मध्यरात्रीं धाड घालायला पाहिजे ? त्यांना पकडायला एवढें लष्करविष्कर कशाला ?

"आतां गांधीजी तर गेले. त्यांना इतक्या उशीरा नेलें हीच सरकारची मेहेरबानी. या पांच आठवड्यांत त्यांनीं आपणाला सांगावयाचें तेवढें सांगून टाकलें आहे. आपला मार्ग बरोबर आंखून दिला आहे. पुरुषांना व स्त्रियांना आपापलें काम दाखवून दिलें आहे. गांधीजींनीं सोंपविलेलें काम पार पाडणें हाच आतां आपला धर्म आहे.

"या घटनेमुळे देशांत कोठेंहि अशांतता न होवो अशी मी ईश्वरापाशीं प्रार्थना करतें. लोकांनाहि प्रार्थना करतें कीं आपली भक्ति व आपली भावना यायोगें कोणी वेडे बनूं नका, परंतु जिवावर उदार होऊन अधिक आवेशानें लढा चालू ठेवा.

"सरकारी नोकरी करणाऱ्या बंधूनो, तुम्हीहि आतां कोठवर नोकरीला चिकटून रहाणार? शिपायी आपल्या देशबांधवांवर लाठ्या चालवितात व गोळ्या घालतात, हें त्यांच्यानें करवतें तरी कसें? बंधूहो, हिंमत दाखवा. भगवान कुणालाहि उपाशी ठेवणार नाहीं. निर्दोष अन् देशभक्तीनें उसळणाऱ्या बालकांना मारावें व मग घरीं जाऊन डोळ्यांतून पाणी काढावें, अशानें काय होणार? परमेश्वराचें नांव घेऊन हिंमत करा आणि नोकऱ्या सोडून द्या.

"याहून निराळा संदेश आज मी काय देणार? परमात्मा आपणा सर्वांना शक्ति देवो."

बापूजी पकडले गेल्यावर गुजरातमधील देशसेवक धरासणाला निघाले. सरकारनें त्यांच्याविरुद्ध अतिशय क्रूरपणा दाखविला. लाठी चालविली, खालीं पाडून वरून घोडे चालविले. तोंडांत बोळे देऊन खाऱ्या पाण्यांत बुडविलें. कांट्यांच्या व तारेच्या कुंपणांत फेंकून दिले. करतां येईल तेवढा क्रूरपणा निःशस्त्र सैनिकांवर केला. बांना याची बातमी कळली. त्या तेथें गेल्या. तेथील दृश्य पाहून त्यांचें हृदय कळवळलें. त्यांनीं वर्तमानपत्राच्या प्रतिनिधीला मुलाखत देतांना जें वर्णन केलें आहे त्यावरून आपणाला त्यांच्या दुःखाची कांहींशी कल्पना येईल.

"घायाळ झालेल्या सैनिकांना पाहावयास व त्यांना धीर द्यावयास मी बलसाडच्या इस्पितळांत गेलें. बिछान्यावर पडलेल्या त्या सैनिकांच्या मलमपट्ट्या व पट्टे यांचा करुण देखावा पाहून माझें हृदय जखमी झालें— रडूं लागलें. पोलीसांनीं त्यांच्यावर जे जुलूम केले ते ऐकून अंगावर शहारे आले. मला एवढें सांगितलेंच पाहिजे कीं, मला जरी दुःख झालें, तरी एवढ्या जबर वेदना सहन कराव्या लागल्या असतांहि त्या तरुणांनीं जी देशभक्ति, शौर्य व उत्साह दाखविला होता तो पाहून माझें हृदय आनंदानें उचंबळून आलें. सत्यास्तव केलेल्या असल्या बलिदानाचें उदाहरण इतिहासांत तरी एकट्या हरिश्चंद्राचेंच सांपडेल.

"चारी बाजूंनीं असल्या जुलुमांच्या कहाण्या कानीं येतच आहेत. अशा वेळीं सर्वजण एकमेकांला साह्य व साथ देतील तरच आपल्या कार्याला

सुयश मिळेल. इतके सगळे डॉक्टर अन् स्त्रिया आजाऱ्यांची सेवा करीत आहेत हें पाहून मला फारच आनंद झाला.

"मला आशा आहे कीं, माझे जे देशबांधव धरासणाची करुण कहाणी ऐकतील ते व्हाइसरॉयच्या नव्या काळ्या कायद्यांना विरोध करण्यासाठीं दुप्पट उत्साहानें कर न भरण्याची चळवळ हातीं घेतील; त्याचप्रमाणें दारूनिषेध व परदेशी कापडावरील बहिष्काराचें कार्य चालू ठेवतील."

हा लढा चालू असतां बीजलपुरांत भरलेल्या जलालपूर तालुका परिषदेचें अध्यक्षस्थान बांनीं स्वीकारलें होतें. तींत भाषण करतांना बांनीं म्हटलें होतें कीं :

"आपल्या देशाच्या इतिहासांतील एका आणीबाणीच्या प्रसंगीं आज आपण येथें एकत्र जमलों आहोंत. आतां आपणाजवळ लांबलचक भाषणें करायला वेळ नाहीं म्हणून आजच्या परिषदेचें अध्यक्षस्थान दिल्याबद्दल मी आपले थोडक्यांत आभार मानून घेतें. यावेळीं मला आपणाला एकच गोष्ट सांगावयाची आहे. ती ही कीं, आपापसांतील भांडणतंटे विसरून जा. सर्वजण या प्रसंगीं एक व्हा. एकाच्या घरीं जप्ती झाली तर सर्वांच्या घरीं झाली असें समजा. कोणी जप्त केलेला माल घेऊं नका.

"या लढ्यांत स्त्रियांनीं मनांत आणलें तर त्या पुरुषांना खूप मदत करूं शकतील. दारू–ताडी आणि परदेशी वस्तूंच्या निषेधाचें काम तर स्त्रियांनींच करावयाचें आहे. धीर द्यावयाच्या वेळीं स्त्रिया पुरुषांना धीर देतीलच; पण यदाकदाचित् स्वार्थाला वश होऊन कोणी गृहस्थ सरकारला मदत करावयास निघाला तर त्याला स्त्रियांनीं सावध करावें व जरूर वाटल्यास अशा गृहस्थाबरोबर असहकारहि करावा.

"स्त्रियांना जेवढी उमज असते तेवढी पुरुषांना नसते. कारण स्त्रियांना दुःखाची भाषा अधिक कळते. धरासणाच्या अत्याचारांनीं स्त्रियांचीं हृदयें चिरलीं गेलीं आहेत. जेव्हां जेव्हां देशहिताविरुद्ध कुठलीहि हालचाल सुरू होईल तेव्हां तेव्हां धरासणाचें स्मरण करा.

"याहून जास्त मी काय सांगूं? परमेश्वर तुम्हांला मीं सुचविलेला निश्चय करण्याचें व तो कृतींत उतरविण्याचें सामर्थ्य देवो आणि तुम्हा सर्वांचें कल्याण करो."

ह्या लढ्याच्या काळांत धांवपळ करावी लागल्यामुळें बांची तब्येत ढांसळली. बा मिठुबहेनसह मरोली गांवीं राहत होत्या. एक दिवस सकाळची प्रार्थना पुरी होऊन सर्वजण न्याहारीला बसले होते. इतक्यांत टपालवाला येऊन तार देऊन गेला. सगळे तारेंतील मजकूर जाणण्यास उतावळे झाले होते.

तार होती : "आम्हाला कस्तूरबांच्या मदतीची जरूर आहे."

या लहानशा संदेशानें सर्वांस क्षुब्ध केलें. बांना तारेचें मर्म कळून चुकलें व त्या न्याहारी बाजूस सारून घाईघाईनें जाण्याची तयारी करूं लागल्या.

ही तार बोरसदहून आली होती. बोरसदच्या बहाद्दर शेतकऱ्यांनीं देशासाठीं आपलें वतन, घरेंदारें, गुरेंढोरें, सर्व कांहीं सोडून हिजरत केली होती. सरकारला धारा न भरल्यामुळें त्यांना तुरुंगवास व मारपीट सहन करावी लागली होती. खेडूतांच्या उदरनिर्वाहाचें एकमेव साधन जी जमीन तिचेंहि लिलांव होऊन गेलें होतें.

धारा न भरण्याचा सल्ला देणाऱ्या कित्येक स्त्रियांवर सरकारनें लाठी चालविली होती. गांवांत हाहाकार उडाला होता. अनेक स्त्रिया जखमी होऊन हॉस्पिटलमध्यें पडल्या होत्या. या बायकांनीं गांवकऱ्यांना धीर देण्यासाठीं बांना तार करून बोलाविलें होतें.

"बा, तुम्ही हें काय करीत आहांत?" मीठुबहेन बांची घाई पाहून घाबरून गेल्या, व यामुळें बांची तब्येत जास्त बिघडेल अशा चिंतेनें म्हणाल्या, "तुमच्यांत कुठें ताकद उरली आहे? रक्ताचा लेशहि नाहीं. म्हणून तर डॉक्टरांनीं तुम्हांला विश्रांति घेण्यास सांगितलें. तुमच्या वतीनें मी बोरसदला जातें. तुम्ही इथें राहा."

"पोलीसांचा लाठीमार शूरपणानें सहन करणाऱ्या भगिनींच्याजवळ मला उभें राहिलेंच पाहिजे. बापू असते तर आतां त्यांच्याजवळच असते, पण आज ते मोकळे नाहींत," कांबळें व इतर जरूरीच्या वस्तु पिशवींत घालीत बांनीं उत्तर दिलें, आणि लगबगीनें बोरसदची गाडी पकडण्यासाठीं रवाना झाल्या.

बोरसदला पोंचल्यावर बांनीं हॉस्पिटलांत जखमी होऊन पडलेल्या स्त्रियांना प्रोत्साहन दिलें. एवढेंच नव्हे तर गांवाला घेरून बसलेली भीति आणि त्रास हीं दूर केलीं. स्वतःची तब्येत अशक्त असूनहि त्याची पर्वा न करतां सकाळपासून रात्र पडेपर्यंत पायावर खड्या राहून काम करणें बांनीं सुरू केलें.

बांची तब्येत ढांसळली. नडियादहून डॉक्टर आले. त्यांनीं बांना तपासलें. विश्रांतीची अनिवार्य आवश्यकता आहे असें सांगितलें व सावध-गिरीची अशी सूचना दिली कीं, "आमचें म्हणणें ऐकलें नाहीं तर तब्येत अधिकच बिघडेल अन् वाईट परिणाम होईल."

"पण मला कांहींहि वाटत नाहीं. मी बापूंच्या पावलावर पाऊल टाकीत चालण्याखेरीज दुसरें कांहींच काम करीत नाहीं. बापूंच्या गैरहजेरींत काम करण्याची मला ही संधि मिळाली आहे. विश्रांति घेण्याचें माझ्याच्यानें होणार नाहीं."

डॉक्टर निराश झाले; व बांनीं एका सत्याग्रहीला साजेल अशा तऱ्हेनें आपलें कार्य पुढें चालूच ठेवलें.

*    *    *

'३२ व '३३ सालीं बांचा बराच काळ जेलमध्येंच गेला. '३२ सालीं सौ. लाभुबहेन महेतांना बांच्या स्वभावाची जी ओळख झाली त्यासंबंधीं त्या लिहितात :

"हें कोण आलें ? एवढ्या लहान कोंवळ्या बालकांना पकडून आणतांना सरकारला लाज नाहीं वाटत ? मला पाहून त्यांचें कोमल दिल कळवळलें. दुसरे दिवशीं त्यांना समजलें कीं मी कांहीं खात नाहीं, मला तेथलें सुकें कोरडें खाणें घशाखालीं जात नसे. लगेच मला बोलावलें. आणि त्यांच्या 'बी' वर्गाच्या आहारांमधून मला बळेंच खाऊं घातलें व उप-देशाचे दोन शब्द सांगितले. 'जर अशी उपाशी राहशील तर तुरुंगवास सहन कसा करशील ? सहन करायला आलीस तर मग सहन केलेंच पाहिजे ना ?' मला सगळें समजत होतेंच म्हणा, पण मन खंबीर करण्यास दोन तीन दिवस लागले; व नंतर आहाराची संवय झाली. दरम्यान त्यांची सहानुभूति लाभली. तुरुंगांत जी कोणी स्त्री आजारी असेल, कमकुवत मनाची असेल,

सुखसोयींत वाढलेली असेल, तिला नेहमीं बांचा आसरा मिळे. बांच्या सहानुभूतीमुळें जेल सहन करणें सोपें जाई. जेलमध्यें आम्ही जवळ-जवळ ऐंशी स्त्रिया एकत्र होतों, पण कुणाला कधीं कसलीहि अडचण पडली नाहीं. एकट्या आहोंत, येथें आमचें कोणी नाहीं, असें कधीं वाटत नसे. त्यांच्या कुटुंबांतच राहत असल्यासारखी त्या सर्वांची काळजी घेत. सर्वांवर सारखें प्रेम व सर्वांची सारखीच काळजी—ही त्यांच्या स्वभावाची विशिष्टता होती."

* * *

राजकोटमध्यें सत्याग्रह सुरू झाला तेव्हां 'तें तर आपलें मूळ गांव-वतन'—असें म्हणून बा तेथें बापूंच्याहि पूर्वीं जाऊन पोंचल्या होत्या. तेथील त्यांच्या हालांचें वर्णन सुशीलाबहेननें फार सरस केलें आहे. तें तेथेंच वाचून पाहावें अशी विनंती आहे. पण बापूजींनीं स्वतः 'गांधीजी' नांवाच्या ग्रंथांत बाविषयीं लिहितांना त्यासंबंधीं जी जास्त माहिती दिली आहे ती येथें देणें अवश्य आहे :

"राजकोटच्या लढ्यांत बांनीं जो भाग घेतला त्याविषयीं कांहीं लिहूं नये असा माझा इरादा होता. पण या लढ्यांत शिरल्यामुळें तिच्यावर बरीचशी निष्ठुर टीका झालेली आहे, म्हणून त्याबद्दल खुलासा करणें अवश्य आहे. बानें लढ्यांत शिरावें असें माझ्या मनाला कधीं सुचलेंहि नव्हतें. त्याचें मुख्य कारण हें होतें कीं असले कष्ट सहन करायला ती फार वृद्ध म्हटली पाहिजे. पण टीकाकारांना कितीहि विचित्र वाटलें तरी त्यांनीं माझ्या या सांगण्यावर विश्वास ठेवला पाहिजे कीं, बा निरक्षर असली तरी तिला कित्येक वर्षांपासून स्वतःला जें करावयाचें असेल तें करण्याला पूर्ण मोकळीक होती. दक्षिण आफ्रिकेंत किंवा हिंदुस्थानांत जेव्हां जेव्हां ती लढ्यांत शिरली तेव्हां तेव्हां ती आपण होऊन आपल्या आंतरिक तळमळीमुळेंच त्यांत शिरली. या वेळींहि असेंच झालें होतें. मणिबहेन पकडल्याची बातमी ऐकून तिच्याच्यानें राहवलें नाहीं, व लढ्यांत शिरण्यास तिनें माझी परवानगी मागितली. मीं म्हटलें कीं तूं सध्या फारच अशक्त आहेस; दिल्लींत थोड्याच दिवसांपूर्वीं तुला न्हाणीघरांत मूर्छा आली होती, व देवदासनें समयसूचकता दाखविली नसती तर तूं देवाघरींच जाऊन पोहोचली असतीस. पण बानें

उत्तर दिलें कीं, ' शरीराची मला पर्वा नाहीं. ' तेव्हां मी सरदारांना विचारलें. तेहि संमति देण्यास बिलकुल तयार नव्हते.

" पण नंतर त्यांचेंहि मन द्रवलें. रेसिडेन्टच्या सूचनेवरून ठाकोर साहेबांनीं वचनभंग केल्यामुळें मला झालेल्या क्लेशाचे ते साक्षीदार होते. कस्तूरबाई राजकोटची कन्यका म्हटली जाणार. म्हणून तिला अंतरंगांतील हांक ऐकूं आली. राजकोटच्या कन्या, आपल्या संस्थानांतील पुरुष व स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठीं झगडत असतां मला स्वस्थ बसतां येणार नाहीं, असें तिला वाटलें.

" तिच्यांतील एक गुण फारच मोठा होता. प्रत्येक हिन्दु पत्नींत कमी अधिक प्रमाणांत तो असतोच. स्वतःला पसंत असो किंवा नसो अथवा कळो किंवा न कळो, पण माझ्या पावलावर पाऊल टाकीत चालण्यांत तिला धन्यता वाटे.

" बा एक अतिशय आग्रही स्वभावाची बाई होती. लहानपणीं मी त्याला हट्टीपणा समजत असे. पण या आग्रही स्वभावानें अगदीं नकळत अहिंसक असहकाराची कला व कृति यांबाबत तिला माझी गुरु बनविली. पूर्वीं अनेक वेळां कारावास अनुभवला असूनहि यावेळचा (१९४२–४४) कारावास, या वेळीं शारीरिक सुखसोयींची कांहीं कमतरता नसूनही तिला मुळींसुद्धां रुचला नव्हता. माझ्या स्वतःच्या व त्याबरोबरच इतर अनेकांच्या झालेल्या धरपकडीमुळें व नंतर लगेच करण्यांत आलेल्या तिच्या स्वतःच्या धरपकडीमुळें तिला जबर आघात बसला होता, व तिच्यांत अतिशय कडवटपणा आला. माझ्या धरपकडीसाठीं तिची मुळींच तयारी नव्हती. मी तिला खात्री दिली होती कीं, सरकारचा माझ्या अहिंसेवर विश्वास आहे व मी स्वतः पकडून घेण्याची तजवीज करणार नाहीं तोंवर ते मला पकडणार नाहींत. हा धक्का एवढा जबर होता कीं पकडल्यानंतर तिला भारी जुलाब होऊं लागले; आणि डॉ. सुशीला नय्यरनें — हिला तिच्याबरोबरच पकडलें होतें — जर त्या परिस्थितींत शक्य ती शुश्रूषा केली नसती तर अटकबंदीच्या छावणींत आमची भेट होण्यापूर्वींच ती मरण पावली असती. तेथें माझ्या सहवासामुळें तिला बराच आराम व शांतता मिळाली व कोणत्याहि औषधावांचून तिचे जुलाब थांबले; पण हृदयाला व्यापून राहिलेली कटुतेची भावना नाहीशी झाली नाहीं. त्यांतून संताप व चीड

उत्पन्न झाली, आणि त्यामुळें फारच हळू हळू कष्ट सहन करीत करीत तिनें देह सोडला. अशा तीव्र वेदनांतून तिची सुटका व्हावी या इच्छेनें, तिच्या साठींच तिच्या देहाचा लवकर अंत व्हावा असें जरी मला फार वाटे, तरी आज तिची उणीव माझ्या कल्पनेपेक्षां जास्त माझ्या अनुभवाला येत आहे. आम्ही सामान्य दंपतींहून निराळ्या प्रकारचे दंपती होतों. आमचें जीवन संतोषी, सुखी आणि सदा ऊर्ध्वगामी होतें. ”

या चालू लढ्यांत बा पकडल्या गेल्या तेव्हांपासूनची आगाखान महालांतील सगळी हकीकत सुशीलाबहेन यांनीं दिली आहे, म्हणून त्याची पुनरुक्ति येथें केली नाहीं.

बांच्या या सर्व सार्वजनिक कार्यांवरून स्पष्ट दिसून येतें कीं, अशीं कार्यें करण्यासाठीं किंवा लोकसेवा करण्यासाठीं खरी आवश्यकता विद्वत्तेची नाहीं, पण जनतेवरील प्रेम, आणि मुख्य वस्तु काय करण्यासारखी आहे याविषयींची साधी अन् सरळ उमज, यांची आहे. बांना गुजरातींत किंवा हिंदींत भाषण करतांना त्यांच्या अक्षरज्ञानाचा अभाव कधींहि नडला नाहीं. उलट त्या सर्व कांहीं सरळ सांगून टाकीत असल्यामुळें त्यांचें भाषण अधिक परिणामकारक होत असे. बर त्यांचीं कांहीं पत्रकें – वक्तव्यें दिलीं आहेत. पण अशा पत्रकांपेक्षां बा जेव्हां तोंडीं भाषण करीत तेव्हां त्याचा परिणाम जास्त होई.

## २०
# निरोप

आपला मृत्यु आतां जवळ येऊन ठेपला आहे याची पूर्वसूचना बांना बऱ्याच काळ आधींपासून झाली होती. '४२ च्या जानेवारींतील गोष्ट आहे. त्यावेळीं बापू व बा कांहीं काळ बारडोलीस राहिले होते. तेथून मीठुबहेननां भेटावयास व थोडे दिवस त्यांच्या संगतींत घालवावयास बा मरोली आश्र-मांत गेल्या. पण तेथें तापानें पछाडल्या गेल्या. कित्येक वर्षांपासून बांचें हृदय कमकुवत होऊं लागलेंच होतें, त्यामुळें खूप अशक्तपणा आला. बांना बापूजी वर्ध्यास निघण्याची तारीख माहीत होती, म्हणून इतक्या अशक्त असूनहि बा बारडोलीस आल्या. बापूंना कळलें कीं बा मरोलीहून आजारी

पडून येत आहे. बापूंना हें ठाऊक होतेंच कीं त्या प्रथम आपल्यालाच भेटायला येणार. तेव्हां माडीवर चढून येण्याचे श्रम बांना न व्हावेत म्हणून बा आल्याचें कळतांच ते घाईघाईनें खालीं आले. मोटारींतून बांना त्यांनीं स्वतःच हात धरून उतरून घेतलें, व बाजूला सरदारांची खोली होती तींत खाटे-वर निजविलें व थोडा वेळ त्यांच्याजवळ बसून मग वर गेले. बा जशा बापूंच्या सेवेंत तत्पर असत, तसे बापूहि बांची फार काळजी घेत. जेव्हां केव्हां बा बाहेरगांवीं जायच्या असतील किंवा बाहेरून येणार असतील तेव्हां हव्या तेवढ्या जरूरीच्या कामांत असले तरीसुद्धां बांना पोंचविण्यास किंवा घेण्यास आश्रमाच्या फाटकापर्यंत जावयाचेंच असा बापूंचा नियम होता.

इतकें सर्व झालें, व बा स्वस्थपणें निजल्या. नंतर सरदार कल्याणजी-भाईंना सांगूं लागले, "बांना अशा स्थितींत येथें कशाला घेऊन आलांत ? तेथेंच ठेवून घ्यायच्या होत्या ना ?"

कल्याणजीभाई म्हणाले कीं, "आम्ही आग्रह करण्यांत कांहीं कमी केलें असेल काय ? पण बा गप्प बसतील तर ना ? त्या सारख्या म्हणत राहिल्या कीं, 'आगगाड्या आतां बंद होणार आहेत अन् बापूजी सेवाग्रामाला निघून गेले तर माझी इतक्या वर्षांनंतर आतां त्यांच्यापासून ताटातूट होणार ना ? मी आतां कुठें फारशी जगणार आहें ? बापूंच्या मांडीवर मरण यावें एवढेंच आतां मला हवें आहे.'"

आणि बांची ही इच्छा खरोखरच पुरी झाली.

'४२ च्या ऑगस्टमध्यें अ. भा. कॉंग्रेस समितीच्या बैठकीसाठीं बापू मुंबईस गेले तेव्हां बादेखील बरोबर होत्या. वर्धा स्टेशनावर पोंचवायला गेलेल्या कित्येक आश्रमवासीयांनीं बांना म्हटलें, 'बा, लवकर परत या,' तेव्हांचे बांचे उद्गार असे होते : "हो बाबा, तुमच्या सर्वांच्या आशी-र्वादानें परत येतां आलें तर जरूर आनंद होईल." असे उद्गार परत येण्याविषयींच्या निराशेनेंच बांच्या तोंडून निघाले होते.

आणि आगाखान महालांत महादेवकाका मरण पावल्यावर तर बा हरघडी असे उद्गार काढीत कीं, "मला जायचें होतें अन् महादेव कसा गेला ?" बापूंच्या उपवासाचे वेळीं आम्ही सर्व आगाखान महालांत बापूंच्या दर्शनासाठीं तीनदां गेलों होतों. आम्ही जेव्हां परत निघत असूं

तेव्हां बा म्हणत, 'जिवंत असेन तर परत भेट होईल.' बापूंचा उपवास पुरा झाल्यावर आम्ही बाहेर निघालों तेव्हां बा माझ्या आईला व आश्र-मांतील इतर बायकांना म्हणाल्या : "ही आपली शेवटची भेट आहे. मी येथून बाहेर निघावयाची नाहीं." आश्रमांतील भगिनींच्या प्रार्थनेंतील पहिला श्लोक पुढीलप्रमाणें आहे :

गोविन्द द्वारकावासिन् कृष्ण गोपीजन-प्रिय ।
कौरवैः परिभूतां मां किं न जानासि केशव ॥

तो म्हणून बा म्हणाल्या, "आतां तो कृष्ण भगवान् या कौरवांनीं घेरलेल्या आपल्या देशाकडे पाहील तर बरें." आणखी मग जेलमधील सर्वांना आठवून आठवून म्हणत कीं : "आम्हा दोघांना खुशाल जेलमध्यें ठेवोत, पण बाकी सगळ्यांची सुटका होवो."

आगाखान महालांतील इतर सर्व गोष्टी, बापूंच्या उपवासाच्या वेळची बांची मनःस्थिति, व बांची परिचर्या, वगैरे संबंधीं सर्व सुशीलाबहेन यांनीं आपल्या प्रकरणांत सुंदर तऱ्हेनें सांगितलें आहे. मी स्वतः तेथें पाहिलेली एकच गोष्ट येथें देणार आहे. बापूंच्या खाटेसमोर भिंतीवर 'हे राम' हे शब्द लिहिलेले होते. बरोबर त्यांच्याखालीं तुळशीची एक कुंडी होती. सकाळीं न्हाणेंधुणें झाल्यावर बा तुलसीमातेचें पूजन करीत आणि वांकवांकून नमन करीत. बापू पडल्यापडल्या श्रद्धापूर्ण आणि प्रेम ओसंडणाऱ्या डोळ्यांनीं बांकडे पाहत असत. किती भव्य तें दृश्य ! ! बापूंचा उपवास निर्विघ्नपणें पूर्ण झाला त्याच्यामागें बांच्या अंतरंगाच्या खोल भागांतून निघालेल्या प्रार्थनांचा केवढा मोठा भाग असेल ? सावित्री सत्यवानाला मृत्यूच्या जबड्यांतून परत आणण्यासाठीं यमराजाबरोबर एकदां झगडली, पण बापूंना वांचवि-ण्यासाठीं बांना यमराजाबरोबर कितीतरी वेळां झुंजावें लागलें आहे. बापूंचा प्रत्येक उपवास बापूंपेक्षां बांनाच अधिक कठिण तपश्चर्येसारखा होता. बापूंचें फक्त शरीर सुकून जाई, पण बांचें अंतःकरणहि जळून जाई. पण भगवान् आपल्या भक्तांना सुखरूप ठेवून वांचवितो याबद्दलची बांची श्रद्धा अढळ होती. त्यामुळेंच बापूंच्या उपवासाचे वेळीं भेटायला गेलेल्या आश्रमवासीयांना बा म्हणत, "तुम्ही चिंता करूं नका. मी बापूंच्या अगोदर जावयाची आहें. बापू नक्की उठणार. पण मी येथून जिवंत बाहेर

पडावयाची नाहीं. हें महादेवाचें मंदिर आहे. महादेव गेला त्याच मार्गानें मीहि जाईन."

* * *

बांच्या अंतकाळाचीं व अग्निसंस्काराचीं वर्णनें बरींच आलीं आहेत. येथें मी त्यावेळीं तिथें हजर असलेल्या एका बाईचें आश्रमांत आलेलें पत्रच देत आहें :

"अंतसमयीं बांचे डोळे एकदम उघडले आणि त्यांनीं बापूजींना बोलाविलें. जयसुखलालभाई जवळ होते. त्यांनीं बापूंना सांगितलें कीं, बा बोलावीत आहेत. बापू हंसत हंसत आले व म्हणाले : 'काय बा, तुला असें वाटत असेल कीं सगळीं नात्यागोत्याचीं माणसें आलीं तेव्हां बापूंनीं मला सोडलें. घे, हा आलों मी.' बापूजींनीं बांना मांडी दिली. बापूंकडे पाहून बा बोलूं लागल्या : 'मी आतां जातें. आपण पुष्कळ सुखें भोगलीं, दुःखेंहि भोगलीं. मी गेल्यावर रडूं नका. मी गेल्यानंतर पक्वान्नें खायचीं.' असें बोलतां बोलतां बांचा प्राण बापूंच्या मांडीवरच निघून गेला. बापू पाहत होते. बांचा प्राण गेल्यावर बापूंनीं आपलें मस्तक बांवर टेकलें व डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. देवदासभाई बांचे पाय पकडून 'बा बा' म्हणून आरडूं लागले, बापूजींचा चष्मा जयसुखलालभाईंनीं काढून घेतला. बापू लगेच स्वस्थ झाले. त्यांनीं देवदासभाईंना मांडीवर घेऊन स्वस्थ केलें. पू. बांजवळ रामनामाचा गजर चालला. नंतर बापू, मनू, प्रभावती व सुशीला या सर्वांनीं मिळून बांच्या मृतदेहाला स्नान घातलें, शरीर पुसून काढलें, व बापूंनीं कातलेल्या सुताच्या साडीनें बांना गुंडाळलें. कपाळावर कुंकूं लावलें. हातांत व गळ्यांत बापूंनीं कांतलेलें सूत घातलें. चौरंडा लिंपून त्यावर रांगोळी घातली आणि बांना त्यावर निजविलें. संध्याकाळीं साडेसातला प्राणोत्क्रमण झालें. रात्रीं १२ पर्यंत प्रार्थना व गीतापारायण झालें. देवदासभाई, मनू व संतोकबहेन यांशिवाय सर्व बाहेर आले. अग्निसंस्काराच्या वेळीं बाहेरच्या बऱ्याच जणांना आंत जायची परवानगी मिळाली. बांचा चेहरा फारच तेजस्वी होता व शांत निद्रेंत निजल्याप्रमाणें भासत होता. दहनासंबंधीचे विधि करण्यासाठीं एका ब्राह्मण भटजींना बोलावून आणलें होतें. प्राथमिक विधि पुरे झाले व मृत देहाला चितेवर ठेवण्यांत आलें. तेव्हां बापूंनीं लहानशी

मराठी ६८२६

प्रार्थना करण्याचें सुचविलें. गीता, कुरान आणि बायबलमधील पाठ म्हटले गेले. आश्रमवासीयांनीं एक भजन म्हटलें. डॉ. गिल्डरनी झरथ्रुस्ती धर्माची प्रार्थना म्हटली. मीरांबहेननीं एक इंग्रजी भजन गायिलें.

"मृत देहावर चंदनकाष्ठें रचण्यांत आलीं व तुपाचें सिंचन केलें गेलें. तेव्हां बापू धीम्या पावलांनीं देवदासभाईपाशीं गेले व म्हणाले : 'देवा, महादेवाचे अंतिम संस्कार मी केले, आतां बांचे अंतिम संस्कार तूं कर.' नंतर देवदासभाईंनीं हातांत अग्नि घेऊन बांच्या मृतदेहाला तीन प्रदक्षिणा घातल्या व 'गोविन्द, गोविन्द, गोविन्द' असें मोठ्यानें उच्चारीत मृत-देहावर अग्नि ठेवला. चिता भडकली.

"एवढा सर्व वेळ बापूजी फार स्वस्थ राहिले होते. पण देवदास-भाईंचें दुःख त्यांना पाहवत नव्हतें. बापूंनीं म्हटलें कीं, 'त्याची आठवण झाली कीं मलाहि धीर धरवत नाहीं.' सायंकाळीं पांच वाजेपर्यंत आम्ही सर्व तेथें होतों. पू. बापूंनीं माझ्याबरोबर पुष्कळ गप्पागोष्टी केल्या. सगळ्यांची विचारपूस केली. रामदासभाई अग्निसंस्कार पूर्ण झाल्यावर येऊन पोचले. रामदास-भाई व देवदासभाई यांना पू. बापूंबरोबर तीन दिवस राहायची परवानगी मिळाली आहे. महादेवभाईंच्या समाधीपाशीं बांची समाधीहि होईल."

महादेवभाईंच्या समाधीवर बापूंनीं स्वतः शंखांनीं 'ॐ' काढला आहे. बांच्या समाधीवरहि बापूंनींच 'हे राम' असे शब्द शंखांनीं काढले आहेत.

श्रीमती सरोजिनीदेवींच्या अंजलीनें या प्रसंगकथेची समाप्ति करूं या :

"हिंदी स्त्रीत्वाच्या जिवंत प्रतीकासारख्या या नाजूक असूनहि बहाद्दर नारीच्या आत्म्याला चिरशांति प्राप्त होवो. ज्या महापुरुषावर त्यांचें प्रेम होतें, ज्यांची सेवा करीत होत्या व अतुल श्रद्धा, धैर्य व भक्तिपूर्वक ज्याला अनुसरीत होत्या, त्यांच्यासाठीं सर्वकाळ त्याग करीत राहण्याचा जो मार्ग त्यांनीं स्वीकारला होता त्या मार्गाचा अवलंब करतांना एक क्षणहि त्यांचें पाऊल डगमगलें नाहीं कीं त्यांचें हृदय कचरलें नाहीं. मृतत्वांतून त्या अमृतत्वांत गेल्या व आपल्या गाथांमधील, आपल्या गीतां-तील व आपल्या इतिहासामधील वीरांगनांच्या मंडलांमध्यें आपलें हक्काचें स्थान प्राप्त करून घेतलें, याबद्दल आपण आनंद मानूं या."

# परिशिष्ट

[ बापूंच्या बांना लिहिलेल्या पत्रांतील कांहीं नमुने ]

१

( राजकोट सत्याग्रहाच्या वेळचे )

सेगांव, ८–२–’३९

बा,

तूं चांगली तावून निघत आहेस. जी कांहीं गैरसोय होईल ती मला कळवावीच. तूं दुःख सहन करायला जन्मली आहेस. तेव्हां तुझ्या गैरसोयींबद्दल मला आश्चर्य वाटत नाहीं. मी राजकोटला तार केलीच आहे. तुझ्या गैरसोयींविषयीं वृत्तपत्रांत कांहींच द्यावयाचें नाहीं. परमेश्वर तिथें तुमच्यापाशीं बसलेलाच आहे. त्याला जें करायचें असेल तें तो करील. कहानम मजेंत आहे. रात्रीं तुझी आठवण काढतो खरा परंतु त्याची काळजी करूं नकोस. अमतुल सलाम येथें आहे. ती कहानमला सांभाळते.

बापूचे आशीर्वाद

चि. मणि, तूं तेथें आहेस हें किती चांगलें आहे !

२

सेगांव, ९–२–’३९

बा,

तुझें पत्र मिळालें. तूं आजारी असतेस हें नाहीं आवडत. पण आतां धीरानें राहा. सुखसोयी मिळतील. पण नाहीं मिळाल्या तरी काय मोठें ? मणि चांगली गाऊं शकत नसली तरी रामायण वाचून दाखवील. राम सीतेच्या दुःखांपुढें आपल्या दुःखांचा काय पाड ? तूं घाबरूं नको. सध्या तरी मुलींकडून सेवा करून घ्यायचें सोडलें आहे. तूं काळजी करूं नकोस. काय करायला हवें तें पाहीन. सुशीला मात्र सेवा करीतच असते.

बापूचे आशीर्वाद

३

सेगांव, १०–२–’३९

बा,

तुला रोज टपाल रवाना झालेलें आहे. तेथें पत्र मिळत नाहीं त्याला काय करावें ! माझी चिन्ता करावयाचें कारण नसावें. पण चिन्ताजनक तब्येत झाली

तरीहि मी तुझ्याकडून अशा उत्तराची आशा बाळगतों कीं, "वियोगांत त्यांचें मरण लिहिलें असेल तर येईलच. पण मी तर जेथें माझीं मुलें पिळलीं जात आहेत तेथें बसलें आहे. मला जेलमध्यें टाकल्यास याहून खुष होईन. ठाकोरसाहेबांकडून वचन पाळविण्यासाटीं तुम्ही सर्व मदत करा, त्या कामीं माझा उपयोग करा, नाहींतर राजकोट येथेंच माझें मरण व्हावें अशी परमेश्वराला माझी प्रार्थना आहे." तूं आपण होऊन स्वतःच्या खास इच्छेनें गेली आहेस, तेव्हां तुझ्या हृदयांत हे उद्‌गार उमटत असतील तर काढ. तुझ्या मनांत हाच विचार ठेव. तूं रोज लिहितेस कीं, मुलींकडून सेवा करून घ्या. पण त्या आतां मोकळ्या झाल्या आहेत. सुशीला मालीश करते तेंहि सोडायचेंच आहे ना? पण माझ्या अशा तब्येतीमुळें तें अजून सोडूं शकलों नाहीं. माझी चिंता या बाबतींतहि करूं नये. मला टिकविणारा शेवटीं तरी ईश्वरच आहे ना?

बापूचे आशीर्वाद

८

बा,

तुला गेल्या वेळीं प्रवचन लिहिलें आहे. त्याची नक्कल पाठव. तुझें पत्र आज मिळालें. हें पत्र मौनवारीं लिहीत आहे. मणिलालची चिन्ता करूं नको. त्याला तुझें पत्र पाठवितों. परागजींनीं सांगितलें त्यावरून घाबरून जायचें कांहीं कारण नाहीं. दोघेहि अनुभवी आहेत. चूक झाली असेल तर सुधारून घेतील. 'जामे जमशेद'ची व्यवस्था केलीच आहे. मथुरादासनीं लिहिल्यावरून झाली आहे. तेव्हां मीं कांहीं अधिक केलें नाहीं. आतां मिळत असेलच. पुन्हा तपास करतों. रामायण व भागवत यांबद्दल तजवीज करतों. प्रेमलीलाबहेनजवळून मागविण्यांत मुलींहि संकोच करूं नकोस. तुला मागवायचें तरी काय असणार? जें थोडें कांहीं पाहिजे असेल तें त्या मोठ्या प्रेमानें पाठवितील. मात्र ज्याची तांतडीनें जरूर नसेल तें माझ्याकडून मागविलेंस म्हणजे बस झालें. मी तजवीज करीन. दांत वापरूं शकतेस? लाल पाण्याच्या गुळण्या करतेस? दूधाभाईच्या लक्ष्मीलाहि ६ वा महिना लागला आहे, असें पत्र मारुतीचें आजच आलें. ही सर्व हकिकत ऐकून मला दुःख किंवा आश्चर्य वाटत नाहीं, वाटायचें कारण नाहीं. लग्नाचा हा परिणाम सर्वांच्याच बाबतींत घडून येतो. त्यांत दुःख कसलें न् आश्चर्य कसलें? रामदासालाहि

## परिशिष्ट

[ बापूंच्या बांना लिहिलेल्या पत्रांतील कांहीं नमुने ]

१

( राजकोट सत्याग्रहाच्या वेळचे )

सेगांव, ८–२–'३९

बा,

तूं चांगली तावून निघत आहेस. जी कांहीं गैरसोय होईल ती मला कळवावीच. तूं दुःख सहन करायला जन्मली आहेस. तेव्हां तुझ्या गैरसोयींबद्दल मला आश्चर्य वाटत नाहीं. मी राजकोटला तार केलीच आहे. तुझ्या गैरसोयींविषयीं वृत्तपत्रांत कांहींच द्यावयाचें नाहीं. परमेश्वर तिथें तुमच्यापाशीं बसलेलाच आहे. त्याला जें करायचें असेल तें तो करील. कहानम मजेंत आहे. रात्रीं तुझी आठवण काढतो खरा परंतु त्याची काळजी करूं नकोस. अमतुल सलाम येथें आहे. ती कहानमला सांभाळते.

बापूचे आशीर्वाद

चि. मणि, तूं तेथें आहेस हें किती चांगलें आहे !

२

सेगांव, ९–२–'३९

बा,

तुझें पत्र मिळालें. तूं आजारी असतेस हें नाहीं आवडत. पण आतां धीरानें राहा. सुखसोयी मिळतील. पण नाहीं मिळाल्या तरी काय मोठें ? मणि चांगली गाऊं शकत नसली तरी रामायण वाचून दाखवील. राम सीतेच्या दुःखांपुढें आपल्या दुःखांचा काय पाड ? तूं घाबरूं नको. सध्या तरी मुलींकडून सेवा करून घ्यायचें सोडलें आहे. तूं काळजी करूं नकोस. काय करायला हवें तें पाहीन. सुशीला मात्र सेवा करीतच असते.

बापूचे आशीर्वाद

३

सेगांव, १०–२–'३९

बा,

तुला रोज टपाल रवाना झालेलं आहे. तेथें पत्र मिळत नाहीं त्याला काय करावें ? माझी चिन्ता करावयाचें कारण नसावें. पण चिन्ताजनक तब्येत झाली

तरीहि मी तुझ्याकडून अशा उत्तराची आशा बाळगतों कीं, "वियोगांत त्यांचें मरण लिहिलें असेल तर येईलच. पण मी तर जेथें माझीं मुलें पिळलीं जात आहेत तेथें बसलें आहे. मला जेलमध्यें टाकल्यास याहून खुष होईन. टाकोरसाहेबांकडून वचन पाळविण्यासाटीं तुम्ही सर्व मदत करा, त्या कामीं माझा उपयोग करा, नाहींतर राजकोट येथेंच माझें मरण व्हावें अशी परमेश्वराला माझी प्रार्थना आहे." तूं आपण होऊन स्वतःच्या खास इच्छेनें गेली आहेस, तेव्हां तुझ्या हृदयांत हे उद्गार उमटत असतील तर काढ. तुझ्या मनांत हाच विचार ठेव. तूं रोज लिहितेस कीं, मुलींकडून सेवा करून घ्या. पण त्या आतां मोकळ्या झाल्या आहेत. सुशीला मालीश करते तेंहि सोडायचेंच आहे ना ? पण माझ्या अशा तब्येतीमुळें तें अजून सोडूं शकलों नाहीं. माझी चिंता या बाबतींतहि करूं नये. मला टिकविणारा शेवटीं तरी ईश्वरच आहे ना ?

बापूचे आशीर्वाद

८

बा,

तुला गेल्या वेळीं प्रवचन लिहिलें आहे. त्याची नक्कल पाठव. तुझें पत्र आज मिळालें. हें पत्र मौनवारीं लिहीत आहे. मणिलालची चिन्ता करूं नको. त्याला तुझें पत्र पाठवितों. परागजींनीं सांगितलें त्यावरून घाबरून जायचें कांहीं कारण नाहीं. दोघेहि अनुभवी आहेत. चूक झाली असेल तर सुधारून घेतील. 'जामे जमशेद'ची व्यवस्था केलीच आहे. मथुरादासनीं लिहिल्यावरून झाली आहे. तेव्हां मीं कांहीं अधिक केलें नाहीं. आतां मिळत असेलच. पुन्हा तपास करतों. रामायण व भागवत यांबद्दल तजवीज करतों. प्रेमलीलाबहेनजवळून मागविण्यांत मुळींहि संकोच करूं नकोस. तुला मागवायचें तरी काय असणार ? जें थोडें कांहीं पाहिजे असेल तें त्या मोठ्या प्रेमानें पाठवितील. मात्र ज्याची तांतडीनें जरूर नसेल तें माझ्याकडून मागविलेंस म्हणजे बस झालें. मी तजवीज करीन. दांत वापरूं शकतेस ? लाल पाण्याच्या गुळण्या करतेस ? दूधाभाईच्या लक्ष्मीलाहि ६ वा महिना लागला आहे, असें पत्र मारुतीचें आजच आलें. ही सर्व हकिकत ऐकून मला दुःख किंवा आश्चर्य वाटत नाहीं, वाटायचें कारण नाहीं. लग्नाचा हा परिणाम सर्वांच्याच बाबतींत घडून येतो. त्यांत दुःख कसलें न् आश्चर्य कसलें ? रामदासालाहि

मी कांहीं ठपका दिला नाहीं. अशा बाबतींत ठपक्यानें काय होणार ? सर्वांनीं यथाशक्ति संयम पाळावा. संयमाची गोष्टसुद्धां आजकालचीच आहे. नाहीं तर माणसें इच्छेप्रमाणें भोग भोगीत आलींच आहेत. ठक्करबापा यावेळीं माझ्याबरोबर नाहींत; १५ ला भेटतील. सध्यां माझ्याजवळ मलकानी आहेत. तेहि खूप काम करीत आहेत. इतर सर्वहि करीतच आहेत. चन्द्रशंकरलाहि बरेंच काम असतें. ओम, किसन शरीराची चांगली काळजी घेतात. ओम होईल तेवढी मेहनत करते. फार भोळी व सरळ आहे. किसनचेंहि तसेंच आहे. सुरेन्द्रला शक्ति आली आहे. आंध्र देशाची मुशाफरी तीन तारखेला पुरी होईल. नंतर म्हैसूरला जावें लागेल. मी असेन तेथें गडबड ही असायचीच. अडचणी–त्रास असायचेच. माझी मात्र सारे काळजी घेतात, तेव्हां अडचणी कमी भासतात. बारीकसारीक गोष्टींकडेहि मीरांबहेन लक्ष पुरवते. म्हणून मला प्रवासाच्या अडचणी राहतच नाहींत. तूं मुलाखत सोडून दिलीस तर माझ्याकडून तुला दर आठवड्याला पत्र मिळूं शकेल. मी प्रवचन दर आठवड्याला पाठवीत जाईन. इतर स्त्रियांची मुलाखत घेण्यांत येतेच, तेवढ्यावर संतोष मान. पण तुझ्या इच्छेला येईल तसें कर. तुला भेटीची इच्छा असेल तर भेटायला यायला बरेच तयार होतील, इच्छासुद्धां होईल त्यांना. जाणून बुजून मुलाखती कमी ठेवण्याचा रिवाज केला आहे. पण तुझी जशी इच्छा असेल तसें बिनसंकोच कळवावें. जानकीबहेन बऱ्या आहेत. त्यांच्या राम–कृष्णाच्या घशांतील गांठी (Tonsils) कापून काढल्याचें मीं बहुतकरून तुला लिहून कळविलेंच आहे. कमळा आतां अन्न घेऊं लागली आहे. किशोरलाल यांना अजून ताप सोडीत नाहीं, पण चिंतेचें कारण नाहीं. माझें मौन सध्या रविवारीं रात्रीं सुरू होतें, म्हणून सोमवारीं रात्रीपर्यंत बोला–यचें नसतें. आज रात्रीं ९–१० ला मौन सुटेल. तेव्हां कोणाबरोबर बोलायचें क्वचितच असेल. कारण नंतर झोंपायचीच वेळ होईल. पहाटे तीन वाजतां उठायचें असतें. ब्रिजकृष्णाचा ताप आतां उतरला आहे. शक्ति यायची तेवढी आतां राहिली आहे. हेमीबहेन मरण पावली.

आतां प्रवचन :—

गेल्या वेळीं भक्ताचीं लक्षणें सांगितलीं. सेवेवांचून भक्ति शक्य नाहीं असेंहि लिहिलें. यावेळीं सेवा कशी करतां येते तें लिहितों. कारण पुष्कळ

वेळां लोक हा प्रश्न विचारतात. कोणी म्हणतात, सेवा अमुक स्थितींतच होऊं शकते. कोणी म्हणतात, अमुक अभ्यास केला तरच सेवा होते. ही सर्व भ्रांति आहे. एवढें गेल्या आठवड्यांतच संपविलें. वाटेल त्या स्थितींत असूनहि माणसाला सेवा करतां येते. आपल्याजवळ जेवढी म्हणून शक्ति असेल ती सर्व कृष्णार्पण केली म्हणजे आपणाला शंभरच्या शंभर टक्के मिळाले. ज्याची शक्ति एक कोटी देण्याची आहे, पण जो अर्धं कोटी देईल त्याला ५० टक्क्यांहून जास्त मिळणार नाहीं. पण ज्याच्यापाशीं एक पै आहे व जो ती पै देतो, त्याला शंभरच्या शंभर टक्के मिळतील. म्हणून तुम्ही तेथें असणाऱ्या स्त्रिया तुमच्या संगतींत येणाऱ्या स्त्रिया किंवा अंमलदार यांजबरोबर उत्तम प्रकारें वागाल तर तुम्ही सेवाधर्म साधलात असें होईल. अंमलदारांबरोबर सेवाभावानें वागायचें म्हणजे त्यांचें कधीं वाईट चिंतूं नये, त्यांच्यांशीं नम्रतेनें वागावें, त्यांना फसवूं नये, नियमांचें पालन करावें, तसेंच तुमच्यांशीं संसर्ग येणाऱ्या व आपल्या गुन्ह्यांबद्दल शिक्षा भोगणाऱ्या स्त्रियांबरोबर सख्ख्या बहिणीसारखें वर्तन ठेवावें. त्यांच्यावर तुमच्या प्रेमाची छाप पडणें, त्यांना तुमची पवित्रता कळून येणें, हेंहि सेवाधर्माचें पालन होय. दोहोंमध्यें हेतु चांगला असला पाहिजे. स्वार्थबुध्दीनें किंवा भीतीमुळें चांगलें वर्तन ठेवलें तरी तें सेवेंमधें येत नाहीं. एखादा मनुष्य एक काम स्वार्थ साधण्यासाठीं करतो व दुसरा परमार्थ दृष्टीनें करतो, असें आपणहि बरेच वेळां पाहतों. जेथें ईश्वरार्पण आहे तेथें स्वार्थाला स्थानच नाहीं. अशी सेवा करणारा इसम रोज आपल्या शक्तींत भर टाकीत असतो. तो अभ्यास करतो, उद्योग करतो तोहि सेवाभावानेंच. असा जो सेवापरायण असतो त्याच्या हंसण्यांत, खेळण्यांत, खाण्यांत, पिण्यांतसुद्धां सेवाभावच भरलेला असतो. म्हणून त्याच्या सर्व कार्यांत निर्दोषता असणार. ईश्वर अशा भक्तांना हव्या असलेल्या सर्व शक्ति देतो. याविषयींचे तीन श्लोक स्त्रियांच्या प्रार्थनेंत आहेत ते तुझ्या लक्षांत असतीलच. ते श्लोक असे आहेत :

अनन्याश्चिन्तयन्तो माम् ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानाम् योगक्षेमं वहाम्यहम् ॥
मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् ।
कथयन्तश्च मां नित्यम् तुष्यन्ति च रमन्ति च ॥

तेषां सततयुक्तानाम् भजतां प्रीतिपूर्वकम् ।
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ॥

यांचा अर्थ 'अनासक्तियोग' मधून पाहून घे. हे श्लोक ९ व्या किंवा १० व्या अध्यायांत सांपडतील. गीता आपण कृतींत उतरविण्यासाठीं वाचतों हें लक्षांत ठेवावें. मी वर लिहिलें आहे तें सर्व गीतेच्या आधारानें लिहिलें आहे असें समजावें.

बापूचे सर्वांना आशीर्वाद

५

१३–२–'३४

बा,

हें पत्र आगगाडींत लिहीत आहें. तुझें पत्र मिळालें. इतक्या कामांत होतों कीं मंगळवारीं लिहूं शकलों नाहीं. आज गुरुवार आहे. तुझ्या मर्जीला येईल तें काम माझ्याकडे सोंपव. मर्जीला येईल तो प्रश्न विचार. तें सर्व मी पुरें करीन; प्रयत्न तरी करीनच. हरिलालविषयीं विचारलें आहेस, तो पाँडीचरीला गेला होता. तेथेंहि पैशासाठीं भीक मागून खूप दारू पीत होता. थोडेसे पैसे मिळालेहि. सध्यां कोठें आहे तें माहीत नाहीं. त्याचें असेंच चालावयाचें. ईश्वर त्याला सद्बुद्धि देईल तेव्हां खरी. त्यांत आपल्या पाप–पुण्यांचाहि परिणाम आहेच ना ? हरिलालचा गर्भ राहिला तेव्हां मी किती मूढ होतों ? जसें तूं व मीं केलें असेल तसेंच भरलें पाहिजे. मुलाच्या वर्तनाला अशा तऱ्हेनें आईबाप जबाबदार आहेतच. आतां आपण एवढेंच करूं शकूं कीं आपण शुद्ध व्हावें; तसा प्रयत्न दोघेंहि करीत आहोंत व तेवढ्यावर संतोष मानूं या. आपल्या शुद्धतेचा परिणाम कळत नकळत कां होईना हरिलालवर होत असेलच. मनूचें अलीकडे पत्र नाहीं, पण जमनादासनें खबर कळविली होती. सुशीलेला लिहीन. पुरुषोत्तमचा वाङ्निश्चय हरखचंदच्या मुलीबरोबर झाला आहे. पुरुषोत्तमची तब्येत अजून बरी आहे असें म्हणतां येणार नाहीं. रणछोडभाईच्या भावाची पत्नी मरण पावली. त्यामुळें मोतीबहेन उदास असते. तिच्यावरची जबाबदारी वाढली आहे. मला अंबालालभाई व मृदुला भेटून गेलीं. अंबालालभाई व सरला–बहेन विलायतेस जात आहेत. तीन चार महिने तेथें राहतील. देवदास–लक्ष्मी ठीक आहेत. लक्ष्मीला मुलांचा भार वाहणें कठिण वाटतें खरें !

रामदास नीमु बरीं आहेत. त्या दोघांनाहि तुझ्या पत्राच्या नकला पाठवीत आहे. मूळ पत्र मणिलालला पाठवीत आहे. नक्कल वल्लभभाईनाहि पाठविली आहे. तेहि काळजी करीत असतात. माधवदासचें अजून उत्तर आलें नाहीं. मथुरादास माझ्याबरोबर आहे. एक दोन दिवस राहून मुंबईस जाईल. एस्थर मेनन विलायतेहून आली आहे. ती भेटून गेली. मिस लेस्टर लंकेला गेली आहे. काल मद्रासचा प्रवास संपवून राजाजी गेले. ते दिल्लीला जातीलच. अमतुल सलामला अजून अशक्तपणा आहे, म्हणून मद्रासला ठेविली आहे. राजाजी तिची काळजी घेतील. तुला पेळू मिळाले असतीलच. ते संपल्यावर लिही म्हणजे आणखी पाठवीन. कुसुमचा भाऊ जंगबहारमध्यें मरण पावला; त्याचें दुःख तिला फारच झालें आहे. प्यारेलाल काल सुटले. किशोरलाल देवळालीस आहेत. थोडे बरे आहेत. लक्ष्मीचें बाळंतपण बारडोलीस होईल, मंजुकेशा निगा टेवील. मोती किंवा लक्ष्मीसुद्धां तेथें असेल. नानीबहेन झवेरीला विटाळासंबंधींच्या गाऱ्हाण्यासाठीं ऑपरेशन केलें आहे. आतां तरी पुरेशा बातम्या कळविल्या ना? ९ तारखेस हैदराबादहून निघून मी पाटण्यास जाणार आहे. राजेंद्रबाबूंनीं बोलाविलें आहे. प्रभावती तेथेंच आहे. बिहारमधें चांगलेंच राहावें लागेल असा संभव आहे.

तुम्हा सर्व स्त्रियांना बापूचे आशीर्वाद

६

पेशावर, ७-१०-'३८

बा,

तूं मला चांगलेंच काळजींत टाकलें आहेस. तुझ्या तब्येतीबद्दल यावेळीं मीं जेवढी काळजी केली तेवढी पूर्वीं कधीं केली नाहीं. आज देवदासची तार मिळाली तेव्हां स्वस्थता वाटली. माझ्या चिन्तेचें कारण मी तुला दुःखी सोडून आलों हें होतें. मी बरें करायला गेलों अन् तुला दुःख झालें. नंतर तूं विसरलीस पण मी कसा विसरेन? आजारी होतीसच. ईश्वरानें कृपा केलेली दिसते. आतां तुझी तब्येत अगदीं सुधारून टाक. लक्ष्मी, रामु, तारा सर्व बरीं झालीं असतीलच. येथील हवा तर फार छान म्हटली पाहिजे. थंडी अजून तरी सहन होत आहे.

बापूचे आशीर्वाद

७

१८-१०-३८

बा,

आतां फक्त ९ दिवस उरले आहेत व ईश्वराची इच्छा असेल तर भेटूं. त्याच दिवशीं सेगांवला जाऊं. तुझ्या पत्रांत एक वाक्य होतें त्याचें उत्तर देण्याचें राहून गेलें. तूं लिहिलेंस कीं, जातांना मीं तुझ्या मस्तकावर हातहि ठेवला नाहीं. मोटार सुरू झाली व मलाहि तसें वाटलें. पण तूं दूर होतीस. अजून तुला बाहेरच्या खुणांची जरूर वाटते कां ? तूं असें कसें धरून चाल-तेस कीं, मी बाहेर दाखवीत नाहीं यावरून माझें तुझ्यावरील प्रेम सुकून गेलें आहे ? मी तर तुला सांगतो कीं, माझें प्रेम वाढलें आहे व वाढत जात आहे. पूर्वीं कमी होतें असें नव्हे, पण जें होतें तें रोज अधिक निर्मळ होत चाललें आहे. मी तुला केवळ मातीची बाहुली नाहीं मानीत. अधिक काय लिहूं ? याचा अर्थ समजत नसेल तर देवदास समजावून सांगेल. पण जशा अमतुल, लीलावती वगैरे बाहेरचीं चिन्हें मागतात तशीच तूंसुद्धां मागत असशील तर मी देईन.

बापूचे आशीर्वाद

* * *

[ आगाखान महालांतून बांनीं लिहिलेल्या पत्रांतील कांहीं नमुने ]

१

२६-५-'४३, सोमवार

चि. काशी,

तुमचीं दोन्हीं पोस्ट-कार्डें मिळालीं. वाचून आनंद झाला. सर्वां-पेक्षां तुझेंच पत्र नियमित येतें. वाचून फारच आनंद होतो. ता. १४ चें पत्र अखेरीस आज मिळालें. म्हणजे फार उशीरां पत्रें मिळतात. तेथील सर्व बरीं आहेत हें ऐकून आनंद झाला. किशोरलालभाईंची तब्येत बरी आहे हें समजल्यावर आनंद वाटावा असेंच आहे. माझ्या सहीचें पत्र यापूर्वीं तुम्हाला मिळालें आहे कीं नाहीं ? आर्यनायकम्‌जी नागपुरहून आलेले आहेत, तेव्हां त्यांना व आशादेवींना माझे आशीर्वाद. पत्र लिहि-लेंस तर प्रभूला व अंबाला माझे आशीर्वाद लिही. काल लक्ष्मीचें पत्र आलें. लिहिते कीं, कधीं कधीं अंबाचीं पत्रें येतात. बाकी येथील सर्व मजेंत आहेत.

माझी तब्येत चांगली आहे. माझी चिन्ता करूं नका. तुमची तब्येत चांगली असेलच. बचू मजेंत असेलच. मला येथें प्रार्थनेच्या वेळीं तुम्हा सर्वांची फारच आठवण होते. चि. कहाना काय लिहीत असतो ? भाजी सगळींच थोडथोडी चिरतात. थोडी तूं पण निवड असें त्याला सांग. भणसाळीभाईपाशीं शिकतो कीं नाहीं ? सुतारकाम करायला जातो कीं नाहीं ? बाकी आतां माझी राखच बाहेर येईल, मी कोठली येणार ? तूं सर्वांबरोबर मिळून मिसळून रहा, असें चि. कहानाला सांगा. लीलावतीला सांगा कीं, आम्हाला तिचा निरोप कळला. ते असें म्हणाले कीं, तुला योग्य वाटेल तसें कर. बाकी मला तरी वाटतें कीं, तूं शाळेंत दाखल व्हावेंस. हा पंथ पुष्कळ लांबचा आहे. छगनलालला आशीर्वाद. लीलावती, गोमतीबहेन, शारदा, आनंद, बचु वगैरे सर्वांना व सर्व आश्रमवासीयांना माझे आशीर्वाद. कृष्णचंद्रजी, शक्य तितक्या चांगल्या रीतीनें कहानला सांभाळा. शेवटीं नाहींच जमलें तर पाठवून द्या. नागपुरास सर्व भगिनींना आशीर्वाद लिहा.

* लि. बाचे शुभ आशीर्वाद, बापूजींचे शुभ आशीर्वाद

## २

२–८–'४३ सोमवार

चि. काशी,

तुमचें पत्र मिळालें होतें. वाचून आनंद झाला. तेथें सर्व बरीं आहेत हें समजल्यावर आनंद झाला. बचु, आनंद मजा करीत असतील. येथें पाऊस खूपच आहे, तेथेंहि असेलच. काठेवाडांत चांगला पाऊस झाला आहे. पत्र लिहिल्यास दुर्गाला, बाबलाला इतर सर्वांना माझे आशीर्वाद लिहा. छगनलालला आशीर्वाद. तुमच्या येथें जसा दुख्याभोपळा खूप होतो तसाच आमच्याकडेहि होतो. चि. मनु मजेंत आहे. माझी तशीच बापूजींची तब्येत चांगली आहे. मला थोडासा खोकला आहे. बाकी सर्व ठीक आहे. खंडु आहे कीं गेला ? मणिभाई आहेत कीं नाहींत ? शंकरन्चें काल पत्र आलें होतें. लीलावती गेली. सैपाकघर कोण सांभाळतें ? आज अमावस्या आहे. उद्यांपासून श्रावण महिना सुरू. आतां सर्व वार सणासुदीचे. येत्या रविवारीं 'पसली'.×

* लि.=लिखितं=लिहिणार. मराठींतील आ.=आपला, यासारखें संक्षिप्त रूप.

×नारळी पूर्णिमे ('बळेव')च्या दिवशीं भाऊ बहिणीला कांहीं तरी भेट देतो ती, किंवा त्यावेळचा समारंभ. परंतु आगाखान महालांत पंचांगाची अडचण असल्यामुळें येथें थोडी चूक राहिली आहे. 'पसली' येत्याच्या पुढच्या रविवारीं असावी.

जेलमधील सर्वांस आशीर्वाद. मनोज्ञा, कृष्णदास, प्रभुदास, अंबादेवी, सर्वांना माझे आशीर्वाद कळवा. सध्यां तरी लीलावतीवांचून सुनें वाटत असेल.

विनोबांचीं कधीं कधीं पत्रें येतात. बाळकोबांना आशीर्वाद. बस हेंच.

लि. बाचे तथा बापूजींचे आशीर्वाद

३

९–८–'४३ सोमवार

चि. काशी,

ता. २२–७–'४३ चें तुमचें पत्र मिळालें. वाचून आनंद झाला. पाऊस वारा वगैरे लक्षांत घेतां माझी तब्येत चांगली आहे. खोकला येतो. दुर्गाची हकीकत कळली. तेथील सर्व मजेंत आहेत हें कळून आनंद. तिला तसेंच बाबलाला व इतरांनाहि माझे शुभ आशीर्वाद. बाकी मला तर वाटतें कीं, तिला आतां सेवाग्राम येथें गोड वाटणार नाहीं तेव्हां तेथेंच राहील. जेथें राहील तेथें सुखानें राहो म्हणजे बस. आम्ही ऐकिलें होतें कीं सावित्री फिरून मंदिरांत* गेली आहे. आश्रमांत सर्वांस आशीर्वाद. दुसरें असें कीं, माझी पेटी उघडा आणि आंत चारपांच साड्या आहेत त्यांपैकीं दोन काळ्या कांठाच्या आहेत त्या आत्याबाईकडे व चारएक वारांचा तुकडा आहे तोहि आत्याबाईकडे पाठवून द्या. आणि दुसऱ्या दोन लाल कांठाच्या आहेत त्यांतील एक रामीला व एक मनूला पाठवून द्या. आणि माझ्या पेटींत गोरखपूरची मोठी गीता, व लाल कांठाची पासोडी कपाटांत आहे, सुती आहे, तीं शांतिकुमारकडे पाठवून द्या; म्हणजे तो तें सगळें येथें पाठवून देईल. आतां बापूजींचा जन्मदिवस येईल. तेव्हां आत्याबाईला व मुलींना द्यायची माझी इच्छा आहे म्हणून लिहितें आहे. दुसरें म्हणजे एक खाकी रंगाचा तुकडाहि आहे, तोसुद्धां रामीला देऊन टाका. बाकीचीं कांहीं माझीं जाकिटें असतील अन् तुम्हाला देण्यासारखीं वाटत असतील तर तीं देऊन टाका. लाल कांठ व मोठा पन्हा आहे तें रामीला द्यावें. माझा बाह्यांचा स्वेटर निळ्या रंगाचा आहे तोहि पाठवून द्यावा. डॉ. मनुभाई व हीराबहेन यांना आशीर्वाद.

आज तर 'पसली' आहे. तुम्हींसुद्धां केलीच असेल.

लि. बा तथा बापूंचे आशीर्वाद

---

* तुरुंगांत

# भाग दुसरा

## वात्सल्यमूर्ति बा

र.नं. ८३३२
तारीख ता. ६५२

## प्रथम दर्शन

कस्तूरबांना मीं १९२० सालीं लाहोरला श्रीमती सरलादेवी चौधराणींच्या घरीं पहिल्यांदा पाहिलें. माझे भाऊ (प्यारेलालजी) गांधीजींजवळ राहत असत, म्हणून माझ्या मातुःश्री दुःखी असत. आपल्या मुलाला परत घरीं घेऊन जाण्यासाठीं त्या गांधीजींकडे गेल्या होत्या. गांधीजी फार कामांत होते, म्हणून त्या तितका सर्व वेळ कस्तूरबांपाशीं बसल्या व त्यांच्याजवळ त्यांनीं आपलें हृदय मोकळें केलें. गांधीजींनीं त्यांना संध्याकाळीं भेटण्यासाठीं वेळ दिली होती. तेवढ्या वेळांत त्यांचें पुष्कळच हृदयपरिवर्तन होऊन गेलें होतें. बांबरोबर सारी दुपार गप्पा मारल्यानंतर आईनें विचार केला, "शेवटीं ही देखील माझ्यासारखीच एक स्त्री आहे ना! ही एवढा त्याग करूं शकते, तर खुशाल माझा मुलगाहि देशाची सेवा करो." म्हणून ती बापूजींना म्हणाली, "तुम्ही माझ्या मुलाला चारपांच वर्षे आपल्या सेवेला ठेवा. पण नंतर माझा मुलगा मला परत द्या. पतिविहीन अशा मला हा मुलगाच एक आधार आहे."

त्यावेळीं मी पांचसहा वर्षांची होतें. आईबरोबर गप्पागोष्टी करणाऱ्या बांचें चित्र आजहि माझ्या डोळ्यासमोर उभें राहतें. आई बांवर मुग्ध होऊन गेली होती. बापूजींनीं तर मातुःश्रीला स्वतः परदेशी कपडे वापरून मला वापरायला देण्याबद्दल, तसेंच घर व दुनिया यांविषयीं एवढा मोह बाळगण्याबद्दल, गोड ठपकाहि दिला. परंतु बांनीं तिच्याबद्दल पूर्ण सहानुभूति दाखविली होती; व आपला अनुभव सांगून बदलणाऱ्या काळाबरोबर आपले विचारहि बदलण्याचा सल्ला दिला होता. कित्येक दिवस मातुःश्री बांच्याच गोष्टी बोलत असत. बांनीं एवढा मोठा त्याग केवळ बापूजींवरील भक्तीनें प्रेरित होऊन केला, याचा मातुःश्रींवर फार मोठा परिणाम झाला होता. बांनीं सहानुभूति दाखविल्यामुळें त्यांच्यांतहि स्वतः त्याग करण्याची शक्ति आली होती. त्यांना हेंहि दिसून आलें होतें कीं बा त्यांच्याप्रमाणेंच एक माता होत्या. बांमध्यें इतका वात्सल्यभाव पाहून मातुःश्रीला असा संतोष वाटला कीं, आपल्या पुत्राचा सांभाळ करणारी एक

"मा"च आहे. या विचारानें आपल्या पुत्राचा वियोग सहन करणें मातार्जीना जरा सोपें गेलें.

## प्रथम परिचय

१९२० ते '२८ च्या काळांत बा व बापूजींचें दर्शन मला मधून मधून घडत असे. बा नेहमीं भारीच प्रेमळ वाटत. १९२९ च्या उन्हाळ्याच्या सुटींत मला बांच्या निकट सान्निध्यांत राहण्याचें सद्भाग्य प्राप्त झालें. माझे भाई पुष्कळ दिवसांपासून मला आश्रमांत बोलावीत होते. मी नेहमींच तयार असें. पण मातुःश्रींना एकट्या मुलीला घराबाहेर पाठवणें पसंत नव्हतें. माझे भाई सांगत असत कीं, जर मला खरोखर कांहीं शिकावयाचें असेल, नवे अनुभव घ्यावयाचे असतील, तर मीं एकट्यानेंच फिरलें पाहिजे. अखेरीस मी कॉलेजांत गेल्यानंतर मातुःश्रींनीं मला एकटीला जाण्यास परवानगी दिली. भाऊ कांहीं कामासाठीं बापूजींबरोबर आम्याला आले होते. ते दिल्लीस येऊन मला घेऊन गेले. चोवीस तासांच्या गाडीच्या प्रवासानंतर आम्ही अमदाबादला पोंचलों. मी पहिल्यांदाच आईला सोडून दूर आलें होतें, म्हणून मन जरा उदासवाणें होतें. पण त्याबरोबरच नवें स्थळ व नवीन प्रकारचें जीवन पाहण्यासाठीं मन उत्सुकहि झालें होतें.

आश्रमाविषयीं मी जें कांहीं ऐकलें होतें व वाचलें होतें त्याची माझ्या मनावर खोल छाप पडली होती. मी कुठल्या तरी देवलोकांत जात असल्यासारखा आनंद माझ्या हृदयांत होता. माझ्यासारख्या एका सामान्य व्यक्तीला बापूंनीं आश्रमांत राहण्याची परवानगी दिली म्हणून माझें हृदय कृतज्ञतेनें भरून आलें होतें. गाडींतून जेव्हां भाईनीं मला दुरूनच साबरमती आश्रमांतील मिणमिणणारे दिवे दाखविले तेव्हां तर माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले.

गाडींतून उतरून घोडागाडींत बसून आम्ही आश्रमांत पोंचलों. रात्र बरीच झाली होती. मीहि थकलें होतें, म्हणून घोडागाडींतच झोंपलें. गाडी एकदम एका लहान व्हरांड्यासमोर येऊन उभी राहिली. आम्ही आश्रमांत येऊन पोंचलों होतों. नंतर मला समजलें कीं, तो स्व. मगनलाल गांधींच्या घराचा व्हरांडा होता. मगनलालभाई वारल्यापासून बापू दिवसां त्यांच्या घरांत

बसून आपलें सगळें कामकाज करीत व रात्रीं 'हृदयकुंजां'त (बांच्या घरीं) जाऊन झोंपत. बापूजी आमच्या आधीं एकच दिवस आश्रमांत पोंचले होते. आम्ही पोंचलों त्यावेळीं आश्रमांत सगळे झोंपलेले होते. एकटे रामदासभाई जागे होते. ते व्हरांड्यांतच झोंपले होते. मी व भाई त्याच व्हरांड्यांत जमिनीवर बिछाने पसरून झोंपलों. जमिनीवर झोंपण्याचा तो माझा पहिलाच अनुभव होता. कुतूहल व घाबरटपणामुळें त्या रात्रीं क्वचितच माझा डोळा लागला असेल.

सकाळीं चार वाजतां प्रार्थनेची घंटा झाली. भाई मला बा व बापूजींपाशीं घेऊन गेले. बापूजींनीं मला प्रवासाची हकीकत विचारली आणि दुसऱ्या दिवसापासून आपल्या व्हरांड्यांत बांजवळ झोंपण्याची सूचना केली.

प्रार्थनेनंतर बा मला आपल्या खोलींत घेऊन गेल्या. खोलींत सामान फारच थोडें होतें. पण प्रत्येक वस्तु व्यवस्थित ठेवलेली होती. कुठेंहि नांवाला सुद्धां कचरा नव्हता. एका लहानशा स्टोव्हवर चहा-कॉफी करण्यासाठीं पाणी ठेविलें होतें. बांनीं मोठ्या प्रेमानें मला व भाईंना न्याहारीस दिलें. बांच्या हातची कॉफी पिण्याचा तो माझा पहिला प्रसंग. नंतर मी आश्रमांत जितकी राहिलें तितके दिवस बा रोज मला आपल्याबरोबरच न्याहारीला बसवीत. घरची अन् आईची मला फार आठवण होई. आईपाशीं हट्ट धरून जर मी येथें आलेली नसतें तर कदाचित् एक दोन दिवसांतच परत जाणाऱ्या गाडींत बसून मी परत घरीं पोंचलें असतें. पण आतां सुटी येथेंच घालवावयाची होती. सगळीं माणसें नवीं नवीं होतीं. त्यांची भाषा मला समजत नव्हती. मला वाटे कीं हे सगळे माझ्यापेक्षां उच्च आहेत. त्यामुळें घाबरून मी कोणाबरोबर बोलूं शकत नव्हतें. पण जेव्हां मी बांजवळ जाई तेव्हां माझी भीति कमी होई. त्या मला आईप्रमाणेंच प्रेमानें खाऊं पिऊं घालीत आणि माझ्याशीं बोलत. एकहि दिवस त्यांच्या तोंडून अशी गोष्ट निघाली नाहीं कीं त्यामुळें आपणाला आपण कुणा महान व्यक्तीजवळ बसलों आहों असें वाटावें. त्या तर 'मा'च होत्या, व त्यांच्या आसपास मातृप्रेमाचेंच वातावरण पसरलेलें असें. मी सारा दिवस न्याहारीच्या वेळाचीच वाट पाहत असें.

आश्रमांत सकाळीं सगळ्या स्त्रिया धान्य नीट करण्यास, पोळ्या करण्यास व भाजी चिरण्यास जात असत. मीहि तेथें जात असें. बासुद्धां येत. त्या सर्वांबरोबर बसून आपल्या वांटणीचें काम पुरेपूर करीत. त्यांच्या हाल-चालींत व काम करण्यांत आश्चर्यकारक स्फूर्ति होती. आणि शेवटपर्यंत त्यांची ही स्फूर्ति कायम राहिली. आजारीपणांतहि कित्येक वेळ त्या काम करीत आणि विश्रांति घेत नसत, म्हणून मला त्यांच्याबरोबर भांडावें लागलें आहे.

बा खूप कांतीत असत. बापूजींपाशीं बसून राहिलेल्या त्या क्वचितच दिसत. पण सारा वेळ त्यांची नजर बापूंवरच राही. कोणत्या वेळीं कोणीं बापूजींची सेवा करावयाची आहे व तें वेळेवर करतें कीं नाहीं याकडे बा बरोबर लक्ष ठेवीत. साबरमती आश्रमांत एक दिवस मीं दुपारीं कडक उन्हांत बांना स्वैंपाकघराकडे जातांना पाहिलें. बांच्या घरापासून स्वैंपाक घर बरेंच दूर होतें. विचारल्यावर समजलें कीं बापूजींच्या पायाला तूप चोळण्यासाठीं त्या भाईला शोधीत होत्या. बापूजींची झोंपण्याची वेळ होऊन गेली होती, तरी भाई आले नव्हते. मी म्हटलें "मला काम सांगा. मी करीन." बा म्हणतात, "बापूंची सेवा करण्याची संधि घालवणं प्यारेलालला आवडणार नाहीं. तोच येऊन करील. तूं त्याला शोधून आण. पण जेवायला बसला असेल तर नको बोलावूंस." येथेंहि 'माता' च बोलत होती कीं, "जेवायला बसला असेल तर नको बोलावूंस."

त्या वेळीं मला कपडे धुतां येत नसत. विहिरीचें पाणी ओढण्याचें श्रम टाळण्यासाठीं नदीचें पाणी स्वच्छ असो कीं गढूळ असो, त्या पाण्यांतच कपडे कसेबसे धुवून आणीत असें. परिणाम असा झाला कीं माझे कपडे अगदीं मातीसारखे रंगून गेले. इतर कुणाला अशा गोष्टींकडे लक्ष देण्यास फुरसत नव्हती. पण बांच्या डोळ्यांना तें दिसलें. त्यांनीं मला कपडे धुण्यास शिकविलें व भाईंना मला मदत करण्यास सांगितलें. त्या तर माझे कपडे धुवून देण्यासहि तयार होत्या. पण आश्रमांत सगळेंच काम हातानें केलें पाहिजे हें मला माहीत होतें, म्हणून मी ते धुवायला दिले नाहींत व स्वतःच विहिरीवर जाऊन धुणें सुरू केलें. विहिरीवर कोणी ना कोणी मला पाणी काढून देत असे. त्यांतहि कदाचित् बांचा हात असावा.

माझी सुटी संपत आली होती. एक दिवस बापूजी एकटेच व्हरांड्यांत बसून कांहीं काम करीत होते. माझ्याशिवाय तेथें कोणी नव्हतें. इतक्यांत कांहीं लोक आश्रम पाहण्यास आले. त्यांनीं बापूजींना प्रणाम केला, कांहीं तरी भेट म्हणून दिलें व आश्रम पाहण्याची इच्छा व्यक्त केली. बापूंनीं मला बोलाविलें व त्या लोकांना आश्रम दाखविण्यास सांगितलें. तितक्यांत बापूंच्या लक्षांत येऊन त्यांनीं मला विचारलें, "पण तूं स्वतः हें सर्व पाहिलें आहेस का ?" मला 'नाहीं' म्हणून सांगावें लागलें. बापूंनीं दुसऱ्या कुणाला तरी बोलावून त्याला त्यांच्याबरोबर पाठविलें. मला एक भाषण ऐकविलें : "कोणी इंग्रज मुलगी इतके दिवस येथें राहिली तर आपल्या आसपासच्या गोष्टींविषयीं अजाण राहणार नाहीं. पण आपल्या देशांतील मुलांमुलींना मात्र आजकाल पुस्तकांचीच काळजी. बी. ए. पास झालीं म्हणजे जीवन सफळ झालें आणि जर का दुर्दैवानें नापास झालीं तर बस खलास ! सामान्य ज्ञानाची त्यांना गरजच भासत नाहीं." मी खूप लाजलें. मी साधारणपणें पुस्तकेंच घेऊन बसत असें; पण त्याचें कारण असें होतें कीं, मला दुसरें कांहीं काम नव्हतें; आणि सगळें पाहण्याची इच्छा होती तरी पण लाज वाटत असल्यामुळें मी कोणाला कांहीं विचारीत नसें व कुठेंहि जात नसें. बांना हें समजून आलें. त्यांना लगेच माझी अड-चण कळली. भाईंना व बापूंना सांगून मला आश्रम व अमदाबाद शहर दाखविण्याची त्यांनीं व्यवस्था केली. अशा रीतीनें मला सर्व स्थळें पाहण्याची संधि मिळाली.

थोड्या दिवसानंतर बापूजी प्रवासास जाणार होते. माझी सुटीहि संपत आली होती, म्हणून मला परत घरीं जायचें होतें. पण मीं कधीं एकटीनें प्रवास केला नव्हता. तेव्हां मला एकटीला कशी दिल्लीला पाठ-विणार ? शेवटीं बापूजींनीं मला आपल्याबरोबर घेऊन जायचें ठरवलें. बापूंच्या वाटेवरच आग्रा येत होतें, आणि आग्र्याहून मला दिल्लीस पाठ-विण्याची व्यवस्था सहज होण्यासारखी होती. अमदाबादहून आम्ही मुंबईला गेलों. तेथें गाडीमधून प्रथमच मला समुद्राचें दर्शन घडलें. आश्रमांत माझ्या चपला हरवल्या होत्या. मुंबईस विकत घेऊं असा मी विचार केला होता. पण आम्ही मुंबईस राहिलों त्या दिवशीं तेथील दुकानें बंद होतीं. मुंबईहून

आम्ही भोपाळला गेलों. गाडींतून उतरून पुलावरुन जात असतां माझ्या पायांत चपला नाहींत हें बांनीं पाहिलें. घरीं पोंचल्यावर लगेच त्यांनीं आपल्यासाठीं थोड्या दिवसांपूर्वींच मागविलेला चपलांचा नवा जोड काढून मला दिला. याप्रमाणें बांच्या कोमल भावनेचा व त्यांच्या मातृप्रेमाचा अनुभव मला त्यांच्या सहवासांत पदोपदीं येऊं लागला. बांची मुक्तकंठानें प्रशंसा करतांना पाहून मला कोणीतरी म्हणालें, "तूं अधिक काळ बांजवळ राहिलीस म्हणजे बाचा रागहि कसा आहे तें समजेल." पण ही गोष्ट मला पटली नाहीं.

बांना इंग्रजी फार येत नव्हतें. पण थोड्याशा ज्ञानानेंहि त्या कशा तऱ्हेनें आपलें काम करून घेत असत त्याचा एक प्रसंग मला आठवतो. भोपाळमध्यें बापूजी नबाबाचे पाहुणे होते. बांना मध पाहिजे होता. तेथें आमच्या तैनातीला दिलेल्या अंमलदाराला बांनीं विचारलें, "तुम्हांला हिंदी येतें ?" बांनीं 'हिंदी' हें सामान्य हिंदुस्तानी या अर्थानें म्हटलें होतें. पण मुस्लिम रियासतींतील मुसलमान अंमलदाराचा हिंदीशीं काय संबंध ? त्यानें शुद्ध हिंदुस्तानींत उत्तर दिलें, "जी नहीं."

बांनीं विचारलें, "इंग्रजी येतें ?"

"जी हां."

बांनीं म्हटलें, "Bees, flowers, honey." तो अंमलदार झटकन् जाऊन मधाची बाटली घेऊन आला.

नबाबांच्या आईच्या मुलाखतीसाठीं बांना नेण्यांत आलें. मीहि बांबरोबर होतें. बेगमांना भेटण्यांत व त्यांच्याबरोबर बोलण्यांत बांना मुळींसुद्धां संकोच किंवा अडचण पडली नाहीं. धनदौलत आणि राजदरबारचें वैभव आणि भपका यांमुळें बा मुळींहि क्षुब्ध होण्यासारख्या नव्हत्या. या वस्तु त्यांना दिपवून टाकणें जरासुद्धां शक्य नव्हतें. आपल्या पतीचा दर्जा राजामहाराजांपेक्षां कितीतरी मोठा आहे हें त्यांना बरोबर माहीत होतें. त्यांनीं बेगमांना खादीचा संदेश दिला. त्यांचें बोलणें ऐकणाऱ्यांना त्या एक निरक्षर स्त्री असतील अशी कल्पनाहि आली नसती. त्यांचें अक्षरज्ञान फार थोडें होतें खरें, पण त्यांचें सामान्य ज्ञान, तसेंच मनुष्यस्वभावाचें व मानवी जीवनाचें ज्ञान, फार सखोल होतें.

आम्याहून मी दिल्लीला गेलें व कॉलेज उघडण्याचा दिवस जवळ आल्यामुळें तेथून लाहोरला गेलें. पण माझ्या हृदयांत बांचें व आश्रमाचेंच चित्र ठसून गेलें होतें. तेथील स्वतंत्रपणाचा व साधेपणाचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला होता. म्हणून लाहोरचें कृत्रिम जीवन फार बोंचूं लागलें. मी आपल्या मनाशीं ठरवून टाकलें कीं आपलें जीवन होतां होईल तों साधें करून टाकावें. जेव्हां भाईबरोबर आश्रमांत जाण्यास निघालें तेव्हां माताजींनीं सांगितलेंच होतें कीं "तेथून कांहीं व्रत वगैरे घेऊन येऊं नकोस." मींहि 'असें कांहीं करणार नाहीं' म्हणून वचन दिलें होतें. माताजींची सूचना विशेषतः खादी वापरण्याच्या व्रतासंबंधींच होती. मी कॉलेजांत गेलें म्हणून त्याच वर्षी माझ्यासाठीं त्यांनीं खूप नवीन कपडे करविले होते व ते टाकून देण्यास त्यांचा जीव धजला नसता.

आश्रमांत आल्यावर मी कांहीं खादी वापरण्याचें व्रत घेतलें नव्हतें. पण आश्रमांतून परत गेल्यावर दुसरे कपडे वापरणें माझ्या जिवावर आलें. मी तीन जोड्या कपडे घेऊन आश्रमांत गेलें होतें, आणि परत गेल्यावरहि तीनएक महिने त्या तीन जोड्यांवरच मी निभावून नेलें. आश्रमांत जाऊन बांपासून मी एवढें शिकलें होतें कीं खादीच्या साध्या कपड्यांतहि उत्तम शोभा आणतां येते. बा नेहमीं फारच सफाईनें कपडे वापरीत असत. त्यांच्याकडून मी कपडे धुणें शिकलें होतें. माताजींची अशी इच्छा होती कीं मी गिरणीचे कपडे वापरावेत. पण मी रोज माझ्या हातानें धुतलेले खादीचे कपडे घालूनच कॉलेजांत जात होतें. शेवटीं माताजींनीं मी गिरणीचे कपडे वापरावे असा आपला आग्रह सोडला व मला खादीचे नवे कपडे शिवून दिले.

## बापूंवांचूनच्या आश्रमांत

१९३० च्या उन्हाळ्याच्या सुटींत मी पुन्हा आश्रमांत आलें. तेव्हां बापूजी व भाई जेलमध्यें होते. आश्रम सुना होता. त्यावेळीं बा गांवोंगांव फिरून कार्यकर्त्यांना व स्वयंसेवकांना प्रोत्साहन देत होत्या. थोड्या दिवसांसाठीं बा आश्रमांत आल्या होत्या. त्या दिवसांतील बा निराळ्याच होत्या. खूप थकलेल्या होत्याच. देशाच्या दुःखामुळें त्या दुःखी होत्या. त्यांच्या कोमेजलेल्या चेहऱ्यावर अपूर्व दृढता व आत्मविश्वास दिसून येत होती. त्यावेळीं त्या कांहीं नुसत्या कोमल 'बा'च नव्हत्या, तर रणभूमीवर उतरून झुंजणाऱ्या 'वीरांगना'हि

होत्या. त्यांच्या मनांत आपल्या लढ्याच्या न्याय्यतेविषयीं आणि आपल्या अंतिम विजयाविषयीं बिलकुल शंका नव्हती.

त्यांची बापूजींच्या निर्णयात्मक बुद्धीवर अपूर्व श्रद्धा होती. त्यांना राजनीति समजत नव्हती, पण त्या बापूंना ओळखीत होत्या. एवढें त्यांना पुरेसें होतें. आपल्या देशांतील कोट्यवधि मुक्या जनतेची मनोवृत्ति त्यांच्यामध्यें प्रतिबिंबित झालेली होती.

आश्रमांत आल्यावर साबरमती जेलमध्यें असलेल्या रामदासभाई, मणिलालभाई व इतर कित्येक मित्रांना भेटण्यास बा गेल्या. मलाहि बरोबर घेऊन गेल्या. तुरुंगांतील अडचणी सहन करकरून त्यांचे चेहरे सुकून गेले होते. हें पाहून माझें हृदय भरून आलें. पण बांनीं पुष्कळ तुरुंग पाहिले होते, पुष्कळ अडचणी सहन केल्या होत्या. त्या अगदीं शांत होत्या. स्वतंत्रतेच्या वेदीवर बलिदान देण्याची त्यांना इतकी संवय होऊन गेली होती कीं, पतीचें, पुत्रांचें किंवा स्वतःचें तुरुंगांत जाणें त्यांना बलिदानासारखें भासतच नव्हतें. हजारों लोक तुरुंगांत पडले होते ना! आपलीं मुलें काय इतरांपेक्षां वेगळीं होतीं? अशी त्यांची मनोभावना होती. त्यांची हिंमत व बहादुरपणा पाहून मला फार आश्चर्य वाटलें.

## देखाव्यांबद्दल नावड

१९३० मध्यें देवदासभाई गुजरात (पंजाबांतील) जेलमध्यें होते. भाई साबरमती जेलमध्यें होते. साऱ्या विश्वाला आपलें कुटुंब बनविण्याचा बापूंचा आदर्श बांनीं आपलासा करून टाकला होता. आणि त्याप्रमाणें कृति करण्याचा त्यांचा प्रयत्न वर्षानुवर्षे चालू होता. देवदासभाई त्यांचे लाडके पुत्र होते. पण भाईंना व इतर कार्यकर्त्यांना साबरमती जेलमध्यें भेटतांना जणूं आपल्याच मुलाला भेटत आहों असा आनंद बांना होत असे. त्या ज्यांना भेटावयास जात त्यांना किती आनंद होई व केवढा धीर मिळे ह्याबद्दल गोष्टच बोलायला नको. फक्त एकदांच बा देवदासभाईंना भेटण्यास गुजरात (पंजाब) ला आल्या. मी व माताजी त्यांच्याबरोबर होतों. माताजींच्या आग्रहावरून बा गुजरात रेल्वे स्टेशनापासून चार मैल दूरच्या आमच्या गांवीं आल्या. बा एवढ्या महान व्यक्ति होत्या तरी त्यांना मिरवणूकीसारखे देखावे नापसंत होते. पण लोकांनीं त्यांची मिरवणूक

काढण्याचा प्रयत्न केला. मिरवणूक काढून प्रजेमध्यें उत्साह वाढविण्याचा लोकांचा उद्देश होता. पण बांना मिरवणूकींचा भारी कंटाळा होता. त्यांच्या तीव्र नापसंतीमुळें लोकांना आपला हट्ट सोडावा लागला. जनतेचें प्रेमप्रदर्शन आणि स्वागताच्या देखाव्याबद्दलची यांची एवढी नावड पाहून पंजाबच्या लोकांना फार आश्चर्य वाटलें. "पुढाऱ्यांना तर हें सगळें फार आवडतें. बा मिरवणुकीस कां नाहीं म्हणतात?" प्रत्येक जण हाच प्रश्न विचारीत होता.

१९३१ च्या उन्हाळ्याच्या सुटींत मी पुन्हा आश्रमांत गेलें. त्यावेळींहि बापूजी तेथें नव्हते. थोड्या दिवसांनीं ते आले, पण आश्रमांत राहिले नाहींत. दांडीकूचसाठीं आश्रमांतून निघतेवेळीं बापूंनीं प्रतिज्ञा केली होती कीं, स्वराज्य मिळेपर्यंत आपण परत आश्रमांत राहावयास येणार नाहीं. म्हणून ते 'विद्यापीठां'त उतरले. कांहीं दिवसांनीं बाहि तेथें आल्या. दोनचार दिवसांनंतर बापू तेथून व्हाइसरॉयला भेटण्यासाठीं सिमल्याला गेले आणि तेथून सरळ त्यांना गोलमेज परिषदेस जावें लागलें. बा साबरमतीसच राहिल्या. बापूंबरोबर विलायतेला जायची गोष्ट तर बाजूलाच राहिली, पण बापूंना निरोप देण्यासाठीं मुंबईपर्यंत जाण्याचा विचारहि बांच्या मनांत आला नाहीं. अनेक वर्षें झालीं, त्यांनीं आपल्या पतीला हिंदुस्तानाच्या व मानवजातीच्या सेवेला अर्पण केलें होतें. बापूंवर जेवढा आपला अधिकार आहे तेवढाच इतरांचाहि आहे या सिद्धान्ताची अंमलबजावणी करतां करतां बांना हें स्वाभाविक वाटूं लागलें कीं, कामासाठीं ज्यांनीं बापूंजवळ राहणें जरूर आहे त्यांनींच बापूंपाशीं राहावें.

गोलमेज परिषदेहून परत आल्यावर लगेच १९३२ त बापूजी पुन्हां जेलमध्यें गेले. विलायतेहून परत आलेल्या भाईला भेटण्यास माताजी मुंबईला आल्या होत्या. परतण्याचे वेळीं बापूंना प्रणाम करण्यास गेल्या तेव्हां बापू म्हणाले, "आतां परत कां जातां? आम्हांला तुरुंगांत पाठवून तुम्हीहि तुरुंगांत जा." बापूजींची धरपकड माताजींच्या देखतच झाली. नंतर भाईसुद्धां पकडले गेले. त्यानंतर माताजीहि तुरुंगांत गेल्या. कांहीं दिवस तर बा व माताजी एकाच तुरुंगांत होत्या. बा किती प्रसन्नपणें तुरुंगांत राहात तें माताजी मला सांगत. तुरुंगांतील त्रास हा त्यांना त्रासासारखा वाटतच नसे. शिवाय त्यांच्या सावलींत राहणाऱ्या इतर कैद्यांचें जीवनहि फार सरळ व मधुर होऊन जात असे.

१९३५ मध्यें मी दोन तीन आठवड्यांसाठीं बापूजींकडे वर्ध्यास गेलें. त्यावेळीं बापू मगनवाडीस राहात. बा सारा दिवस आपल्या कामांतच गुंतलेल्या असत. त्याच वर्षी नोव्हेंबर मध्यें मी पुन्हां वर्ध्यास गेलें.

## बांची शुश्रूषापद्धति

माझ्या परीक्षेनंतर मी पुन्हां वर्ध्यास गेलें. त्यावेळीं देवदासभाई आजारी होते. बांनीं किती धीरानें व समजूतदारपणानें देवदासभाईंची आजारांत सेवा केली तें सर्व अद्भुत होतें. १९३५ च्या उन्हाळ्यांत बा व भाई देवदासभाईंना सिमल्यास घेऊन गेलीं. बा आपल्या सामान्य ज्ञानानें मोठमोठ्या डॉक्टरांपेक्षांहि जास्त काम कसें करीत असत, याचें वर्णन भाई करी. शेवटीं त्यांच्या मेहनतीला यश आलें. देवदासभाई बरे झाले. बा पुन्हां बापूंपाशीं जाऊन पोंचल्या.

१९३७च्या डिसेंबरांत कलकत्त्याला बापूजी आजारी पडले. मी कांहीं दिवसांसाठीं त्यांच्याकडे गेलें. त्यानंतर कित्येक अशा घटना घडल्या कीं थोड्या दिवसांऐवजीं मी कित्येक वर्षें त्यांच्यापाशीं राहिलें. बांनीं माझा चार्ज घेतला. त्यांच्याकडे एक लहान खोली, न्हाणीघर व व्हरांडा होता. तेथेंच माझाहि बिछाना ठेवण्यास त्यांनीं सांगितलें. रात्रीं त्या मला आपल्या जवळच निजवीत, व सर्व प्रकारें सख्ख्या आईप्रमाणें माझी काळजी घेत. सुरुवातीला सकाळीं मी माझा बिछाना उचलून ठेवण्याचें विसरून जाईं व बा कांहींहि बोलल्यावांचून माझा बिछाना उचलून आंत ठेवून देत. मला हें समजलें तेव्हां मला खूप लाज वाटली व न चुकतां माझा बिछाना उचलूं लागलें. मी बांचाहि बिछाना उचलण्याचा प्रयत्न करीत असें, परंतु मी जाऊन पोंचण्यापूर्वींच बा आपला बिछाना उचलून ठेवून देत. इतरांनीं ठेवलेले बिछाने उचलून नीट लावून ठेवतांना बांना मी पुष्कळ वेळां पाहिलें आहे. मोटमोठ्या गाद्या उचलण्याचाहि त्यांना कंटाळा येत नसे. स्वच्छतेची त्यांना इतकी आवड होती कीं अव्यवस्था व घाण त्यांना मुळींच सहन होत नसे. त्यांचा नियमितपणासुद्धां आश्चर्यकारक होता. बा कुठलेंहि काम करण्यास एकदांहि विसरल्याचें माझ्या आठवणींत नाहीं. एकदां मीं त्यांच्या लहानशा पेटींतून कांहींतरी काढलें. ती बंद करण्याचा एक चाप बिघडला होता. म्हणून मी एका बाजूचा बंद करून दुसरा तसाच उघडा राहूं दिला. बांनीं तें पाहिलें.

स्वतः उठून बंद करून आल्या. पुन्हां एकदां त्या पेटींतून कांहीं काढण्याचा प्रसंग आला तेव्हां बा म्हणाल्या, "इकडे आण, मी बंद करून देतें." मीं म्हटलें, "मी करतें." बांच्या डोळ्यांत विनोद होता, "विसरून गेलीस तर?"

## बांची दिनचर्या

बांची तब्येत चांगली राहत नव्हती. वर्षानुवर्षे दमा व खोकला चालू राहिल्यामुळें त्यांचें हृदय व फुप्फुसें कमकुवत झालीं होतीं. पण त्यांना आपल्या शरीराबद्दल कांहींच वाटत नसे. त्यांचा उत्साह तर अद्भुत होता. हळूहळू काम करणें अथवा चालणें त्यांना माहीतच नव्हतें.

सकाळीं ४ वाजतां प्रार्थनेला उठण्याचा त्यांचा आग्रह असे. प्रार्थने-नंतर बापूजी अर्धापाऊण तास झोंपत. पण बापू उठण्यापूर्वींच बा त्यांच्या-साठीं न्याहारीचें तयार करण्यास किंवा करविण्यास स्वैंपाकघरांत जात. आश्रमवासीयांत बापूजींची सेवा करण्यासाठीं चढाओढ चाले. म्हणून बा प्रत्येकाला कांहीं ना कांहीं काम सोंपवून देत. सोंपविल्यावरहि स्वतः जवळ उभ्या राहून काम बरोबर होत आहे कीं नाहीं, बरोबर स्वच्छता ठेवण्यांत आली आहे कीं नाहीं तें पाहत. न्याहारीचें तयार करून बापूजींच्या खोलींत त्या घेऊन जात व जवळ बसून त्यांना खाऊं घालीत. नंतर भांडीं बरोबर घांसलीं जाताहेत कीं नाहींत तें पहात. कित्येक वेळां इतर मुलींनीं घांसलेलीं भांडीं बांना पुन्हां घांसतांना मीं पाहिलें आहे. त्यांचीं भांडीं नेहमीं चकचकीत असत.

बापूजी फिरावयास निघाले म्हणजे बा स्नान वगैरे आटोपून पूजापाठ करीत. तास दीडतास रामायण, गीता वगैरेंचा पाठ करीत. मग स्वैंपाकघरांत जाऊन बापूजींचें जेवण तयार करवीत आणि बाकीच्या स्वैंपाकावरहि लक्ष ठेवीत. जेवतेवेळीं बापूजींना व त्यांच्याबरोबर बसलेल्या इतर पाहुण्यांना वाढून मग त्या बापूजींजवळ जेवायला बसत. पण त्यांची नजर बापूजींकडेच राही. एखादी माशी बापूजींपाशीं आली कीं लगेच बांच्या डाव्या हातांतील पंखा तिला उडवून लावी. जेवल्यानंतर बा बापूंच्या जवळ जाऊन बसत व त्यांच्या पायाला तूप चोळीत. मग आपल्या खोलींत जाऊन थोडी विश्रांति घेऊन कांतण्यास बसत. ४००-५०० तार त्या रोज कांतीत. आजारामुळें मला त्यांना केव्हां केव्हां सुचवावें लागे कीं, "बा, तुम्ही कांतण्याचे

एवढे श्रम करूं नका." बा हंसून गोष्ट उडवून लावीत. त्यांना वाटे कीं बापूंच्या लिहिण्या–वाचण्यांत व राजनैतिक कामांत कांहीं आपण मदत करूं शकत नाहीं; पण कांतून त्यांचें कार्य वाढवितां येतें ना ? बापूजींनींच म्हटलें आहे कीं "सुताच्या धाग्यानें स्वराज्य मिळणार आहे."

संध्याकाळीं त्या पुन्हां स्वैंपाकघरांत जात, बापूजींचें खाणें तयार करवीत व सकाळप्रमाणेंच बापूजींना खाऊं घालीत. स्वतः त्या कित्येक वर्षांपासून संध्याकाळीं जेवतच नव्हत्या. संध्याकाळीं फक्त कॉफी पीत. शेवटचीं कांहीं वर्षें तर कॉफीसुद्धां त्यांनीं सोडली होती. म्हणून फक्त गरम मसाला ( सुंठ, मिरीं, दालचिनी )घालून उकळलेला काढाच पीत. संध्याकाळीं बापू फिरावयास जात तेव्हां बा आश्रमांतील आजाऱ्यांना पाहण्यास निघत. मग आश्रमांतील इतर स्त्रियांबरोबर थोडें फिरावयास जात. आश्रमापासून अर्ध्या एक फर्लांगावर बापूजी परत येतानां दिसले कीं त्यांना जाऊन मिळत. फिरून आल्यावर संध्याकाळची प्रार्थना होई. बा सबंध प्रार्थनेंत पूर्ण भाग घेत, रामायणहि गात. रामायणाची तयारी त्या आधींच सकाळीं करून ठेवीत. इतक्या प्रेमानें व गोडीनें त्या सकाळीं रामायण व गीता यांचा अभ्यास करीत कीं कोणी विद्यार्थीहि आपल्या परीक्षेसाठीं त्यांच्यापेक्षां जास्त लक्षपूर्वक तयारी करीत नसावा. संध्याकाळच्या प्रार्थनेनंतर प्रार्थनेच्या जागीं बांचा दरबार भरे. जवळजवळ सगळ्या स्त्रिया बांजवळ बसत. कोणी पाय चेपीत तर कोणी पाठ रगडीत. आश्रमांतील सगळ्या बातम्या व इकडच्या तिकडच्या गप्पा तिथें चालत. अर्ध्या पाऊण तासानंतर दरबार बरखास्त करून बा बापूंची व आपली झोंपण्याची तयारी करीत.

त्या वेळीं रामदासभाईचा लहान मुलगा कहाना बांजवळ राहत होता. बा एखाद्या तरूण मातेच्या उत्साहानें कहानाची काळजी घेत. बालकाचें मन त्यांना फारच चांगलें ओळखतां येत असे. परिणामीं कहाना आपल्या आईला विसरूनहि गेला होता. त्याला त्याची 'मोठी बा'च सर्वस्व होती. १९३८त बा राजकोट सत्याग्रहांत भाग घेण्यास गेल्या तेव्हां कहानाची काळजी घेणें व त्याला शांत ठेवणें बापूंना जवळजवळ अशक्य झालें होतें. प्रथम बापूंना आशा होती कीं आपण कहानाची नीट काळजी घेऊं शकूं. पण कहाना सर्वकाळ मोठ्या बांची आठवण काढीत होता. शेवटीं एक

दिवस बापूजी हंसत हंसत म्हणाले, "तूं माळ घेऊन मोठ्या बाच्या नांवाचा जप करीत बस. मोठी बा येऊन तुझ्यासमोर उभी राहील." कहाना खुष होऊन म्हणाला, "द्या माळ." बापूजींनीं माळ दिली. त्यानें माळ घेऊन, जप करण्यास सुरुवात केली. थोड्या वेळानें रडत रडत परत आला, "मोठी बा तर नाहीं आली." बापूजी शेवटीं हरले व त्यांनीं त्याला त्याच्या आईकडे पाठवून दिलें.

## बांचा स्वार्थत्याग

कल्कत्याहून बापूजी आजारी पडून आले होते. आजाराची बातमी ऐकून जवळजवळ सर्वच आश्रमवासी घाबरून गेले होते. पण बांजवळ भीति म्हणून कांहीं पदार्थच नव्हता. आम्ही कल्कत्याहून परत आलों तेव्हां डिसेंबर महिना होता. सेवाग्रामांत खुप थंडी पडत होती. बापूजींना अनेक वर्षांपासून उघड्यावर निजण्याची संवय होती. पण त्यावेळीं थंडी-मुळें रक्तदाब इतका वाढला होता कीं डॉक्टरांच्या सांगण्यावरून त्यांना उघड्यावर झोंपणें सोडावें लागलें. कलकत्याला जाण्यापूर्वीं सेवाग्रामांत बापूजी एका जोड-खोलीच्या कोपऱ्यांत राहत होते. आजाराची बातमी ऐकून त्यांना एकांत व शांतता लाभावी म्हणून मीरांबहेननीं आपली खोली रिकामी करून ठेवली होती. पण बापूजींनीं त्या खोलींत राहण्याचें कबूल केलें नाहीं. "मीरांनें ती खोली आपल्यासाठीं व खादीकामासाठीं बांध-विली आहे. मी तेथें कसा राहूं शकेन? आणि मला न विचारतां हा फेरफार तिनें कां केला? मी तर माझ्या पूर्वींच्याच कोपऱ्यांत राहीन."

पण त्या कोपऱ्यांत रात्रीं निजण्याची सोयच कोठें होती? तेथें इतरहि झोंपत असत. बापू तेथें झोंपले तर त्या लोकांना त्रास व्हावयाचा! बापूंना हें कधींच पसंत पडलें नसतें. बापूंना मीरांबहेनच्या खोलींत झोंपावयास सांगण्याचा कुणालाहि धीर होईना. इतक्यांत बा म्हणाल्या, "माझी खोली आहे ना." बापू बांच्या खोलींत झोंपूं लागले.

ती खोली लहान होती, आणि बापूंबरोबर इतर दोघेतिघे आल्या-मुळें बांना व कहानाला व्हरांड्यांत झोंपावें लागलें. तरी बांनीं एकदांहि असें म्हटलें नाहीं कीं, "बापू खुशाल झोंपोत, पण इतरांसाठीं मी

माझी खोली कां म्हणून रिकामी करावी?" दुसरे दिवशीं सकाळीं न्याहारी करतां करतां बापू म्हणतात, "ती खोली मी खास बासाठीं करविली होती आणि आतां मी तिचा कबजा घेऊन बसलों आहे. आजपर्यंत बाला स्वतंत्र खोली अशी कधींहि मिळाली नाहीं. माझें व बाचें जें कांहीं होतें तें सुरुवातीपासूनच सगळ्यांसाठीं होतें. पण बाच्या या वृद्धावस्थेंत तिला जरा एकांत मिळूं शकला तर बरें, या विचारानें मी ती खोली बासाठीं बांधविली होती. पण तिचा उपयोगहि बानें केवळ स्वतःसाठीं केला नाहीं. अनेक मुलींना बानें तिच्यांतच सांभाळलें आहे. पण मी आलों म्हणजे बाला अगदींच बाहेर निघून जावें लागल्यासारखें होणार. मी जेथें जातों तेथील जागा धर्मशाळा होऊन जाते. हें मला बोंचतें आहे. पण मला एवढें सांगितलें पाहिजे कीं, बानें केव्हांहि याविषयीं तक्रार केली नाहीं. जें पाहिजे तें बाजवळून घेऊन जातों. वाटेल त्याला बाजवळ राहण्यास पाठवून देतों. बानें खुशीनें त्याला संमति दिली आहे." बा बापूंजवळच बसल्या होत्या. बापूंनीं हंसून बांना म्हटलें, "हो, पण असेंच असायला पाहिजे ना? जर मियां एक म्हणेल व बिबी दुसरें, तर जीवनाचा विरसच व्हावयाचा. पण येथें तर मियां म्हणेल तें बिबीनें मान्य केलेंच समजावें." सगळे हंसूं लागले.

आंत झोंपले तरी बापूंचा रक्तदाब पुन्हां पहिल्यासारखा झाला नाहीं. थंडीच्या वेळीं फारच वाढत असे. शेवटीं डॉक्टरच्या सल्ल्यावरून बापूंनीं जुहूला जाण्याचें कबूल केलं. आश्रमांतील कित्येक लोक हें ऐकून रडूं लागले "बापूंची काय फार गंभीर स्थिति आहे? जिवंत परत येतील ना?" पण बा अगदीं शांत होत्या. आदर्श नर्स बनून बापूंच्या सेवेला लागल्या होत्या. स्वतःची विश्रांति-विश्रांति सगळें विसरून गेल्या होत्या. सबंध दिवस बापूंजवळ बसून राहत असत व प्रत्येक काम करण्यास तत्पर असत. बाहि बापूंबरोबर जुहूला आल्या.

बापू जुहूला जवळजवळ दोन महिने राहिले. तेथें त्यांची तब्येत पुष्कळ सुधारली. दोन वेळां समुद्रकिनाऱ्यावर फिरावयास जात. बासुद्धां त्यावेळीं त्यांच्याबरोबर खूप फिरत असत. तब्येत सुधारल्यावर '३९ च्या आरंभीं बापू परत सेवाग्रामला आले. तेथून त्यांना कलकत्त्यास जावयाचें

होतें. बांनीं आनंदानें त्यांना निरोप दिला. बापू बरे असले म्हणजे त्यांच्याबरोबर राहण्याचा आग्रह बा धरीत नसत.

### जगन्नाथाच्या दर्शनाचा प्रसंग

कलकत्याहून बापू गांधीसेवासंघाच्या सभेसाटीं कटकला आले. बा, दुर्गाबहेन वगैरेहि सेवाग्रामहून तेथें आल्या होत्या. तेथून जगन्नाथपुरी जवळच असल्यामुळें बा, दुर्गाबहेन, लीलावतीबहेन, नारायण व इतर कित्येकजण जगन्नाथपुरी पाहण्यास निघाले. बांची देवाल्यांवर अपूर्व भक्ति होतीच. म्हणून दुर्गाबहेन व बा यांनीं आंत जाऊन जगन्नाथाच्या मूर्तीला नमस्कार केला, प्रदक्षिणा घातली व संध्याकाळीं परत आल्या. बापूंनीं जेव्हां ऐकलें कीं बा व दुर्गाबहेन मंदिरांत जाऊन दर्शन घेऊन आल्या तेव्हां त्यांना फार वाईट वाटलें व ते नाराजहि झाले. "ज्या मंदिरांत हरिजनांना जाऊं देत नाहींत त्यांत आपणाला कसें जातां येईल ?" संध्याकाळीं फिरावयाच्या वेळीं बापू बांच्या खांद्यावर हात ठेवून फिरावयास निघाले व याविषयीं बोलणें सुरू केलें. बांनीं एकाद्या लहान मुलाप्रमाणें अगदीं प्रांजलपणें आपली चूक कबूल केली व बापूंची क्षमा मागितली. बापूंचा राग नाहींसा झाला. त्यांनीं बांना म्हटलें:

"यांत माझाच दोष आहे. मी तुझा शिक्षक झालों पण तुझें शिक्षण अर्धवटच राहूं दिलें, मग तूं काय करणार ?" थोड्या वेळानें महादेवभाई-बरोबर बोलतांना बापू म्हणाले, "बानें इतक्या सरळपणानें आपली चूक माझ्याजवळ कबूल केली कीं मी मुग्ध झालों आहें. या घटनेनें मला फार धक्का बसला आहे. पण मला वाटतें कीं याची जबाबदारी बावर किंवा दुर्गावर नसून माझ्यावर व तुमच्यावर आहे. माझा दोष तर मी पुष्कळ वेळां कबूल केला आहे, पण आज मला तुमच्याविषयीं बोलावयाचें आहे. तुम्ही व दुर्गा एक असाधारण जोडपें आहां. तुम्ही मित्र आहां. तुम्ही दुर्गाला आपल्याहून इतकी मागें कशी राहूं दिली ? जसा तुम्ही बाबलाच्या शिक्षणाचा विचार करीत असता, तसा दुर्गाच्या शिक्षणाचा कां नाहीं केला ?" महादेवभाई विचारे काय उत्तर देणार ? त्यांना आपली चूक इतकी स्पष्ट दिसून आली कीं त्यांनीं बापूंना पत्र लिहून कळविलें कीं, "मी तुमच्याजवळ राहण्यास लायक नाहीं, म्हणून मला तुमच्याजवळून निघून जाण्याची परवानगी

द्या." पण बापू थोडेच त्यांना सोडणार होते ? चुकल्यामाकल्याला मार्गावर आणणें हें तर बापूंचें कामच. मग आपल्या निकटतम मित्राच्या लहानशा चुकीसाठीं बापू त्याला कसे सोडून देतील ? खूप चर्चा झाल्या, पत्रव्यवहार चालला, बापू व त्यांची मंडळी डेलांगहून कलकत्त्याला आली. बा वगैरे सर्व परत सेवाग्रामला गेलीं. कलकत्त्यालासुद्धां चर्चा चालूच होती. बापू महादेवभाईंची समजूत घालीत होते. शेवटीं महादेवभाईंनीं ती सबंध हकिकत लेखरूपानें 'हरिजन'मध्यें प्रसिद्ध केली व शांत झाले.

## सेवाग्रामांत कॉलरा

१९३८ कीं '३९ च्या उन्हाळ्यांत सेवाग्रामांत कॉलरा सुरू झाला. मी सर्व आश्रमवासीयांना कॉलऱ्याचें इंजेक्शन घेऊन टाकण्यास सांगितलें. बापूंनीं प्रार्थनेच्या वेळीं सांगितलें कीं सर्वांनींच इंजेक्शन घेतलें तर बरें. कारण गांवांतील लोक आश्रमांत येत असल्यामुळें संसर्गाची फार भीति आहे. वर्ध्याला काकासाहेब वगैरे मंडळींना कॉलरा झाला होता. आम्ही आश्रमांत कॉलरा येऊं देण्याची जोखीम पत्करण्यास तयार नव्हतों. पण कांहीं लोकांच्या मनांत इंजेक्शनबद्दल अश्रद्धा होती. ते त्यांतून सुटूं पाहत होते. पण कोणालाहि बोलण्याचा धीर होत नव्हता. शेवटीं बा म्हणाल्या, "मला तर इंजेक्शन घ्यायचें नाहीं. जें व्हायचें असेल तें होईल." बापू म्हणाले, "जे इंजेक्शन घेणार नाहींत त्यांना बाळकोबांच्या खोलींत राहावयास जावें लागेल." बांना हें कबूल होतें, पण इंजेक्शन घेण्यास त्या तयार नव्हत्या. परिणामीं आश्रमांत फार थोड्या लोकांनीं इंजेक्शनें घेतलीं. गांवांत तर जवळजवळ सगळ्यांना दिलींच होतीं. इतर काळजी घेतल्यामुळें सेवाग्रामांतील कॉलरा लवकर नाहींसा झाला, आणि आश्रम अजिबात बचावला.

## राजकोट सत्याग्रह

१९३८ त सरदारांच्या आग्रहावरून बापू बारडोलीला गेले. त्याच वेळीं राजकोटला सत्याग्रह सुरू झाला. तेथील ठाकोरसाहेबांनीं प्रजेला कांहीं हक्क देण्याचें कबूल करून नंतर ते फिरले होते. जनतेनें याबद्दल आपला विरोध दाखविण्यासाठीं सत्याग्रह करण्याचा निश्चय केला. बांनीं हें ऐकलें व लागेच बापूंजवळ गेल्या. राजकोट तर आपलें वतन. तेथें सत्याग्रह सुरू

झाला तर आपण त्यांत भाग घेतलाच पाहिजे. बापूंनीं परवानगी दिली. बांना राजकोट येथें सविनय कायदेभंगाबद्दल नजरकैद करण्यांत आली. पहिल्यांदा त्यांना एकट्यांनाच एका लहानशा गांवीं ठेवण्यांत आलें. देवदासभाई तेथें त्यांना भेटण्यास गेले. तेथील वातावरण इतकें खराब होतें कीं आजहि त्याचें वर्णन करतांना देवदासभाईंच्या डोळ्याला पाणी येतें. पण बांनीं एकाहि पत्रांत त्याबद्दल तक्रार केली नव्हती. त्या सैनिक बनून गेल्या होत्या; व त्या स्वतः असें मानीत कीं सैनिकानें अडचणी सहन करण्यास घाबरतां कामा नये. पण लोकांमध्यें त्याविषयीं खूप चर्चा झाली. बांची प्रकृति इतकी वाईट झाली होती कीं त्यांना डॉक्टरी उपचाराच्या सोयीपासून इतक्या दूर ठेवणें जोखमीचें होतें. शेवटीं राजकोट सरकारनें त्यांना राजकोटपासून १०–१५ मैल दूर असलेल्या आपल्या एका मुक्कामाच्या जागीं ठेवलें. तेथें त्यांच्याबरोबर मणिबहेन व मृदुलाबहेनहि होत्या. त्यावेळचीं बांचीं पत्रें खूप मजेदार येत. त्यांना फक्त बापूंच्या तब्येतीची व कहानाची चिंता वाटत होती.

बा तुरुंगांत गेल्यानंतर थोड्या दिवसांत बापूंनींहि राजकोट सत्याग्रहांत जाण्याचा निश्चय केला. बापू, भाई, कनु आणि मी राजकोटला पोंचलों. बापूजींबरोबर आम्ही बांच्या नजरकैदेंत त्यांना भेटावयास गेलों. सरकारनें त्यांना सर्व तऱ्हेच्या सोयी दिल्या होत्या. तरीहि त्यांचा चेहरा कोमेजलेला होता. फार दिवस बापूंचा वियोग त्या मुळींच सहन करूं शकत नसत. मनांतून खुशाल धीर धरीत असत् बा, पण शरीरावर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहत नसे.

नंतर बापूजींचा राजकोटचा उपवास सुरू झाला. बांना ही बातमी कळतांच धक्का बसला. पण बांना अशीं दुःखें सहन करण्याची संवय झालेली होती. मी उपवासाची बातमी घेऊन बांकडे गेले होतें. बा म्हणाल्या, "मला बातमी तरी द्यायची कीं उपवास करण्याचा विचार चालला आहे!"

मी म्हटलें, "पण बा, आमच्यापैकीं कुणालाहि माहीत नव्हतें कीं बापूजी उपवास करण्याचा विचार करीत आहेत. एकाएकीं सकाळीं उठून बापूंनीं एक पत्र लिहिलें व त्यावरून कळलें. चर्चा करायला त्यांनीं वेळच दिला नव्हता."

बांनीं कांहीं उत्तर दिलें नाहीं. लगेच स्वैंपाक करणाऱ्या बाईला बोलावून सांगितलें, “जोंपर्यंत बापूजींचा उपवास चालेल तोंपर्यंत मी एकदांच खाईन व तोहि फलाहारच करीन.” बापूंच्या उपवासांत बा प्रत्येक वेळीं असेंच करीत; त्यामुळें त्या बापूंची सेवाहिं करूं शकत व बापूंच्या तपस्येंत भागहि घेऊं शकत.

दुसऱ्या कीं तिसऱ्या दिवशीं बा एकदम बापूंसमोर येऊन उभ्या राहिल्या. बापूंनीं विचारलें, “कशी आलीस?” बांना सरकारतर्फे कळविण्यांत आलें होतें कीं बापूंना भेटण्याची त्यांची इच्छा असेल तर त्या जाऊं शकतील; म्हणून त्या आल्या होत्या. नंतर रात्र झाली तरी कोणी बांना घेऊन जाण्यास आलें नाहीं. या निमित्तानें बांना सोडून देण्याचा सरकारचा इरादा होता. पण बापूंना हें कसें सहन होईल? त्यांनीं सांगितलें, “सोडायचें असेल तर सर्वांना सोडा. मृदुला, मणि यांनाहि सोडा, व रीतसर सोडा.” रात्रीं एक वाजतां बापूंनीं बांना परत तुरुंगांत पाठविलें. कोणी तरी म्हणालें, “तो रस्ता तर आतां बंद आहे. पासाशिवाय तेथें कोणालाहि जाऊं देत नाहींत. बांना रस्त्यांतच अडवून ठेवतील.” बापूंनीं बांना म्हटलें, “तुला वाटेंत अडविलें तर तेथेंच सत्याग्रह कर. जेथें अडवतील तेथेंच पडून रहा. मग सबंध रात्र रस्त्यावर पडावें लागलें तरी चिंता नाहीं.” बा कांहींहि चर्चा न करतां निघाल्या. त्यावेळीं त्यांच्या मनाची स्थिति कशी असेल! बापूजींना तशा स्थितींत सोडून जातांना त्यांना कसें वाटलें असेल! पण अशा वेळीं बापूंशीं चर्चा करण्याचा त्यांना विचारसुद्धां येत नसे. बापूजींनीं सरकारला पत्र लिहिलें. बांना सारी रात्र रस्त्यावर राहूं देण्याची राजकोट सरकारला हिंमत झाली नाहीं. त्यांना परत मुक्कामाचे जागीं नेण्यांत आलें. दुसरे दिवशीं रीतसर कागदपत्र करून बा, मणिबहेन, व मृदुलाबहेन यांना सोडून दिलें. दुपारीं तिघीजणी बापूजींजवळ आल्या. त्या दिवशीं बापूजींची स्थिति जरा गंभीर होती. बा त्यांच्या सेवेंत तल्लीन होऊन गेल्या. आपला थकवा, आजार सगळें पार विसरून गेल्या.

## पहिला गंभीर आजार

बापूजी राजकोटहून कलकत्याला व तेथून गांधी–सेवासंघाच्या संमेलनासाठीं वृंदावनाला गेले. तेथून परत राजकोटला आले. वाटेंत

दिल्लीला उतरले, तेथें बांना ताप आला. मी दोनचार दिवस बांना प्रवास करूं देऊं नये म्हणून बापूंना सांगितलें. पण बापूंनीं तें मान्य केलें नाहीं. गाडींतच बांना १०५° अंश ताप चढला. पण बापू बरोबर होते म्हणून त्यांना कांहीं चिंता नव्हती. राजकोटला पोंचल्यावर औषधपाणी अन् शुश्रूषा केल्यावर बा बऱ्या झाल्या. पण कांहीं दिवसांनीं सरहद्द प्रांतांत जाण्यासाठीं बापू मुंबईस गेले असतां तेथें बा फार आजारी पडल्या. तापाच्या स्थितींतच आगगाडीचा प्रवास केल्यामुळें मुंबईत बांना त्रिदोष झाला. पण बांच्यामधें बरें होण्याची शक्ति अद्भुत होती. ताप उतरल्यावर बापू सरहद्द प्रांतीं गेले. बांना बरोबर जायची इच्छा होती, पण अशक्तपणामुळें आठदहा दिवसानंतर जायचें ठरविलें. मी व भाई बांबरोबर मुंबईस राहिलों. त्या वेळच्या बांच्या सहवासाची व नंतर सरहद्द प्रांताच्या प्रवासाचीं स्मरणें फार गोड आहेत. त्यावेळीं बांच्या सेवेवांचून मला दुसरें कसलेंहि काम नव्हतें. सबंध दिवस मी त्यांच्या सेवेमधेंच असें. बासुद्धां आम्हां भावा-बहिणींबरोबर एखाद्या मित्राप्रमाणेंच वागत. मला असें आढळलें कीं, बांचें मन अगदीं ताजें आहे व नवीं नवीं दृश्यें व नवीन नवीन वस्तूंबद्दल त्यांना फार आवड आहे. बा माझ्यावर सख्ख्या मुलीसारखें प्रेम करीत. आईला नेहमीं वाटतें कीं आपल्या मुलांसारखीं हुशार जगांत दुसरीं कोणीं नाहींत. बांना-सुद्धां वाटे कीं त्यांच्या सुशीलाचें डॉक्टरी ज्ञान फार गाढ आहे. मला त्यामुळें गोंधळल्यासारखें होई. मला माझे दोष कळत होते. पण माझी संमति घेतल्याखेरीज मोठमोठ्या डॉक्टरांच्या औषधानेंहि बांना संतोष होत नसे. बांच्या या प्रेमामुळें व विश्वासामुळें डॉक्टरी ज्ञान वाढविण्याच्या माझ्या इच्छेला अतिशय उत्तेजन मिळालें.

## दुसरा गंभीर आजार

सरहद्द प्रांतांतून परत आल्यावर मी माझा अभ्यास संपविण्यासाठीं व एम्. डी. ची परीक्षा देण्यासाठीं दिल्लीसच जाऊन राहिलें व अभ्यास सुरू केला. तेथें बापूजींचें पत्र आलें कीं : "बा आजारी असते व रोज म्हणते कीं मला सुशीलाजवळ पाठवून द्या. मी तिला पाठवूं कीं नको त्याचें तूं तारेनें उत्तर दे." मी लगेच तार केली कीं बांना खुशाल येऊं द्या. बा दिल्लीला आल्या. एकट्याच आल्या होत्या. अशा वयांत अशी अशक्त

प्रकृति असतांना बांना एकट्यांना पाठवायला नको होतें, अशी मीं बापूंच्या जवळ तक्रार केली. महादेवभाईनीं लिहून कळविलें कीं बापूजींनीं बांना एकट्यांनाच पाठविण्यास सांगितलें व बांनाहि वाटलें कीं आपण एकट्या जाऊं शकूं; म्हणून मी त्यांना गाडींत बसवून आलों व बरोबरच्या प्रवाश्यांना त्यांच्याकडे लक्ष ठेवण्यास सांगितलें होतें. बा म्हणाल्या, "पण त्यांत काय झालें? तूं उगाचच काळजी करतेस. सरळ प्रवास होता. गाडींत बसून राहावयाचें होतें. तेथें महादेवभाईनीं बसवून दिलें व येथें तुम्हीं उतरून घेतलें. एवढें पुरें नाहीं?" मी चूप बसलें. अशा तऱ्हेच्या दृढता आणि आत्मविश्वासापुढें कोण काय बोलूं शकणार?

बा देवदासभाईकडे उतरल्या. मी दिवसांतून दोनतीन वेळां त्यांना पाहावयास जाई व औषध वगैरे लावून येत असें. तेवढ्यांत ईस्टरची सुट्टी आली. बापूजींनीं मला सेवाग्रामाला बोलाविलें. मी माझ्या अभ्यासासाठीं मुंबईस जावयाचा कार्यक्रम पूर्वीपासूनच ठरविला होता. बा सेवाग्रामहून मुद्दाम खास माझ्याकडे आल्या होत्या. अर्थात् बांनीं म्हटलें कीं, "तूं जाऊन ये, मी आठदहा दिवस येथेंच राहीन." पण मला तें बरें वाटलें नाहीं. म्हणून बापूजींना तार करून बांपाशीं राहण्यास परवानगी मागितली. बांना मूळव्याधीवर इंजेक्शन देण्यासाठीं मी त्यांना इस्पितळांत घेऊन गेलें. दुपारीं माझ्या खोलीवर घेऊन आलें. बांनीं दोनचार दिवस माझ्याच जवळ राहण्याची इच्छा दर्शविली. मला याहून अधिक आनंदाची गोष्ट दुसरी कोणती असूं शकणार? पण मी बांची फारशी सोय करूं शकणार नाहीं, अशी मला धाकधुक वाटली. मी इस्पितळांत जाईन त्यावेळीं बा एकट्या येथें कशा रहातील? पण बांना त्याची पर्वा नव्हती. "सकाळ संध्याकाळ तूं मला प्रार्थना ऐकविलीस तर मला बरें वाटेल. एवढ्यासाठींच माझी येथें रहायची इच्छा आहे." मी देवदासभाईंच्या घरीं जाऊन बांना प्रार्थना म्हणून दाखविण्यास तयार होतें. पण, मी त्यांना येथें राहूं देऊं इच्छीत नाहीं, असें बांना वाटेल म्हणून या बाबतींत मी फार आग्रह केला नाहीं. मला त्यांच्या सोयीच्या दृष्टीनेंच त्यांना माझ्या येथें ठेवण्यास संकोच वाटत होता. पण मी त्यांच्या आग्रहाच्या अधीन झालें.

बांना आरामशीर वाटावें म्हणून दुपारीं मी खूप पाणी टाकून खोली थंड केली. विजेचा पंखा होताच. बांना खूप आराम वाटला व त्या खूप निजल्या. पण त्यांना एवढा गारवा सहन होऊं शकला नाहीं. दुसऱ्या दिवशीं थोडा ताप आला. तिसरे दिवशीं लक्ष्मीवहिनी आल्या व त्यांना आपल्या घरीं घेऊन गेल्या. कारण त्या रोज आल्यावांचून राहत नसत आणि उन्हांतून येण्याजाण्यांत मुलांना फार त्रास होत असे. बांचा आजार लांबला. त्यांना लघवीच्या वेळीं त्रास होऊं लागला. त्रिदोषाचा सुद्धां थोडा परिणाम होता. मी माझी परीक्षा विसरून जाऊन बांच्या सेवेला लागलें. ईश्वराची सारखी प्रार्थना करीत होतें कीं, हे भगवन्ता, बा बऱ्या होणें हीच माझी एम्. डी. ची डिग्री आहे. मला तर काळजीनें घेरलें होतें. बा सेवाग्रामहून मुद्दाम माझ्याकडे आल्या व आतां जर त्यांना कांहीं झालें तर मी बापूंना तोंड कसें दाखवूं ? शेवटीं भगवन्तानें माझी लाज राखली. बांची तब्येत हळू हळू सुधारूं लागली. त्या वेळीं बापूजी रोज बांना पत्र लिहीत असत. जेव्हां मी बापूंचें पत्र घेऊन बांकडे जाईं तेव्हां बांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें नवेंच तेज दिसूं लागे. बांना बऱ्या करण्यांत त्या पत्रांचा फार मोठा हिस्सा होता. बा बऱ्या होऊन सेवाग्रामला गेल्या. देवदासभाई सहकुटुंब त्यांना पोंचविण्यास गेले होते. बा ज्या दुखण्यावर इलाज करण्यास आल्या होत्या तेंहि बरें झालें होतें. थोड्या अशक्तपणाशिवाय बांची तब्येत अगदीं छान झाली होती.

## अंतिम कारावासाची तयारी

१९४२च्या ऑगस्टमध्यें मी दिल्ली हॉस्पिटलमध्यें होतें. पांच कीं सहा ऑगस्टला मला बातमी कळली कीं काँग्रेस महासमितीची बैठक पुरी झाल्यावर सेवाग्रामला पोंचण्यापूर्वींच बापूंना पकडणार आहेत. प्रिन्सिपालकडून चार पांच दिवसांपुरती रजा घेऊन बा, बापू व भाई यांना भेटण्यासाठीं मी मुंबईस आलें. ८ तारखेला सायंकाळीं मी पोंचलें. बापूजी, भाई वगैरेंना मला पाहून फारच आश्चर्य वाटलें. माझी तार त्यांना मिळाली नव्हती. बा महासमितीच्या बैठकीला आल्या नव्हत्या. त्या 'बिरला हाऊस' मध्येंच होत्या, व नेहमींप्रमाणें बापूंच्या सेवेंत गर्क होत्या. महासमितीहून परत आल्यावर प्रार्थना करून जवळ जवळ बारा वाजतां आम्ही झोंपलों.

सकाळीं ४ वाजतांच्या प्रार्थनेच्या वेळीं महादेवभाईंनीं सांगितलें कीं, बापूंना पकडण्यासाठीं येत आहेत असे टेलिफोन रात्रीं एक वाजेपर्यंत सारखे येत होते. बापू म्हणतात, "मला कोणी पकडणार नाहीं. सरकार कांहीं एवढें मूर्ख नाहीं कीं माझ्यासारख्या मित्राला पकडील; आणि आजच्या माझ्या भाषणानंतर कोणी पकडीलच कसें ?"

बापूंच्या या आत्मविश्वासाचा बापूंच्या मंडळीपैकीं इतर सर्वांवर परिणाम होत होता. बांनीं मला म्हटलें, "तूं इतकी धावपळ करून कशाला आलीस ? बापू सेवाग्रामला परत जाईपर्यंत तुझें कामहि पुरें झालें असतें, म्हणून तेव्हांच यायचें होतेंस ना ?" पण तो आत्मविश्वास खोटा ठरला. ९ ऑगस्टला सकाळीं साडेपांचला महादेवभाई धावत आले. "बापू, पकडायला आले आहेत." बापू झट्कन् तयार झाले. पोलीस अंमलदारानें तयारीसाठीं अर्धा तास दिला. सर्वांनीं मिळून प्रार्थना केली, "हरिने भजतां हजी कोईनी लाज जती नथी जाणी रे." ('हरिला भजतां अजुन कुणाचीहि लाज हरिलि नच कळलें रे') सहा वाजतां बापू, महादेवभाई व मीराबहेन यांना पोलीस घेऊन गेले. बा व भाई यांची इच्छा असल्यास त्यांना बरोबर येतां येईल असें पोलीसांनीं सांगितलें. बापूंनीं बांना म्हटलें, "तुला राहवत नसलें तर खुशाल ये; पण मला तर असें वाटतें कीं तूं माझ्याबरोबर येण्याऐवजीं माझें काम करावेंस."

बांना एवढें बस होतें. त्यांनीं कांहींहि वाद न घालतां बापूंचें काम करण्याचा निश्चय केला. बापूजी सायंकाळीं शिवाजी पार्कमध्यें जाहीर सभेंत भाषण करणार होते. बांनीं जाहीर केलें कीं, त्या सभेंत आपण स्वतः भाषण करूं.

बापूंच्या अटकेची बातमी साऱ्या शहरांत विद्युद् वेगानें पसरली. लोकांचे थवेच्या थवे बिरला हाउसकडे लोटले. बांचा दरबार सबंध दिवस भरलेला होता. त्या थकून भागून गेल्या होत्या. बापूंच्या अटकेसाठीं त्या मुळींहि तयार नव्हत्या. तरीहि त्या धीरानें शारीरिक व मानसिक थकव्याची पर्वा न करतां. बसलेल्या होत्या.

इतक्यांत बातमी आली कीं, बहुत करून सभेला जाण्यापूर्वीं रस्त्यांतच बांना पकडून नेतील. जर बांना पकडलें तर त्यांची अशी अशक्त स्थिति असल्यामुळें मला त्यांच्याबरोबर गेलें पाहिजे, म्हणून मी माझें व बांचें सामान बांधलें.

मग बांनीं माझ्याकडून एक पुरुषांना उद्देशून व एक स्त्रियांना उद्देशून असे दोन संदेश लिहवून घेतले. बस, वाणीचा प्रवाह अस्खलित चालला होता. संदेश सांगत असतां बांना कसलाच विचार करावा लागत नव्हता. स्त्रियांसाठीं असलेल्या संदेशांत बांनीं खालीलप्रमाणें लिहविलें :

"महात्माजी तर तुम्हाला ~~खूप सांगून मग गेले आहेत. काल त्यांनी~~ अडीच तासपर्यंत महासमितीच्या बैठकींत आपलें अंतरंग मोकळें केलें आहे. त्याहून विशेष सांगण्यासारखें काय असणार ? आतां त्यांच्या सूचना अंमलांत आणावयाच्या आहेत. स्त्रियांनीं आपलें पाणी दाखविण्याची वेळ आली आहे. सर्व जातींच्या स्त्रियांनीं मिळून या लढ्याला शोभा आणावी. सत्य व अहिंसेचा मार्ग सोडूं नये."

## अटक

संध्याकाळीं पावणे पांच वाजतां बा व मी सभेस जाण्यास निघालों. पोलीस अंमलदार दरवाजापाशींच उभा होता. तो हात जोडून म्हणतो, "माताजी, आपलें वय घरांत बसून आराम घेण्याचें आहे. आपण सभेला गेलां नाहींत तर ?" पण बा कुठल्या ऐकायला ? तेव्हां आम्हां दोघींना गिरफदार करण्यांत आलें. कारण, पोलीसांना अशी बातमी लागली होती कीं, जर बांना पकडलें तर सभेंत मी भाषण करणार आहें. पोलीसांच्या कानावर अशीहि गोष्ट गेली होती कीं, आम्हां दोघींना पकडल्यावर भाई सभेंत भाषण करणार आहे. म्हणून त्यांनाही आमच्याच बरोबर पकडण्यांत आलें. बापूजी पकडले गेले तेव्हां असें सांगून गेले होते कीं, स्वातंत्र्याच्या प्रत्येक सैनिकानें 'करेंगे या मरेंगे' चा बिल्ला आपल्या कपड्यावर शिवून टाकावा. कनूनें कागदाच्या एका तुकड्यावर तो मंत्र लिहून आम्हांला दिला. बांना देऊं लागला तेव्हां बा म्हणाल्या, "मला याची काय जरूर आहे ?" तो मंत्र तर त्यांच्या मनांत भरलेलाच होता. बाहेर दाखविण्याची काय जरूर होती ?

मोटार आम्हां तिघांना घेऊन निघाली. बांच्या चेहऱ्यावर दुःख होतें. त्यांच्या डोळ्यांत आसवें होतीं. मी विचारलें, "बा, तुम्ही कां बरें घाबरलां आहांत ?" त्या कांहीं बोलल्या नाहींत. त्यांचें शरीर गरम होतें. मी धीर देण्याचा प्रयत्न केला. तेव्हां बा बोलल्या, "यावेळीं आपल्याला जिवंत बाहेर येऊं देणार नाहीं. मुली, हें सरकार पापी आहे."

मी म्हटलें, "होय बा, पापी तर आहेच, तेव्हां त्याचें पापच त्याला गिळून टाकील आणि बापूजी फत्ते मिळवून बाहेर पडतील."

मोटार आर्थररोड जेलच्या समोर येऊन उभी राहिली. रस्त्यावरून कित्येक लोक जात येत होते. ते मुळींहि लक्ष न देतां पुढें निघून गेले. मला आश्चर्य वाटलें. काय, हे लोक बांना ओळखीतच नसावेत ? आज काय घडलें आहे त्याची या लोकांना कांहींच माहिती नाहीं ?

दरवाजा उघडला. आम्हाला ऑफिसांत घेऊन गेले. थोड्या वेळानें स्त्रीविभागाची मेट्रन बांना व मला आंत घेऊन गेली. आंत गेल्यावर मी बांचें आंथरूण घातलें. बांना ९९॥ ताप होता. त्यांना कांहीं खायचें नव्हतें व खूप थकल्या होत्या, तेव्हां पडल्याबरोबर झोंपीं गेल्या.

## आर्थररोड जेलमध्यें

ता. १०-८-'४२

रात्रीं जवळ जवळ दोन वाजतां कांहीं आवाज ऐकून मी उठलें. पाहिलें तों बा पायखान्यांतून येत होत्या. रात्रीं त्यांना जुलाब होऊं लागले होते. मी उठण्यापूर्वीं बरेच वेळां त्यांना शौचाला जावें लागलें होतें. मी उठून बांना आधार दिला व आंथरुणावर निजविलें. दुसरे दिवशीं डॉक्टर आले तेव्हां मी बांच्या आजारामुळें त्यांच्यासाठीं खास आहाराची मागणी केली. त्यांनीं म्हटलें, "विकत आणवूं शकतां." मी म्हटलें, "मग तुम्ही आमच्या कोणा तरी मित्राला टेलिफोन करा. ते पैसे पाठवितील, कारण आमच्यापाशीं विकत घ्यायला पैसे नाहींत." पण जेलरनें म्हटलें, "टेलिफोन करतां येणार नाहीं, कारण सरकारचा असा हुकम आहे कीं बाहेरच्या जगाबरोबर तुम्हांला कांहींहि संबंध ठेवतां येणार नाहीं." हें तर फार विचित्र म्हटलें पाहिजे ! मी डॉक्टरनां म्हटलें, "आज तरी तुम्ही इस्पितळांतून सर्व पाठवा. नाहींतर आपल्या स्वतःच्या खिशांतून खर्चून. वेळ आली म्हणजे मी तुम्हांला पैसे देऊन टाकीन." खूप सांगितल्यावर संध्याकाळीं दोन सफरचंदें आलीं. त्यांचा रस काढायला साधन तर कांहींच नव्हतें. बांना सबंध दिवस जुलाब होतच होते. मला काळजी वाटूं लागली कीं आतां काय होणार ? औषधाविषयीं सांगितलें, पण औषधाची कांही तजवीज झाली नाहीं.

बांच्या चेहऱ्यावर व्याकुळता दिसत होती. मीं दोन तीन वेळां इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी काढण्याचा प्रयत्न केला, पण कांहीं जमलें नाहीं. बांना आजहि थोडा ताप होता. जुलाबांमुळें अशक्तपणा वाटत होता. आम्हांला ज्या खोलींत ठेवलें होतें तेथील हवा इतकी वाईट होती कीं आंत जाऊन बसल्याबरोबर डोकें जड होत होतें. मेट्रनलाहि तसेंच वाटलें व तिनें आम्हांला आपल्या स्वतःच्या खोलींत बसायला सांगितलें. मी तेथें बांसाठीं आंथरूण घातलें व बा थोडा वेळ निजल्या. पण बांना लगेच संडासांत जावें लागलें. वारंवार एवढें जायचें यायचें बांच्या शक्तीबाहेरचें होतें. म्हणून आम्ही परत आमच्या खोलींत गेलों. बानीं मला आग्रहानें त्या खोलींतून बाहेर जायला सांगितलें. पण मी थोड्याच वेळांत परत आंत गेलें. त्यावेळीं दुसरी एक बाई आमच्या खोलींत आली होती. ती तीन चार लहान मुलांना सोडून आली होती. बांनीं अतिशय प्रेमानें तिला सर्व हकिकत विचारली. तिचें दुःख व चिंता पाहून बा आपलें दुःख विसरून गेल्या. त्या तर तमाम हिंदुस्तानच्या बा होत्या ना! सबंध हिंदुस्तानच दुःखी असतां एकेका व्यक्तीच्या दुःखाची गोष्ट करून काय उपयोग! बांची चिंता व दुःख स्वतःबद्दल नव्हतें. त्यांना दुसऱ्याच काळजीनें बेचैन केलें होतें: "बापूजी हिंदुस्तानचीं दुःखें दूर करण्यांत यशस्वी होऊं शकतील?" मी म्हणें, "बा, तुम्ही कशाला चिंता करतां? बापूंनीं भगवन्ताचा आश्रय घेतला आहे व शुभ हेतूनें सर्व केलें आहे. त्यांना यश देणारा भगवान् बसलाच आहे." बा चूप बसल्या. पण त्यांच्या डोळ्यांत व चेहऱ्यावर वेदना दिसत होती.

पहिल्या दिवशीं आम्ही झोंपीं गेल्यावर आम्हां तिघींना आंत कोंडून ठेवण्यांत आलें. म्हणून दुसरे दिवशीं आम्हीं संध्याकाळपासूनच बाहेर आंथरुणें घालून ठेविलीं. मेट्रन जेलरकडे गेली. जेलरनें तिला आमच्या बरोबर घासाघीस करूं नको म्हणून सांगितलें. बाहेर निजण्याचें एक कारण असें होतें कीं खोलींतील हवा कोंदट होती. विमानी हल्ल्यांत संरक्षणासाठीं सर्व खिडक्यांचा पाऊण भाग बांधून काढला होता. संडासाचा पाट फुटून गेला होता. म्हणून फारच दुर्गंध येत होता व खोलींत फारच दमटपणा होता. व्हरांड्यावरहि उंच भिंती घातलेल्या होत्याच, तरीहि खोलीपेक्षां थोडें बरें होतें.

बा थकल्या होत्या त्यामुळें लगेच झोंपीं गेल्या. बा उठल्या म्हणजे प्रार्थना करून घेऊं, म्हणून आम्ही दोघी आंथरुणावर पडल्या पडल्या वाट पाहत होतों. नऊ वाजतां मेट्रननें येऊन सांगितलें कीं, ११ वाजतां तुम्हां दोघींना येथून घेऊन जाणार आहेत. मी उठून सामान बांधलें. १० वाजतां बा जाग्या झाल्या. त्यांना त्या दुसऱ्या बाईंच्या आंथरुणावर बसवून त्यांचें आंथरुणहि बांधून टाकलें. मग प्रार्थना सुरू केली. रामनामाची धून चालली होती, तेवढ्यांत जेलर आले. करतां फळें मागविण्यासाठीं मजजवळ पैसे नव्हते, ही सकाळची गोष्ट ऐकून त्या नव्या बाईनीं आपलें पाकीट मला देऊन टाकलें. त्यांत वीसएक रुपये होते. त्यांतून पांच रुपयांची एक नोट मी घेतली. त्याबाई रंगीत साडी आणण्यास विसरल्या होत्या म्हणून मी त्यांना माझी एक रंगीत साडी दिली. माझ्या मनांत आलें कीं कदाचित् जेलमध्यें मरून गेलें तर माझ्या डोक्यावर कोणाचें देणें तरी राहणार नाहीं ना !

आम्ही ऑफिसांत गेलों. बांनीं सुपरिन्टेन्डेन्टना विचारलें, "कोठें घेऊन जात आहांत ? येरवड्याला कीं बापूंकडे ?" मेट्रनला विचारलें तेव्हां उत्तर मिळालें नव्हतें. पण येथें उत्तर मिळालें, "बापूजींकडे." हें ऐकून आमच्या मनावरील बराचसा भार कमी झाला. आम्हांला स्टेशनवर नेऊन एका वेटिंग रूममध्यें बसविलें. मला झोंप येत होती पण बा अगदीं जाग्या होत्या. स्टेशनवर नेहमींप्रमाणें ये-जा व गोंगाट चालूच होता. बा लक्षपूर्वक तें सर्व पाहत होत्या. एकदम म्हणाल्या, "सुशीला, पहा, दुनिया रोजच्या-सारखीच चालली आहे. जणूं कांहीं घडलेंच नसावें ! बापूजींना स्वराज्य कसें मिळणार ?" त्यांच्या आवाजांत एवढें कारुण्य होतें कीं माझ्या डोळ्याला पाणी आलें. मी म्हटलें, "बा, बापूंना ईश्वराचें साहाय्य आहे ना ? सगळें उत्तम होऊन जाईल."

पोलीस अंमलदार आला. गाडीची वेळ झाली होती. आम्हाला पहिल्या वर्गाच्या एका लहान डब्यांत बसविलें. गाडी पुण्याकडे निघाली.

## आगाखान महालांत प्रवेश

११–८–'४२

सकाळीं सात वाजतां आगगाडी एका लहान स्टेशनावर आली. एक पोलीस अंमलदार आम्हाला घेण्यास आला होता. सबंध रात्र बांना

जुलाब होत होते, त्यामुळें त्या अगदीं अशक्त झाल्या होत्या. स्टेशनावर खुर्ची ठेवण्यांत आली होती. पण बांनीं खुर्चींत बसण्यास नकार दिला. बांचा स्वभावच असा होता कीं, जोंपर्यंत शरीर काम करीत राहील तोंपर्यंत दुसऱ्यावर भार टाकायचा नाहीं. बा चालतच स्टेशनच्या बाहेर आल्या. एक मिनिट देखील चालावें लागलें नाहीं. बाहेर मोटार तयार होती. जवळजवळ अर्ध्या तासांत मोटार आगाखान महालाच्या दरवाजाशीं आली. पहारेकऱ्यांनीं एक मोठा दरवाजा उघडला. जरा पुढें गेल्यावर एक तारेचा दरवाजा उघडला. मोटार पोर्चमधें उभी राहिली. बा माझ्या आधारानें हळूहळू पायऱ्या चढल्या. व्हरांड्यांत कैदी झाडीत होते. आम्ही विचारलें, "बापूंची खोली कोणती ?" एकानें उत्तर दिलें, "शेवटची." बा माझ्या आधारानें हळूहळू बापूंच्या खोलींत आल्या. बापू एका उंच गादीवर बसले होते. हातांत एक पेन्सिल घेऊन खूप लक्षपूर्वक कांहींतरी सुधारीत होते. महादेवभाई जवळच उभे होते. कांहीं-तरी चर्चा चालली होती. आम्ही त्यांच्या अगदीं जवळ गेलों तेव्हां महादेवभाईनीं आम्हाला पाहिलें. ते फार खूष झाले, पण बापूंच्या भुंवया जरा चढल्या. त्यांना वाटलें कीं, 'बा माझा वियोग सहन करूं न शक-ल्यामुळें दुबळेपणाच्या आहारीं जाऊन माझ्या मागोमाग तर आली नाहीं ना ? ती आपलें कर्तव्य विसरली नाहीं ना ?' जरा कडक आवाजांत बापू बोलले, "तूं येथें येण्याची मागणी केली होतीस कीं त्या लोकांनीं तुला पकडलें ?" बा तर कांहीं वेळ गप्प होऊन गेल्या. बापू काय विचारीत आहेत हेंच त्यांना समजेना ! मी म्हटलें, "नाहीं बापूजी, पकडल्या जाऊन आलों आहोंत." आतां बा समजल्या. "नाहीं, नाहीं, मी मागणी नव्हती केली. या लोकांनीं आम्हाला पकडलें आहे." तितक्यांत आमचा पोलीस रक्षक आला व म्हणाला, "तुमचें सामान पाहून घ्या." मी बांना बसण्यास सांगितलें, पण त्या सामान पाहून घेण्यास तो लांबलचक व्हरांडा चालून पोर्चपर्यंत आल्या. स्फूर्ति व नीटनेटकेपणा हीं त्यांच्या स्वभावांत खचून भरलेलीं होतीं. शिवाय बापूंना भेटतांच त्यांच्या शरीरांत जणूं कांहीं नवीन चैतन्य आलें होतें. कितीहि नको म्हटलें तरी त्या सामान पाहून घेण्यास जात असतां त्यांना कोणी अडवूं शकलें नाहीं.

मी बांच्या आजाराविषयीं बोललें तेव्हां महादेवभाईनीं त्यांच्यासाठीं आंथरूण तयार केलें. आम्ही सामान पाहून परत येत असतां वाटेंत त्या जेलचे सुपरिन्टेन्डेन्ट मि. कटेली भेटले. फारच आदरपूर्वक ते बांना आंत घेऊन गेले. आम्ही एकदां आंत जाऊन आल्याचें त्यांना माहीत नव्हतें. बांना आंथरुणावर निजवून मी त्यांच्यासाठीं प्रिस्क्रिप्शन लिहिलें. पण बांचे जुलाब बापूंच्या दर्शनानें व मनावरील भार हलका झाल्यामुळें आपोंआप बंद झाले होते. औषधाचा एक भाग दिला. दुसरा द्यायची जरूरच पडली नाहीं. कदाचित् एकहि दिला नसता तरी चाललें असतें.

दुसऱ्या दिवसापासून बा आंथरुणावरून उठून थोडथोडें फिरूं लागल्या. बापूंच्या जेवणाचे वेळीं त्या त्यांच्यापाशीं बसत व त्यांना वाढीत. नेहमींप्रमाणें एका हातांत पंखा घेऊन बा माशी अन् मच्छर उडवून लावीत. त्यावेळीं आगाखान महालांत माश्या व मच्छरांचा फार उपद्रव होता. मालिश करण्याच्या वेळींहि मच्छर हाकलावे लागत. नाहीं तर त्यावेळीं बापू झोंपूं शकत नसत. पहिले एकदोन दिवस महादेवभाईनीं मच्छर घालवले पण मग तें काम बांनीं आपल्याकडे घेतलें. जवळ जवळ १॥ तास खुर्चीवर बसून बा पंखा सतत चालू ठेवीत. आपण माशी किंवा डांस आला म्हणजे उडवूं, पण बांचा पंखा माशी किंवा मच्छर जवळ येऊं नये म्हणून सतत चालूच राही.

## गव्हर्नर व व्हाइसरॉयना पत्रें

बा व मी मंगळवारीं आगाखान महालांत पोंचलों होतों. त्याच दिवशीं बापूंनीं मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड लुम्लींना पाठवायचें पत्र पुरें केलें होतें. महादेवभाईनीं त्याची पक्की नक्कल लिहिली, व टपालांत टाकण्यासाठीं पत्र सुपरिन्टेन्डेन्टजवळ दिलें. चिंचवड स्टेशनवर पोलिसांनीं एका सत्याग्रही युवकाबरोबर कसें खराब वर्तन केलें होतें त्याचें वर्णन बापूंनीं या पत्रांत केलें होतें; वर्तमानपत्रें मागितलीं होतीं व सरदार अन् मणिबहेन यांना आगाखान महालांत रहाण्यास येऊं देण्यासंबंधीं सूचना केली होती. पत्र पाठविल्यावर सर्वजण विचार करूं लागले कीं, सरदार आले तर त्यांना कोणती खोली द्यावी. सरदार आले तर हंसवून खिदळवून बापूंना आनंदी

ठेवतील म्हणून महादेवभाई खुषींत होते. बाहि त्यांच्या आगमनाच्या विचारानें खुषींत होत्या.

बापूंनीं दुसरें पत्र व्हाइसरॉयनां लिहावयास सुरुवात केली. तें पत्र सर्वांना अगदीं लक्षपूर्वक वाचून पाहण्यास व कांहीं सूचना करण्यास सांगितलें होतें. आम्ही सर्व त्याच्या कच्च्या प्रती बनविण्यांत मदत करीत होतों, पण महादेवभाईंवर सर्वांत जास्त भार होता. अखेरीस शुक्रवारीं तें पत्र तयार झालें. महादेवभाई शेवटची पक्की नक्कल लिहून बापूंपाशीं आले व म्हणाले, 'याची नक्कल करण्यास मला दोन तास लागले.' अक्षर मोत्याच्या दाण्यासारखें होतें. बापू घटकाभर महादेवभाईंच्या सुंदर अक्षराकडे पाहतच राहिले. नंतर सही करून तें पत्र सुपरिन्टेन्डेन्टजवळ दिलें. तें पत्र पाठविल्यावर आम्हीं सर्वांनीं मुक्ततेचा श्वास सोडला.

या चारपांच दिवसांत बांची तब्येत बरीच सुधारली होती. शक्तीहि आली होती. हिंडूफिरूं लागल्या होत्या. स्वैंपाकघरांतहि जात, व त्यांनीं स्वतःचा पूजापाठ सुद्धां सुरू केला होता. आनंदांत दिवस चालले होते.

## शनिवार-१५ ऑगस्ट

नेहमीप्रमाणें बापू साडेसात वाजतां फिरावयास निघाले. महादेवभाईहि त्या दिवशीं फिरायला आले. सर्व मंडळी आठ वाजतां फिरून परत आली. बापूजी मालिश करून घेण्यास गेले, व महादेवभाई आपल्या कामाला लागले. बा पंख्यानें वारा घालण्यास आल्या नव्हत्या. त्या दिवशीं आय्. जी. पी. कर्नल भंडारी येणार होते. कैदी व्हरांडयाची झाडझूड झपाट्यानें करीत होते. बा सरोजिनीदेवींच्या खोलींत होत्या.

थोड्या वेळानें कर्नल भंडारींची मोटर आली. सरोजिनीदेवींच्या खोलींत बापू व मी वगळून सर्व मंडळी त्यांच्याबरोबर गप्पागोष्टी करीत होती. मी बापूंना मालिश करीत होतें. मधून मधून महादेवभाई वगैरेंचा हंसण्याचा आवाज ऐकूं येत होता. एकाएकीं आवाज थांबला. मला कोणीतरी मोठ्यानें हांक मारली. मला वाटलें कीं कर्नल भंडारींना भेटण्यासाठीं बोलावीत आहेत. तेवढ्यांत बा स्वतःच धावत आल्या, "सुशीला, लौकर चल, महादेवला फिट् आली आहे!" मी धावत गेलें. महादेवभाईंची

महाप्रयाणाची तयारी चालली होती. नाडी बंद होती, हृदयाची गति बंद होती, श्वास चालू होता, व शरीराचे अवयव ओढत चालले होते.

मी बापूंना बोलाविलें. त्यांनाहि वाटलें कीं कर्नल भंडारींना भेटायला त्यांना बोलावीत असावेत. कुणी तरी म्हणालें, "महादेवभाईंना कांहीं तरी झालें आहे." पण, महादेवभाईंची कायमच्या प्रयाणाची तयारी झालेली होती याची बापूंना काय कल्पना असणार? बापू महादेवभाईंच्या खाटेजवळ येऊन उभे राहिले व 'महादेव, महादेव' म्हणून हांक मारूं लागले. पण कोण उत्तर देणार? बा म्हणूं लागल्या, "महादेव, महादेव, बापूजी आले आहेत. महादेव, बापूजी बोलावताहेत." पण त्या दिवशीं महादेवभाई कुणालाहि उत्तर देणार नव्हते. हळूहळू श्वासहि बंद झाला. पहिलें बलिदान देऊन झालें.

बांना हा वज्राघात सहन करणें कठिण होतें. त्यांनीं धीरानें प्रार्थना वगैरेंत भाग घेतला, पण सतत अश्रुधारा वाहत होत्या. त्यांच्या डोळ्यांपुढें सर्व कांहीं चक्कर चक्कर करीत फिरूं लागलें.

शवाला अग्नि देण्यासाठीं खालीं घेऊन गेले. बासुद्धां आग्रहानें खालीं आल्या. त्यांना अजून पायऱ्या चढण्या-उतरण्याची शक्ति आली नव्हती. पण 'महादेव'ला निरोप देण्यासाठीं बा जाणार नाहींत असें कसें होईल? बांच्या अशक्त तब्येतीमुळें त्यांनीं दहनक्रिया पाहिली नाहीं तर बरें, असें आम्हाला वाटे. पण बांना त्या दिवशीं अडविणें शक्य नव्हतें. चितेपासून थोड्या अंतरावर बांसाठीं खुर्ची ठेवली. बा सगळा वेळ हात जोडून आरडत होत्या कीं, "महादेव, तूं जिथें जाशील तिथें सुखी अस. भाई, तूं सदासर्वदा सुखी अस. तूं बापूंची खूप सेवा केली आहेस. हे भाई, तूं सदा सुखी अस." व मधून मधून उद्‌गारत: "महादेव कां गेला? मी कां नाहीं? ईश्वराचा हा कुठला न्याय!" दहन करून सर्व परत फिरले. सायंकाळचे पांच वाजून गेले होते. घरांत नीरव शांतता होती. कोण कुणाचें सान्त्वन करणार?

बांना सारखें वाटे कीं, 'हें ब्राह्मणाचें मरण, हा मोठा अपशकुन म्हटला पाहिजे'. बापू म्हणत, "हो, सरकारला." पण बांच्या मनांतून ही शंका गेली नाहीं. थोड्या दिवसांनीं मला म्हणतात, "सुशीला, हें ब्रह्म-हत्येचें पाप तर आपणांलाच लागलें ना? बापूजींनीं लढा सुरू केला,

महादेव तुरुंगांत आला, व येथें त्याचा मृत्यु झाला. हें पाप तर आपणालाच लागलें ना ?" मी म्हणें, "तुम्ही असले विचार कां करतां ? महादेवभाईंनीं देशसेवा करीत असतां बलिदान दिलें आहें. त्यांच्या मृत्यूचें पाप कसलें ? आणि जरी असलें तरीहि तें सरकारच्या डोक्यावर बसणार. सरकारनें विनाकारण त्यांना पकडलें. बापूंनीं कुठें लढा सुरू केला होता ?" बा म्हणत, "होय, ही गोष्ट खरी आहे. बापूंनीं लढा सुरू केला नव्हता. बापू तर अजून सरकारबरोबर तडजोडीच्या गोष्टी बोलायला जायचे होते. पण हें सरकारच पापी आहे. त्यानें बापूंना कांहीं करूं दिलें नाहीं."

बांमध्यें खोल धर्मभावना होती. जगांतील कुठलीहि शक्ति त्यांच्या धर्मभावनेला हलवूं शकत नव्हती. त्या नेहमीं तुळशीमातेची पूजा करीत, मीरांबहेननें आपल्या खोलींत ठेवलेल्या बाळकृष्णाच्या मूर्तीला फुलें वाहत. हीं दोन बांचीं मंदिरें होतींच. महादेवभाईंचें चितास्थान हें तिसरें मंदिर झालें होतें. बांच्या अंगांत शक्ति होती तोंपर्यंत त्या नेहमीं बापूंबरोबर चितास्थानीं जात, समाधीला प्रदक्षिणा घालीत व प्रणाम करीत. २ ऑक्टोबरला बापूंचा जन्मदिवस होता. त्या दिवशीं सरोजिनीदेवींनीं एक लहान दीपमाळ लावण्याचें नक्की केलें. बांनीं मला बोलावलें, "सुशीला, शंकराच्यापुढें न विसरतां दिवा ठेवून ये." मला प्रथम कांहीं समजलें नाहीं, मग लक्षांत आलें : "बा, महादेवभाईंच्या समाधीवर दिवा ठेवण्याचें म्हणतां ना ?"

"हो, हो, तेंच तर महादेवाचें—शंकराचें मंदिर आहे ना." बांनीं उत्तर दिलें.

## विद्यार्थिनीरूपांत बा

महादेवभाईंच्या मृत्यूमुळें वातावरण फारच उदासवाणें झालें होतें. अशा तऱ्हेचा मृत्यु बाहेरहि मनुष्यांना अस्वस्थ करून टाकतो, जेलमध्यें तर याचा परिणाम फार लांबवर टिकतो. शेवटीं बापूंनीं उपाय शोधून काढला: "आपण सर्व आपल्या एकएक मिनिटाचा हिशोब ठेवूं या. सगळा दिवस कामांतच घालवूं, म्हणजे वेडेवांकडे विचार मनांत येऊं शकणारच नाहींत. या हिंसेनें भरलेल्या जगांत अहिंसेला आपलें स्थान शोधून काढावयाचें असेल तर त्याचासुद्धां हाच मार्ग आहे." बापू स्वतः सबंध

दिवस कामांतच असत. आतां इतरांचा कार्यक्रमहि त्यांनीं नक्की करून दिला. बांना गुजराती शिकविण्याचें सुरू केलें, गीताहि शिकवूं लागले. भूगोल सुरू केला व केव्हां केव्हां इतिहासहि शिकवूं लागत. दुपारीं जेवल्यावर निजण्या-पूर्वीं बांना कांहीं ना कांहीं वाचून दाखवीत व समजावून सांगत. बांना खूप मजा वाटत असे. त्या अत्यंत आवडीनें शिकण्याचा प्रयत्न करीत. कधीं कधीं तर त्यांना वाईटहि वाटे कीं, हें सर्व शिकायचें फार उशीरां सुरू केलें, पहिल्यापासूनच शिकलें असतें तर किती चांगलें झालें असतें !

बा फारच आवडीनें शिकत; पण त्यांचें मन व मेंदू बापूजींच्यासारखीं तरणीं नव्हतीं. आतां नवीन नवीन विषय शिकणें त्यांना कठिण जाई. बांना पूर्वींचा धडा आठवतो कीं नाहीं तें कळण्यासाठीं सुरुवातीला बापू प्रश्न विचारीत. पण बहुतकरून बांच्या तो लक्षांत राहत नसे. बापू बांवर चिडत नसतच; पण उत्तर देतां न आल्यामुळें बांना फार वाईट वाटे. त्या धडे लक्षांत ठेवण्यासाठीं प्रयत्नहि अतिशय करीत. एक दिवस बापू-जींनीं त्यांना पंजाबांतील नद्यांचीं नांवें शिकविलीं. बापूजी झोंपले तशा त्या माझ्याकडे आल्या, "सुशीला, तीं नांवें मला कागदावर लिहून दे ना." मीं नांवें लिहून दिलीं. तो कागद हातांत ठेवून बांनीं सबंध दिवस नांवें घोकलीं. पण ७४ वर्षांच्या वयाला नवीन गोष्टी शिकण्याची शक्ति कुणा विरळ माणसांतच असते. दुसऱ्या दिवशीं नद्यांचीं नांवे त्या बापूंना सांगू शकल्या नाहींत.

बापूंनीं बांना नैसर्गिक भूगोल शिकवायला सुरुवात केली. रेखांश, अक्षांश आणि विषुववृत्त म्हणजे काय ? हें सर्व त्यांनीं बांना समजावून सांगितलें. बा फारच आवडीनें तें सर्व शिकल्या. पण लक्षांत ठेवणें कठिण होतें. दररोज दुपारीं जेवणानंतर बापू एक नारिंग मागवीत आणि त्यावरून विषुववृत्त वगैरे बांना समजावून सांगत. शेवटीं बांच्या तें सर्व लक्षांत राहिलें. थोड्या दिवसांनंतर एकदां भाई मनूला भूगोल शिकवीत होते. बा तेथें उभ्या राहून ऐकूं लागल्या. भाईंना इंग्रजी नांवें येत होतीं. पण हिंदी नांवांत घोटाळा झाला. बा येऊन मला म्हणतात, "सुशीला, प्यारेलाल ज्याला रेखांश म्हणतो त्याला बापूजी तर अक्षांश म्हणत होते." त्यांचें म्हणणें खरें होतें. भाईंनीं आपली चूक सुधारली.

बापूजींनीं बांबरोबर गुजराती पांचवें पुस्तक वाचावयास सुरुवात केली. त्यांत कविताहि येत. बापूजी कवितांच्या चाली बांना शिकवूं लागले. आठ दहा दिवस रोज संध्याकाळीं प्रार्थनेनंतर बा व बापू त्या कविता म्हणत. आमच्या अम्माजान (सरोजिनी देवी) पुष्कळ वेळां मस्करी करीत. बापू हंसूं लागत व पुन्हा बांबरोबर गायचें सुरू करीत.

बापूंनीं बांना हिंदुस्थानच्या प्रांतांचीं नांवें शिकविलीं. नंतर प्रत्येक प्रांताच्या मुख्य शहराचें नांव शिकविलें. बांनीं तें शिकण्यासाटीं मेहेनत खूप केली, पण जेव्हां बापू विचारीत तेव्हां बांच्या तोंडून बोललें जाई, "कलकत्याची राजधानी लाहोर आहे" किंवा असेंच कांहीं दुसरें उत्तर बा देत.

हळूहळू बांचा उत्साह कमी होऊं लागला. त्या पुष्कळ वेळां म्हणत कीं, "मी आजारी असतें, त्यामुळें माझा मेंदू दुबळा झाला आहे. कांहीं लक्षांतच राहत नाहीं." तरीहि बांनीं अभ्यास सोडला नाहीं. गीतेच्या अभ्यासाला त्या जास्त वेळ देऊं लागल्या. बापूजींपाशीं गीता शिकत. सायंकाळच्या प्रार्थनेनंतर माझ्यापाशीं गीता वाचीत. त्यांचा गीतेचा अभ्यास जवळजवळ मरेपर्यंत चालू होता असें म्हणता येईल.

महादेवभाईंच्या मृत्यूनंतर बा नियमितपणें बापूंबरोबर सकाळ-संध्याकाळ फिरायला जात. बापू केव्हां केव्हां त्यांना फारच जलद चालवीत. पण हा क्रम एक महिन्याहून जास्त चालला नाहीं. एक दिवस त्या बापूंबरोबर खूप जलद ५५ मिनिटें चालल्या. त्याच दिवसापासून त्यांच्या छातींत दुखूं लागलें. बस, त्यानंतर बा बापूजींबरोबर फिरूं शकल्या नाहींत. सकाळीं बापू खालीं बगीचांत फिरत तेव्हां बा वर व्हरांड्यांत थोड्या फेऱ्या मारून खुर्चीवर बसून राहत, व 'आश्रमभजनावली' किंवा 'अनासक्तियोग' वाचीत. जवळजवळ एक तास त्यांचें असें वाचन चाले, नंतर मालिश वगैरे करायला उठत.

बांची वाचण्याची रीत लहान मुलासारखी होती. बापूंनीं त्यांना ही रीत सुधारण्यास सांगितलें. बा बहुधा सकाळीं 'अनासक्तियोग' व दुपारीं वृत्तपत्रें मोठ्यानें वाचीत. बापूंनीं त्यांच्या वाचण्याच्या रीतीवर टीका केली तेव्हांपासून त्यांनीं मोठ्यानें वाचणें सोडलें. दुपारीं वर्तमानपत्रें घेऊन

त्या माझ्याकडे किंवा भाईकडे येत. मागाहून मनू आली तेव्हांपासून ती त्यांना वाचून दाखवी.

बांची लिहिण्याची रीतहि लहान मुलासारखीच होती. त्या प्रत्येक अक्षर सुटें लिहीत. बापूंनीं त्यांना चांगल्या तऱ्हेनें लिहायला शिकविण्याचा प्रयत्न केला, व लिहिण्याची संवय करण्यास सांगितलें. बांमध्यें ७४ वर्षांचे अनुभव व बुद्धिमत्ता यांप्रमाणेंच बालकासारखा सरळपणासुद्धां होता. कोणीहि कांहीं नवीन काम करीत असलें तर त्यांना तें शिकायची हुक्की यायची. नुकतांच माझ्या हातीं बांची १९३१-३३ची डायरी आली. त्यांत मला दिसलें कीं त्या दिवसांतहि कैदेमधें बांची अभ्यासू वृत्ति आजच्यासारखीच होती. त्या मीरांबहेनपाशीं हिंदी शिकत, इतर कुणाजवळ गुजराती शिकत, व कित्येक बायकांना नॅपकिन् तयार करतांना पाहून तें शिकायलाहि त्यांनीं सुरुवात केली. सेवाग्रामांत लहान कहानाला इतिहास-भूगोल शिकतांना पाहून बांनीं तो शिकण्याची सुरुवात केली.

आगाखान महालांत आम्हां सर्वांना वह्या मागवतांना पाहून त्यांनीं बापूजींना स्वतःसाठीं एक वही मागविण्यास सांगितलें. बापूजींनीं त्यांच्या हातांत दोनचार कागद दिले. "यांवर लिहिण्याची संवय कर. थोडीशी प्रगति झाली म्हणजे वही मागवून देईन," असें बापू म्हणाले. बांना यामुळें फार आघात बसला. बापूजींनाहि आपली चूक उमगली. पण आतां काय करणार? सरोजिनीदेवींनीं त्यांच्यासाठीं एक वही मागविली. मी ती बांना दिली. त्यांनीं ती बापूजींच्या पुस्तकांत ठेवून दिली. किती सांगितलें तरी त्यांनीं ती वापरली नाहीं. बापूंनीं दिलेल्या कागदावर लिहिणेंच पसंत केलें. बापूंनीं सुद्धां सांगितलें. पण बा स्वाभिमानी होत्या. "मला नोटबुकाची काय गरज?" त्यांनीं शांतपणें उत्तर दिलें. शेवटपर्यंत ती वही बापूजींच्या पुस्तकांतच पडून राहिली.

## रामायण व भागवत यांवरील श्रद्धा

बांच्या जुन्या डायऱ्यांमध्यें असें लिहिलें आहे कीं, त्या १९३१-३३ मध्यें तीन वेळां जेलमध्यें गेल्या. दर वेळीं त्या नियमानें रामायण व भागवत ऐकत. आगाखान महालांत सायंकाळच्या प्रार्थनेंत तुलशी-रामायणांतील

दोन चौपाया म्हटल्या जात. बा दुपारीं रामायण घेऊन जात व सायंकाळीं म्हणावयाच्या चौपाया पूर्वींच वाचून ठेवीत. त्यांचा अर्थ समजण्याचा प्रयत्न करीत. सेवाग्रामांतहि त्यांचा हाच कार्यक्रम असे. येथें प्रार्थनेनंतर बापूंनीं स्वतः अर्थ समजावून सांगण्याचें सुरू केलें. बांची श्रद्धा अंधश्रद्धा नव्हती. अतिशयोक्ति असेल तेथें त्या म्हणत, "ह्या सर्व गप्पा वाटतात." त्याचप्रमाणें बालकांडांतील दशरथ व जनक यांच्या वैभवाचीं लांबच्या लांब वर्णनें, तसेंच स्वयंवरमंडपाच्या रचनेचें वर्णन करण्यांत पानेंच्या पानें भरलेलीं पाहून बा म्हणत, "बस, तुलसीदासजींना दुसरें कांहीं कामच नव्हतें कीं काय म्हणून ते असलीं लांबलचक वर्णनें लिहीत बसले ?" बापूजींना विचार आला कीं, रामायणांतील लांब वर्णनें, उपाख्यानें वगैरे काढून टाकून एक संक्षिप्त तुलसीरामायण तयार केलें तर बांच्या चांगलें कामास येईल. त्याप्रमाणें रामायणांत खुणा करून ठेवणें सुरू केलें. बालकांड व अयोध्याकांडाच्या थोड्या भागांत खुणा केल्या होत्या. प्रार्थनेंतहि संक्षिप्त रामायणच वाचणें सुरू केलें. बापूंनीं भाईंना म्हटलें, "दररोज दोन चौपायांचा गुजराती अनुवाद सुंदर अक्षरांत बांना लिहून देशील तर त्यांना बरें वाटेल व मलाहि संतोष होईल." भाईंनीं अनुवाद सुरू केला. बापू स्वतः तो अनुवाद सुधारीत. पण पुढें उपवास वगैरे इतर कारणांमुळें बापूंचें बांच्या रामायणांत खुणा करण्याचें व भाईंचें अनुवाद करण्याचें काम अर्धवट राहून गेलें.

बापूंच्या उपवासाच्या वेळीं सायंकाळच्या प्रार्थनेनंतर बांना रामायणांतील चौपायांचा अर्थ समजावून सांगण्याचें माझ्यावर आलें; व नंतर तें काम माझ्याकडेच राहिलें. बा फारच लक्षपूर्वक अर्थ ऐकत. जेथें अतिशय धर्मभावनेनें ओथंबलेल्या चौपाया येत किंवा अतिशय करुण रस येई, अशा ठिकाणीं बा स्वतःच समालोचना करीत. हा क्रम जवळजवळ त्यांच्या मृत्यूपर्यंत चालू राहिला. मरण्याच्या पूर्वीं दोन तीन दिवस बा फार थकलेल्या दिसल्या, डोळे मिटून पडून राहिल्या होत्या. मी विचारलें, "बा, आज रामायणाचा अर्थ करायचा का ?"

बांनीं डोळे उघडले, "विचारतेस काय अर्थ करायचा कां म्हणून ? रामायण आणून अर्थ सांगायला सुरवात कां करीत नाहींस ?" बांनीं जरा चिडून उत्तर दिलें.

मीं म्हटलें, "तुम्ही थकलेल्या दिसलांत म्हणून मीं विचारलें."

बांनीं शांतपणें म्हटलें, "पण पडल्या पडल्या रामायणाचा अर्थ ऐकण्यांत मला कसला थकवा वाटायचा आहे ? अर्थ सांगायला सुरवात कर."

दुपारीं तुलसीरामायणाखेरीज बापूंनीं बांना बालरामायण वाचून दाखविलें. नतर वाल्मीकि–रामायणाचा गुजराती अनुवाद वाचून दाखविला. बा बसून तें ऐकत. पण बापूजींना लवकर पुरें करावयाचें होतें व बा सबंध वेळ बसूं शकत नव्हत्या, तेव्हां तेंहि मीच वाचून दाखवूं लागलें. मागाहून हें काम मनूनें घेतलें. मनूनें बांना सबंध वाल्मीकि–रामायण वाचून दाखविलें. दुपारीं जेवतांना मी बापूंजवळ संस्कृत वाल्मीकि–रामायण वाचीत असें. बाहि त्यावेळीं बसत व फार आवडीनें ऐकत. बांचा आजार वाढल्यावर संस्कृत रामायणाचा अभ्यास बंद करावा लागला. नाहींतर त्यांतूनहि संक्षिप्त रामायण करण्याचा बापूंचा विचार होता. बालकांड व अयोध्याकांडाचा थोडा भाग केलाहि होता.

गुजराती वाल्मीकि–रामायण पुरें झाल्यावर मनूनें बांना 'बारडोलीच्या सत्याग्रहाचा इतिहास' वाचून दाखविण्यास सुरवात केली. पण "हें सगळें मी जाणतेंच," असें म्हणून बांनीं तो बंद केला. बांना धार्मिक पुस्तकांची अधिक आवड होती, म्हणून भागवत मागविलें व सबंध भागवत पुरें केलें. नंतरहि एकादशीसारख्या विशिष्ट तिथीच्या दिवशीं बा भागवत ऐकत. अखेरच्या दिवसांत बांनीं पुन्हां नियमितपणें भागवत ऐकणें सुरू केलें. सायंकाळीं चार ते साडेचार मी भागवत वाचून दाखवीत असें. कोणी भेटीस आल्यास वाचन बंद राही. एकदा पांच सहा दिवस रोज लागोपाठ कुणीतरी भेटावयास आलें. ज्या दिवशीं कोणी आलें नाहीं त्या दिवशीं सुद्धां मी भागवत वाचायला गेलें नाहीं. क्रमांत व्यत्यय आला. बांचा आजार वाढल्यामुळें मला रात्रींहि बरेंच काम पडत असें, म्हणून दुपारीं मी झोंपीं गेलें. भागवताच्या वेळीं जागी झालें, पण थकलें होतें म्हणून आळस केला झालं. बांना आज भागवताची कदाचित् आठवणहि होणार नाहीं अशी आपली मनाची समजूत केली. पण बा थोड्याच विसरणार ? त्यांनीं मनूला बोलावून तिच्याकडून भागवत वाचून घेतलें. त्यानंतर जें कांहीं थोडे दिवस त्यांनीं भागवत ऐकलें तें मनूनेंच वाचून दाखविलें. मला पुन्हां वाचून दाखवायला जाण्याची हिंमत

झाली नाहीं. पण आज मनांतून त्याचा पश्चाताप होत आहे. मला माहीत होतें कीं, भजजवळून भागवत वाचून घेणें बांना जास्त आवडतें. कारण मी थोडाफार अर्थहि समजावून सांगत असें. एक दिवस आळस केला; तरी दुसऱ्या दिवशीं गेलें असतें तर बा मला थोडें बोलल्या असत्या एवढेंच. पण मनांत मात्र खुषच झाल्या असत्या. पण मी तें करूं शकलें नाहीं. मी घटकाभर विसरून गेलें कीं जीवन क्षणभंगुर आहे; सेवेची संधि मिळाली तर कधींहि सोडतां कामा नये.

## व्रत उपवासादि

आगाखान महालांत गेल्यावर बांनीं बापूंना विचारलें, "एकादशी केव्हां आहे ?" बापूंनीं मि. कटेलीना एक पंचांग मागवून देण्यास सांगितलें. बाहेरून कोठलीहि वस्तु मागविण्यास परवानगी मिळवावी लागे व त्यांत वेळ जात असे. तेव्हां बापूंनीं मला एक कॅलेन्डर तयार करण्यास सांगितलें. त्याची रीतसुद्धां सांगितली. बापूजी पकडले गेले त्या दिवसाचीं तिथि-वार आम्हाला माहीत होतीं. त्यावरून सबंध वर्षाचा हिशोब बसविला. माझा एक सबंध दिवस त्यांत गेला. कॅलेन्डरांत पौर्णिमेच्या दिवशीं लाल पेन्सिलीनें व अमावास्येच्या दिवशीं निळ्या पेन्सिलीनें खूण केली. यावरून बापूंनीं बांना मिति सांगितली व एकादशी कधीं येईल तें दाखविलें. जवळजवळ महिनाभर आम्हीं याच कॅलेन्डरवर भागविलें. नंतर आमच्या-कडे पंचांग व कॅलेन्डर दोन्हीं आलीं.

बा नेहमीं एकादशीच्या दिवशीं फलाहार करीत असत. एकाहि एकादशीचा उपास करण्याचें त्या विसरल्याचें मला आठवत नाहीं. अशा रीतीनें प्रत्येक सोमवार, सोमवती अमावास्या, एखादी पुनव, जन्माष्टमी, शिवरात्र वगैरे पवित्र दिवशीं त्या उपवास करण्याचें विसरत नसत. एखाद्या वेळीं सोमवार, एकादशी न दुसरी एखादी पर्वाची तिथि लागून आली तरी बा तीन चार दिवस लागोपाठ उपवास करीत. बऱ्या असोत कीं आजारी असोत यांतील कुठलाहि उपवास सोडण्याचा त्यांना विचारसुद्धां येत नसे. राष्ट्रीय सप्ताह, स्वातंत्र्यदिन व 'क्विट् इन्डिया' दिन हे उपवास वरील उपवासांव्यतिरिक्त येत. तेहि बा कधीं विसरत नसत.

## पातिव्रत्य

बा फार शिकलेल्या नव्हत्या. पण त्यांच्या बुद्धीचा विकास बराच झालेला होता. बापूंवर त्यांची अपूर्व श्रद्धा होती. हिंदु स्त्री पतिव्रताधर्माला सर्वांत उच्च स्थान देते. बासुद्धां बापूंच्या मागून चालण्यांतच आपला धर्म मानीत असत.

तुरुंगांत पुष्कळ वेळां मनू बापूंना गोष्ट सांगायला सांगे. बापूंनीं तिला लहानमोठ्या दोनचार गोष्टी सांगितल्या सुद्धां. एक दिवस मी म्हटलें, "गोष्ट सांगायची तर तुमची स्वतःचीच गोष्ट सांगा ना." बापूंनीं तें कबूल केलें. त्यांची आत्मकथा वाचणें व त्यांच्या तोंडून आत्मकथा ऐकणें या दोहोंत जमीनअस्मानाचें अंतर होतें. बापूंनीं आपलें बाळपण, बांबरोबर खेळणें, विवाह, विलायतला जाणें, दक्षिण आफ्रिकेला जाणें इत्यादि सगळ्या गोष्टी सांगितल्या. मागाहून बांचा आजार वाढल्यामुळें तें बंद झालें. बांनीं हिंदु-धर्माचे आपले जुने संस्कार जिंकून बापूंच्या मागोमाग चालण्याचा कसा प्रयत्न केला त्याचें वर्णन करीत बापू म्हणाले, "मला हें सांगितलें पाहिजे कीं, यांत कुटुंबांतील सर्व स्त्रियांची मला मदत मिळाली. त्या सर्व बांना सांगत, 'इतर लोक खुशाल आपले जुने रीतरिवाज पाळोत, अंत्यजांना घरांत येऊं न देवोत, मुसलमान शिवलेलें पाणीसुद्धां न पिवोत, पण तूं असले विचार सोडलेच पाहिजेत. आपल्या पतीमागून चालणें हाच तुझा धर्म आहे. त्यांच्या पावलावर पाऊल टाकीत असतां तूं कांहींहि केलेंस तरी त्याचें पाप तुला लागणें शक्य नाहीं. त्याचा परिणाम शुभकारकच झाला पाहिजे.' बांनीं नेहमीं त्यांच्या सल्ल्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न केला. तिनें प्रत्येक पाऊल बुद्धिपूर्वक समजून उमजून टाकलें असें म्हणतां येणार नाहीं. पण मी मात्र असें मानीत आलों आहे कीं, बुद्धि हृदयाच्या मागोमाग चालणारी वस्तु आहे. बानें जें कांहीं केलें आहे तें श्रद्धेनें केलें आहे आणि नंतर बुद्धीने सर्व गोष्टी तिनें समजून घेतल्या आहेत."

बा नियमितपणें कांतीत. २०० ते ५०० तार होत. विधायक कार्याचें महत्त्व त्यांना उत्तम प्रकारें समजलें होतें. पण आगाखान महालांत गेल्यावर त्या फार कांतूं शकल्या नाहींत. हृदयाचा रोग सुरू झाल्यामुळें त्यांचें कांतणें बंद करावें लागलें. तें थांबवायला मला किती त्रास पडला

तें सांगणें कठिण आहे:- "अग, कांतून माझ्या हृदयाला काय श्रम होणार आहे?" त्याप्रमाणेंच त्यांचें घरांत हिंडणेंफिरणें थांबविणें सुद्धां कठिण होतें. एक दिवस तर कर्नल भंडारींनीं "हें पहा, आपण विश्रांति घेतली नाहीं तर मला आपल्याला येरवड्याला घेऊन जावें लागेल." असें म्हणून बांना घाबरवलें. बा इतक्या भोळ्या होत्या कीं या खोट्या धमकीचाहि त्यांच्यावर परिणाम झाला. बा अंथरूणावरच पडून राहूं लागल्या. दोनचार दिवसांत तब्येत सुधारूं लागली. पण सूतरहाट सुटला तो सुटला. बांच्या मनांत अशी कल्पना शिरली कीं कांतण्यामुळें हृदयाचा रोग होतो. त्यामुळें मागाहून आम्हीं त्यांना कांतायला सांगितलें तरीहि त्या कांतीत नसत. त्यांना आपल्या दुखण्याच्या विचारापासून अलिप्त ठेवण्यासाठीं सूतरहाट हें उत्तम साधन होईल असें आम्हाला वाटत असे. एकदां दोनदां बांनीं रहाट काढला सुद्धां, पण तो पुन्हा सुरू झाला नाहीं.

## स्पर्शास्पर्श

बामध्यें स्पर्शास्पर्शाची भावना मी कधींहि पाहिली नाहीं. १९३० त मी प्रथमच आश्रमांत गेलें तेव्हां तेथें लक्ष्मी नांवाची एक लहान मुलगी होती. बा आणि बापू तिला आपली मुलगी म्हणत. ती बापूंपाशींच राही व बा आईसारखी तिची निगा ठेवीत. जेव्हां मी आश्रमांतून घरीं गेलें तेव्हां एका बाईनीं मला खोंचून विचारलें, "आश्रमांत धेडाच्या पोरीशीं तुझी मैत्री झाली कीं नाहीं?"

मी विचार करूं लागलें, "धेडाची मुलगी कोण?"

"ती ग, महात्माजींनीं जिला आपली मुलगी मानली आहे ती."

तेव्हां मला कळलें कीं, बा आणि बापू जिला आपल्या मुलीप्रमाणें पाळतात ती लक्ष्मी बांची स्वतःची मुलगी नसून एक हरिजन मुलगी आहे.

याचप्रमाणें सेवाग्राम आश्रमांत हरिजन कामकऱ्यांविषयींहि बा फार उदारपणा व प्रेम बाळगीत असत. स्वतःला कांहीं काम करवून घ्यावेंच लागलें तर तें त्यांना हरिजन सेविका मणिबाईकडूनच करून घेणें पसंत पडे. आगाखान महालांतहि मणिबाई, खंडूमामा वगैरे हरिजन सेवकांची त्यांना फार आठवण होत असे. कधीं चर्चा निघाली तर त्या म्हणत, "शेवटीं

ईश्वरानेंच सर्वांना निर्माण केलें आहे ना? मग कोणी उच्च कसला आणि कोणी नीच कसला? ही भावनाच चुकीची आहे."

## जुने संस्कार

पण त्याबरोबरच जुन्या संस्कारांना त्या संपूर्णपणें विसरूं शकल्या नव्हत्या. ब्राह्मणांबद्दल त्यांच्या मनांत विशेष श्रद्धा व आदर होता. आगाखान महालांत शिपाई आमचें बरेंच काम करीत असत. एक शिपाई ब्राम्हण होता. त्याला स्वैंपाकाच्या कामावर ठेवण्यांत आलें होतें. बांचें त्याच्यावर विशेष प्रेम होतें व त्या त्याला फळें, दूध वगैरे देत. कधीं त्याची चूक झाली तरी कांहीं बोलत नसत. "बिचारा ब्राह्मणाचा मुलगा आहे. इथें दुसरा कसला धर्म होऊं शकत नाहींच. याला कांहीं देतां आलें तर बरें," असें त्या नेहमीं म्हणत.

यावरून दुसरे शिपाई हेवा करूं लागले व सुपरिन्टेन्डेन्टकडे तक्रार गेली. त्यांनीं बांना सांगितलें कीं तुम्ही कुणाला कांहीं देऊं नका. पण बा कसल्या जुमानतात! त्यांनीं, कांहीहि न बोलतां, जसें देत होत्या तसेंच देणें चालू ठेवलें. बा म्हणत, "मी माझ्या वांट्यांतलें देतें. त्यांत बाकीच्यांचें काय जातें?"

एक दिवस त्याला बांनीं विचारलें: "महाराज, तुम्ही ब्राह्मण आहां, सांगा तर मग आम्ही केव्हां घरीं जाणार?" तो बिचारा काय उत्तर देणार! त्यानें म्हटलें, "हो, बा, टिप्पण पाहून सांगेन." मग त्यानें कांहीं सांगितलें कीं नाहीं तें मला माहीत नाहीं.

## हिंदु-मुसलमानांबद्दल समभाव

असें असूनहि बांच्या मनांत इतर जातींतील लोकांबद्दल कुठल्याहि प्रकारें कमी प्रेम किंवा नावड होती असें नाहीं. आगाखान महालांत एक दोन मुसलमान शिपाईहि होते. त्यांच्याशींहि बा चांगल्या तऱ्हेनें मिसळत अन् गप्पागोष्टी करीत. त्यांच्याकडूनहि स्वैंपाक घरांतील कामासारखीं कामें करवून घेत. ईद वगैरे सणांच्या दिवशीं त्यांना फळें व मिठाई देत. शिपायांत हा हिंदु किंवा हा मुसलमान असा कसलाहि भेदभाव त्या बाळगीत नसत. अर्थात इतिहासाच्या पुस्तकांत मुस्लिम सत्तेच्या वेळीं त्यांनीं केलेल्या जुलमांचें वर्णन

येई तेव्हां तें वाचून त्या अस्वस्थ होत. डॉ. अनसारी, हकीमसाहेब अजमलखान, खान अबदुल गफारखान, डॉ. खानसाहेब, मौलानासाहेब ह्या सर्व मुस्लिम मित्रांना पाहून त्यांना पुष्कळ वेळां वाटे कीं, इतिहासांत हें सगळें कशामुळें लिहिलें असेल ? या मुसल्मान मित्रांबद्दल त्यांच्या मनांत सरदार वल्लभभाई किंवा जमनालालजी यांच्याएवढेंच प्रेम अन् मित्रभाव होता. त्यांच्या मनांत असा विचारहि कधीं येत नसे कीं, यांतील अमुक हिंदु आहे अन् अमुक मुसल्मान. आश्रमांत राहणाऱ्या मुसल्मान स्त्रीपुरुषांविषयींहि त्यांच्या वर्तनांत कधीं भेदभाव आढळत नसे. बांच्या डोळ्याला हें मात्र लगेच दिसत असे कीं कोण मनापासून त्यांची सेवा-शुश्रूषा करतें व कोण बापूंना खुष ठेवण्यासाठीं करतें. अशा लोकांकडून सेवाचाकरी करून घेणें त्यांना मुळींच आवडत नसे. मग तो हिंदु असो कीं मुसल्मान. याबद्दल जर कोणी बापूंजवळ तक्रार घेऊन गेलें तर त्या सहजासहजीं त्याला क्षमा करूं शकत नसत.

वृत्तपत्रांतील बापूंबद्दलची टीका वाचून त्यांना फार दुःख होई. त्यांना ती नवीनच गोष्ट होती. एक तर बा बाहेर असतांना इतक्या लक्ष-पूर्वक वर्तमानपत्रें वाचीत नसत. त्यांना तेवढा वेळहि मिळत नसे. दुसरें असें कीं, यावेळीं बापूंच्या विरुद्ध जेवढा कटुपणा उत्पन्न करण्यांत आला होता तेवढा पूर्वीं क्वचितच कधीं केला गेला असेल. पुष्कळ वेळां त्या म्हणत, "पाहा तर खरे, हे लोक किती खोटें बोलताहेत तें ! त्यांच्या पापांचे घडे कधीं तरी भरतीलच ना ? ईश्वर कोठवर हें पाप सहन करील ?" विशेषतः जेव्हां बापूंच्या अहिंसेवर कुणी हल्ला करी तेव्हां तें बांना मुळीं-सुद्धां सहन होत नसे.

## या वेळच्या कैदेचा बांवरील परिणाम

बा बरेच वेळां कैदेंत जाऊन आल्या होत्या. दक्षिण आफ्रिकेंतील तुरुंगांत त्यांना फार कष्ट सहन करावे लागले होते. कधीं कधीं त्या मला आपल्या अनुभवांची कहाणी सांगत. पण त्या सर्व तुरुंगवासांपेक्षां यावेळचा तुरुंगवास बांना जास्त जाणवत होता. त्यांना वाटत होतें कीं यावेळीं सरकारनें विनाकारण सगळ्या लोकांना पकडून ठेवलें आहे. जनतेवरील सरकारी

जुलमांची जी थोडीफार हकीकत वृत्तपत्रांत येई त्यामुळें त्यांना फार दुःख होई. यावेळची सर्वांची बेमुदत कैद त्यांना फार जांचत होती. महादेव-भाईंच्या मृत्यूनंतर त्यांच्या मनांत अशी भीति उत्पन्न झाली होती कीं, आपणहि बहुधा या जेलमधून जिवंत बाहेर पडणार नाहीं. १८-८-'४२ ला त्यांनीं आपली ही भीति पहिल्यांदा प्रकट केली. बाहेर पडल्यावर काय करणार याविषयीं सगळे गोष्टी बोलत होते. त्यावेळीं बा बोलून गेल्या, "कुणाला माहीत आहे कीं, मी बाहेर पडेन किंवा नाहीं. मीं आतां आहे न् संध्याकाळीं नाहीं असेंहि घडेल!" बापूंनीं हें ऐकलें. ते म्हणाले, "असें कां म्हणतेस? एका दृष्टीनें तूं म्हणतेस तें सर्वांनाच लागू आहे. ही सुशीला मोठी डॉक्टर होऊन आली आहे तरी ती देखील आतां आहे न् सायंकाळीं नाहीं असें होणें शक्य आहे. महादेवचें असेंच झालें ना? तूं न् मी आजाऱ्यासारखे होतों ते खुशाल बसलेले आहोंत. तेव्हां तूं बरी व्हावयाची आहेसच. जेवढी सेवाशुश्रूषा हवी असेल तेवढी करून घे; पण सगळ्या काळज्या मनांतून काढून टाक."

परंतु काळजी सोडणें बांना अशक्य होतें. इतर तुरुंगांत बांबरोबर दुसऱ्या बायका असत, त्यांच्याशीं गप्पागोष्टी करण्यांत, आजाऱ्यांकडे पाहण्यांत, कांतण्यांत व भजन-कीर्तनांत त्यांचा वेळ जात असे. पण यावेळीं प्रत्येक-जण आपापल्या कामांत गुंतलेला असे. बांना कांहीं वाचून दाखवायचें असेल किंवा त्यांची कांहीं सेवाचाकरी करावयाची असेल त्या वेळेव्यतिरिक्त त्यांच्याशीं बोलायला व त्यांच्याजवळ बसायला कोणी नव्हतें. आणि बांना नेहमीं सगळ्या स्त्रियांबरोबर गप्पागोष्टीं करणें फार आवडत असे, त्यांतूनहि संध्याकाळीं विशेषच. यामुळें बा बहुतकरून विचारसागरांतच बुडून गेलेल्या असत. एक दिवस म्हणूं लागल्या, "एवढ्या मोठ्या साम्राज्यसत्तेशीं बापूजी लढत आहेत. तिच्याजवळ तर अपरंपार साधनें आहेत. बापू कसे जय मिळवणार?"

मीं म्हटलें: "बा, पण शेवटीं ईश्वर आहे ना? बापूंनीं त्याच्याच आधारावर लढा सुरू केला आहे, तोच त्यांना पैलतीराला नेईल."

"पण आज तरी ईश्वर आपल्याला प्रतिकूळ झालेला आहे. महादेवला तो कसा घेऊन गेला?"

बापूंनीं हें ऐकलें न् म्हटलें, "महादेवचें जाणें म्हणजे एक शुद्धतम बलिदान आहे. त्यामुळें स्वातंत्र्याच्या लढाईला फायदाच होणार आहे."

पण बांच्या मनांतून ही शंका गेली नाहीं. एक दिवस त्यांची तब्येत जराशी जास्त नादुरुस्त होती. तेव्हां चिडून बापूंना म्हणाल्या, "पाहा तर, मी तुम्हाला म्हणत होतें कीं एवढ्या मोठ्या राजसत्तेशीं तंटा करूं नका, पण तुम्ही माझें ऐकलें नाहीं. आतां त्याचें फळ सगळ्यांना भोगावें लागत आहे. सरकारजवळ अपार शक्ति आहे. त्यामुळें तें लोकांना चिरडून टाकीत आहे. लोक बिचारे कोठवर सहन करतील ? याचा परिणाम काय होणार ?"

प्रथम बापूंनीं बांना युक्तिवादानें समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण त्या दिवशीं बा कांहीं केल्या समजून घेण्यास तयार नव्हत्या. शेवटीं बापू म्हणाले, "तर मग तुला काय पाहिजे आहे ? चल, तूं न् मी सरकारची माफी मागूं या ?"

बा चिडून गेल्या होत्या. त्या म्हणाल्या, "मी कां कोणाची माफी मागूं ?"

"मग तूं सांगत असलीस तर व्हाइसरॉयकडे माफीसाठीं मी पत्र लिहितों."

बापूंची कोठल्याहि प्रकारें मानहानि होणें बांना कधींहि सहन होणें शक्य नव्हतें. जराशा रागांतच म्हणाल्या, "कोंवळ्या पोरी कैदेंत पडलेल्या असून माफी मागत नाहींत अन् तुम्ही मागणार ? आतां केलें आहे त्याचें फळ भोगा. तुमच्याबरोबर आम्हीसुद्धां सहन करूं. महादेव कैदेंत खलास झाला; आतां माझी पाळी आली आहे." बापूंनीं तें गुपचुप ऐकून घेतलें. बा जेव्हां चिडत तेव्हां साधारणपणें ते मौन धारण करीत.

थोड्या दिवसांनंतर बापूंना त्या म्हणतात : "मी असें म्हणतें कीं तुम्ही इंग्रजांना हिन्दुस्थानांतून जायला सांगतांच कशाला ? राहूं देत कीं खुशाल. आपला देश खूप मोठा आहे, त्यांत आपण सगळे मावूं शकूं. तुम्ही त्यांना सांगा कीं, तुम्ही आमचे भाऊ म्हणून येथें राहा."

बापू म्हणतात : "मग मीं दुसरें काय म्हणतों आहे ? मीसुद्धां हेंच म्हणतों आहे कीं तुम्ही आमचे भाऊ होऊन राहा, सरदार बनून नव्हे.

तुमची सरदारी काढून घ्याल तर तुमच्याबरोबर आमचा कांहीं भांडणतंटा नाहीं."

बा म्हणतात: "हां, हें मात्र बरोबर आहे. आपण इंग्रजांना सरदार म्हणून ठेवूं शकत नाहीं, भाऊ बनून ते खुशाल राहोत."

दुसरे दिवशीं मी बांना मालिश करीत होतें तेव्हां मला म्हणतात: "सुशीला, हे लोक फार वाईट आहेत. बापूजी म्हणतात कीं आमचे भाऊ होऊन आमच्या देशांत राहा, पण त्यांना तर आपल्यावर हुकमत गाजवावयाची आहे, हिन्दुस्थानाला लुटायचा आहे. म्हणून बापूंना व इतर पुढाऱ्यांना त्यांनीं पकडून कैदेंत डांबून ठेवलें आहे."

बांनीं बापूजींपासून कांहीं नवें ऐकलें कीं दुसरे दिवशीं मालिश करायच्या वेळीं मला सांगायच्यांच. पुस्तकांतहि कांहीं नवीन वाचलें कीं आम्हाला दाखवीत. एके दिवशीं त्यांनीं पारशांचा इतिहास वाचला. संध्याकाळीं आमच्या तुरुंगाचे पारशी सुपरिन्टेन्डेन्ट मि. कटेली बांना भेटायला आले. बा त्यांना म्हणतात: "कटेलीसाहेब, तुम्हाला माहीत आहे, पारशी लोक हिंदुस्थानांत कसे आले ते?" व पुस्तकांत वाचलेला सर्व इतिहास त्यांनीं सांगितला. मि. कटेली फारच सज्जन होते. बांना पाहून त्यांना आपल्या म्हाताऱ्या आईची आठवण होत असे. त्यांनीं अत्यंत सज्जनपणानें बसून ती सर्व गोष्ट ऐकली.

## बापूंच्या उपवासाची तयारी

'सत्याग्रहांत उपवासाचें काय स्थान' याविषयीं चर्चा बऱ्याच दिवसांपासून चालू होती. पुष्कळांना असें भय वाटे कीं या वेळीं कैदेंत गेल्याबरोबर बापू उपवास सुरू करतील. महादेवभाई जेलमध्यें सहा दिवस होते पण तितके दिवस ते नेहेमीं या चिंतेंत मग्न असत कीं, बापूंनीं उपवास सुरू केला तर काय होईल? परंतु महादेवभाईंच्या मृत्यूनंतर कांहीं दिवस उपवासाची गोष्ट थंडावली. महादेवभाईंच्या मृत्यूला बापूजींनीं स्वतंत्रतेच्या वेदीवरील शुद्ध बलिदान म्हटलें आहे. या बलिदानाचा परिणाम पाहण्यासाठींहि, कदाचित्, त्यांनीं थोड्या दिवसापुरता उपवासाचा विचार बाजूस ठेवला असावा.

पण जसजसे दिवस जात चालले तसतशी देशाची दुर्दशा, दुष्काळ, आणि सरकारचा जुलूम या सर्व गोष्टींच्या बातम्या वाचून बापूजींची शांतता नाहींशी होऊं लागली, व ते फार गंभीर दिसूं लागले. उपवासाच्या विचारानें त्यांच्यावर कुरघोडी करावयास सुरुवात केली. सरकारच्या जुलमाबद्दलचा आपला विरोध आपण कोणत्या प्रकारें दाखवूं शकूं? जनतेच्या दुःखांत कशा रीतीनें भागीदार होऊं? असे विचार त्यांच्या डोक्यांत निरंतर घोळूं लागले.

२८ डिसेंबरला सोमवारचें मौन होतें. तेव्हां बापूजींनीं व्हाइसरॉयना पाठवावयाच्या पत्राचा मसुदा तयार केला. दुसरे दिवशीं बांना हें कळलें तेव्हां त्या म्हणूं लागल्या, "पत्र पाहिजे तर खुशाल लिहा, पण उपवासाची मुळीं गोष्टसुद्धां बोलूं नका." बापूंना हंसूं आलें. त्या पत्रांत उपवासाचा उल्लेख होताच. आम्हीं सर्वांनीं बापूजींना आग्रह केला : "उपवासाची गोष्ट सोडून द्या, कदाचित् आपल्या पत्रानेंच व्हाइसरॉयची सद्वृत्ति जागृत होईल. कांहीं झालें तरी त्यांना असें म्हणण्याची संधि मिळतां कामा नयेच कीं गांधींनें उपवासाची धमकी दिली, म्हणून आम्हीं त्याचें म्हणणें ऐकिलें नाहीं." बापूंना तें पटलें व ३१ डिसेंबरला एक लहान सुंदर पत्र स्वहस्तानें लिहून बापूंनीं व्हाइसरॉयना पाठविलें. त्याच्या उत्तराची वाट पाहत बापू फार ध्यानमग्न राहूं लागले. तेव्हां मीरांबहेननीं म्हटलें : "बापूंना एकांत पाहिजे आहे. आंब्याच्या झाडाखालीं एक झोंपडी बांधली तर बरें." बांनीं नाहीं म्हटलें : "झोंपडीची काय जरूर आहे? बापूंना कोठेंहि एकांत उपभोगतां येतो." बापूंनीहि म्हटलें : "माझा एकांत निराळ्याच प्रकारचा आहे. मी बाला माझ्यापासून दूर ठेवूं शकत नाहीं, ठेवूं इच्छीतहि नाहीं."

व्हाइसरॉयबरोबरचा पत्रव्यवहार पुढें चालला तसा उपवास नजीक येऊं लागला. मदोन्मत्त सरकार कुठें बापूंचें ऐकणार होतें? पण आम्ही सर्व उपवासाच्या विचारानेंच घाबरून जात होतों. एक दिवस भाईनीं मला विचारलें : "तुझ्या अंदाजाप्रमाणें बापू किती दिवस उपवास ओढूं शकतील!"

मी म्हटलें : "अगदीं नक्की सांगणें कठिणच आहे, पण राजकोटच्या उपवासाच्या वेळीं पांचव्या दिवशींच स्थिति गंभीर झाली होती. त्या हिशो-बानें पाहतां बापू फार दिवस रेटूं शकणार नाहींत."

सरोजिनीदेवी म्हणूं लागल्या : "बापूंनीं उपवास करतां कामा नये. या वयांत ते उपवासांतून सुरक्षित बाहेर पडूं शकणार नाहींत व अंतिम बलिदानाची वेळ अजून आली नाहीं."

बा चिंताक्रांत होऊं लागल्या. सरोजिनीदेवींनीं म्हटलें : "तुम्ही काळजी करूं नका. बापू तर म्हणत आहेत कीं जोंवर ईश्वराची आज्ञा झाली नाहीं, आंतरिक प्रेरणा झाली नाहीं, तोंवर मी उपवास करणार नाहीं. आणि परमेश्वर त्यांना उपवास करायला कधींहि सांगणार नाहीं."

बांनीं उत्तर दिलें : "एवढें तर मला माहीतच आहे कीं परमेश्वर उपवास करायला सांगणार नाहीं. पण बापूजींनीं असेंच मानलें कीं पर-मेश्वरानें सांगितलें आहे तर मग ?"

बापूजी दररोज दुपारीं अर्धा तास ध्यान धरून बसत, मार्गदर्शना-साठीं ईश्वराची प्रार्थना करीत असत. बा सकाळीं स्नानादिक आटोपून अर्धापाऊण तास तुळशीमातेच्या पूजेला बसत. त्या ईश्वरापाशीं आपल्या पतीला दीर्घायुष्य मिळावें म्हणून, प्राण वांचावे म्हणून, प्रार्थना करीत.

या काळजीमुळें बांचा अशक्तपणा वाढूं लागला. बा, सरोजिनीदेवी तशाच मीरांबहेन दर शनिवारीं महादेवभाईंच्या समाधीवर फुलें वाहण्यास जात. पण आतां बांचें जाणें बंद पडूं लागलें. तेवढें चालण्याची धमक त्यांच्यांत राहिली नव्हती. म्हणून आम्हां सर्वांना बांची काळजी वाटूं लागली. उपवासाच्या वेळीं त्यांची दशा काय होईल ' हा प्रश्न आम्हा सर्वांच्या मनांत उभा राही. आम्हाला वाटे कीं बांची अशी स्थिति असतां इतकी उग्र कसोटी त्यांना झेंपणार नाहीं. सरोजिनीदेवीनें कडक भाषेंतच बापूंना म्हटलें कीं, "बापू, तुमचा उपवास बांना खलास करून टाकील." बापूंना हंसूं आलें व ते उत्तर देत म्हणाले, "तुम्हा सर्वांपेक्षां मी बांना अधिक ओळखतों. तुम्हा लोकांना बांच्या बहादुरपणाची कल्पना येणें शक्य नाहीं. तुम्ही कुणी बांना बरोबर ओळखलेंच नाहीं. मी तिच्या बरोबर बासष्ट वर्षें काढलीं आहेत ना ? मी तुम्हाला सांगतों कीं

तुम्हा सर्वांपेक्षां बा अधिक हिंमत दाखविणार आहे. हरिजनांसंबंधींच्या उपवासांत माझी जेव्हां जगण्याची आशा सुटली अन् माझें सगळें सामान इस्पितळांतील लोकांना वाटून टाकण्याचें नक्की केलें, तेव्हां बानें आपल्या हातानेंच तें सामान दुसऱ्यांना वांटून दिलें होतें. त्यावेळीं बांच्या डोळ्यांत ओलसरपणाहि दिसला नव्हता."

बांची सन १९३३ च्या रोजनिशीचीं पानें उलटीत असतां खालील नोंद आढळली:—

"अंग धुऊन इस्पितळांत गेलें. मथुरादास माझ्याबरोबर होते. मीं सामानाची करंडी (बास्केट) बांधलेली होती ती सोडली. मग बापूजींनीं म्हटलें : 'सगळें सामान इस्पितळांत देऊन टाक.' मी देऊन टाकलें. गेल्या रात्रीं बापूजींना उलटी झाली होती. सकाळीं फार अशक्तपणा आला. म्हणतात, 'आतां मी या अंथरुणांतून बरा होऊन उठणार नाहीं. तूं कांहीं काळजी करूं नकोस. उलट तूं अभिमान बाळगावास. सत्य यालाच म्हणतात.' पण ईश्वर दयाळु आहे, त्यानें आपल्या भक्तांना तारलें आहे. मग जें व्हायचें असेल तें होईल."

आणि बांचा हा ईश्वरावरचा विश्वास निरर्थक ठरला नाहीं. त्याच दिवशीं सरकारनें बापूंना सोडलें. उपवास पुरा झाला त्या दिवशींच्या बांच्या रोजनिशींत आहे : "तीन वाजतां पर्णकुटींत आलों." अशा रीतीनें बांची श्रद्धा फळास आली.

बांच्या धीरासंबंधींचा बापूंचा विश्वास खरा ठरला. त्याच दिवशीं सायंकाळीं ते उपवासाबद्दल बांबरोबर बोलले. दुसरे दिवशीं बा म्हणाल्या: "एवढा सगळा खोटेपणा चालला असतां बापूंच्यानें गप्प कसें बसवेल! सरकारच्या जुलमांबद्दल विरोध दर्शविण्यास बापूंपाशीं उपवासावांचून दुसरें साधन तरी कोणतें आहे?" आम्ही सगळे चकित होऊन मुकाट्यानें ऐकतच राहिलों.

मानसिक निर्धाराबरोबरच बांची शारीरिक शक्तीसुद्धां वाढूं लागली. सबंध उपवासांत त्यांनीं धैर्य बाळगून बापूजींची सेवा केली. त्यांची स्वतःची तब्येत एक दिवसहि बिघडली नाहीं.

## उपवास

१० फेब्रुवारी १९४३ रोजीं सकाळीं न्याहारी केल्यावर प्रार्थना करून बापूजींनीं उपवास सुरू केला. त्या दिवशीं सकाळीं व संध्याकाळींहि ते फिरायला गेले, महादेवभाईंच्या समाधीपाशींहि जाऊन आले. बासुद्धां त्यांच्याबरोबरच फिरल्या. नेहमींप्रमाणें यावेळींहि बांनीं फलाहारावर राहणें सुरू केलें. २१ दिवसपर्यंत अन्नाला स्पर्शसुद्धां केला नाहीं. बापूजींच्या पूर्वींच्या उपवासांच्या वेळीं बा फलाहारहि एक वेळच करीत. यावेळीं त्यांच्या शरीराच्या स्थिती-कडे पाहून आम्हीं सर्वांनीं म्हटलें कीं तुम्ही एकदांच नव्हे पण दोनदां फलाहार करावा. असा आग्रह केला तेव्हां अगदीं अनिच्छेनें बा आमच्या आग्रहाला वश झाल्या.

दिवसांतून दोनतीन वेळां बा गरम पाणी व मध पीत. बापूंच्यां उपवासाचे वेळीं स्वाभाविकपणेंच त्यांच्या जवळपास असावें अशी बांची इच्छा अस-णार. म्हणून मध-पाण्याचा ग्लास घेऊनच त्या बापूंच्या खाटेशेजारीं बसत. कांहीं काम असलें तर खाटेजवळ असलेल्या टेबलवार ग्लास ठेवून काम करून टाकीत व परत येऊन पाणी पीत. एक दिवस डॉ. गिल्डर म्हणाले, “ हें बरोबर नाहीं. सरकारी माणसाच्या मनांत कदाचित् अशी शंका यायची कीं, बापूंना पाजण्यासाटींच मधाचें पाणी घेऊन बा फिरत असतात. ” त्यांनीं ही गोष्ट बांनाहि सांगितली. बांनीं दृढतापूर्वक उत्तर दिलें : “ बापूजींच्याबद्दल असली शंका कुणाला येणेंच शक्य नाहीं. ”

उपवासाच्या तिसऱ्या दिवशीं बापूंना ओकाऱ्या येऊं लागल्या. तेव्हां बा म्हणाल्या: “ पाण्यांत जरा मोसंब्याचा रस टाका ना ? ” बापूंनीं नाहीं म्हटलें : “ मी कांहीं सहजासहजीं रस घेणार नाहीं. ” त्यानंतर उबग वाढूं लागली. बापूंना पाणी मुळींच पितां येईना. रक्त घट्ट झालें, मूत्रपिंड मंद पडले. पण बांनीं पुन्हा बापूंना रस घेण्याचा आग्रह केला नाहीं. त्या फार स्वाभिमानी होत्या. शिवाय त्यांना असेंहि वाटे कीं बापू आपल्या मनांत येईल तेंच करणार, मग एकच गोष्ट पुन्हापुन्हा सांगून त्यांच्या शक्तीचा अपव्यय कशाला करा ?

उपवासाचे दिवस वाढत चालले तसतसा बांचा तुळशीपूजेचा व बाळ-कृष्णपूजेचा वेळहि वाढत गेला. जसजशी बापूंची स्थिति गंभीर होत गेली

तसतशी बांची पूजा अधिक दीर्घ व अधिक भावपूर्ण होत चालली. २२ फेब्रुवारीला बापू जीवन-मरणामध्यें हेलकावे खात होते. मीरांबहेननें मला मुकाट्यानें बोलाविलें व बाहेर घेऊन गेल्या. तेथें बा तुळशीमातेच्यापुढें गुडघे टेकून प्रार्थना करीत होत्या. त्यांच्या मुद्रेवरील भाव इतका करुण, इतका दीन होता कीं पहाणाऱ्याच्या डोळ्यांत पाणी यावें. त्या ध्याना-मध्यें तल्लीन होत्या. आपल्याजवळ कोण उभें आहे अन् कोण तेथून जात आहे याचें त्यांना मुळीं भानहि नव्हतें.

उपवासाच्या तेराव्या दिवशीं (२२ फेब्रुवारीला) १० मिनिटें प्रयत्न करूनहि बापू अर्धा औंस पाणीदेखील पिऊं शकले नाहींत. अतिशय थकून बेहोष होऊन खाटेवर पडले, नाडी मंद चालूं लागली, शरीर घामानें ओलेंचिंब झालें, बोलण्याची ताकद तर राहोच, पण खूण करण्याएवढी-सुद्धां ताकद राहिली नव्हती. बा प्रार्थनेंत मग्न होत्या. बापूंच्या खोलींत मीच एकटी होतें. भीत भीत मी बोललें, "बापूजी, मोसंब्याचा रस घ्यायची वेळ आली असें नाहीं समजायचें ?" सात मिनिटेंपर्यंत विचार करून बापूंनीं खुणेनें हो म्हटलें. मी लगेच दोन औंस रस व दोन औंस पाणी मिसळून बापूंना प्यायला दिलें. चार औंस प्रवाही वस्तु शरीरांत जातांच बापूंच्या निस्तेज चेहऱ्यावर जीवनाचे किरण उमटूं लागले. तेवढ्यांत बा आल्या. परमेश्वरानें त्यांची प्रार्थना ऐकिली होती.

बांचें अवसान १९४४च्या २२ फेब्रुवारीला झालें. कोणी म्हणालें : "गेल्या वर्षीं याच दिवशीं बापू यमराजाच्या जबड्यांत होते. सावित्रीप्रमाणेंच बांनीं त्यांना सोडविलें, तें अशा अटीवर कदाचित् असेल कीं पुढील वर्षीं याच दिवशीं मी तुमच्याकडे येईन."

बापूजींच्या उपवासामुळें आगाखान महालाचे दरवाजे उघडले होते. सबंध दिवस भेटायला येणारांची रांग लागलेली असे. बापूंना प्रणाम करूनच लोक बाहेर पडत व मग बांबरोबर बोलत असत. मुलांबाळांना पाहून बा खूष होत असत. त्या 'मा' होत्या. सगळ्या जगाला त्यांनीं आपलें म्हटलें होतें, तरी स्वतःच्या मुलांबाळांचें त्यांच्या जवळील स्थान अढळ होतें. बापूंचा असा नियम होता कीं उपवास चालू असतां भेटायला येणाऱ्या

कोणालाहि खाण्यापिण्याचें कांहीं विचारायचें नाहीं. बांना या नियमाचें पालन करणें फार कठिण जाई.पण त्यांनीं तो नियम अक्षरशः पाळला.

२१ दिवस पुरे झाले. उपवास सोडण्याच्या वेळीं सरकारनें फक्त मुलांना आंत येण्याची परवानगी दिली, मित्रांना देखील दिली नाहीं. बापूंच्या मनांत मित्र किंवा पुत्र यांमधें कधींहि भेदभाव नव्हताच, तेव्हां त्यांनीं पुत्रांनाहि येऊं दिलें नाहीं. दोन मार्चला संध्याकाळीं भेटीचीं माणसें जेव्हां निरोप घेऊं लागलीं तेव्हां बांच्या डोळ्यांत आसवें उभीं राहिलीं. लक्ष्मीबाई खऱ्यांना तसेंच आश्रमांतील इतर स्त्रियांना निरोप देतांना बा म्हणाल्या : "हा शेवटचा रामराम आहे, बहेन!" मी म्हटलें, "बा, असें कां बोलतां ? आपण सर्व लवकरच बाहेर पडणार आहोत." "हां, तुम्ही सगळे पडणार," बांनीं उत्तर दिलें.

## उपवासानंतर

तीन मार्चला बापूंचा उपवास पुरा झाला. त्यानंतर तीन चार दिवस सरकारनें देवदासभाई व रामदासभाई यांना भेटायला येण्याची परवानगी दिली. पण शक्ति येऊं लागली असून आतां कांहीं काळजी उरली नाहीं असें कळल्याबरोबर भेटी बंद करण्यांत आल्या. मुलांची तेथील उपस्थिति बांना औषधासारखीच होती. तुरुंगाचे दरवाजे बंद झाल्याबरोबर बांची शक्ति क्षीण होऊं लागली. उपवास चालू असतां आपल्या निश्चयाच्या बळावर त्या एवढें काम करीत होत्या व शरीरालाहि टिकवून धरलें होतें; पण आतां क्षीणता येऊं लागली. बोलतां बोलतां थकून जात. उदासहि असत. १६ मार्चला संध्याकाळीं छातींत धडधड सुरू झाली, ती दोन तास राहिली. त्यानंतर २५ मार्चला सायंकाळीं पुन्हा रोगाचा आवेग आला, तो चार तास चालला. बस्, तेथून बांचा आजार सुरू झाला तो अखेर त्यांचे प्राण घेऊन गेला.

उपवासापूर्वीं बापूजी पुष्कळ वेळां म्हणत कीं सहा महिन्यांत कांहींना कांहीं तरी निकाल लागेल. उपवासानंतर ते म्हणूं लागले कीं आतां कमींत कमी सात वर्षे तरी तुरुंगांत राहायचें आहे. यामुळें बांना फार धक्का बसला. त्या वारंवार म्हणत : "मला तर महादेवच्या जवळच राहायचें आहे कीं ? मी कुठें सात वर्षें जगणार आहे ?" असें असूनहि त्या

बालिकासारख्या सरळ मनाच्या होत्या. आशा कांहीं आंतून निर्मूळ झाली नव्हती. बाळकृष्णाच्या मूर्तीसमोर बरेच वेळां एकांतांत त्या प्रार्थना करीत कीं, "हे बाळकृष्णा, आम्हाला लवकर तुरुंगाबाहेर ने."

एक दिवस सहज सिनेमाची गोष्ट निघाली. वृत्तपत्रांत 'भरत-मिलाप'चें वर्णन आलें होतें. रामायणांतील भरतभेटीचा प्रसंग बांना फार आवडत असे. मीं म्हटलें: "बा, तुम्ही दिल्लीला याल तेव्हां तुम्हाला 'भरतमिलाप' अवश्य दाखवूं." बांना ही कल्पना आवडली आणि आपण सगळीं कैदेंत बसलों आहों अन् दिल्लीहून फार दूर आहों हें त्या घटकाभर विसरूनही गेल्या आणि म्हणूं लागल्या: "पण बापूजी जाणार नाहींत, मग मला कसें जातां येईल?" मीं म्हटलें: "नाहीं, बा, तें एक धार्मिक चित्र आहे, त्यांत रामायणांतील कथा आहे. बापू स्वतः खुशाल न जावोत पण तुम्हाला अडविणार नाहींत. आपण, तारा, रामु न् मोहन* या सर्वांना बरोबर घेऊन जाऊं." तारा, रामु व मोहनचीं नांवें ऐकतांच बांच्या मुखावर स्मित झळकलें. "बरं" असें म्हणून इतर गप्पागोष्टींकडे वळल्या.

बापूंच्या उपवासाच्या वेळीं श्री. जयसुखलाल गांधी बांना भेटले. त्यांची मुलगी मनु १९४२ च्या चळवळीपूर्वी बांच्याजवळ होती व या-वेळीं ती नागपूरच्या तुरुंगांत असून तिचे डोळे तिथें बिघडूं लागले होते. त्यांनीं बांना म्हटलें, "जर मनु तुमच्यापाशीं असेल तर तिचे डोळेहि सुधारतील अन् तिला तुमच्या सेवेचा लाभहि मिळेल." बांच्या मातृहृदयाला त्या मुलीचे बिघडणारे डोळे बरे करण्याचा विचार जास्त महत्त्वाचा वाटला व त्यांनीं बापूंना म्हटलें, "मला एक मदतगार हवाच आहे, मग आपण मनूला बोलाविली तर?" बापूंनीं ही सूचना मनावर न घेण्याचा थोडासा प्रयत्न केला; कारण त्यांना अशी भीति वाटत होती कीं सरकार नाहीं म्हणेल, अन् सरकारला आपली अशी कुठलीहि मागणी अमान्य करण्याची संधि देणें त्यांना पसंत नव्हतें. पण बांनीं भक्कमपणा दाखविला. त्यांनीं स्वतःच कर्नल शाह व कर्नल भंडारी यांच्याजवळ गोष्ट काढली: "मला एक मदतनीस (नर्स) पाहिजे आहे." तेवढ्यांतच पुन्हां बांच्या

* तारा ही देवदासभाईंची मुलगी, रामु व मोहन त्यांचे मुलगे.

हृदयांत धडधडीचा प्रादुर्भाव झाला. डॉक्टर गिल्डर यांनीं व मीं एका पत्रांत आमचा असा डॉक्टरी अभिप्राय कळविला कीं बांना एका मदतनीस नर्सची जरूर आहे. सरकार चमकलें. मनु आली नाहीं तर कोण येईल असा प्रश्न उभा राहिला. बांनीं मणिबहेन पटेल तसेंच प्रेमाबाई कंटक यांचीं नांवें सुचविलीं. सरकारला हीं नांवें कसचीं पटतात ! मुंबई सरकारनें सी. पी. सरकारबरोबर पत्रव्यवहार सुरू केला, व २२ मार्चला मनु आगाखान महालांत येऊन पोंचली. त्याच दिवशीं आमच्या अम्माजान सरोजिनीदेवी यांची मलेरियाच्या जंतूंच्या प्रतापामुळें सुटका झाली.

मार्चच्या शेवटीं बांवर न्यूमोनियाचा ल्हानसा हल्ला झाला. एप्रिलच्या सुरुवातीस लघ्वींत बी. कोलाय् (B. Coli)चा त्यांचा जुना त्रास उद्भवला, परंतु योग्य इलाजानंतर तो थांबला.

बांच्या सेवाशुश्रूषेंत मनु खूपच मदत करूं लागली. कांहीं दिवस बांची तब्येतहि बरी वाटूं लागली. जेवणाच्या वेळीं जेवणघरांत त्या येऊन बसत. डॉ. गिल्डर व मि. कटेली मांसाहारी होते म्हणून ते निराळ्या टेबलाशीं बसत. मीराबहेन जमिनीवर आसन मांडून बसत. मनु, भाई व मी दुसऱ्या एका टेबलाशीं बसत असूं. बा सर्वांच्यापाशीं जात व सर्वांच्या जेवणावर लक्ष ठेवीत अन् गप्पागोष्टी करीत. स्वैंपाक मागच्या व्हरांड्यांत करण्यांत येई. तेथंहि बा जाऊन बसत आणि आचाऱ्याबरोबर गप्पागोष्टी करीत व स्वैंपाकाच्या बाबतींत सूचनाहि करीत. तेथें सर्वांच्या आईचें स्थान त्यांनीं पुरेपूर मिळविले होतें. त्या हिंदुस्थानच्या माता होत्या, व या ल्हान कुटुंबाच्या मा तर होत्याच होत्या. आईप्रमाणें त्या सर्वांची काळजी घेत.

बापूजींना शक्ति येऊं लागली तसे ते आपला जास्त वेळ सरकार-बरोबर पत्रव्यवहारांत घालवूं लागले. बांना शिकविण्याचें तशींच इतर कामेंहि कांहींशीं थंडावूं लागलीं. बा स्वतःच रामायण, गीता वगैरे वाचीत, मनूजवळून वाचून घेऊन ऐकत. सबंध वाल्मीकि रामायण मनूनें बांना वाचून दाखविलें, व ते पुरें होतांच भागवत वाचून दाखविलें. बांना भागवत इतकें प्रिय होतें कीं एकदां ऐकून झाल्यावर पुन्हा ऐकण्याला सुरुवात केली.

## खेळांची आवड

या सर्व कामांशिवाय बा खेळांतहि भाग घेत. आम्ही बॅड्मिन्टन् किंवा टेनिकॉइट् खेळत असूं. बा खुर्चीवर बसल्याबसल्या आवडीनें पाहत. खेळांत कोणी हातचलाखी किंवा खोटेपणा केला तर बा त्याला चमका-वीत. रात्रीं मीरांबहेन, डॉ. गिल्डर वगैरे कॅरम खेळत. तें पाहायला बा जात. हळूहळू त्या स्वतःच कॅरम खेळूं लागल्या. त्यांना त्याची इतकी गोडी लागली कीं दररोज दुपारीं अर्धा तास त्या कॅरम खेळण्याचा सराव करूं लागल्या. त्यांत मीरांबहेन सर्वांहून जास्त प्रवीण होत्या. बा नेहमीं त्यांच्या भिडू होत. त्यामुळें नेहमीं त्यांची बाजू जिंकत असे व मग त्या खुष होत. कधीं जर एकाएकीं हरल्या तर खट्टूहि होत. शेवटीं असें नक्की ठरविण्यांत आलें कीं कांहीं झालें तरी अखेरीस बा जिंकतील असेंच करावयाचें. कॅरममधील 'राणी' जिंकून घेण्याची बांना फार हौस असे. व 'राणी' मिळाल्यावर हरल्या तरी त्या आपण हरलों असें मानीत नसत. कॅरममध्यें बा इतक्या कांहीं गुंगून जात कीं त्यावेळीं त्या आपला आजार न् दुःख पार विसरून जात. अखेरच्या आजारांत जेव्हां त्यांच्यांत खेळण्याएवढी शक्ति राहिली नाहीं तेव्हां कॅरम बोर्ड त्यांच्या पलंगाजवळ ठेवून आम्ही खेळत असूं व तें बांना फार आवडे. मृत्यूपूर्वी दोन तीन दिवस खाटेवर पडल्या-पडल्या त्यांनीं कॅरम खेळतांना आवडीनें पाहिलें होतें. कॅरममधें मीरांबहेन त्यांच्या कायमच्या भिडू असल्यामुळें मीरांबहेननें जिंकलें कीं आपणच जिंकलें व मीरांबहेन हरल्या कीं आपणच हरलों असें त्यांना वाटे. आम्हाला त्यांचा नेहमीं आग्रह चाले कीं आमच्यांतील कोणीतरी मीराबहेनचा भिडू व्हावें, म्हणजे डॉ. गिल्डर व त्यांचा भिडू एकट्या मीरांबहेनना जिंकूं शकणार नाहींत. पिंग्पांग् सुरू होतांच बांनीं तें खेळायला सुरवात केली. पण तें खेळतांना बांना दम लागत असे म्हणून तें बंद करावें लागलें. त्यांचें शरीर जीर्ण झालें होतें, पण कित्येक बाबतींत त्यांचें मन अगदीं बालका-सारखें होतें.

## वात्सल्य

मुलांबरोबर खेळणें व त्यांना खावूं-पिवूं घालणें बांना फार आवडे. आश्रमांत बांबरोबर दोनचार मुलें हीं असायचींच. पण कैदेंत हें कोठून

जमणार ! एक दिवस शेळीला करडें झालीं. मनूनें एक करडूं उचलून बांजवळ नेलें. बांनीं त्याला मांडीवर घेतलें व त्याच्याशीं खेळूं लागल्या अन् त्याला खाऊं घालूं लागल्या. बा तर जणूं तें बकरीचें पिल्लूं आहे हें विसरूनच त्याच्याशीं बोलूं लागल्या, "तूं दररोज माझ्याजवळ खेळायला येत जा हं." नंतर कांहीं दिवस मनू त्याला दररोज बांजवळ आणीत असे. एकदा त्यानें बांचे कपडे खराब केले. तेव्हांपासून मनूनें त्याला आणणें बंद केलें.

## बांची शाल

बांना व मला बिर्ला हाऊसमधें पकडलें तेव्हां माझ्यापाशीं एकहि गरम कपडा नव्हता. मी फक्त थोड्या दिवसांसाठींच मुंबईस आलें होतें. उकाड्याच्या ऋतूंत कोण कशाला गरम कपडे जवळ बाळगील ? बांनीं आपलें सामान आवरतांना एक शाल परत पाठवून देण्यासाठीं काढून ठेवली होती, कारण ती बरोबर घ्यायची त्यांना गरज भासली नाहीं. पण मी विचार केला कीं कोण जाणें जेलमधें किती दिवस राहावें लागेल. कदाचित् गरम कपड्याची गरज लागेलहि. म्हणून बांना विचारून ती शाल मी माझ्यापाशीं ठेवली होती. कैदेंत ती शाल मला खूपच उपयोगी पडली. पुण्यांत थंडी बरीच होती. बाहेरच्या जगाशीं आमचा बिलकुल संबंध राहूं नये हा सरकारचा इरादा होता. तेव्हां ती शाल मजजवळ नसती तर फार त्रास झाला असता. बापूंच्या उपवासांत माताजी (माझ्या मातुःश्री) तेथें आल्या होत्या. बांना वाटलें कीं सुशीला गरम कपड्यांविषयीं सांग-ण्याचें विसरून जाईल. म्हणून त्यांनींच माताजींना म्हटलें : "सुशीलेपाशीं शाल नाहीं. माझी वापरते आहे. तिच्यासाठीं शाल न् इतर गरम कपडे पाठवून द्या." माताजींना वाटलें कीं बांना आपली शाल परत हवी असेल. म्हणून त्या त्याच वेळीं आपली शाल माझ्यासाठीं ठेवून गेल्या. दुसरे दिवशीं बांनीं माताजींची शाल माझ्याजवळ पाहिली. तेव्हां मला विचारलें : "ही कुणाची शाल ?" मी म्हटलें : "माताजी माझ्यासाठीं ठेवून गेल्या आहेत." बांना हें सहन झालें नाहीं, व त्या मला म्हणाल्या : "माताजींची शाल त्यांना परत दे, तुझ्याजवळ माझी आहे ना ?" मी उत्तर दिलें : "पण बा, तुम्हाला ती हवी असेल ना ?" "नाहीं बाई,

मला सध्यां मुळींच नको आहे. मी तुझी शाल न् इतर कपडे पाठवून द्यायला माताजींना सांगितलें आहे; ते आले म्हणजे तूं माझी शाल मला परत दे." असें म्हणून बांनीं आग्रहानें माताजींची शाल परत देवविली. बांची शाल मी काळजीपूर्वक बांच्या कपाटांत ठेवली. बांच्या मृत्यूनंतर देवदासभाईंनीं आग्रहानें ती शाल बांचें स्मृतिचिन्ह म्हणून मला परत दिली.

कार्तिक शुद्ध १ ला पुष्कळ प्रांतांत वर्षारंभ मानण्यांत येतो. त्या दिवशीं लोक एकमेकांना वस्तु वगैरे भेटीदाखल देतात. तुरुंगांतहि दिवाळीनंतर वर्षप्रतिपदेच्या दिवशीं सरोजिनीदेवींनीं बांना एक साडी भेट म्हणून दिली. बा ती आनंदानें नेसल्या. मग बा माझ्यासाठीं कपाटांत साडी शोधायला लागल्या. राजकुमारी अमृतकुंवर यांनीं स्वतःच्या हातांनीं कातलेल्या सुताची एक साडी विणवून घेऊन त्यांना दिली होती. तिचे कांठ हिरव्या रेशमाचे होते. ती काढून मला देत बा म्हणाल्या, "सुशीला, ही तूं नेस. नवी नाहीं हो बाई, मी एक दोन वेळां वापरली आहे. येथें माझ्यापाशीं नवी साडी नाहीं." मी म्हटलें, "नवीची कांहींच जरूर नाहीं. तुमच्या नेसण्यानें तर तिचें मोल कमी न होतां उलट वाढलेंच आहे. पण तुमच्याजवळ इथें साड्या कमी आहेत. तेव्हां ही तुमच्याजवळच ठेवा. इथून बाहेर पडूं तेव्हां द्या." पण बा बाहेर आल्या नाहींत. त्यांच्या मृत्यूनंतर देवदास-भाईंनीं त्यांच्या साड्यांतून एखादी मला घ्यायला सांगितलें. तेव्हां मी तीच साडी उचलली. बांची ती साडी व बांची शाल या आजला माझ्या-जवळच्या सर्वांत अधिक मूल्यवान वस्तु आहेत.

## खाण्याची व खाऊं घालण्याची हौस

बांना स्वैपाक फारच छान करतां येत असे. परंतु बापूजींनीं अस्वादव्रत घेतलें तेव्हांपासून बांची ही कला जवळजवळ निरुपयोगी झाली. तरी बा कधींकधीं कांहीं पदार्थ करीत. त्यांना उत्तमोत्तम पदार्थ खाऊं घालण्याची व खाण्याची हौस होती. तुरुंगांत डॉ. गिल्डरांच्या न्याहारी-साठीं मनूकडून कांहीं ना कांहीं त्या करवून घेत. एक दिवस बांनीं पुरणपोळी करविली व म्हणाल्या : "आज मात्र मीहि खाणार; बापूजींना विचारून ये, तुम्ही घ्याल का थोडी ?" बांनीं जड पदार्थ खाल्ला तर हृदयांतील धडधडीचा हल्ला येण्याचा संभव होता. मनू बापूजींना विचारायला गेली तेव्हां बापूजींनीं

उत्तर दिलें, "बा खाणार नसेल तर मी खाईन." बांना निश्चय करायला पळभरहि वेळ लागला नाहीं, व त्या म्हणाल्या "मग मी नाहीं खाणार." नंतर जवळ बसून त्यांनीं बापूजींसाठीं व इतर पुष्कळ जणांसाठीं पुरण-पोळ्या करवल्या. सगळ्यांना खाऊं घातल्या, अन् स्वतः चवहि घेतली नाहीं !

एक दिवस फिरून बांच्या हृदयाची धडधड सुरू झाली व ती बराच वेळपर्यंत टिकली. दुसऱ्या दिवशीं त्यांनीं आपल्यासाठीं तुपांतील वांग्याची भाजी करावयास मनूला सांगितलें. मनू मला विचारायला आली. मी नको म्हटलें. "कसें तरी करून ही गोष्ट टाळ. बांना कालच हृदयाच्या धडधडीचा त्रास झाला होता, अन् असली वस्तु खाण्यांत आली तर कदाचित् त्या पुनः आजारी पडतील." मनूनें जाऊन बांना म्हटलें : "सुशीलाबहेन वांग्याची भाजी करूं नको म्हणते." बा चिडून गेल्या व बापूजींपाशीं जाऊन तक्रार करूं लागल्या. बापूजी कामांत होते. सावकाश समजावून सांगण्याला वेळ नव्हता, म्हणून म्हणाले : "तुझ्या तब्येतीसाठीं तुला एवढा संयम पाळलाच पाहिजे." पण बा कांहीं अशा एकदम कबूल होणार थोड्याच ! त्या नाराज झाल्या : "बस, मला कांहीं खायचेंच नाहीं." मी व मनूनें खूप काकुळतीस येऊन म्हटलें : "बा, तुमच्या तब्येतीसाठीं करून दिली नाहीं. नाहींतर तुम्ही सांगाल तें करून देऊं." पण बा कुणाचें ऐकणें शक्य नव्हतें. "मला कांहीं करून नकोच आहे." नंतर जवळजवळ पंधरा दिवस दूध, फळें व मधमिश्रित पाणीच घेत होत्या. मला व मनूला फार वाईट वाटलें. बापूजींनीं आमची समजूत केली : "काळजी करूं नका. यामुळें बांचें कांहीं नुकसान व्हायचें नाहीं, फायदाच होणार आहे." खरोखरच या काळांत बांची तब्येत फारच छान राहिली. वजनहि उतरलें नाहीं. आम्ही बांची समजूत करण्याचा प्रयत्न करीत होतोंच. हळूहळू बा वांग्याची गोष्ट विसरून गेल्या व नेहमींचा आहार घेण्यास त्यांनीं सुरुवात केली.

## बांचा हट्ट

अखेरच्या आजारांत, मृत्यूपूर्वीं दोनच दिवस, बांना विचार आला कीं आपण एरंडेल घेतलें तर बरें. पण त्यावेळीं त्या इतक्या अशक्त झालेल्या होत्या कीं मला व डॉ. गिल्डरनां वाटलें कीं अशा स्थितींत रेचक घेणें बरें नव्हे. सकाळीं बांनीं माझ्याजवळ एरंडेल मागितलें. मी प्रथम

समजूत घालण्याचा खुप प्रयत्न केला. पण बांनीं ऐकलें नाहीं, तेव्हां मी तेथून निघून गेलें. कांहीं वेळानें बापूजी आले. बापूजींनींहि समजावून सांगितलें कीं, "अशा स्थितींत एरंडेल घेणें बरें नव्हे. रोग्यानें कधीं आपलें औषध आपणच नक्की करूं नये आणि मी तर म्हणतों कीं आतां तूं औषध सोड, सगळें विसरून जा, मलाहि विसर, रामाचे ठायीं मन गुंतव." मला सांगितलें कीं, "बाला आतां समजलें आहे व आतां ती एरंडेल मागणार नाहीं." परंतु बा इतक्या सहजासहजीं आपला हट्ट सोडणें शक्य नव्हतें. कांहीं वेळानें डॉ. गिल्डर त्यांच्याजवळ गेले. त्यांच्याजवळहि बांनीं एरंडेल मागितलें; व त्यांनींहि नकार दिला. बांना फार वाईट वाटलें. दुपारीं जयसुखलालभाई भेटायला आले तेव्हां त्यांच्याजवळहि बा तक्रार करूं लागल्या कीं, "हे सर्व आपलाच कायदा चालवितात, मला एरंडेलसुद्धां देत नाहींत."

मी सकाळनंतर बांजवळ गेलेंच नव्हतें. पुन्हा एरंडेल मागितलें तर? जवळजवळ दोन वाजतां त्यांच्याजवळ गेलें. तेव्हां हाताचें बोट हलवून बा मला म्हणूं लागल्या: "तूं मला एरंडेल दिलें नाहींस ना? आतां मीं कांहींच घेणार नाहीं. तुझें औषधहि घेणार नाहीं. माझ्यावरसुद्धां तुझा डॉक्टरी कायदा चालवतेस काय?" लहान मुलासारख्या या हट्टाला काय करावें?—हा मोठा प्रश्नच होता. त्यांना दुखवितांना मनाला कष्ट होत. "बा, मला तर असें कळलें होतें कीं आतां तुमची समजूत झाली असून तुम्ही एरंडेल घेणार नाहीं." "अं हं, मला एरंडेल घ्यायचेंच आहे." बांच्या आवाजांत व त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारची दीनता दिसत होती. त्यांच्या अंतकाळीं कशाला त्यांना दुःख द्या! मीं म्हटलें: "तुम्ही आग्रह सोडीतच नसाल तर अगदीं लाचार म्हणून तुम्हाला एरंडेल देईन एवढेंच." बांनीं म्हटलें: "मग आण तर." कोणी तरी युक्ति सुचविली कीं प्रवाही पॅराफिनमधें थोडें एरंडेल टाकून तें द्यावें. तसेंच केलें गेलें. बा तें प्याय-ल्यावर शांत झाल्या.

## 'पीड पराई जाणे रे'

या वेळचा तुरुंगवास निराळाच होता. हे निःशस्त्र स्त्रीपुरुष आपल्याला आतां खलास करून टाकतील आणि जर कां जेलमधील लोकांचा

बाहेरच्या लोकांशीं संबंध साधला गेला तर आकाशच जणूं कोसळून पडेल असें सरकारला भय वाटत होतें. १९४२ च्या ऑगस्टमध्यें कैद करतांना सरकारचा असा हुकूम होता कीं कैद्यांना वृत्तपत्रें देऊं नयेत, तसेंच पत्रव्यवहाराची किंवा भेटीची मोकळीक देऊं नये. सरोजिनीदेवी आपल्या मुलीला आजारी सोडून आल्या होत्या. त्यांनीं सरकारला लिहिलें, "माझ्या मुलीची माहिती तर कळवाल कीं नाहीं?" बांनाहि दररोज आपल्या मुलांची अन् त्यांच्या मुलाबाळांची काळजी वाटतच असे. मीरांबहेनजवळ कपडे पुरेसे नव्हते. त्यांनीं आयू. जी. पी.'ला म्हटलें, "माझे कपडे तरी मागवून घ्याल कीं नाहीं?" अखेरीस तीन एक आठवड्यानंतर आयू. जी. पी. नें कळविलें कीं 'कुटुंबाचें कुशल वर्तमान कळण्यापुरतीं पत्रें नातेवाईकांना लिहावयाचीं असतील तर लिहूं शकतां. लिहून तुम्ही तीं सरकारकडे द्यावींत व सरकार तीं पुढें रवाना करील. तुमच्या नातेवाईकांनाहि लिहिण्याची इच्छा असेल तर त्यांनीं पत्रें सरकारकडे पोंचवावींत व सरकारला योग्य वाटलें तर तीं पत्रें तुम्हाला देण्यांत येतील.' कपडे वगैरे मागविण्याबाबतहि असाच नियम होता. सरोजिनीदेवींनीं आपल्या घरीं पत्र लिहिलें. मीरांबहेननें मित्रांना लिहिण्याची परवानगी मागितली, कारण त्यांचे नातेवाईक समुद्रापलीकडे होते. त्यांना सोडून त्या येथें आल्या होत्या. तेव्हां येथील मित्र हेच त्यांचे नातेवाईक होते. बापूजींनीं लिहिलें कीं, "मी आश्रमजीवन स्वीकारलें आहे. माझ्यापाशीं घरचे व दूरचे असा भेद नाहीं. महादेवच्या मुलाला किंवा पत्नीला मी लिहूं शकत नसेन तर मी कोणाला लिहावें? शिवाय मला कौटुंबिक प्रश्न असे कांहीं नाहींतच. राजकारणाच्याबाबतींत मी लिहिणार नाहीं, पण इतर सार्वजनिक कार्याविषयींसुद्धां मी लिहूं शकत नसेन तर पत्रें लिहिण्याची मोकळीक माझ्यापुरती तरी व्यर्थ आहे."

सरोजिनीदेवींनीं व बांनीं मला विचारलें, "तूं माताजींना लिहिलेंस?" बापूजींनीं मला सांगितलें होतें कीं, "माझ्या पत्राचें उत्तर येऊं दे, मग पाहूं तूं काय केलें पाहिजेस तें." बापूजींच्या पत्राचें उत्तर आलें, त्यांत सरकारनें त्यांना नातेवाईकांखेरीज आश्रमवासीयांना पत्रें लिहिण्याची मोक-ळीक दिली होती. परंतु कौटुंबिक गोष्टींवांचून इतर बाबतींत लिहिण्याची मनाई केली. त्यावरून बापूजींनीं कुणालाच पत्र लिहावयाचें नाहीं असा निश्चय

केला व सरकारला आपला निश्चय कळविला. तेवढ्यांत भाई (प्यारेलाल) सुद्धां तेथें आले होते. बापूंनीं आम्हांला म्हटलें, "मला वाटतें कीं आपल्यापैकीं कोणीहि अशा अटींवर पत्रें लिहूं नयेत." आम्हा सर्वांना सरकारकडून कळविण्यांत आलें कीं तुम्हाला ज्यांना कागद पत्रें पाठवावयाचीं असतील त्यांचीं नांवें व पत्ते द्या. भाईनीं व मीं उत्तरादाखल लिहून कळविलें कीं, "सरकार जोंपर्यंत गांधीजींना पत्रें पाठवितां येतील असें करीत नाहीं तोंपर्यंत आम्हाला कशीं पत्रें पाठवितां येतील?" मला सांगण्यांत आलें, "बापू महात्मा आहेत. तूं माताजींना पत्रें लिहिलींच पाहिजेस. अशा रीतीनें पत्रें न लिहिल्यामुळें तूं कांहीं महात्मा होणार नाहींस." मी उत्तर दिलें: "मी कांहीं महात्मा होण्यासाठीं असें केलें नाहीं." बापूजींना मीं म्हटलें: "बापूजी, मी आपल्या सल्ल्याप्रमाणें सरकारला लिहिलें आहे, मग मला अशा तऱ्हेचीं बोलणीं कां ऐकविलीं जावींत?" बापूजींनीं जबाब दिला: "मी तुला तुझा धर्म दाखविला. बा, तूं, प्यारेलाल माझ्यांत समाविष्ट होतां. मी लिहिणार नाहीं, तर तुम्ही कशीं लिहूं शकाल? पण याप्रमाणें वागण्याची तुमच्यांत शक्ति नसेल, किंवा स्वतंत्र विचार केल्यावर आपला धर्म खरोखर याहून उलटाच आहे असें तुम्हाला वाटेल, तर तूं सरकारला लिहिलेलें पत्र रद्द कर आणि घरीं पत्रें पाठवायला लाग." मला तसें करण्याची मुळींच आवश्यकता वाटली नाहीं.

थोड्या दिवसांनंतर बांनीं पत्रें लिहिणें सुरू केलें. तुरुंगांत कुणाची भेटहि होत नसे, आणि पत्रेंहि मिळूं शकलीं नाहींत तर बांना फार वाईट वाटे. पण स्वतः पत्रें लिहिलीं नाहींत तर उत्तरें येणार कशीं? या विचारानें बांनीं पत्रें लिहिण्यास प्रारंभ केला. माझीहि समजूत घालूं लागल्या, "बापूजी साधु आहेत; त्यांनीं तर सगळी माया ममता सोडली आहे. पण आपण कांहीं असें केलें नाहीं. तूं देखील माताजींना पत्रें पाठविलीं पाहिजेस." बापूजींनासुद्धां विचारलें, "सुशीलेला आपल्या आईला पत्रें लिहावयांस सांगा ना." बापू म्हणाले, "मी कुठें तिला अडविली आहे?" बा एक माता होत्या. त्यांना असें वाटे कीं आपल्या मुलांचीं पत्रें न आलीं तर आपण जशा व्याकुळ होतों तशाच आमचीं पत्रें गेलीं नाहींत तर माताजी नक्की व्याकुळ होत असतील.

## बापूजींचा कैदेंतील दुसरा जन्मदिवस

१९४३ च्या ऑक्टोबर २ ला बापूजींचा या जेलमधील दुसरा वाढ-दिवस होता. बांची तब्येत नरम होती. शिवाय या वर्षी आमच्या अम्मा-जान (सरोजिनीदेवी) नव्हत्या. आम्हीच सर्व तयारी केली. बांनीं आपल्या हातानें कैद्यांना खाण्याचें वाढलें आणि आम्हालाहि कामांत होईल तितकी मदत केली. यांच्या पाशीं बापूजींनीं कांतलेल्या सुताची साडी होती. सेवाग्राम सोडतांना बांनीं ती मनूजवळ दिली होती: "लोक म्हणतात कीं आश्रम जप्त होणार आहे. म्हणून ही साडी तूं सांभाळून ठेव. कुठें हरवूं नकोस. मी मरण पावल्यावर ही साडी गुंडाळून मला जाळा." तुरुंगांत आल्यावर बांनीं त्या साडीचा तपास केला, पण कांहीं पत्ता लागला नाहीं. मनू आगाखान महालांत आल्यावर तिनें ती साडी कुठें ठेवली आहे तें सांगितलें, व बांनीं साडी मागवून घेतली. यावेळीं बापूजींच्या वाढदिवशीं बा तीच साडी नेसल्या होत्या.

## सहृदयता

ऑक्टोबरच्या अखेरीस माझ्या वहिनी शकुंतला यांचें शस्त्रक्रिया करून बाळंतपण करण्यांत आलें व त्यांना मुलगी झाली. नव्हेंबरच्या सुरु-वातीलाच सात दिवसांच्या पोरीला सोडून त्या स्वर्गवासी झाल्या. तुरुं-गांच्या पद्धति अशा विचित्र असतात कीं शस्त्रक्रियेविषयींची व मृत्यूची अशा दोन्ही तारा मला बरोबरच मिळाल्या व त्यासुद्धां मृत्यूनंतर आठ दिवसांनीं! तेवढ्यांत पत्रहि आलें. माझ्या वहिनी आपल्या सबंध आजारांत माझी आठवण काढीत होत्या. माताजींनीं तसेंच माझ्या भावानें (मोहन-लालनें) मला पॅरोलवर सोडण्यासाठीं सरकारकडे अर्जहि केला होता. पण मी गांधीजींच्या बरोबर होतें तेव्हां सरकार मला कसली बाहेर जाऊं देतें! बांचें कोमल हृदय या प्रसंगानें हळहळलें, व त्या बापूजींना म्हणाल्या: "सुशीलेनें आपल्या आईजवळ असायला पाहिजे."

बापूजींनीं हंसून म्हटलें, "सुशीला गेली तर तुझी सेवा कोण करील?"

"मला माहीत आहे कीं माझी गैरसोय होईल, पण मी कांहीं अशी स्वार्थी नाहीं कीं तिच्या दुःखाचा विचार मला येऊं नये." मग

मला म्हणाल्या : "सुशीला, तूं माताजींना व मोहनलालना पत्र लिहिलेंच पाहिजे."

मीं म्हटलें : "बा, मी सरकारला एकदा लिहून कळविलें आहे कीं मला पत्रें लिहावयाचीं नाहींत. आतां मला कसें लिहितां येईल?"

बा बापूजींपाशीं गेल्या. "सुशीलेची समजूत करून तिला सांगा कीं सरकारला लिहिलें म्हणून काय झालें? त्यावेळीं थोडीच कल्पना होती कीं अशी आपत्ति येणार आहे? भावाबहिणींनीं दोघांनींहि घरीं पत्र लिहिलेंच पाहिजे."

बापूजींनीं आम्हाला बोलावून सांगितलें : "पत्र न लिहिण्याचा सल्ला माझाच ना होता? मला वाटतें कीं विशेष परिस्थितींत पत्र लिहिण्यास हरकत नाहीं. माताजी व मोहनलाल यांच्या सांत्वनार्थ तुम्ही घरीं पत्र पाठविलें पाहिजे."

त्याच रात्रीं आम्हीं घरीं पत्र लिहिलें. माझ्या भावानें उत्तरीं कळविलें कीं माताजी आजारी असतात आणि अशा स्थितींत शकुंतलेच्या आठ दिवसांच्या मुलीला सांभाळण्याचा प्रश्न फारच बिकट होऊन बसला आहे. बापूजींनीं बांना म्हटलें, "बेबीला इथें बोलावूं या. तूं तिची काळजी घेशील ना?" बा म्हणाल्या : "मी काय सांगणार? मी असतें आजारी. पण सरकारनें येऊं दिलें तर माझ्यानें होईल तेवढें मी करीन." बापूजींनीं सरकारला पत्र लिहिलें कीं, "त्या बेबीची निगा ठेवायला घरीं कोणी नाहीं. एकतर सुशीलेला पॅरोलवर घरीं जावूं द्यावी. म्हणजे ती बेबीची योग्य व्यवस्था लावूं शकेल, नाहींतर बेबीला येथें पाठवून द्या. सुशीला डॉक्टर आहे, पण आमची मुलगी आहे. ती थोडे दिवस गेली तरीहि आमची गैरसोय ही होणारच. म्हणून बेबीलाच येथें आणूं दिली तर अधिक बरें. परंतु असें होऊं शकत नसेल तर आम्हाला गैरसोय सहन करावी लागली तरी खुशाल लागूं दे. पण सरकारनें सुशीलेला पॅरोलवर सोडावें." सरकारचें उत्तर आलें : "दोन्ही सूचनांपैकीं एकहि मंजूर होण्यासारखी नाहीं."

याच वेळीं सी. पी. सरकारनें सर्व स्त्री नजरकैद्यांना सोडून देण्याचा निर्णय केला. मनु सी. पी. सरकारची कैदी होती. तेव्हां हुकूम

आला कीं मनूची इच्छा असल्यास तिची सुटका होऊं शकेल. मनूनें न सुटण्याचा निर्णय केला : "मी बांच्या सेवेसाठीं आलेली आहें. सेवा अर्ध-वट टाकून कशी जाऊं?" बा खुष झाल्या. देवदासभाईंना पत्र लिहिलें त्यांतहि या गोष्टीचा उल्लेख केला. देवदासभाईंना असें वाटलें कीं सरकार सुशीलेला सोडीत होतें पण तिनेंच सुटायचें नाहीं म्हटलें. त्यांचें पत्र आलें, "सुशीलेनें असें करावयास नको होतें. तिच्या आईला तिच्या मदतीची फार जरूर आहे." बांना वाटलें कीं आपल्या पत्रानें हा गैर-समज झाला असल्यामुळें तो दूर केला पाहिजे. माताजींना असें वाटतां कामा नये कीं माझ्या गरजेच्या वेळीं माझी मुलगी माझी सेवा करायला नाहीं म्हणते. म्हणून त्या लगेच बापूजींकडे गेल्या व तार करविली : "सुशीलेला नव्हे, मनूला सोडण्याची गोष्ट होती." मी बांना म्हटलें : "तार कशाला करतां? लिहायचेंच असेल तर पत्र लिहा." पण बांनीं तें कबूल केलें नाहीं. आईची भावना त्यांना चांगली कळत होती व आई-विषयीं मुलांचें काय कर्तव्य आहे याचीहि त्यांना बरोबर कल्पना होती.

## अखेरचें आंथरूण

बांना धाप नेहमींच लागत होती. '४३ च्या नव्हेंबरांत धाप वाढली. कॅरम खेळतां खेळतांहि त्यांना दम लागूं लागला. डॉ. गिल्डर म्हणूं लागले कीं आपण कॅरम बंद करूं या. पण बांना कॅरमची इतकी आवड होती कीं तसें करणें बरें वाटलें नाहीं. एक दिवस एनिमा घेतल्यावर बांना घाबरल्यासारखें होऊं लागलें. मी जाऊन पाहिलें तों ओठ काळे पडले होते. नाडीचा वेग फार वाढला होता. मी औषध दिलें. थोड्या वेळानें तब्येत कांहींशी सुधारली, पण पुरी पहिल्यासारखी झाली नाहीं. दोन तीन दिवस ताप आला. तेव्हांपासून आंथरूण धरलें तें सुटलेंच नाहीं. फिरणें-सवरणेंहि बंद झालें. बांसाठीं एकचाकी खुर्ची मागविली. त्यांत बांना बसवून आम्ही त्यांना व्हरांड्यांत फिरवीत असूं.

आजारांतहि बा एकादशी, संक्रांत वगैरे विसरत नसत. मकरसंक्रांतीच्या दिवशीं त्यांनीं म्हटलें : "तीळ मागवा व त्याचे लाडू करून सगळ्या कैद्यांना वांटा." बापूजींनीं बांना चमकावीत म्हटलें : "हें बरें नव्हे. हें कुठें आपलें घर आहे? असलीं कामें कैदेंत करतां कामा नये. ती आपल्या

घरींच करावींत." बानीं म्हटलें: "पण मला कुठें आतां घरीं जायला मिळणार आहे!" दुसरे दिवशीं तीळ मागवून त्याचे लाडू बनविले. बांना चाकाच्या खुर्चींत बसवून बाहेर घेऊन गेलों, व त्यांनीं आपल्या हातानें सर्वांना तिळगूळ दिला.

डिसेंबरांत स्थिति जास्तच बिघडली. धाप चालू असल्यामुळें निजतांनाहि अडचण पडूं लागली. मागें टेंकण असलेली खाट मागविली. कांहीं दिवसांनीं स्थिति याहूनहि बिघडली. तेव्हां एक लहान टेबल तयार करविलें, त्यावर डोकें ठेवून बा निजत. त्या टेबलावर आपले हात ठेवून त्यांवर डोकें टेकून पडलेल्या बांचें चित्र अतिशय करुण होतें. बांच्या मृत्यूनंतर बापूंनीं तें टेबल स्वतःपाशीं ठेवलें. तेव्हांपासून हें टेबल जिथें तिथें बापूंबरोबर फिरत असतें. खाण्याचे वेळीं बापू त्याचा उपयोग करतात. बापूंचें खाणें चाललें असतां बा नेहमीं त्यांच्यापाशीं बसत. आतां बांच्या जागीं तें टेबल आलें आहे.

स्थिति आणखी जास्त बिघडली, ऑक्सिजन मागवून ठेवला. प्रथम बा नळी पटापट नाकासमोरून दूर करीत; पण मागाहून मात्र स्वतः मागवून ऑक्सिजन घेऊं लागल्या. मीं व डॉ. गिल्डरनीं सरकारला पत्र लिहिलें कीं डॉ. जीवराज महेता व डॉ. बिधन रॉय यांचा सल्ला मिळावा म्हणून त्यांना बोलाविलें पाहिजे. डॉ. जीवराज पुण्यांतच होते. एक दिवस संध्याकाळीं कांहीं मिनिटेंपर्यंतच त्यांना आणण्यांत आलें. त्यावेळीं बापूजींना बांजवळ राहूं देण्यांत आलें नाहीं. फक्त डॉ. गिल्डर व मी हजर राहूं शकलों. डॉ. बिधन रॉयना मात्र बोलाविलें नाहींच. दोनदां आठवण करून दिली, पण उत्तराचें नांव नाहीं.

आजार वाढला तसें शुश्रूषेचें काम वाढलें. दुसऱ्या नर्सांची मागणी केली तेव्हां सरकारनें एक आया पाठवून दिली. एक आठवड्याच्या आंतच ती निघून गेली. एवढ्या गोष्टीच्या आधारावर बांच्या मृत्यूनंतर मध्यवर्ती कायदेमंडळांत असें जाहीर करण्यांत आलें कीं बांच्या सेवेला सुशिक्षित नर्सा ठेवण्यांत आल्या होत्या. नर्सांसाठीं पुन्हा मागणी करण्यांत आली तेव्हां सरकारनें बाहेरून कोणी नातेवाईकाला बोलावण्यास सांगितलें. बांनीं कनू

गांधी व प्रभावती यांचीं नांवें दिलीं. लांबलचक पत्रव्यवहारानंतर, व पहिली मागणी केल्याला कित्येक आठवडे झाल्यावर, १२ जानेवारीला प्रभावतीबहेननां पाठविण्यांत आलें, व १ फेब्रुवारीला कनूला येऊं दिलें.

बापूजींनीं सरकारला लिहिलें होतें कीं बांना, तसेंच आपल्याबरोबरच्या इतर लोकांना, भेटी घेतां आल्या पाहिजेत. सुरुवातीला या पत्राचा कांहीं परिणाम झाला नाहीं. पण बांचा आजार वाढला तेव्हां सरकारनें त्यांचे दोन मुलगे रामदास गांधी व देवदास गांधी यांना तार करून बोलावलें. बा त्यांना भेटल्यावर फार खुष झाल्या. आम्हाला वाटलें कीं दर आठवड्याला बांना कोणी भेटायला आलें तर त्यांना फायदा होण्याचा संभव आहे. त्यांच्या आजाराचें एक मुख्य कारण तुरुंग हें होतें. तशा त्या अनेक वेळां कैदेंत जाऊन आल्या होत्या, पण या वेळची अनिश्चित मुदतीची कैद त्यांना फार बोंचत होती. शिवाय यापूर्वींच्या तुरुंगांत त्यांच्याबरोबर दुसऱ्या बऱ्याच स्त्रिया होत्या; तसेंच वेळोवेळीं बाहेरील लोकांच्या भेटीसुद्धां होत. त्यामुळें त्यांना कांहीं वाटत नसे. पण यावेळीं असें कांहीं नव्हतें. त्यांच्या मनावरील सर्वांत अधिक दडपण अशा मनोभावनेमुळें होतें कीं या वेळीं सरकारनें बापूजींना व त्यांच्याबरोबर इतरांना कारणावांचून पकडलें आहे. बांच्या मुलांना दर आठवड्याला तेथें येणें कठिण होतें. म्हणून इतर नातेवाईकांनाहि येण्याला परवानगी मिळाली व त्याबरोबरच असा हुकूम आला कीं, भेटीच्या वेळीं बांच्याजवळ बापूजींवांचून कोणी असूं शकणार नाहीं. पण आजारीपणांत नर्सवांचून कसें चालणार? अखेरीस एका नर्सला हजर राहण्याची परवानगी मिळाली. पण आजारीपण वाढलें तेव्हां मात्र एका नर्सवर भागविणें कठिण होऊं लागलें. बापूजींनीं फिरून तुरुंगाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. परिणामीं असा हुकूम आला कीं सुपरिन्टेन्डेन्टला जेवढ्या नर्सांची आवश्यकता वाटेल तेवढ्यांना हजर राहूं द्यावें.

डिसेम्बर महिन्यांतच बांनीं एखाद्या वैद्याला बोलावण्यास सांगितलें होतें; त्याप्रमाणेंच निसर्गोपचार करणाऱ्या डॉ. दिनशा मेहतांना बोलाविण्यासहि सांगितलें होतें. पण सरकारला एकदा सांगून काम थोडेंच होतें? बापूजींना फिरून एकदा लांबलचक पत्रव्यवहार करावा लागला व सरकारी ऑफिसरांना शेवटीं इतकें सांगावें लागलें कीं, "माझ्या पत्नीच्या उपचारासाठीं

अवश्य ती व्यवस्था मी करूं शकत नसेन तर मला तुम्ही दुसऱ्या एखाद्या तुरुंगांत नेऊन ठेवा, म्हणजे मला माझ्या पत्नीच्या मनोवेदनेचा मूक साक्षीदार बनावें लागणार नाहीं."

शेवटीं १९४३ च्या ५ फेब्रुवारीला सरकारनें डॉ. दिनशा महेतांना येऊं दिलें; व तोंडी असा हुकूम दिला कीं, ते येतील तेव्हां दोन डॉक्टरांशिवाय बांपाशीं कोणी राहतां कामा नये. बापूंना फार वाईट वाटलें. जेव्हां हा हुकूम सांगण्यांत आला तेव्हां बापू स्नान करायला जात होते. सामान्यपणें मालिश व स्नान ही त्यांची विश्रांतीची वेळ असते. त्यावेळीं ते झोंपीसुद्धां जातात. पण त्या दिवशीं असला हुकूम ऐकून त्यांना विश्रांति घेणें अशक्य झालें. आंघोळीच्या टबमधें पडल्यापडल्या त्यांनीं प्यारेलालकडून सरकारला एक पत्र लिहविलें. मजकूर सांगत असतां त्यांचे हात व ओठ कांपत होते. "मृत्युशय्येवर पडलेल्या स्त्रीच्या बाबतींत असल्या अटी घालणें शोभत नाहीं. तिला लघ्वीस किंवा शौचास जावयाचें झालें तर डॉ. दिनशा महेता तिथें असल्यामुळें काय इतर नर्सांना तिच्याजवळ जातां येणार नाहीं? मला स्वतःलाच डॉक्टरांना विचारायचें असलें कीं माझ्या पत्नीची तब्येत कशी काय आहे, तर मीं काय इतरांमार्फत विचारावयाचें? ही किती विचित्र गोष्ट! अशा रीतीनें वेळोंवेळीं मला टोंचण्यापेक्षां मला येथून दुसरीकडे नेण्यांत आलें तर बरें. म्हणजे मग माझी पत्नी मजकडून कशाचीहि आशा बाळगूं शकणार नाहीं अन् मलाहि तिच्या वेदनांचा मूक साक्षीदार व्हावें लागणार नाहीं." दुपारीं उत्तर आलें कीं, "हुकमाचा अर्थ समजण्यांत तुमची चूक झाली आहे. नर्सा राहूं शकतील, तसेंच तुम्हालाहि डॉक्टरांना कांहीं विचारायचें असल्यास विचारूं शकतां." तेव्हां तें पत्र पुढें पाठविण्याची बापूजींना जरूर राहिली नाहीं.

डॉ. दिनशांना दिवसांतून एकदांच यावयाची परवानगी मिळाली होती. बांची अशी इच्छा होती कीं ते बरेच वेळां आले तर बरें. म्हणून त्यासाठीं बापूजींना पुन्हा लिहावें लागलें व शेवटीं परवानगी मिळाली.

इकडे जानेवारी महिन्यापासूनच बांनीं पुन्हां एकदां वैद्यांचे उपचार करविण्याची मागणी सुरू केली होती. बापूजी, कर्नल भंडारी, कर्नल जलाल शाह,

आमच्या तुरुंगाचे सुपरिन्टेन्डेन्ट किंवा जे कोणी येई त्याला बा हेंच सांगूं लागल्या. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यांत बांची स्थिति अधिकच चिंताजनक झाली. बापूजींनीं पुन्हां तुरुंगाच्या ऑफिसरांना वैद्याला बोलावण्याचा आग्रह केला. जेलचे अधिकारी म्हणूं लागले, "हें आमच्या हातीं नाहीं. मुंबई सरकारला फोन करून आम्ही विचारतों." मुंबई सरकारनें उत्तर दिलें, "हें आमच्याहि हातीं नाहीं. दिल्ली सरकारला फोन करून आम्ही विचारतों." अशा रीतीनें दिवस जात चालले. अखेरीस ता. ११ फेब्रुवारीला बापूजींनीं याविषयीं सरकारला एक कडक पत्र लिहिलें. पण तें पत्र टपालांत पडण्यापूर्वींच बातमी आली कीं वैद्य, डॉक्टर, हकीम वगैरे ज्या कुणाला बोलवावयाचें असेल त्याबद्दल परवानगी देण्या न देण्याचें दिल्ली सरकारनें तुरुंगाच्या डॉक्टरवर ठेवलें आहे. बापूंनीं लगेच पुण्यांतील एखाद्या वैद्याला बोलावून आणायला सांगितलें. संध्याकाळ होई तों जोशी नांवाचे एक वैद्य आले. ते कांहीं औषध देऊन गेले. आपल्या औषधाबरोबर दुसरें कुठलेंहि औषध दिलें जाऊं नये अशी त्यांची सूचना होती.

दुसरे दिवशीं लाहोरचे वैद्यराज पंडित शिवशर्माजी येऊन पोंचले, व त्यांचें औषध सुरू झालें. रात्रीं बांना थोडीशी अस्वस्थता वाटूं लागली. पण वैद्याचें औषध चालू असेल तेव्हां इतर कोणतेंहि औषध देतां येत नव्हतें, म्हणून शर्माजींना कळविण्यासाठीं सुपरिन्टेन्डेन्टला सांगितलें. त्यांनीं फोनवरून वैद्यांना हकीकत कळविली. पण पाहिल्यावांचून वैद्यहि काय सांगणार ? त्यांनीं मालिश वगैरे करण्याचा सल्ला दिला. तें आम्हीं आधींच करून चुकलों होतों व त्यापासून मुळींच फायदा झाला नव्हता. बा जवळजवळ सबंध रात्र निजूं शकल्या नाहींत.

जेव्हां आजार थोडासा कमी होता तेव्हां जर कधीं झोंप आली नाहीं तर बा माझ्याजवळ किंवा मनूजवळ येऊन निजत. त्यावरून या रात्रींहि जें कोणी त्यांच्यापाशीं जाई त्याला बा म्हणत, "मला माझ्या खोलींत घेऊन चला, माझ्या खाटेवर निजवा." मला, भाईंना, बापूजींना, डॉ. गिल्डरना, सगळ्यांना बांनीं असें वारंवार सांगितलें. परंतु थंडीमध्यें बांना त्यांच्या खाटेवरून दुसरीकडे नेणें कुणालाहि बरें वाटलें नाहीं. शेवटीं थकून पहाटे पांच वाजण्याच्या सुमाराला त्या झोंपीं गेल्या.

आयुर्वेदीय औषधांवरून त्यांचें मन उडालें. डॉ. गिल्डरना म्हणूं लागल्या : "आतां मला वैद्याचें औषध देऊं नका. तुमचेंच औषध द्या." आम्हीं सर्वांनीं समजूत घालण्याचा प्रयत्न केला, "बा, वैद्यराजांचें औषध सुरू केलें आहे. त्याचा दोन चार दिवस अंदाज घेऊन नको का पहायला?" वैद्यराजांनींहि फोनवरून बांना आपलें औषध घेण्याची विनंति केली. शेवटीं बांची समजूत पटली व वैद्यराजांचें औषध चालू ठेवलें.

दुसरे दिवशीं बांची तब्येत इतकी उत्तम वाटली कीं, संध्याकाळीं बापूजी फिरायला गेल्यावर बा आपल्या चाकाच्या खुर्चीवर बसून सगळ्या व्हरांड्यांत फिरल्या व नंतर 'बाळकृष्णा' जवळ जाऊन पोहोचल्या. बापूजींनीं खालून पाहिलें, तेव्हां ते वर आले व दरवाज्यांत उभे राहून पाहूं लागले. बा ध्यानामध्यें तल्लीन होऊन प्रार्थना करीत होत्या. कांहीं वेळानें डोळे उघडले आणि बापूजींना पाहून लाजल्या, व हंसत हंसत म्हणाल्या "तुम्ही फिरायला जा. तुमचें इथें काय काम आहे?" बापूंना हंसूं लोटलें व ते पुनः फिरायला गेले. आम्ही सर्व अतिशय खूष झालों. आशेचे किरण दिसूं लागले. आम्हा सर्वांना वाटलें कीं एका दिवसाच्या औषधानें एवढा गुण आला ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. हा आयुर्वेदाचा चमत्कार आहे. पण रात्रीं परत बेचैनपणा सुरू झाला. एक वाजेपर्यंत झोंप आली नाहीं. तेव्हां फिरून सुपरिन्टेन्डेन्ट साहेबांना जागें केलें. त्यांनीं फोन करून वैद्यराजांना बातमी दिली. वैद्यराज येऊन एक गोळी देऊन गेले व बांना झोंप आली.

बांची स्थिति इतकी गंभीर होती कीं ज्यांचे उपचार चालू असतील त्यांना रात्रींसुद्धां बांजवळ असणें जरूरीचें होतें. परंतु सरकारनें वैद्यराजांना रात्रीं 'महालां'त राहण्याची परवानगी दिली नव्हती. अखेरीस वैद्यराजांनीं सांगितलें, "मी दरवाजापाशीं मोटारींत निजून राहीन, म्हणजे जेव्हां जरूर वाटेल तेव्हां मी येऊं शकेन." सर्वांवर त्यांच्या या कर्तव्य-परायणतेचा खोल परिणाम झाला. तीन दिवस वैद्य शिवशर्माजी आगाखान महालाच्या दरवाजापाशीं मोटारींत निजत. तरीसुद्धां त्यांना जेव्हां बोला-वण्याची जरूर वाटे तेव्हां प्रथम एका शिपायाला उठवावें लागें, तो जमादाराला उठवी, जमादार सुपरिन्टेन्डेन्ट साहेबांजवळून किल्ली घेऊन बाहेर वैद्यराजांना बोलवायला जाई व वैद्यराज आंत आले म्हणजे सुपरिन्टेन्डेन्ट

साहेब त्यांना घेऊन बांच्या खोलींत येत. जोंपर्यंत वैद्यराज आंत असत तोंपर्यंत सुपरिन्टेन्डेन्ट त्यांच्याबरोबर असत व त्यांना परत बाहेर पोंचवून निजावयास जात. ही सर्व खटपट बापूंना फार जाचत होती. १६ फेब्रुवारीला वैद्यराजांची मोटारींतील तिसरी रात्र होती. रात्रीं सुमारें साडेबारा वाजतां त्यांना बोलवावें लागलें व जवळजवळ दीड वाजतां ते परत मोटारींत निजायला गेले. बापू आपल्या खाटेवर पडल्या पडल्या हें सर्व पाहत होते. रात्रीं दोन वाजतां उठून त्यांनीं अधिकाऱ्यांना पत्र लिहिलें कीं, "वैद्यराजांना महालांत निजण्याची परवानगी मिळालीच पाहिजे. रोज रात्रीं इतक्या माणसांना उठवावें लागणें मला बिलकुल पसंत नाहीं; व उद्यां रात्रीपर्यंत, म्हणजे ता. १७ फेब्रुवारीच्या रात्रीपर्यंत, परवानगी मिळाली नाहीं तर वैद्यराजांचें औषध मी स्वतः बंद करवीन, आणि डॉक्टरांचें बंद झालेलेंच आहे. तेव्हां रोगी उपचारावांचूनच राहील."

पत्राचा परिणाम झाला. १७ फेब्रुवारीला वैद्यराजांना महालांत निजावयास परवानगी मिळाली. वैद्यराजांनीं रात्रीं दोन तीन वेळां बांना तपासलें. झोंपेचें औषध दिलें व रात्र बऱ्याच प्रमाणांत चांगली गेली.

१८ फेब्रुवारीला पुन्हा अस्वस्थता सुरू झाली. वैद्यराज सबंध दिवस शहरांत हिंडून नवीं नवीं औषधें आणून बांना देऊं लागले. परंतु बेचैनपणामुळें सबंध रात्र बांना झोंप लागली नाहीं. वैद्यराजांच्या औषधानें शौचाला झालें, पण लघ्वी होऊं शकली नाहीं. रात्रीं बांना किंचित् तापहि होता.

सकाळीं प्रार्थनेनंतर वैद्यराजांनीं बापूजींना म्हटलें: "माझ्याकडून होईल तेवढें सगळें मी केलें, पण बांची स्थिति सुधारत नाहीं, बिघडतच चालली आहे. अशा स्थितीत डॉक्टरांना त्यांचे उपाय करून पाहण्याची संधि दिली पाहिजे." बापूजींनीं मला आदल्या दिवशींच म्हटलें होतें कीं, उद्यांपर्यंत वैद्यराजांच्या औषधानें गुण न आला तर ते कदाचित् जातीलहि; मग केस तुमच्या हातांत येईल. त्याबाबत मला स्वतःला असें वाटतें आहे कीं औषध अजिबात बंद करावें. पण तुम्हीं सगळीं माझें म्हणणें मनापासून समजून घ्याल व स्वीकाराल तरच तें होऊं शकेल. परंतु ही गोष्ट मान्य करणें आम्हाला कठिण होतें. सकाळीं डॉ. गिल्डरनीं व मीं बांना तपासलें, व काय उपचार करावयाचे ते नक्की केले. दुपारीं लघ्वी व्हावी, म्हणून $\frac{1}{2}$ सी. सी. सॅलिर्गेनचें

इन्जेक्शन दिलें. या टेस्ट् डोझनेंहि संध्याकाळीं बांना पांचएक औंस लघ्वी झाली. आम्हा सर्वांना आनंद झाला. तीन चार दिवसांनंतर इतकी लघ्वी झाली होती. वैद्यराजांनीं सांगितलें कीं इन्जेक्शननें लघ्वी होते आहे तर त्याबरोबरच पुन्हा एकदा माझें औषध देऊन पाहूं द्या.

पण दुसरे दिवशीं म्हणजे ता. १९ फेब्रुवारीला सॅलिनचें पुन्या प्रमाणांत इंजेक्शन देऊनहि कांहीं परिणाम झाला नाहीं. फुफ्फुसांत न्यूमोनियाचीं लक्षणें दिसतच होतीं. त्यामुळें रक्ताचा दाब फारच कमी झाला होता. अशा स्थितींत बिचारा मूत्राशय कसें कार्य करणार! न्यूमोनियासाठीं सत्ताधिकाऱ्यांना पेनिसिलीन् मागविण्यास सांगितलें.

ता. १७ला दुपारीं हरिलालभाई आले. त्यांना पाहून बा फारच खुष झाल्या. नंतर कळलें कीं त्यांना एकदाच यावयाची परवानगी मिळाली होती. हें ऐकून बा नाखुष झाल्या. "हें काय हें? देवदासला दररोज येऊं देतात अन् हरिलालला एकदांच येऊं देणार? भंडारी माझ्या समोर आले तर त्यांना विचारीन कीं दोन भावांमध्यें असला भेदभाव कां म्हणून करतां? हा बिचारा गरीब आहे म्हणून कां आपल्या आईला भेटूं शकणार नाहीं?"

बापूजींनीं त्यांना शांत केलें व म्हटलें, "मी त्याला परवानगी मिळवून देईन." दुसऱ्या दिवशीं सरकारकडून परवानगी आली, पण हरिलालभाईंचाच पत्ता लागला नाहीं. बा दररोज विचारीत व दररोज उत्तर मिळे कीं त्यांचा कांहीं पत्ता लागत नाहीं. बांची स्थिति गंभीर झाली तेव्हां सरकारनें दोन्ही मुलांना बातमी कळविली होती. आम्हाला निरोप आला कीं देवदास व रामदास यांना कळविण्यांत आलें आहे, व हरिलालला सरकार शोधीत आहे.

## रामनाम हेंच औषध आहे

ता. १९ च्या सर्व रात्रभर ऑक्सिजनची नळी नाकांत ठेवूनच बा पडून होत्या. झोंप बरी आली. पण ता. २० फेब्रुवारीला सकाळीं ५ वाजल्यापासून अस्वस्थता सुरू झाली. वारंवार तोंडांतून 'राम, हे राम' असें बा उच्चारूं लागल्या. सॅलिनचा लघ्वीवर कांहीं परिणाम झाला नाहीं, तेव्हां

वातावरणांत अतिशय निराशा पसरली. बांचा अस्वस्थपणाहि वाढला. तेव्हां आम्ही सर्वच अस्वस्थ झालों. बापूजी येऊन बांच्या खाटेवर बसले. त्यांच्या खांद्यावर डोकें ठेऊन बा कांहींशा स्वस्थ झाल्या. त्याच स्थितींत बसल्या-बसल्या बापूजींनीं सकाळची प्रार्थना केली. त्यानंतर वारंवार आम्ही सर्व बांजवळ बसून रामनामाचा गजर करीत व भजनें म्हणत होतों. जेव्हां कोणी म्हणणारें नसेल तेव्हां ग्रामोफोनवर रेकर्ड लावीत होतों. 'श्रीराम भजो दुःखमें सुखमें' हें भजन बांना फार प्रिय होतें. तें ऐकतांना घटकाभर बा आपल्या वेदना विसरून जात. सव्वा नऊ वाजतां क्लोराल व ब्रोमा-इडचा एक डोस दिला. त्यानंतर दीडएक तास बा निजल्या. उठल्या तेव्हां तब्येत बरी होती. नंतर उठून बसल्या व उत्तम प्रकारें दंतधावन केलें. दांत घासले. नाकांत पाणी ओढलें. सर्वांना आश्चर्य वाटूं लागलें कीं बांच्यांत एवढी शक्ति आली कोठून! मग चहा पिऊन पुन्हा झोंपीं गेल्या. औषध नको म्हणाल्या. दुपारीं एक वाजतां परत अस्वस्थता सुरू झाली. 'राम हे राम' असें बोलूं लागल्या. त्यांच्या आवाजांत एवढी करुणता भरलेली होती कीं त्यांचें बोलणें ऐकवत नव्हतें. बा बोलत तेव्हां वाटे कीं जणूं बकरीच्या गळ्यावर सुरी फिरवली जात आहे अन् ती बें बें करीत आहे! गीता, रामनाम, भजन वगैरे चालूच होतें. त्यामुळें मधून मधून बा थोडा थोडा वेळ शांत होत असत.

बापूजी सबंध दिवस बांच्या खाटेवर बसून असत. ते बसले म्हणजे बांना कांहींशी शांति मिळे. बापूंनीं आम्हाला म्हटलें, "आतां केवळ रामनाम हेंच औषध राहिलें आहे. बाकी सर्व उपचार सोडा. मला तर असें वाटतें कीं, मध-पाण्यावांचून दुसरा कांहीं आहारहि देऊं नये. बानें स्वतः मागितलें तर गोष्ट निराळी. माझा औषधावर विश्वास नाहीं. माझ्या मुलांच्या गंभीर आजारांतहि मीं त्यांना औषध दिलें नाहीं. पण बांच्या बाबतींत मी माझा नियम चालविला नाहीं. परंतु आज मात्र तिला स्वतःलाच औषधाविषयीं अप्रीति उत्पन्न झाली आहे. रामनामाशिवाय तिला चैन पडत नाहीं. हें दृश्य करुण आहे पण मला फार प्रिय आहे. रामावांचून तिच्या तोंडून आज मला कांहीं ऐकूंच येत नाहीं. अशा वेळीं मी तरी औषध सोडूनच दिलें असतें. ईश्वर वांचविणार असेल तर वांचवील, नेणार असेल तर

नेईल. ईश्वराला तिला वांचवायची असेल तर कांहीं उपचाराशिवाय देखील वांचवील, नाहीं तर मी बाला जाऊं देईन."

संध्याकाळीं बांनीं एनिमा घ्यायचा म्हटलें. बापूजींची तो टाळावा अशी इच्छा होती. "आतां रामनामच तुझें औषध आहे." पण बांना तें कबूल झालें नाहीं. मी बापूजींना म्हटलें, "म्हणताहेत तर घेऊं द्या ना. शेवटच्या घटकेला जेवढा संतोष देतां येईल तेवढा देऊं या." बापूंनीं संमति दिली. एनिमानंतर खूप मळ बाहेर पडला. नंतर दोन तास बा स्वस्थपणें झोंपल्या. त्यांची स्थिति इतकी बरी दिसूं लागली कीं मीं बापूजींना म्हटलें: "बापूजी, औषध देण्याची परवानगी द्या ना. जोंवर प्राण आहे तोंवर प्रयत्न कां करूं नये?" पण बापू थोडेंच माझें ऐकणार होते!

## सर्वांच्या बा

रात्रीं डॉ. दिनशा महेतांनाहि तेथें निजण्याची परवानगी मिळाली. बांची स्थिति गंभीर झाली तेव्हांपासून रात्रीं अर्ध्याहून जास्त वेळ मी बांपाशीं बसत असें. कनू, प्रभावती, मनू, भाई हीं आळीपाळीनें बसत. नेहमीं दोघेजण हजर राहणें अवश्य होतें. जेव्हां मी नसें तेव्हां डॉ. गिल्डर आंथरुणावरून उठून मधून मधून बांना पाहून जात. त्यांचीहि तब्येत कांहीं बरी नव्हती. म्हणून त्यांना जास्त त्रास देणें योग्य वाटत नसे. पण डॉ. दिनशांना उठवण्यांत संकोच वाटण्याचें कांहीं कारण नव्हतें. म्हणून त्यांना बांजवळ बसवून रात्रीं दोन वाजतां मी निजायला गेलें. सकाळीं उठलें तेव्हां कळलें कीं चार वाजतां बांची नाडी फार खराब झाली होती आणि डॉ. गिल्डरनां उठविण्यांत आलें होतें. सकाळीं उठून तेथें गेलें तेव्हां डॉ. गिल्डर बांच्याजवळ ख़ुर्चीवर बसलेले दिसले. त्यावेळीं नाडी बरी होती. बा एरंडेल मागत होत्या. (त्याचा उल्लेख पूर्वीं आलेलाच आहे.)* डॉक्टर साहेबांनीं म्हटलें: "बा, एरंडेलानें अशक्तपणा वाढेल, तेव्हां तें घेतां कामा नये." बा म्हणूं लागल्या, "तर मग खुशाल वाढो, मला आतां लाकडांवरच चढायचें आहे ना?"

डॉक्टरसाहेब म्हणाले, "बा, असें कां बोल्तां? अजून मुलगे यायचे आहेत, आज देवदास येईल, रामदास येईल. सगळ्यांना भेटायचें आहे ना?"

---

* पहा पा. १६८-६९

बा किंचित् हंसल्या. मग गंभीर होऊन म्हणाल्या, "त्यांना कशाला बोलावतां? तुम्हीं सर्व माझीं मुलेंच आहां ना? मरून गेलें तर जाळून टाका. रामदासला तर येऊं देऊंच नका. आगगाडीचें भाडें जास्त आहे अन् गाडींत गर्दी फार असते."

बा दररोज हरिलालभाईविषयीं विचारीत असत. सगळे त्यांचा तपास करीत होते, पण ते सापडत नव्हते. २० तारखेला स्वामी आनंद यांनीं त्यांना शोधून काढलें. हरिलालभाईनीं सुपरिन्टेन्डेन्ट साहेबांना फोनवरून सांगितलें कीं मी येणार होतों, पण दुपारीं झोंपीं गेलों, व त्यामुळें येऊं शकलों नाहीं. 'झोंपीं जाण्या'चा अर्थ काय तें आम्हीं सर्व समजलों. बांना राग आला. बापूजींनीं समजूत घालून बांना शांत केलें. ता. २१ला दुपारीं हरिलालभाई आले. त्यांची स्थिति पाहून दुःखानें बा डोकें आपटूं लागल्या. हरिलालभाईंना त्यांच्यापुढून दूर नेण्यांत आलें.

एवढ्या श्रमानें बांच्या छातींत दुखूं लागलें होतें. सकाळीं त्यांनीं एरंडेल घेण्याचा आग्रह धरला होता. त्यावरून मीं बापूजींना विचारलें, "अशा स्थितींत बांना दुसरें औषध देण्यास परवानगी नाहीं देणार?" बापूजींनीं म्हटलें, "बानें एरंडेल आग्रहपूर्वक घेतलें आहे. तेव्हां माझा विरोध राहिलाच नाहीं. जें योग्य वाटेल तें द्या." म्हणून मीं बांना हृद-याची व्यथा थांबण्याचें औषध दिलें व रामनामाचा गजर चालविला. बा शांतपणें ऐकूं लागल्या.

## बापूजींची पत्नीभक्ति

बापू रात्रीं बरेच वेळां बांच्याजवळ येऊन जात. पण बा त्यांना जास्त वेळ बसूं देत नसत. दिवसाहि पुष्कळ वेळ बापू बांच्या खाटेवर येऊन बसत. बांना टेंकायच्या इतर साधनांपेक्षां आमच्यापैकीं कुणाचा तरी आधार घेऊन बसणें अधिक पसंत पडे. बापूजी जेव्हां जवळ बसत तेव्हां त्यांनाच टेंकून बा बसत. डॉ. गिल्डरनीं मला म्हटलें: "जरा लक्ष ठेवलें पाहिजे. न्युमोनियाचे जंतु फार विषारी असतात. बापूंचें तोंड बांच्या तोंडाच्या फार जवळ असतें हें बरें नव्हे. तेव्हां बापू इथें कमी बसतील तर बरें." पण बापूजींना याविषयीं कांहीं सांगणें ही कांहीं सोपी गोष्ट नव्हती.

अशक्तपणा वाढल्यामुळें बा जेव्हां थुंकत तेव्हां जवळ असलेल्या नर्सला त्यांचें तोंड पुसून काढावें लागे. आम्ही फडक्यानें तोंड पुसून तें फडकें फेंकून देत असूं. बांच्या मृत्यूपूर्वी तीन चार दिवस बापूजी रात्रीं त्यांच्याजवळ गेले, तेव्हां लहान लहान नवे रुमाल तयार करण्यास आम्हांला सांगितलें. दुसरे दिवशीं मीं आणि मनूनें चार रुमाल केले. बापूजी जेव्हां रात्रीं किंवा दिवसा बांजवळून जात तेव्हां मळलेले रुमाल उचलून धुवावयास नेत. पहिल्या दिवशीं मी म्हटलें: "बापूजी, आपण हें राहूं द्यावें, आम्ही धुवून घेऊं." बापूजींनीं उत्तर दिलें: "मला करूं द्या, मला हें करणें आवडतें." त्यानंतर पुन्हा केव्हांहि मीं बांची सेवा करावयाचें काम त्यांच्या हातांतून घेण्याचा प्रयत्न केला नाहीं.

एक दिवस दुपारीं बापूजी जेवल्यावर बांजवळ जाऊन बसले. बांची झोंपायची तयारी झाली होती. बापूजींना टेंकून जर त्या झोंपी गेल्या तर त्या जाग्या होईपर्यंत बापूजींना उठणें शक्य नव्हतें. बापूजींची स्वतःचीहि निजायची वेळ झालेली होती. ते खूप थकलेले होतेच. मी म्हणालें, "बापूजी, आतां तुम्ही मला बांजवळ बसूं द्या, निजून उठल्यावर इकडे या." बापूजी तेथून गेले खरे पण आपल्या गादीवर पडल्यावर म्हणूं लागले, "मला थोडा वेळ बसूं दिलें असतें तर काय झालें असतें?" त्यांना तिथून उठून जाण्याची सूचना करण्याचें कारण मी सांगितलें, पण मनाला टोंचणी सुरू झाली कीं थोडे दिवस बापूंच्या विश्रांतींत व्यत्यय आला तरी चालेल; पण ज्या कामांत त्यांच्या मनाला शांतता मिळत असेल त्यांत मीं कां मधें पडावें? या अखेरच्या क्षणीं न्युमोनिया असो कीं दुसरें कांहीं असो, बापूंना असें सांगण्याची कोणाची छाती होती कीं तुम्ही बांच्या जवळ कमी बसत चला म्हणून? डॉक्टरसाहेब म्हणाले, "जवळ बसले तरी चालेल, पण बांच्या तोंडाजवळ आपले तोंड येऊं दिलें नाहीं म्हणजे झालें." पण एवढेंहि सांगण्याची त्यावेळीं कोणाची हिंमत नव्हती. बापू स्वतः असल्या स्पर्श वगैरे गोष्टी महत्त्वाच्या मानीत नाहींतच. तेव्हां मौन बाळगणें हेंच ठीक वाटलें. डॉक्टरसाहेबहि समजले. "हां, बरें आहे. बासष्ट वर्षें एकत्र राहून आज वियोगाचा क्षण नजीक आलासा वाटत आहे, अशा वेळीं बापू बांजवळून दूर कसे राहूं शकतील? आणि आपणहि त्यांना याविषयीं कसें

कांहीं सांगावें ? " असें म्हणतां म्हणतां त्यांच्या डोळ्यांना पाणी आलें.

अखेरचा आजार सुरू होण्यापूर्वी कित्येक दिवसांपासून बांना शौचाचे व लघ्वीचे वेळीं आग होत असे. बापूजींना त्या म्हणाल्या, " मी पाण्याचा उपचार करीन. " दुसऱ्या दिवसापासून थंड व गरम पाण्याचे टबबाथ घेणें सुरू झालें. ते देतांना बापूजींचा जवळजवळ एक तास जाई, व बरेचसे थकूनहि जात. बांनीं एक दिवस म्हटलें: " तुम्ही जा. मला सुशीला बाथ देईल. तुम्हाला पुष्कळ काम आहे. " बापूंनीं उत्तर दिलें : " त्याची फिकर नाहीं. " असें म्हणून बाथ देण्याचें चालू ठेवलें. एक दिवस मीं म्हटलें, " बापूजी, आपणाला वेळेची कितीतरी ओढाताण आहे. आपण जेव्हां सांगाल तेव्हां मी बांच्या सेवेला तयारच आहें. तेव्हां आपली इच्छा असेल तेव्हां हा बाथ वगैरे देण्यांतील एक तास आपण वांचवूं शकतां. " बापूजींनीं अशा तऱ्हेनें तास वांचवायला नकार दिला, व म्हणाले : " तूं बांची सेवा करायला तयार आहेस हें मला माहीत आहेच. पण उत्तरावस्थेंत ईश्वरानें मला अशा तऱ्हेनें बांची सेवा करण्याची संधि दिली आहे तिला मी अमूल्य समजतों. जोंपर्यंत बा माझी सेवा घेत राहील तोंपर्यंत मी खुषीनें एक तास तिच्यासाठीं बाजूला काढीन. "

बा कुणाच्या मांडीवर असतां जाणार अशाविषयीं बांच्या मरणापूर्वी दोन तीन दिवस बापूजींनीं बोलणें काढलें. ते म्हणाले : " ज्या भाग्यवंताची सेवा एकनिष्ठ असेल त्याच्याच मांडीवरून बा जाणार. पण तें मात्र भगवंतालाच माहीत. " तें भाग्य त्यांच्यावाचून दुसऱ्या कुणाला लाभणें शक्य होतें !

## शेवटची रात्र

संध्याकाळीं जवळजवळ साडेसहा वाजतां देवदासभाई, मनू ( हरिलालभाईंची मुलगी ) व संतोकबहेन येऊन पोंचलीं. त्यांना पाहतांच बांना रडूं कोसळलें. हरिलालभाईविषयींचें त्यांचें दुःख अजून शांत झालें नव्हतें. देवदासभाईंना पाहून म्हणूं लागल्या, " आतां तुलाच सगळ्यांची काळजी घ्यायची आहे. बापूजी आहेत साधु, त्यांना सबंध दुनियेचा सांभाळ करावयाचा आहे; आणि हरिलालचें तुला माहीतच आहे. तेव्हां कुटुंबाची काळजी तुलाच वाहावी लागणार. "

मनूनें बांना भजन म्हणून दाखविलें. बांची अशी इच्छा होती कीं संतोकबहेन व मनू रात्रीं आपल्याजवळ राहाव्यात. पण सरकारनें परवानगी दिली नाहीं. देवदासभाईंना राहण्याची परवानगी होती. देवदासभाई त्यांना बाहेर पोंचविण्यास गेले. बा माझ्या मांडीवर झोंपी गेल्या. पण आजच्या त्यांच्या झोंपेनें मला संतोष वाटला नाहीं. लघ्वीला न झाल्यानें आतां गुंगी येऊं लागली होती. ही झोंप ताजेपणा आणणारी झोंप नव्हती. रात्रीं साडे-अकरा वाजतां मी उठलें. प्रभावतीबहेन बांपाशीं येऊन बसल्या. बांनीं त्यांना म्हटलें: "चला, आपण दोघी झोंपीं जाऊं या." तेवढ्यांत जोरानें ढांस आली. मी औषधाचा भाग घेऊन बांजवळ गेलें. बांनीं औषध नाहींच घेतलें. पण मला खाटेजवळ घाण आली. दिवा आणून पाहतें तों खाटेंतच परसाकडेस झालें होतें. बांना त्याची जाणीवहि नव्हती. मला वाटलें कीं ही आतां जाण्याची तयारी आहे. खाटेवरची चादर व कपडे बदलले व बांना निजविलें. तेवढ्यांत देवदासभाई आले. ते बांची खडया पायावर उभे राहून चाकरी करूं लागले. मी दिव्याजवळ जमीनीवर बसून बांच्या तब्येतीविष-यींची रोजनिशी लिहूं लागलें. देवदासभाई हळूहळू बांचें डोकें चेपीत होते. त्यांना वाटलें कीं बा झोंपीं गेल्या आहेत, म्हणून त्यांनीं चेपण्याचें बंद केलें. बांनीं मला हांक मारली, "सुशीला, तूंहि थकलीस कां?" मीं म्हटलें, "बा, मला कसला आला आहे थकवा?" मग मी डोकें चेपणें सुरू केलें. बांच्या डोक्यांत कळ येत होती. चक्कर येत होती. मेंदूहि सैरभैर झाला होता. युरेमियाचीं चिन्हेंहि दिसूं लागलीं होतीं. दोन वाजतां बांना झोंप लागली. पावणेतीनला मी निजायला गेलें. देवदासभाई पांच वाजेपर्यंत बांच्याजवळ उभे होते. त्यांच्या चेहऱ्यावर ग्लानि व प्रेम निथळत होतीं. आई जाण्याच्या तयारींत आहे या विचारानें त्यांचें हृदय बालकाप्रमाणें रुदन करूं लागलें होतें. तेथें उभे असलेले ते आईवरील पुत्रप्रेमाच्या मूर्तीसारखे दिसत होते.

## २२ फेब्रुवारी १९४३

२३ तारखेला सकाळीं सात वाजतां उठून मी आंत गेलें. हाततोंड धूत होतें तेवढ्यांत बांनीं हांक मारली, "सुशीला"!

मी जवळ जाऊन विचारलें: "काय आहे, बा?"

बांनीं म्हटलें: "सुशीला मला घरांत घेऊन जा. माझी काळजी घे."

मीं त्यांच्या खाटेजवळच टांगलेलें 'हे राम' लिहिलेलें चित्र दाखविलें, "हें पहा, बा, तुम्ही घरांतच आहां. हें पहा तुमचें आवडतें चित्र."

थोड्या वेळानें बा पुन्हा बोलल्या: "मला घरांत घेऊन जा, बापूजींच्या खोलींत घेऊन जा."

मीं म्हणालें: "पण तुम्ही बापूजींच्याच खोलींत आहां, बा." मग मला वाटलें कीं कदाचित् बा बापूजींना बोलावूं इच्छीत असाव्या. ते शेजारच्या खोलींत न्याहारी करीत होते. मी त्यांना कळविलें कीं फिरायला जाण्यापूर्वीं जरा बांजवळ येऊन जा.

बा माझ्या मांडीवर पडून होत्या. एकाएकीं बोलूं लागल्या, "सुशीला, कुठं जायचें ? मरून जायचें ?" पूर्वीं बा जेव्हां असें बोलत तेव्हां मी म्हणत असें: "असें काय बोलतां, बा ? आपण सगळीं बरोबरच घरीं जाऊं." पण आज तसें म्हणण्याचा मला धीर झाला नाहीं. मी म्हणालें: "बा, एक दिवस आपणां सर्वांनाच मरायचें आहे ना ? पुढेंमागें सगळ्यांनाच जावें लागणार आहे, त्यांत काय आहे ?" बांनीं डोकें हालविलें, जणूं कांहीं 'हो' म्हणत असाव्यात तसें. मग शांत होऊन डोळे मिटून मला टेकून अर्धवट झोंपीं गेल्या.

थोड्या वेळांत बापूजी आले. बराच वेळपर्यंत जवळ उभे राहिले. मग म्हणाले, "आतां मी फिरायला जाऊं ?" नेहमीं बापू बांजवळ बसूं लागले म्हणजे बा एक तर "नाहीं, फिरायला जा," असें किंवा "झोंपायला जा" असें तरी म्हणत. पण आज बापूजींनीं फिरायला जाण्याचें विचारलें तेव्हां बांनीं नको म्हटलें. बापू त्यांच्याजवळ खाटेवर बसले. बांनीं त्यांच्या छातीवर आपलें डोकें ठेवलें आणि त्यांचा आधार घेऊन डोळे मिटून पडून राहिल्या. त्यावेळीं दोघांच्या चेहऱ्यावर अपूर्व शांति आणि संतोष दिसून येत होतीं. तें दृश्य इतकें पवित्र, इतकें दिव्य होतें कीं, आम्ही तें पाहतांच हळुवार पावलांनीं थोडेसे दूर जाऊन उभे राहिलों. बापूजी दहा वाजेपर्यंत तेथेंच बसून राहिले. मधून मधून ते बांना रामनामाचा आधार घेण्यास सांगत होते. त्यांना जरासा खोकला आला तरी थोपटीत होते.

भाई, मी आणि देवदासभाई जेवणघरांत बसल्याबसल्या गप्पागोष्टी करीत होतों. देवदासभाई म्हणत होते कीं, एका सरकारी अंमलदारानें बांना कां सोडण्यांत येत नाहीं तें मला स्पष्टपणें सांगितलें: "आम्हीं जर त्यांना सोडलें आणि बाहेर आल्यावर त्यांची स्थिति गंभीर झाली तर लोक तुमच्या वडिलांनाहि सोडण्याची मागणी करतील, आणि मग आम्हीं त्यांना सोडलें नाहीं तर लोक आम्हाला राक्षस म्हणतील."

दहा वाजतां बांनीं बापूजींना जावयास सांगितलें. मी त्यांच्या जागीं बसलें. एकटी होतें. मला विचार आला, "जाणतां अजाणतां झालेल्या सर्व चुकांची बांजवळ क्षमा मागावी." पण बोलायला गेलें तोंच गळा दाटून आला आणि तोंडून शब्दहि बाहेर पडेना. बा सकाळीं सात वाजतां म्हणाल्या होत्या, "काय, मरून जायचें?" त्याच विचाराची पुन्हा त्यांना आठवण करून देणेंहि मला बरें वाटलें नाहीं. बांना मधूनमधून गुंगी येत होती. आजचाच असा पहिला दिवस होता कीं, जेव्हां त्यांनीं तोंड धुणें वगैरे केलें नव्हतें. मी बोरोग्लिसरीननें तोंड साफ करूं कां, म्हणून विचारलें तेव्हां त्यांनीं नको म्हटलें.

पेनिसिलिन् कलकत्त्याहून विमानद्वारा पाठविण्यांत आलें होतें. कर्नल शाह व कर्नल भंडारी बातमी घेऊन आले कीं पेनिसिलिन् आलें आहे. बापूजींनीं सर्वच्या सर्व औषधें बंद करून टाकलीं होतीं. बांनाहि औषध घेण्याची मुळींच इच्छा नव्हती. अशा स्थितींत काय करावें, हा विचार करण्यासारखा प्रश्न होता. देवदासभाईंची अशी इच्छा होती कीं पेनिसिलिन्चा उपयोग करून पाहावा. डॉक्टर गिल्डरबरोबर व मजबरोबर याविषयीं विचारविनिमय करून बाहेरच्या कुणा मिलिटरी डॉक्टरबरोबर बोलणें करण्यास जायच्या बेतांत ते होते. डॉ. दिनशा महेता त्यांच्याबरोबर जाणार होते. तेवढ्यांत बांनीं हांकारा केला, "महेता कुठें आहेत? मला मालिश वगैरे करा म्हणावं." डॉ. दिनशा जिन्यावरच होते. त्यांना परत हांक मारण्यांत आली. बांची अशी स्थिति असतां मालिश करण्याची त्यांना मुळींच जरूर भासत नव्हती. परंतु बांचा आग्रह पाहून १५ मिनिटें पावडर घेऊन त्यांनीं थोडें मालिश केलें, आणि मग निघून गेले. बा अर्धवट गुंगींत माझ्या मांडीवर पडून राहिल्या होत्या. कांहीं वेळानें पुन्हां म्हणाल्या:

"महेता कुठें आहेत ? ते सर्व करतील." जवळजवळ अंतकाळीं बांनीं महेतांची आठवण काढली हा महेतांवरील त्यांच्या श्रद्धेचा पुरावाच म्हटला पाहिजे. मी ओल्या कपडयानें त्यांचें तोंड स्वच्छ केलें. तेवढ्यांत कर्नल भंडारी आले. देवदासभाईंनीं बांचा फोटो घेण्याची परवानगी मागितली होती. ते विचारायला आले होते कीं याविषयीं बापूजींची काय इच्छा आहे ? बापूंनीं सांगितलें: "मी असल्या गोष्टींबद्दल अगदीं उदासीन आहे, पण मुलांची अन् नातेवाईकांची इच्छा असेल तर सरकारनें परवानगी दिली पाहिजे."

प्रभावतीबहेननां बांजवळ बसवून मी स्नान करण्यास गेलें. माझ्या गैरहजेरींत डॉ. गिल्डर बांजवळ होते. बांची नाडी फारच अनियमित झाली होती. मधून मधून हाताला लागतच नसे व फिरून पुन्हा पहिल्यासारखी चाले. गेल्या रात्रींनंतर नाडीची स्थिति वेळोंवेळीं अशी होत होती. सर्वांना वाटूं लागलें कीं आतां कांहीं दिवसांचा नव्हे तर घटकांचा प्रश्न आहे. बापूजींनीं मला सांगितलें होतें कीं, तूं कांहीं नाहीं तरी पाव तास फिरून यावेंसच. म्हणून स्नान करून मी पंधरा मिनिटें फिरायला गेलें. फिरतां फिरतां मी प्रार्थना करीत होतें:

मूकं करोति वाचालं पङ्गुं लङ्घयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥

हा श्लोक वारंवार हृदयांतून उमटत होता. खरंच त्या माधवाला बांना अजूनहि वांचवितां नाहीं का येणार ? परंतु मनुष्याच्या बाबतींत चांगलें काय आहे किंवा काय नाहीं, हें भगवंतालाच माणसापेक्षां जास्त कळणार; आणि तो त्याचप्रमाणें करतो. केव्हांतरी बांना जावें लागणारच कीं ! स्वातंत्र्यार्थ चाललेल्या अहिंसक युद्धामध्यें तुरुंगांत मरण पावणें व अशा रीतीनें स्वातंत्र्याच्या वेदीवरील बलिदान होऊन हुतात्मा बनणें क्वचितच कुणाच्या नशिबीं असतें. बांच्या आमरण तपस्येनंतर हें सौभाग्य त्यांना प्राप्त होणार नाहीं तर कुणाला प्राप्त होणार ? भगवंतानें त्यांना ज्या महान् पदाला योग्य मानलें त्यांत माझ्यासारख्या मोहवश व्यक्तीच्या प्रार्थनेनें थोडाच फेरफार होऊं शकणार होता !

बापूजी कित्येक दिवसांपासून पातळ पदार्थांचाच आहार करीत असत. त्यांच्या मनावर बांच्या आजाराचा एवढा मोठा भार होता कीं आहार कमी केल्यावांचून त्यांना आपली तब्येत बरोबर ठेवणें शक्य नव्हतें. शिवाय त्या दिवसांत खाण्यामध्यें अर्धापाऊण तास जावा हेंहि त्यांच्या मनाला खुपत असे. स्नान केल्यावर दहा मिनिटांतच खाणें संपवून ते बांजवळ येऊन बसत. एकदां बसले म्हणजे मग उठून जाणें त्यांच्या जीवावर येई. म्हणून साधारणतः आपलें सर्व काम आवरूनच ते बांजवळ येत.

मी फिरून परत आलें तेव्हां बापूजी बापाशीं बसले होते. बा एकाएकीं खाटेवर उताण्या निजल्या. दम्यामुळें कित्येक महिन्यांपासून बा उताण्या निजूं शकत नसत. कुणा माणसाचा आधार घेऊन किंवा दुसऱ्या कशाला टेकून बसल्या तरीसुद्धां समोरच्या टेबलावर डोकें टेंकावें लागे. आज त्यांना अशा निजलेल्या पाहून आम्ही सर्व चमकलों. देवदासभाईंना निरोप पाठविला. ते लेडी ठाकरसींच्या घरीं निजण्याच्या तयारींत होते. बातमी कळतांच ते मनूसह आले. डॉ. दिनशा महेताहि आले. बापूजींनीं बांना विचारलें: "रामनाम किंवा भजन ऐकायचंय?" बांनीं नाहीं म्हटलें. नंतर बापूजींनीं बाजूच्या खोलींत हळू आवाजांत गीतापाठ सुरू करण्यास सांगितलें. कनू, देवदासभाई, प्यारेलालजी वगैरे आळीपाळीनें गीतेचें पठण करूं लागले, जेणेंकरून बांच्या कानीं तो ध्वनि पडावा.

रात्रींपासूनच गिळतांना बांना अडचण पडत होती. पाणी पिणेंहि नकोसें झालें झालें. दुपारीं देवदासभाई गंगाजल घेऊन आले. त्यांत थोडीं तुळशीचीं पानें तोडून टाकलीं. बापूजींनीं सांगितलें: "देवदासनें गंगाजल आणलें आहे." बांनीं तोंड उघडलें. बापूजी चमच्यानें पाजूं लागले. तें सर्व बांनीं पिऊन टाकलें. पुन्हा तोंड उघडलें. बापूजींनीं एक चमचाभर पाजलें व म्हणाले: "आतां परत थोड्या वेळानें घे बरं." बा शांतपणें डोळे मिटून झोंपीं गेल्या. गुंगींत बा 'हे गंगाजी' असेंहि बोलत होत्या. गंगाजलाचें पान केल्यानें त्यांना अपूर्व शांतता लाभली होती. इतर नातेवाईकांना बांजवळ बसण्याची संधि मिळावी म्हणून बापूजी त्यांच्याजवळून उठून जवळच ठेवलेल्या आपल्या गादीवर जाऊन बसले.

थोडया वेळानें संतोकबहेन, केशुभाई, रामीबहेन (हरिलालभाईंची मोठी मुलगी) आलीं. अशा वेळीं बांच्यांत शक्ति कशी आली कुणाला माहीत. पण उठून त्या सर्वांबरोबर बोलूं लागल्या. संतोकबहेननां म्हणाल्या: "देवदासनें माझ्यासाठीं खूप येजा केली, फार सेवा केली आहे." देवदासभाईंना म्हणूं लागल्या: "तूं माझी पुष्कळ सेवा केली आहेस. आतां तूं आपलें कर्तव्य कर; सर्वांची काळजी घे." देवदासभाईंनीं म्हटलें: "बा, मी काय सेवा केली आहे? मी तर काल रात्रीं आलों. सेवा खरोखर तुझ्या सोबत्यांनीं केली आहे." परंतु बांना अंतकाळीं देवदासभाईंना पाहून परम संतोष झाला होता. त्यांच्या एका रात्रीच्या सेवेची त्यांच्या मनाला सर्वांत जास्त किंमत वाटत होती. देवदासभाईंनीं म्हटलें: "बा, रामदासभाई येत आहेत." "काय काम आहे?" बांनीं म्हटलें. रामदासभाईंना त्रास देणें हें बांना फार जांचे.

बापूजींकडे पाहून बा म्हणूं लागल्या: "मी जाण्यांत दुःख कसलें? माझ्या नांवानें लाडू करून खायचे." त्यानंतर हात जोडून डोळे मिटून ईश्वराची प्रार्थना करूं लागल्या, "हे परमेश्वरा, ढोरांप्रमाणें पोट भरभरून खाल्लें आहे. माफ कर. आतां फक्त तुझीच भक्ति हवी आहे, तुझेंच प्रेम पाहिजे आहे." त्यांच्या चेहेऱ्यावर अपूर्व शांति होती. त्यांनीं त्या-वेळीं सगळी माया ममता सोडली होती. त्यांची वृत्ति संपूर्णपणें सात्त्विक झाली होती.

कनूनें बांचे थोडे फोटो काढले. सर्वांना वाटत होतें कीं बापूजी बांजवळ बसले आहेत असा एक फोटो घेतां आला तर छान. बापूजींना बांजवळ बसायला सांगण्याचें काम माझ्यावर सोंपवण्यांत आलें. पण मीहि कसें काय सांगावें हाच मोठा प्रश्न होता. बापूजींना फोटोंची फार चीड आहे. कोणी एकदम त्यांचा फोटो घेतला तर गोष्ट निराळी. परंतु फोटो-साठीं बापू कधीं बसत नाहींत.

बापूजी असा आग्रह करीत होते कीं सगळ्यांनीं थोडथोडा वेळ आळीपाळीनें आराम घ्यावा. या आग्रहाच्या अनुरोधानें चार वाजतां मी म्हटलें: "बापूजी, मी थोडी विश्रांति घ्यायला जातें. आपण बांचा चार्ज घ्या." कनूला आशा होती कीं, देखरेखीचा चार्ज घेऊन बापू

बाजवळ बसतील त्यावेळीं मी फोटो काढीन. परंतु बापूंनीं म्हटलें: "देख-रेखीचा चार्ज मी घेतोंच, पण येथें बसल्याबसल्याच. बाकीचे बांजवळ बसले आहेत त्यांना बसूं दे. बा मला बोलावील तेव्हां मी बापाशीं जाईन."

साडेपांच वाजतां कर्नल शाह व कर्नल भंडारी पेनिसिलिन् घेऊन आले. बापूजींना विचारलें तेव्हां ते म्हणाले: "डॉ. गिल्डर व सुशीला द्यायला तयार असतील तर द्या." डॉ. गिल्डरनां बापूजींचा विचार माहीत होता, म्हणून त्यांना पेनिसिलिन् देण्याबाबत फार उत्साह नव्हता. देवदासभाईंबरोबर बोलणें झालें. दोन प्रश्न होते: एक तर मृत्युशय्येवर पहुडलेल्या बांना आतां कसलीं इन्जेक्शनें टोंचायचीं? ईश्वराच्या भरंवशावर राहूं द्या व शांतपणें जाऊं द्या. हें होतें बापूंचें मत. त्यांत बरेचसें सत्य होतें. दुसरा विचार असा होता कीं जोंवर प्राण आहे तोंवर आशा कां म्हणून सोडावी? प्रयत्न कां करूं नये? हें होतें सामान्य तटस्थ डॉक्टरी मत. देवदासभाई या दुसऱ्या मताचे होते. डॉ. गिल्डरनीं त्यांना म्हटलें: "तुमची इच्छा असेल तर आम्ही पेनिसिलिन् देण्यास तयार आहों." त्यांनीं मला सूचना केली म्हणून मी पिचकारी उकळत ठेवली. बापूजींनीं हें पाहिलें, व मला विचारूं लागले: "तुम्ही सर्वांनीं काय निश्चय केला आहे?" मी म्हटलें: "पेनिसिलिन् देऊं." बापूंनीं मला विचारलें: "तुम्हा दोघांना वाटतें का कीं दिलें पाहिजे? त्यामुळें गुण येईल?" त्यावर उत्तरादाखल मी हो तरी कशी म्हणूं? मी म्हटलें कीं आपण डॉ. गिल्डरांच्याजवळ बोलून पाहा.

बांची स्थिति कांहींशीं बरी वाटत होती. पेनिसिलिननें कदाचित् फायदा होईल या आशेच्या धाग्यानें माझ्या मनावरील भार कांहींसा हलका झाला. सकाळपासून खाल्लें नव्हतें म्हणून खावयास गेलें. जवळ-जवळ सगळेच खायला बसले. बापू डॉ. गिल्डरांना समजावून देवदास-भाईंची समजूत करायला गेले. डॉ. गिल्डरनीं मला म्हटलें: "बापूंना माहीत नव्हतें कीं यासाठीं कांहीं इंजेक्शनें द्यावीं लागतील. आतां कळलें, तेव्हां ते पेनिसिलिन् द्यायचें नाहीं म्हणत आहेत." मी पिचकारी उचलून बंद करून टाकली. मनांत थोडीशी निराशा झाली. त्याबरोबरच कांहींशी

शांतिहि लाभली कीं बांची अशी स्थिति असतां मला त्यांना सुई टोंचावी लागणार नाहीं.

बापू देवदासभाईंना समजावून सांगत होते कीं, "तूं ईश्वरावर विश्वास कां ठेवीत नाहींस ? मृतशय्येवर पडलेल्या आईलासुद्धां औषध देऊं पहातोस ?" वगैरे. या चर्चेत त्यांना फिरायला जायला उशीर झाला. दररोज साडेसहा वाजतां फिरण्यासाठीं खालीं निघून जात. आज जवळजवळ सवासात वाजायला आले होते. बोलणें पुरें करून खालीं जायची तयारी करण्यासाठीं म्हणून ते स्नानाच्या खोलींत गेले, इतक्यांत बा बोलल्या, "बापूजी". प्रभावतीबहेन जवळच बसलेल्या होत्या, त्यांनीं बापूजींना बोलाविलें. ते येऊन बांजवळ बसले. पण कनूला फोटो घ्यायची मनाई केली.

बांना फारच अस्वस्थता वाटत होती. दोनदा उठून बसल्या, फिरून निजल्या. बापूजींनीं विचारलें : "काय होतंय ?" अगदीं अपरिचित देशाच्या किनाऱ्यावर उभा असलेल्या भोळ्या बालकाप्रमाणें त्यांनीं अत्यंत करुण आवाजांत जीभ चांचरत चांचरत उत्तर दिलें : "कांहीं समजत नाहीं." मी नाडी पाहिली. फारच क्षीण झाली होती. परंतु दिवसांतून किती तरी वेळां नाडी मंद झाली होती. मला असें कळूं शकलें नाहीं कीं, आतां फक्त कांहीं मिनिटांचीच गोष्ट आहे. बांच्या खोलीच्या दाराजवळ व्हरांड्यांत कनू व मी बोलत होतों : "बापूजींनीं मनाई केली नसती तर किती सरस फोटो मिळाला असता ! साधारणतः कोणी न सांगतां फोटो घेतला तर अडवीत नाहींत आणि आजच तुला कां थांबविलें ?" त्यावेळीं आम्हाला एवढें समजलें नाहीं कीं बांजवळचीं बापूजींचीं तीं शेवटचीं पळें अत्यंत पवित्र होतीं आणि फोटोनें त्यांची पवित्रता कमी करण्याची त्यांची इच्छा नव्हती.

तितक्यांत बांचे भाऊ माधवदासमामा आले. बांनीं त्यांना ओळखलें. डोळ्यांत पाणी आलें; पण बोलूं शकल्या नाहींत. मी आंत आलें. बांनीं शेवटच्या घटकेला उठण्याचा प्रयत्न केला, पण बापूजींनीं म्हटलें : "आतां पडूनच रहा." बांनीं बापूजींच्या मांडीवर डोकें टेकलें. बांचे डोळे फिरल्यासारखे झाले, दोन चारदां उचकी आली, घशांतून अंतकाळची घरघर ऐकूं येऊं लागली. तोंड उघडलें गेलें. दोनचार आंचके

बसले, आणि बांचा आत्मा या दुनियेच्या बंधनांतून मुक्त झाला! बापूजींनीं म्हटलें होतें कीं बा कुणाच्या मांडीवर असतां जाणार? तें सौभाग्य कोणाच्या नशिबांत असेल? बापूजींवांचून दुसऱ्या कुणाच्या भाग्यांत तें असूं शकणार? फिरायला जातांना अकस्मात् त्यांना उशीर झाला नसता तर ते बांच्याजवळ शेवटच्या घटकेला येऊं शकले नसते. पण बांवरील त्यांच्या एकनिष्ठतेचें तसेंच त्यांच्या भक्तीचें फळ त्यांना देण्यास ईश्वर कसा विसरेल?

बापूजींनीं बांच्या डोक्याखालून तक्क्या काढून घेतला. खाटहि सरळ केली. मीरांबहेननें दुपारपासूनच खाटेची दिशा उत्तर-दक्षिण केलेली होती. सर्व रामनामाचा गजर करूं लागले. मी जडवत् उभी राहून पाहतच राहिलें. डॉक्टर असूनहि अन् कित्येक मृत्यु पाहिले असूनहि असें मरण तटस्थतेनें पाहणें मला अजून शिकावयाचे आहे.

बरोबर सात पस्तीसला बांनीं प्राण सोडला. देवदासभाई बांच्या खाटेवर डोकें टेंकून बालकासारखे 'बा, बा,' म्हणत ओक्साबोक्शीं रडूं लागले. बापूजींच्या डोळ्यांच्या कोपऱ्यांतून दोन मोती ओघळून पडले. शेवटीं बापूजी उठले. खोली रिकामी करण्यास सांगितलें. तुरुंगाच्या दरवाज्यांत मथुरादासभाई सहकुटुंब उभे होते. त्यांना अंतिम दर्शनासाठीं आंत यायची परवानगी मिळाली नव्हती. सरकारला भीति वाटत होती कीं बांच्या मृत्यूची बातमी बाहेर कळतांच कदाचित् दंगाधोपा झाला तर! अखेरीस बापूजींनीं त्यांना या अटीवर आंत यावयाची परवानगी मिळवून दिली कीं जोपर्यंत सरकारी परवानगी असेल तोपर्यंत आमच्यापैकीं कोणीं बाहेर जाणार नाहीं.

बापूजी, मी, मनू, संतोकबहेन सर्वांनीं मिळून बांना स्नान घातलें. केस साफ करून विंचरले आणि शव पुसून काढलें. शेवटच्या सफरीच्या-वेळीं पांघरण्यासाठीं बापूंच्या हातानें कांतलेल्या सुताची जी साडी बांनीं जपून ठेवली होती तिनें शवाला लपेटलें. लेडी ठाकरसींनीं गंगाजलांत भिजवलेली दुसरी एक साडी पाठविली. ती बापूंकडील साडीवर घातली. संतोकबहेननें बापूंनीं कांतलेल्या सुताचे केलेले चुडे बांना घातले. तुळशीची कंठी गळ्यांत घातली व डोक्यावर चंदन व कुंकवाचा मळवट भरला.

मनूनें व कनूनें ज्या ठिकाणीं बांनीं प्राण सोडला ती बापूजींची खोली स्वच्छ केली. मीरांबहेननें शव ठेवण्यासाठीं सफेत चुन्याचा लांबट चौकोन केला. उशागतीं सुंदर ॐ आणि पायागतीं सुंदर स्वस्तिक तयार केलें. शव तेथें आणून ठेवण्यांत आलें. मीरांबहेननें बांच्या केसांत फुलें गुंफलीं. बांच्या चेहऱ्यावर मंद स्मित विलसत होतें आणि अपूर्व शांति पसरली होती. जणूं झोंपीं गेल्या असाव्या तशा दिसत होत्या. सर्वांनीं एकत्र बसून प्रार्थना केली; गीतेचें पारायण केलें. दीड तासांत हा सर्व विधि पुरा झाला.

शांतिकुमारभाईनीं शवाच्या दहनासाठीं चंदनाचीं लांकडें मागविण्याचें बोलणें काढलें. बापूंनीं नाहीं म्हटलें : "बा गरीबाची पत्नी होती, गरीब माणूस चंदनबिंदन कुठून आणणार ?" आमचे सुपरिन्टेन्डेन्ट साहेब एकदम म्हणाले : "माझ्यापाशीं चंदनाचीं लाकडें आहेत." बापूंनीं उत्तर दिलें : "तुम्ही, म्हणजे सरकार, जें वापरूं इच्छीत असाल तें वापरूं शकतां. तुमच्यापासून चंदनाचीं लाकडें घेण्याला मला कांहींच हरकत नसणार." एक सबंध चंदनाच्या झाडाचीं लाकडें तेथें येऊन पडलीं.

मृत्यु होतांच कर्नल भंडारी सरकारतर्फे बापूजींना विचारावयास आले कीं शवाच्या अग्निसंस्काराबाबत आपली काय इच्छा आहे. बापूजींनीं तीन मार्ग सुचविले :

१. शव आपल्या मुलांच्या व नातेवाईकांच्या ताब्यांत द्यावें. याचा अर्थ असा कीं जाहीर रीतीनें लोकसमुदायाच्या देखत अग्निसंस्काराची क्रिया करण्यांत येईल व त्यांत सरकारनें कुठल्याहि प्रकारची ढवळाढवळ करूं नये.

असें होऊं शकत नसेल तर—

२. महादेवभाईप्रमाणें महालासमोरच अग्निसंस्कार करण्यांत यावा आणि नातेवाईकांना व मित्रांना हजर राहाण्यास परवानगी देण्यांत यावी.

३. परंतु सरकार एकट्या नातेवाईकांनाच येऊं देण्यास इच्छीत असेल व मित्रांना परवानगी मिळणार नसेल तर कुणींहि हजर राहावें अशी स्वतःची इच्छा नाहीं. तुरुंगांतील आपल्या सोबत्यांच्या मदतीनें स्वतः एकटे अग्निसंस्कार करतील.

सरकारला जें कांहीं करायचें असेल तें साजेल अशा तऱ्हेनें करावें व त्यांत घर्षणाचा प्रसंग येऊं नये अशी त्यांची खास विनंती होती. लोकसमुदायासमोर अंत्येष्टिसंस्कार करण्यांत येईल तर स्वतः एवढें सांगण्यास तयार होते कीं सरकारला दंग्याची भीति बाळगण्याचें कांहींच कारण नाहीं; "माझे मुलगे तेथें स्वतःचे प्राण धोक्यांत घालतील पण दंगा होऊं देणार नाहींत."

त्यांना विचारण्यांत आलें : "बाहेर अग्निसंस्कार करण्यांत आला तर तुम्ही स्वतः तेथें जाऊं इच्छितां काय ?"

बापूंनीं उत्तर दिलें : "नाहीं, माझे मुलगे, मित्र व नातेवाईक तें सर्व करतील. मी बाहेर जाणार नाहीं."

परंतु सरकार एका मोठ्या मिरवणूकीची जोखमदारी घ्यावयास तयार नव्हतें. या निमित्तानेंहि लोकांत जागृति होणें आणि उत्साह येणें सरकारला परवडण्यासारखें नव्हतें. म्हणून त्यानें दुसऱ्या अटीचा स्वीकार केला आणि मित्र व नातेवाईक यांच्या हजेरींत महालासमोरच दहन करण्याची परवानगी दिली.

गीतापठन झाल्यावर, म्हणजे जवळजवळ रात्रीं अकरा वाजतां, देवदासभाई, मनू व संतोकबहेनवांचून बाकी सर्वांना बाहेर जाण्याचा हुकूम मिळाला. आम्ही सर्व आळीपाळीनें शवाजवळ बसलों. सकाळीं शवापाशींच सर्वांनीं प्रार्थना केली. बापूजी शवाच्या उशाजवळ आपलें आसन ठेवून बसले होते.

२३ फेब्रुवारीला सकाळीं सात वाजल्यापासून बाहेरून सर्व येऊं लागले. मित्र व नातेवाईकांची संख्या जवळजवळ दीडशें पर्यंत होती. मनूनें शवाला आरती ओंवाळली. इतर सर्वांनीं शवाला प्रणाम केले. फुलांचा मोठा ढीग पडला. हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती, इंग्रज या सर्व जमातींतील मित्र हजर होते. महादेवभाईंची क्रिया ज्यानें केली ते ब्राह्मणहि आले. देवदासभाईंकडून सर्व क्रिया करविण्यांत आली.

शवाला चितेवर ठेवल्यावर बापूजींनीं एक लहानशी प्रार्थना करविली. तींत हिंदु, पारसी, मुसलमान या सर्व धर्मांची प्रार्थना होती. देवदासभाईंनीं अग्नि दिला. थोड्या मिनिटांतच ज्वाला भडकल्या. बांनीं 'करेंगे

या मरेंगे' ह्या मंत्राचें पुरें पालन करून दाखविलें. आतां त्या स्वतंत्र झाल्या होत्या. कुठली साम्राज्यसत्ता आतां त्यांना बंधनांत अडकवूं शकणार होती ?

चिता महादेवभाईंच्या समाधीच्या बाजूलाच होती. आईला वाटलें असावें कीं मुलाला एकटा सोडून माझ्यानें कसें जाववेल ! म्हणून ती त्याच्यापाशींच राहिली.

शांतिकुमारभाईंनीं सबंध दिवस मुलाप्रमाणें काम करून देवदास-भाईंचा भार हलका केला. शवाखालीं लाकडें जरा कमीं पडलीं. जळत्या चितेंत नवीन लाकडें ठेवीत असतां कनूच्या डोळ्यांच्या पापण्यांना थोडीशी आंच लागली.

बांच्या शरीरांतून प्राणी खूप निथळलें. त्यामुळें दहनक्रिया सायंकाळीं चार वाजतां पुरी झाली. तोंपर्यंत बापूजी चितेपाशींच होते. किती वेळां मित्रांनीं म्हटलें कीं आपण थकून जाल; पण बापूजींनीं तेथून हलायचें नाहीं म्हटलें. "बासष्ट वर्षांच्या सोबतिणीला या घटकेला मी अशीच कसा सोडूं शकेन बरें ? बासुद्धां त्याबद्दल मला माफ करणार नाहीं," बापूंनीं हंसून उत्तर दिलें. परंतु त्यांच्या हृदयांत तीव्र वेदना होत होत्या. ते ज्ञानी आहेत, महात्मा आहेत, परंतु मनुष्यहि आहेतच. सगळे निघून गेल्यावर रात्रीं खाटेवर निजल्यानिजल्या म्हणूं लागले : "बाविरहित जीवनाची मला कल्पनाहि करतां येत नाहीं. माझी अशी इच्छा होती कीं, बा माझ्या हयातींतच निघून जाईल तर बरें, म्हणजे माझ्यानंतर तिचें काय होईल अशी मला चिंता राहणार नाहीं. पण ती माझ्या जीवनाचें अविभाज्य अंग होती. तिच्या जाण्यामुळें माझ्या जीवनांत जो सुनेपणा आला आहे तो कधींहि भरून येऊं शकणार नाहीं." परत बोलूं लागले, "ईश्वरानेंसुद्धां माझी केवढी कसोटी पाहिली ! मी तुम्हाला पेनिसिलिन् देऊं दिलें असतें तरीहि ती जायची होतीच, परंतु तसें करण्यानें ईश्वरावरील माझ्या श्रद्धेंत न्यूनता आली असती. 'देवदासाला समजावूनच येतों आहें, पेनिसिलिन् न देण्याचा निश्चय पक्का होत आहे आणि बाची जाण्याची तयारी झाली आहे,—हासुद्धां एक विचित्र योगच आहे ! आणि बा माझ्याच मांडीवर गेली, त्यामुळें तर माझ्या हर्षाला सीमा राहिली नाहीं."

रामदासभाई सायंकाळीं आले. चिता अजून जळतच होती. देवदास-भाई व रामदासभाई यांना तीन दिवस महालांत राहण्याची परवानगी मिळाली. चौथ्या दिवशीं चितेची रक्षा व अस्थि गोळा करून त्यांनीं निरोप घेतला. नर्सा देखील एकामागून एक जाऊं लागल्या. कोणीसें म्हटलें : "बांनीं आपले प्राण देऊन एकदाचे जेलचे दरवाजे उघडविले. त्या त्यागमूर्ति होत्या. आपलें जीवित अर्पण करून इतक्या माणसांना बापूंच्या दर्शनाची सुवर्णसंधि मिळवून दिली."

बांच्या चितेच्या स्थानीं एक कच्ची समाधि रचण्यांत आली. महा-देवभाईंच्या समाधीवर शिंपा व शंखांनीं ॐ काढला होता. बांच्या समाधीवर शंखांनीं 'हे राम' लिहिण्यांत आलें. रोज सकाळ-संध्याकाळ आम्ही सर्व समाधीची यात्रा करीत असूं, फुलें वाहत असूं. सकाळीं गीतेच्या बाराव्या अध्यायाचा पाठहि करण्यांत येत होता. महादेवभाईंच्या समाधीवर फुलांचा क्रॉस करण्यास बापूजींनीं सुरुवात केली होती. बांच्या समाधीवर स्वस्तिक कर-ण्याचा निर्णय झाला. ही कांहीं मृत व्यक्तींचीं मूर्तिपूजा नव्हती; त्यांच्या गुणांचें स्मरण होतें, त्या गुणाबद्दलची श्रद्धांजलि होती; ईश्वराप्रत प्रार्थना होती कीं या दोन महान् व्यक्तीं — माता तसाच मुलगा — च्या गुणांचें आम्हालाहि अनुसरण करूं दे.

बांच्या आजाराच्या दिवसांत बापूजींना फार श्रम पडले होते. ते बरेच अशक्त झाले होते. शेवटीं त्यांना मलेरियानें पछाडलें. आगाखान महालांत तिसरा मृत्यु व्हावा अशी सरकारची इच्छा नव्हती. म्हणून ता. ६ मेला जेलचे दरवाजे उघडले गेले आणि बापूजी व त्यांच्याबरोबरचे सर्व सोबती यांना सोडून देण्यांत आलें.

सुटकेपूर्वीं बापूजींनीं सरकारला असें पत्र लिहिलें होतें कीं ह्या दोन समाधींचीं स्थानें हीं पवित्र स्थानें आहेत, त्यांचा कुठल्याहि अन्यप्रकारें उपयोग करण्यांत येता कामा नये; आणि लोकांना या समाधींपाशीं जाण्याची मोकळीक असली पाहिजे.

शेवटच्या दिवशीं सकाळीं सात वाजतां आम्ही सर्व दोन्ही समा-धींचा निरोप घेण्यास गेलों. पुरे ९३ आठवडे बापूजी या तुरुंगांत राहिले

होते. तें आमचें जणू घरच झालें होतें; आणि आमच्यांपैकीं दोघांना मागें ठेवून तेथून जाणें आम्हा सर्वांना जड वाटत होतें. पण ते देशाचे व बापूंचे सच्चे सेवक होते. देशाच्या अन् बापूंच्या सेवेंत त्यांनीं स्वतःचे प्राण अर्पण केले होते. आणि जेलचे दरवाजे खुले करविण्यांतहि त्यांचा हात होताच ना! जीवनांत आणि मरणाच्या द्वारांहि त्या दोघांनीं बापूजींची, अर्थात् देशाची, सेवांच केली होती. आजहि हे दोन आत्मे बापूजींचें रक्षण अन् सेवा करीत नसतीलच असें कोणाला म्हणतां येईल बरें?

पुरवणी

# अंत्येष्टि

भ्रातृभाव व सहानुभूति प्रदर्शित करणाऱ्या माझ्याकडे आलेल्या तसेच अटकबंदीच्या छावणीच्या पत्त्यावर माझ्या पिताजींकडे सरळ पाठविण्यांत आलेल्या संदेशांचा जाहीरपणें केवळ स्वीकार करण्यानें भागण्यासारखें नसून त्याबद्दल विशेष कांहीं तरी करणें आवश्यक वाटतें. त्यांतील बरेचसे फार परिश्रमपूर्वक व विस्तारानें लिहिण्यांत आले आहेत, आणि तरीहि त्यांच्या लेखकांचा आशय त्यांतून पूर्णपणें व्यक्त होत नाहीं. त्यांतून शोक प्रगट केला गेला आहे तो इतका हृदयद्रावक आहे कीं, त्यामुळे ते लेखक व जे प्रत्यक्ष वियोगदुःखांत बुडून गेले आहेत ते सर्व या दोहोंमध्यें परस्परांविषयीं सहानुभूति उत्पन्न व्हावी. माझ्या मातेच्या शेवटच्या क्षणांच्या अमूल्य व पवित्र आठवणी मी माझ्यापाशींच ठेवल्या व माझ्या संगेंच दुःखी झालेल्या मोठ्या समुदायाला, जाहीर रीतीनें जेवढ्या प्रमाणांत शक्य आहे तेवढ्या प्रमाणांत, तिचे भागिदार होऊं दिलें नाहीं तर, मला वाटतें, तें अयोग्य ठरेल. अजूनहि माझ्या शोकाचा उमाळा शांत झाला नाहीं व जणूं दैवावरचा माझा विश्वास हरपला असावा अशी विचित्रभावना माझ्या मनाला त्रास देत आहे. अर्थात् हें थोड्या वेळापुरतेंच आहे अशी माझी खात्री आहे. मी अचानक मातृविहीन झालों आहे; पण या मानसिक दशेविरुद्ध झुंजून तिच्यांतून पार होण्याची मी आशा बाळगून आहे.

शेवटच्या घटकेपर्यंत त्या संपूर्णपणें बेशुद्ध कधीं झाल्या नव्हत्या. शनिवारच्या सरकारी पत्रकांत त्यांची तब्येत गंभीर असल्याचें जाहीर झालें, तरीहि आजाराच्या या शेवटच्या अवस्थेंतून आपण सहीसलामत पार पडूं अशी आशा, त्या वेळच्या पूर्ण निराशाजनक परिस्थितींतसुद्धां त्या बाळगून होत्या. हृदयाच्या चलनाच्या मंदतेमुळें शेवटच्या कांहीं दिवसांपासून मूत्रपिंडांचें कार्य मंद पडलें होतें आणि तापरहित त्रिदोषामुळें स्थिति आणखी विशेष नाजूक झाली. रक्ताचा दाब कमी होत अगदीं ७५-५२ पर्यंत उतरला.

डॉक्टरांनीं तर आतां त्यांना वांचवितां येण्याची आशा सोडली होती आणि उपचार बंद केले होते. सोमवारीं संध्याकाळीं मी तेथें पोंचलों तेव्हां त्यांना भारी व्यथा होत होती. त्यांच्या बरोबरच्या बंदिस्तांच्या प्रेमपूर्ण शुश्रूषेमुळेंच वरून वरून ती व्यथा थोडी हलकी वाटत होती. त्या ती रात्र काढतील अशी डॉक्टरांची कल्पना नव्हती. त्यांच्या पार्थिव जीवनाची ती अखेरची रात्र होती. या रात्रीच्या प्रत्येक क्षणीं त्यांना त्यांच्या सोबत्यांच्या तशीच गांधीजींच्या हातची सेवाशुश्रूषा मिळाली होती.

अर्धवट बेशुद्ध अवस्थेंत प्रश्नांचीं उत्तरें त्या 'होय—नाहीं' म्हणून किंवा हळूच आपलें मस्तक हलवून देत. एकदा गांधीजी त्यांच्यापाशीं आले तेव्हां आपला हात उंच करून त्यांनीं विचारलें, "हे कोण आहेत?" आणि गांधीजी जवळजवळ तासभर त्यांची सेवा करीत बसले तेव्हां त्यांना बरीचशी स्वस्थता मिळालीसें वाटलें. त्यांच्याजवळ बसलेले गांधीजी, जरी त्यांचे हात कांपत होते तरीहि, त्यांच्यापेक्षां वयानें खुप लहान दिसत होते. या दृश्यावरून बत्तीस वर्षांपूर्वींचा आफ्रिकेंतील एक प्रसंग मला आठवला. बा त्यावेळीं तेथें तीन महिन्यांचा कारावास भोगून बाहेर आल्या होत्या. व त्यांचें शरीर अगदीं क्षीण झालें होतें. एका रेल्वे स्टेशनवर माझ्या आईवडिलांना पाहून एका ओळखीच्या युरोपियन गृहस्थानें विचारलें, "मि. गांधी, या तुमच्या मातुःश्री आहेत?"

सकाळीं त्यांची स्थिति जास्त खराब दिसत होती. परंतु त्या शांत व स्वस्थ होत्या. सोमवारीं त्या आशेच्या तंतूला चिकटून राहिल्या होत्या. मंगळवारीं त्या निवृत्त झाल्याशा मला वाटूं लागलें. युरेमियाचीं चिन्हें वाढत असतांहि त्यांचें मन अधिक शांत व स्पष्ट होतें.

सोमवारपासून त्यांनीं कुठल्याहि प्रकारचें औषध व पाणीहि घ्यायचें बंद केलें होतें. परंतु मंगळवारीं मध्याह्न समयीं थेंबभर गंगाजल घेण्यासाठीं त्यांनीं आपलें तोंड उघडलें. त्यामुळें त्यांना थोडा वेळ बरें वाटलें. त्यानंतर तीन वाजतां त्यांनीं मला आपल्याजवळ बोलाविलें आणि म्हणाल्या, "मी जातें. केव्हांतरी मला जावें लागणारच, मग आजच कां नाहीं?" मी त्यांचें शेवटचें मूल; माझ्यांत त्यांचा जीव अडकला होता हें उघडच होतें. पण वरीलप्रमाणें बोलून व इतरहि गोडगोड अन् प्रेमळ शब्दांच्या द्वारां

त्यांनीं सर्वांच्या देखत निश्चयानें माझ्यावरील आसक्ति दूर केली. त्यांची वाणी एवढी स्पष्ट कधीं ऐकली नव्हती व त्यांचे शब्द इतके गोड न् वेंचक मला कधीं भासले नव्हते.

यानंतर लगेच त्यांनीं आपले हात जोडले व कुणाच्याहि मदती-वांचून उठून बसल्या. नंतर आपलें मस्तक खालीं वांकवून, त्यांच्यानें करवेल तेवढा उंच आवाज करून, कांहीं मिनिटें त्यांनीं प्रार्थना केली: "हे ईश्वरा, माझ्या आधारा, तुझ्या दयेची मी याचना करीत आहें." हे हृदयवेधक शब्द त्यांनीं फिरफिरून उच्चारिले. अश्रु पुसण्यासाठीं मी खोलींतून बाहेर गेलों त्याचक्षणीं आगाखान महालाच्या आवारांत पेनि-सिलिन् येऊन पोंचलें होतें. तें औषध देऊन पाहण्याची डॉक्टरांची इच्छा नव्हती. त्रिदोष हा फक्त पूरक होता. मूत्रपिंडाच्या कार्यशक्तीची अखेरची क्षीणता पेनिसिलिननें दूर करणें शक्य नव्हतें. शिवाय तसें करण्याची वेळहि आतां निघून गेली होती. तथापि त्रिदोषावरील हें चमत्कारपूर्ण औषध देण्याची तयारी करण्यांत आली.

सुमारें पांच वाजतां बांपाशीं पुन्हा जायची मी हिंमत केली. यावेळीं त्यांनीं मंद हास्य केलें. हीं ४२ वर्षें माझे लाड पुरविणारें तें हास्य होतें; परंतु तेंच मरणाऱ्या मातेचें आपल्या पुत्राला आश्वासन देण्यासाठीं उमटलेलें विषादपूर्ण अंतिम हास्यहि होतें.

माझ्या बा मानवतेच्या जणूं मूर्ति होत्या. त्यांनीं माझ्याविषयीं दाखविलेल्या सविशेष प्रीतीबद्दल त्यांच्या निकट परिचयांत आलेल्या सर्वांची मी त्यांच्या वतीनें क्षमा मागतों. जिनें इतर रीतीनें ईश्वराच्या सृष्टीला उज्ज्वल केली अशा माझ्या मातेच्या क्षतीबद्दल ते अवश्य माफ करतील.

परंतु त्या हास्यानें पेनिसिलिनविषयींचें माझें कुतूहल पुन्हां जागृत केलें आणि त्याबाबत पुढचे उपाय करण्याविषयीं डॉक्टरांबरोबर विचार-विनिमय करणें मला माझें कर्तव्य वाटलें. डॉक्टर तें देऊन पाहायला तयार होते, पण तें यशस्वी होण्याची कांहीं आशा त्यांनीं दाखविली नाहीं. बांना त्रासदायक इंजेक्शनें देण्याच्या बाबतींत मी संमति दिली आहे असें कळतांच सायंकाळीं बगीच्यांत फिरण्याचें रहित करून गांधीजी माझ्या-बरोबर याविषयीं चर्चा करावयास आले. "तूं वाटेल तसलें अपूर्व

औषध आणलेंस तरीसुद्धां तूं आपल्या आईला आतां बरी करूं शकणार नाहींस. तूं आग्रह धरशील तर मी माझें म्हणणें सोडीन पण तुझा आग्रह अगदीं चुकीचा आहे. गेले दोन दिवस तिनें कांहींहि औषध कीं पाणी घ्यायचें नाकारलें आहे. आतां ती ईश्वराच्याच हातीं आहे. तुझी इच्छा असेल तर त्याच्या आड ये; परंतु तूं जो मार्ग पत्करूं इच्छितोस तो तूं पत्करूं नयेस असा माझा सल्ला आहे. व हें लक्षांत ठेव कीं, तूं असें करून चारचार किंवा सहासहा तासांनीं इंजेक्शन देऊन मरत असलेल्या आईला पीडा देण्याचें काम करीत आहेस." आतां मला चर्चा करण्यासारखें कांहीं राहिलें नव्हतें. डॉक्टरांनाहि हायसें वाटलें. माझ्या वडिलांबरोबरची माझी ही सर्वांत गोड चरफड पुरी होते न होते तोंच निरोप आला कीं बा त्यांना बोलावीत आहेत. त्यांनीं जाऊन, लगेच बांना आराम वाटेल अशा रीतीनें आधार देऊन बसलेल्या लोकांची जागा आपण घेतली. त्यांनीं बांना आपल्या खांद्यावर टेकविलें आणि आपल्याकडून देतां येईल तेवढा आराम देण्याचा प्रयत्न केला. इतरांप्रमाणेंच मी सावधानपणें समोर उभा होतों. तेव्हां मला दिसलें कीं बांच्या तोंडावरील कळा जास्त जास्त काळवंडत चालली आहे. पण तरीहि त्या बोलल्या आणि अधिक बरें वाटावें म्हणून हात वांकडे तिकडे फिरवूं लागल्या.

इतक्यांत एका पळभरांत अंतकाळ येऊन ठेपला. कितीतरी डोळ्यांतून आसवें वाहूं लागलीं. गांधीजींनीं मात्र आपले अश्रु आवरून धरले. सगळे बांभोंवतीं वर्तुळाकार उभे राहिले आणि त्यांच्यासह आजपर्यंत त्यांच्या आवडीचें जें भजन गात आले तें भजन गाऊं लागले. दोन मिनिटांत त्या निश्चेष्ट झाल्या! आमच्यापैकीं एकानें मला म्हटलें त्याप्रमाणें, आम्ही जेवून घेण्याची त्या वाट पाहत होत्या. अटकबंदीच्या छावणींत सहा वाजतां जेवण करण्यांत येई. सात पस्तीसला त्यांनीं देहविसर्जन केलें.

त्यांच्या अस्थि घेऊन अलाहाबादला जात असतां वाटेंमध्यें मी हें लिहीत आहे. सोमवारीं त्यांना त्रिवेणीमध्यें टाकण्यांत येईल. एका मुठींत मावतील एवढ्या लहान लहान मातेच्या अस्थि आहेत. बंदीच्या छावणींत निवास करणाऱ्यांनीं शुक्रवारीं चितेच्या राखेंतून त्या विधिपूर्वक गोळा केल्या होत्या. केळीच्या पानावर त्यांना ठेवलें होतें व त्यांवर फुलें, शेंदूर

व इतर सुगंधी द्रव्यें वाहण्यांत आलीं. नंतर पवित्र संस्काराचा विधि संपल्यावर अंतिम सफरीसाठीं त्यांना तयार करण्यांत आलें. अशा रीतीनें मी माझ्या आईबरोबर प्रवास करीत आहें. परंतु मला माहीत आहे कीं उद्यानंतर मला तिच्याबरोबर फिरून कधींहि प्रवास करतां येणार नाहीं.

दोन महानद्यांच्या संगमस्थानीं ह्या अस्थि टाकण्याची क्रिया करण्यांत यावी असा गांधीजींचा स्पष्ट निर्णय होता. "कोट्यवधि हिंदु जो धार्मिक विधि करतात तो तुझ्या मातेलाहि आवडेल," असें त्यांनीं मला सांगितलें. तशाच तऱ्हेची इच्छा व्यक्त करणारी पूज्य मालवीयजींची तार आली व त्यामुळें या निर्णयाला दुजोरा मिळाला. बहुतांश रक्षा रिवाजाप्रमाणें पुण्यानजीकच्या इंद्रायणी नदींत सोडण्यांत आली होती. विज्ञानाच्या दृष्टीनें या दुसऱ्या गोष्टीच्या योग्यपणाविषयीं मी साशंक आहे; व तिची विल्हेवाट लावण्याची दुसरी कुठलीहि रीत मी पसंत केली असती. परंतु विचाराला पटेल अशा दुसऱ्या कुठल्याहि मार्गाच्या विकल्पाच्या अभावीं रुढीचा जय झाला.

मला त्याप्रमाणेंच शुक्रवारीं सूर्योदयाच्यापूर्वीं माझ्याबरोबर नदीवर आलेल्या लहानशा जनसमूहाला उन्नत करणारी ती क्रिया होती.

अग्निसंस्कार झाल्यानंतर दुसरे दिवशीं गोळा करण्यांत आलेल्या राखेंतील कांहीं भाग अटकबंदीच्या छावणींत जपून ठेवण्यांत आला आहे. त्यांत चितेबरोबर जळून देखील अखंडित राहिलेल्या व नंतर मिळालेल्या पांच बांगड्यांचाहि समावेश होतो.

बांचा आजार अटकबंदीच्या छावणींत १९४२ सालच्या सप्टेंबर महिन्यापासून सुरू झाला. त्याच वेळीं हृदयाच्या रोगाचीं चिन्हें पहिल्यांदा दिसून आलीं. गेल्या चारपांच वर्षांपासून त्यांची तब्येत जरी बिघडली होती, तरी यापूर्वीं हृदयाच्या रोगाचा हल्ला कधींहि झाला नव्हता. कारावासाचा ताण सहन करण्याची त्यांच्यांत शारीरिक किंवा मानसिक ताकद राहिली नव्हती असें म्हणण्यांत लेशमात्रहि अतिशयोक्ति नाहीं. यापूर्वीं त्यांनीं पुष्कळ वेळां कारावास सहन केला आहे. विशेषतः, राजकोट संस्थानांतील एका दुसऱ्या गांवीं त्यांना एकांतवासाच्या कैदेचीसुद्धां शिक्षा करण्यांत आली होती, व तेव्हां एकदां त्या मरतां मरतां वांचल्या होत्या.

परंतु हा शेवटचा कारावास मात्र सर्वकाळ त्यांना तीव्र कसोटीसारखाच गेला, व मध्येंच त्यांचा आत्मा अन् शरीर दोन्हीं कोमेजूं लागलीं. आगाखान महाल व त्याच्या आसपासचें वातावरण, हीं त्यांना ज्या गोष्टीचा सराव होता त्याच्या अगदीं उलट होतीं. कांटेरी तारेचें कुंपण आणि चौकीपहारा यांनीं जें कांहीं अर्धवट होतें तें पुरें केलें. गेल्या वर्षीं त्यांनीं माझ्याजवळ ज्यांचें निंच छपरांच्या झोंपड्या असें वर्णन केलें त्या सेवाग्रामच्या निवासस्थानांत परत जाण्याची त्यांना आतुरता लागली होती, ही खरी गोष्ट जनतेला कळविण्यांत मी माझ्या प्रिय मातेच्या स्मृतीला कांहीं कमीपणा आणीत नाहीं. अनिश्चित समयाच्या बंदिवासाचा तर त्यांच्यावर याहूनहि अधिक परिणाम झाला व तेथें मिळणारीं सर्व शारीरिक सुखें त्यांच्या मनाला कीं आत्म्याला शांतता देऊं शकलीं नाहींत. हजारों इतर लोक—ज्यांपैकीं कित्येक तर त्यांच्या निकट परिचयाचे होते—आपल्यासारखें च बंधन सहन करीत आहेत या गोष्टीमुळें त्यांचें दुःख अधिक तीव्र झालें व गेल्या दीडवर्षापासून तर त्यांची नेहमींची एक मूक प्रार्थना ही होती कीं, त्यांना व बापूंजींना कायमचे अटकेंत ठेवून इतर सर्वांना सोडून देण्यांत येवो.

त्यांच्या आजारानें गंभीर स्वरूप धारण केलें त्यावेळीं त्यांना कैदेंतून सोडण्यांत आलें असतें तर तें फायदेशीर झालें असतें काय? सोडून देण्याबरोबरच त्यांना इच्छा होईल तेव्हां परत अटकेंत येऊन बसण्याची मोकळीकहि त्यांना देण्यांत आली असती तर यापासून त्यांना अवश्य फायदा झाला असता. असें करण्यांत आलें असतें तर तें पूर्णपणें 'मायाळूपण' म्हटलें गेलें असतें. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं त्या कर्त्याहर्त्या परमेश्वराच्या करुणामय अंतिम दरखास्तीशिवाय सुटकेच्या दुसऱ्या कोणत्याहि दरखास्तीचा मानसिक समाधानापुरताहि लाभ त्यांना मिळाला नाहीं. त्यामुळें, हिंदी सरकारनें त्यांना सोडण्याची अनेक वेळां इच्छा व्यक्त केली परंतु त्या ऑफरचा लाभ घेण्याचें त्यांनीं नाकारलें, अशा अर्थाचें अमेरिकेंतील हिंदी सरकारच्या एजंटानें केलेलें स्पष्टीकरण पाहून मला मोठा धक्का बसला व अचंबाहि वाटला. या संबंधांत हिंदुस्थानांत करण्यांत आलेल्या अधिकृत घोषणांहूनहि हें निराळें आहे; आणि अमेरिकेंत ही गोष्ट निराळ्या

स्वरूपांत प्रसिद्ध करण्यांत आली याविषयींचा खुलासा अजूनपर्यंत माझ्या पाहण्यांत आला नाहीं.

ज्यांनीं आम्हाला सांत्वनपर संदेश पाठविले आहेत, त्याचप्रमाणें जे मूकभावानें आमच्या शोकांत समभागी झाले आहेत, त्या सर्वांचें मी माझ्या तीन भावांच्या व इतर नातेवाईकांच्या वतीनें अगदीं मनापासून आभार मानतों. या वियोगदुःखांत जे कोट्यवधि स्वजन आमच्या एवढेच दुःखी झाले आहेत त्यांव्यतिरिक्त आम्हाला दुसरे बहीणभाऊ नाहींत.

या जाहीर निवेदनाच्या कामीं मी फार समय घालवला आहे, वृत्तपत्राची प्रमाणाबाहेर जागा अडविली आहे, असें ज्यांना वाटत असेल त्यांची मी नम्रभावें क्षमा मागतों. हा प्रसंग सहिष्णुता दाखवण्यास योग्य आहे. आमच्यावर आलेल्या आश्वासनपर संदेशांच्या द्वारा तसेंच अन्य रीतीनें आमच्याबद्दल दाखविण्यांत आलेल्या सहानुभूतीचा जाहीरपणें आभारपूर्वक स्वीकार न करण्याची चूक मी केली असती तर आमच्या दुःखांत भागीदार असणाऱ्या क्रोडो देशबांधवांच्या रास्त आक्षेपाचा धनी झालों असतों, अशा तऱ्हेची माझी मनोभावना मी थांबवूं शकत नाहीं.

या कसोटींतून गांधीजी कसे पार पडले याविषयीं मला दोन शब्द लिहिले पाहिजेत. त्यांच्या जीवनांत पडलेली ही करुण उणीव त्यांना जांचत आहे, कारण त्यांच्या विकासांत बांचा मोठा वांटा आहे. परंतु ते तत्त्वज्ञान्या-सारखी शांतता बाळगूं शकले आहेत; आणि त्यांच्यापासून आपण जशी अपेक्षा बाळगतों त्याप्रमाणें ते आपल्या भावनेवर ताबा ठेवून आहेत. त्यांच्या आसपासचें वातावरण खिन्नतेशिवायच्या उदासीपणाचें होतें व शुक्रवारीं माझे भाऊ व मी त्यांच्यापासून दूर जायला निघालों तेव्हां आंसवांच्याबदलीं त्यांनीं त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें गंमत केली. मला वाटतें त्यांची तब्येत चांगली आहे.

# बा

बांच्या विषयीं कांहीं बोलणें किंवा लिहिणें अतिशय कठिण आहे. मानवहृदयाची आणि मानवचित्ताची शुचिता व सरळता यांच्या त्या प्रतीकच होत्या. जी व्यक्ति तिनें तिलाहि माहिती नसेल अशा प्रकारें कुणा भिन्न भूमिकेवर संचार करीत होती, तिचें वर्णन करण्याला वाणी असमर्थ आहे. बा म्हणजे 'बा'च होत्या. अगदीं साध्यासुध्या, पण धीर न् वीर. दुसऱ्यांची चूक त्यांच्या मनांत कधींहि राहत नसे. आश्रमांत किंवा बाहेर कुणी कांहीं अयोग्य केलें असेल व त्याची गोष्ट निघाली तर बा एकदम म्हणत, "पण त्यानें असें कां केलें असावें?"

बांविषयीं पुष्कळ लोक असें मानतात कीं त्या एक मवाळ, गरीबशा हिंदु पत्नी होत्या. जणूं केवळ पतीची छायाच. पण ही गोष्ट मुळींच खरी नाहीं. बासुद्धां बापूंसारख्याच स्वतंत्र व्यक्तित्वाच्या होत्या. केवळ बुद्धीनेंच नव्हे, तर अंतःप्रेरणेनेंच त्या सत्य ओळखीत असत आणि आपले स्वतंत्र निर्णय करीत. स्वतःच्या बळानेंच त्या आपल्या उच्च कक्षेपर्यंत पोंचल्या होत्या. बापू इतके महान् आहेत व स्त्रीत्वाचे एवढे मोठे पूजक आहेत कीं कुणालाहि ते बळेंच आपल्याबरोबर ओढणार नाहींत. शेंकडों वर्षांपासून रूढ झालेल्या परंपरांचा त्याग करतांना बांना स्वाभाविकपणेंच कठिण वाटलें. साबरमती आश्रमांत अस्पृश्यतेच्या कमालीच्या वाईटपणाबद्दल बांना समजावतांना बापूंनाहि वेळ लागला. पण एकदां बांची खात्री झाली व बांना तें कळून चुकलें, त्याबरोबर हरिजन त्यांचे लाडके होऊन गेले.

मरणाच्यापूर्वीं दोन वर्षें सेवाग्रामांत आपल्या झोंपडीच्या पश्चिमाभिमुख ओट्यावर बसलेल्या बांचें चित्र माझ्या नजरेसमोर उभें राहतें. सबंध देशांतून बापूंना भेटायला येणाऱ्यांना बापूंच्या झोंपडीकडे जातांना या ओट्यासमोरून जावें लागें. पुष्कळ लोक बांना नमस्कार करायला जात व त्यांच्या हंसतमुखाच्या दर्शनाचा आनंद लुटीत. सर्वांसाठीं मायाममतेचे दोन गोड शब्द बांजवळ असायचेच. बांचें तें शांत न् मधुर दर्शन कोणीहि विसरूं शकणार नाहीं. मला तर बांचा आवाज कधींहि विसरतां येणार नाहीं असें

वाटतें. त्या आवाजांत एक अद्‌भुत मार्दव होतें; पक्षाच्या गोड किलबिलाटासारखें कांहींतरी होतें. बा चिडलेल्या असल्या व कुणाला रागें भरत असल्या तरीहि त्यांच्या आवाजांतील मृदुता नाहींशी होत नसे. कॉंग्रेसच्या कार्यकारिणी समितीचे सभासद गांधीजींबरोबर तासन्‌तास चर्चा करून हवे तेवढे थकून गेलेले असले, तरी त्या ओट्यावर बांना भेटल्यावांचून कधीं जात नसत. बांना भेटण्याची प्रत्येकाची रीत निराळी. वल्लभभाई हे लहानग्या मस्तीखोर कहानालाच चिडवीत व त्याच्याबरोबर धिंगामस्ती करायला लागत. कहानाहि वल्लभभाईंना धिटाईनें उत्तरें देऊन हंसवी. मौलाना गंभीरपणें बांजवळ येऊन त्यांच्या तब्येतीविषयीं कुशल विचारीत अन् नमस्कार करून जात. जवाहरलाल जर खुषींत असले तर कांहींतरी विचित्र क्रांतिकारक शक्कल काढून बांना चिडविण्याचा प्रयत्न करीत. त्यांना वाटे कीं बा रागावून विरोध करतील; पण बा मात्र आपलें मधुर हास्य करीत हळूच म्हणत कीं, भाई, तुमची गोष्ट खोटी आहे, तुम्ही कुठेंतरी चुकत आहांत. जवाहरलाल थकलेले असत तेव्हां बांना हात जोडून नमस्कार करीत आणि कुशल प्रश्न विचारून पुढें जात. पण बांना तें आवडत नसें. त्या दिवशीं बापूंच्यावर प्रश्नांचा पाऊस पडे. "आज जवाहर कां बरें थोडासा उदासवाणा दिसत होता? तुम्ही त्याला कांहीं म्हटलें तर नाहीं ना?" बापू हंसत उत्तर देत, "तूंसुद्धां जवाहरसारखी कल्पनातरंगी झाली आहेस कीं काय? आमच्यामध्यें आज तर कसलाहि मतभेद झाला नाहीं." राजेन्द्रबाबूंबरोबर तर कसलीच भानगड नसे. कदाचित् दोहोंच्या स्वभावाची घडणच एक प्रकारची, त्यामुळेंच असें असावें. दोहोंच्याहि हृदयांत कटुपणा नांवाचा पदार्थच नाहीं. आणि विरळ व्यक्तित्व धारण करणारे ते महान पठाण, खान अब्दुल गफारखान. त्यांच्या हृदयांत युद्ध व हिंसेविषयीं गांधीजींच्या एवढीच तीव्र नावड आहे. ते तर बांपाशींच बसत आणि पश्चिमेकडच्या खालीं उतरणाऱ्या प्रकाशाकडे पाहत राहत. कार्यकारिणी सभेचे इतर सर्व सभासद सायंकाळीं वर्ध्यास जात, पण खानसाहेब मात्र सेवाग्रामांतच राहत.

नारीत्वामध्यें केवढा गौरव व केवढें वैभव आहे याची कल्पना बा व सरोजिनी देवी यांच्यावरून आपणाला येईल. केवढें वैविध्य, केवढी

तेजस्विता, केवढें सनातन यौवन! आपण होऊन स्वीकारलेल्या आदर्शो-साठीं, हृदयांत कटुपणाचा लवलेशहि न बाळगतां, सर्व कांहीं सहन करण्याची केवढी तयारी, केवढें धैर्य, केवढी अचल श्रद्धा, केवढी शक्ति! या दोन स्त्रियांना पाहून आपल्याला असा एक दिव्य साक्षात्कार नाहीं का होत कीं, आपली भारतभूमि म्हणजे एक श्रेष्ठ स्त्रियांचा देश आहे? मानवप्रेम व मानवसेवा या गांधीजींच्या महान् आदर्शाला धरून तो राहील आणि बाजारी, लष्करी अन् सत्तेच्या स्पर्धेत तो पडणार नाहीं.

बापूंप्रमाणेंच इतर पुष्कळ जण त्या स्तब्ध झालेल्या आवाजाला ऐकण्यास तळमळत असतील. पण या शोकामागें अमर अशी आशा उभी आहे कीं, बांसारखीं माणसें कधीं मरत नसतातच. अमरत्वाचे खरे वारस अशीं माणसेंच होत.

या हिंदुस्थानाखेरीज दुसऱ्या एखाद्या देशांत जन्मणें बा किंवा बापूंना शक्य झालें असतें काय? या प्रश्नाचें उत्तर मला स्पष्ट नकारात्मक मिळतें. मी असें मानणारी आहे कीं, या देशांत त्यांना जेवढें प्रेम न् पूजा मिळाली तेवढीं दुसऱ्या कुठल्याहि देशांत मिळतीं ना. या विचारानें आपल्याला आश्वासन मिळतें. पुराण कालापासून चालत आलेल्या आपल्या प्राचीन संस्कृतीचे ते मानवरूपी अवतार आहेत. आज जरी आपल्या त्या संस्कृतीवर विकृतींचे चरे पडलेले असले, तरीहि मूळांत आपली संस्कृति ही शांति व ज्योतीची संस्कृति आहे. माणसाला ती ईश्वराचाच अंश मानते. दुसरी कोठलीहि संस्कृति माणसाला एवढ्या शक्तीची व एवढ्या स्वतंत्रतेची। आशा दाखवीत नाहीं. मात्र आजच्या दुनियेची करणी पाहिली म्हणजे शक्तीचा अर्थसुद्धां जणूं अगदीं निराळाच झालेला दिसतो. आज जे स्वतःच्या विरोधकांचें जास्तींत जास्त नुकसान करूं शकतात ते आपल्याला अधिकांत अधिक शक्तिमान समजतात. शक्तीचा अर्थ गांधीजी व आपला देश असा करतात कीं, हृदयांत द्वेष न बाळगतां जे सर्वांत जास्त कष्ट सहन करण्यास तयार होतात त्यांच्या पायाशीं शक्ति आपोआप येऊन बसते. भौतिक सत्ता मिळविण्यासाठीं मोठा लढा उत्पन्न करून जग आपल्या वारसदारीवर आज निखारे ठेवीत आहे, हें किती करुण आणि वेडेपणाचें आहे! विचारवंत लोकांच्या मनांत मात्र याबद्दल लेशभरहि शंका नाहीं

कीं, मदानें धुंद झालेल्या या लोकांना मागें पाऊल घ्यावेंच लागेल व आधुनिक जगताचा पुरुषोत्तम जी शांतिवीणा दगडांच्या भिंतींमागें वाजवीत बसला आहे ती सर्व दुनियेला कान देऊन ऐकावीच लागेल. या मदोन्मत्त जगाच्या समोर उभें राहून "तुम्ही सर्वजण चुकत आहांत, मीच एक खरा आहे—तुमचीं हृदयें पालटेपर्यंत मी कदाचित् जिवंत नसेन, तरीहि काळ व भावि प्रजा माझ्या वचनाची साक्ष देतील," असें सांगणें हें कांहीं किरकोळ छातीच्या माणसाचें काम नाहीं. आपल्या बा अशाच एका पुरुषाच्या जीवनसाथी होत्या. सबंध जीवन-भर त्या त्यांच्या सोबती राहिल्या आहेत. त्यांच्या विरहवेदनेचा थांग कोणाला लागणार? हें कोणाला कळावयाचें देखील नाहीं. कारण बापू आपल्या जीवनाचे खोलांतील खोल अनुभव मौन पाळून ईश्वरसान्निध्यांत घेत असतात.

पुष्कळ वर्षांपूर्वीं बापूंनीं अस्पृश्यतेच्या कलंकाविरुद्ध धर्मयुद्ध पुकारलें तेव्हां बांचें मन वळवण्यास त्यांना फार कठिण गेलें. अगदीं धीर खुटूं न देतां बापू बांना समजावून सांगत. रोज तासन् तास चर्चा करीत. एक दिवस तर हरिजनांना स्वैंपाकघरांत येऊं देऊन स्वैंपाक करूं देण्याबद्दल बांना पटवून देतांना ते थकून गेले व म्हणाले, "या मुद्याविषयीं बाची समजूत घालणें फारच कठिण आहे." पण हे शब्द उच्चारतांनाच त्यांची दृष्टि अन्तर्मुख होऊन खोलवर गेली व ते म्हणाले: "परंतु असें असूनहि मला जन्मोजन्म सोबतिणीची निवड करावी लागली तर मी बालाच पसंत करीन." बापूंच्या या शब्दांपेक्षां इतर कोणत्या शब्दांनीं बांच्या खऱ्या स्वरूपाचें वर्णन होऊं शकेल?

बांविषयीं आपण भाषेच्या द्वारा विचार करूं शकणार नाहीं. त्यांची मूर्ति, त्यांचें चित्र नजरेसमोर उभें केलें पाहिजे. त्यांची चाल, त्यांचें चलनवलन, त्यांचा मृदु आवाज व यापेक्षांहि वरचढ असें त्यांचें गोड, निर्मळ स्मित, यामुळें त्या महान विभूतीच्या शुचितेचें व वीरतेचें खरें दर्शन घडतें. तसें पाहिलें तर बा जाज्वल्य नव्हत्या. दक्षिण आफ्रिकेंत व येथें स्वातंत्र्याच्या चळवळींत बा कित्येक वेळां तुरुंगांत गेल्या होत्या, पण यांत आपण कांहीं असाधारण केलें आहे असें त्यांनीं कधींहि दाखविलें नाहीं.

देशासाठीं दिलेलीं महान बलिदानें, स्वेच्छापूर्वक गरीबीचा स्वीकार, सर्वस्वाचा, आपल्या प्रिय पतीच्या संगतीचासुद्धां, त्याग — हें सर्व बांनीं स्वभावसहज निरभिमान वृत्तीनें केलें आहे.

बा अखेरच्या कैदेंत गेल्या तेव्हां मी तेथें होतें. पोलीस अंमलदार येऊन थडकला तेव्हां तेवढ्याच मधुरपणानें त्या आपली चीजवस्त बांधू लागल्या. शिवाजी पार्कमधील सभेंत जाऊन आदल्या दिवशीं जाहीर झाल्याप्रमाणें बा बापूंचा संदेश देणार होत्या. धरपकडीचा विधि फार विचित्र तऱ्हेचा झाला. एक मोठा धिप्पाड अंमलदार बांसमोर हात जोडून उभा राहिला (अर्थात् तो हिंदी होता) व मस्तक खालीं नमवून बांना विचारूं लागला कीं, "आपण घरींच राहणार कीं सभेंत जाणार आहां? आपला काय हुकूम आहे?" आपल्यासारखा अल्पात्मा असा शरीरानें धिप्पाड आहे आणि बांसारख्या महात्मा शरीरानें अशा लहान न् नाजुक आहेत. हें पाहून त्यालाहि कसेंसेंच वाटलें असेल. बांनीं आपलें नेहमीचें मधुर हास्य करून झटकन् उत्तर दिलें: "मी तर सभेंतच जाणार आहे." तो अंमलदार अधिकच बुचकळ्यांत पडला. अखेरीस तो म्हणाला, "तर मग आपण या मोटारींत बसाल? मी आपणाला बापूंपाशीं घेऊन जाईन." बांच्या धरपकडीचा हा विधि. आश्रमांतील एका मुलाच्या मनांत आलें अन् तो बांच्या साडीला 'करेंगे या मरेंगे'ची एक पट्टी लावूं लागला. बांनीं हळूच त्याला दूर करून म्हटलें: "असलें मला शोभणार नाहीं." बांची ती शेवटची यात्रा. तेथून त्या परत आल्या नाहींत. त्यांनीं त्या सूत्राचें पालन कुठल्याहि प्रकारच्या डामडौलावांचून केलें. मी ऐकलें आहे कीं आगाखान महालांतील त्या उदासवाण्या वातावरणांत त्यांना बरें वाटत नव्हतें. आश्रमांतील साध्या पण स्वच्छ झोंपड्यांची त्यांना संवय झालेली होती. आंत अपरंपार धूळ सांचून राहण्याएवढें अवाढव्य फर्निचर त्यांना आवडत नसे. तेथील वातावरण तर प्रतिकूल होतेंच. तशांत आणखी महादेवभाईंचा थोड्याच दिवसांनीं मृत्यु झाला.

मी त्यांना अखेरच्या पाहिल्या त्या बापूंच्या शेवटच्या उपवासाच्या वेळीं. नक्की तारीख द्यायची तर १८ फेब्रुवारी १९४३ रोजीं. बापूंच्या काळजी करण्यासारख्या दिवसांतील तो पहिला दिवस होता. २१ रविवार-

पासून पारडें फिरलें. बांच्या चेहऱ्यावरील त्या दिवशीचें दुःख हृदयविदारक होतें. सबंध देशाच्या — राव आणि रंक — सर्वांच्या हृदयाला व्यापून राहिलेल्या दुःखाचें अन् ग्लानीचें जणूं त्या प्रतीक होत्या. जणूं असें वाटत होतें कीं अखिल राष्ट्राच्या वतीनें बा असें तर म्हणत नसाव्यात कीं : "नाहीं, नाहीं, हे भगवंता, एवढा मोठा बळी घेऊं नकोस. या अंधकारांतून आणि या भयंकर अटवीमधून आमच्या देशाला प्रकाश व शांतीच्या मार्गानें नेण्यासाठीं आमच्या या पुढाऱ्याला वांचव." बापू मात्र शांत होते व म्हणत होते कीं, "कोणी घाबरू नका. या तीराला किंवा पैलतीराला सर्व एकच आहे. मी तयार आहें." अशा परित्यागापुढें व अशा ईश्वरश्रद्धेपुढें शोकाला अवकाशच उरत नाहीं. पण आपल्या वीरतापूर्ण स्मिताच्या मागें लपलेलें बांचें दुःख असह्य होतें. आगाखान महालाच्या समोर उभ्या असलेल्या दोन दोन चौकीपाहऱ्यांतून बाहेर निघतांना माझें व माझ्या सोबत्याचें हृदय भग्नच झालें. बापू कदाचित् जातील या दुःखापेक्षांहि बांचें काय होईल हा विचार अधिक दुःखप्रद होता. हें शेवटचें चित्र विसरून जाण्याचा मी आटोकाट यत्न करतें. राष्ट्रीय वावटळीच्या थोड्या दिवसांपूर्वीं मी सेवाग्रामाला गेलें होतें त्यावेळचें बांचें चित्र मनांत बाळगणें मला फार आवडतें. प्रार्थनेच्या चौकाच्या बाजूस असणाऱ्या त्यांच्या झोंपडीच्या ओट्यावर बा बसल्या आहेत, त्यांच्या आजूबाजूला भगिनींचा दरबार भरला आहे आणि बा आपल्या विलक्षण आणि अनुपम शैलींत सगळ्यांबरोबर गप्पागोष्टी करीत आहेत. त्यावेळच्या बांच्या स्मितामधून मिळणारा प्रकाश जितका अद्भुत होता तेवढीच अद्भुत, बा कित्येकांच्या साठीं काम करकरून थकलेले आपले दोन्ही हात जोडून सर्वांना 'या बसा' म्हणत अथवा निरोप देत, ही गोष्ट होती! आतां तर अमर व विभूतिमय अशा भारतीय नारी – मंडलांत सीता आणि सावित्रीच्याजवळ बा जाऊन बसल्या आहेत. हजारों वर्षें त्या भारतीयांना आश्वासन व धीर मिळविण्याचें स्थान होऊन राहतील.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
६७२६

द्रा. क्र.

## आमचीं मराठी प्रकाशनें

१. एक धर्मयुद्ध — लेखक: महादेव हरिभाई देसाई; अनु. पां. ग. देशपांडे, पृ. सं. ८ + ९८; किंमत रु. ०–१४–०

यांत १९१८ सालच्या अमदाबाद येथील गिरणीकामगारांच्या लढ्याचा इतिहास दिलेला आहे.

२. **विधायक कार्यक्रम** : त्याचें रहस्य व स्थान — लेखक: मो. क. गांधी; अनु. पां. ग. देशपांडे; पृ. सं. ४०; किंमत रु. ०–६–०

गांधीजींच्या अठरा-कलमी विधायक कार्यक्रमाची सुधारून वाढवलेली ही नवी आवृत्ति आहे.

३. **जीवनांतील आनंद** — लेखक: काकासाहेब कालेलकर; अनु. पां. ग. देशपांडे; पृष्ठसंख्या अदमासें पावणे तीनशें

निसर्गाच्या विविध विभूति आणि कलाविषयक लेखांचा संग्रह.

छापत आहे.

## आगामी प्रकाशनें

१. **मलेरिया** — संपादक: वि. म. कोठारी; अनु. पां. ग. देशपांडे

२. **उत्तरेकडील भिंती** — लेखक: काकासाहेब कालेलकर

३. **त्यागमूर्ति व इतर लेख** — लेखक: मो. क. गांधी; अनु. गो. रा. कुळकर्णी

हा गांधीजींच्या सामाजिक लेखांचा संग्रह आहे.

४. **स्त्री-पुरुष मर्यादा** — लेखक: किशोरलाल घ. मशरूवाळा; अनु. रा. ज. सोमण

५. **हिन्दस्वराज्य** — लेखक: मो. क. गांधी; अनु. पां. ग. देशपांडे

REFBK-0006726